ठाणें.

म. ग्रं. सं.
विषय
वा. नं.

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
संग्रहालय क्रमांक
लेखक
पुस्तकाचें नांव
सन

(धर्म)



# सच्छास्त्रमंडन

अथवा

# स्वर्णकारद्विजत्वखंडन.

हें पुस्तक

## विठ्ठल शिवरामशास्त्री नारळेकर

यांनीं

तयार करून

## मुंबईंत

जगदीश्वर छापखान्यांत छापविलें.

मिति मार्गशीर्ष शुद्ध ८

शके १७९८ धातृनाम संवत्सरे.

सन १८७६ इसवी.

हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें रजिस्टर केलें आहे.

किम्मत २ रुपये.

# वेदोद्धारक ऋषि.


वेदांचे शाखाभेद दाखविणारे शाकलादि ऋषि.
१० मंडलांचे भेद दाखविणारे गृत्समदादि ऋषि.
ब्राह्मण, आरण्यकांचे ऐतरेयादि ऋषि.
सूत्रे, निरुक्त इत्यादिकांचे आश्वलायनादि ऋषि.

# प्रस्तावना.

सांप्रतकालीं सर्व ज्ञातीच्या लोकांस आपआपल्या विचारास येईल तो तो धर्म स्वीकारण्यास व त्या अन्वयें वागण्यास मोकळीक आहे. याचें कारण असें कीं आपले राज्यकर्ते जे इंग्लिश लोक त्यांचा धर्म प्रजांच्या धर्मा पासून केवळ निराळा असून ते ह्मणजे इंग्लिश लोक आपल्या जातीच्या प्रजा अमुकच धर्मानें वागतात व अमुकच मतें का प्रतिपादन करितात इकडे बिलकुल लक्ष्य देत नाहींत. परंतु या स्तुत्य मोकळिकेचा किती एक लोक फारच बेजड रीतीनें उपयोग करितात व आपणास महत्व मिळवून आपला स्वार्थ साधण्या करितां भलभलतीं वचनें बनावट करून ती प्राचीन व सर्वमान्य आहेत असें दाखविण्या करितां त्यांवर ग्रंथही रचून सुज्ञ व विद्वान् लोकांस फसविण्याचे उद्देशानें ते प्रसिद्ध करितात. याचें ढळढळीत उदाहरण ज्या लोकांहीं स्वर्णकाररुत ब्रह्मविचारादि म्हणून ग्रंथ (वासुदेव आत्माराम शेट प्रभृति सोनारांच्या उदार आश्रया खालीं प्रसिद्ध झाले आहेत) पाहिले असतील त्यांच्या आढळण्यांत आले असतील यांत संशय नाहीं, सोनार हेच ब्राह्मण व बाकीचे म्हणजे ज्यांस कोंकणस्थ, देशस्थ, कऱ्हाडे, देवरुखे, व पंचगौड, पंचद्राविड या संज्ञेनें प्रसिद्ध आहे त्यांस यत्किंचित् ही द्विजत्वाची छाया नाहीं असा व्यर्थ ढोल वाजवून वरील वेदशास्त्राधिकार शून्य वासुदेव आत्माराम शेट आदिकरून सोनारांनीं मुंबईत बरीच वर्षे आपल्या बाष्कळपणाचें प्रदर्शन मांडलें आहे. सोनार हे खरेच ब्राह्मण असून त्यांस षट्कर्मांचा व वेदाध्ययनादिकाचा अधिकार आहे. त्यांचा सांप्रतचा हातोडा बागेसरी वगैरे वापरून उदरनिर्वाह करण्याचा धंदा हा केवळ नूतन आहे; अशा विषयीं पुरातन ग्रंथाधार वासुदेवशेट आदिकरून सोनारांनी प्रसिद्ध केला असता म्हणजे आमच्या तर काय परंतु सर्व बुधजनांच्या पूज्यतेस पात्र झाले असते. परंतु बिचारे करितील काय? द्विजत्वाच्या रस्त्यानें हीजे कधीं गेले नाहींत त्यांस ते मिळणार कोठून? तेव्हां अर्थात कोण्या अर्थलुब्ध व्युत्पन्नास कांहीं द्रव्य देऊन

त्यांच्याकडून कांहीं जुन्या ग्रंथांचीं नांवें शिकून त्यांवर संस्कृत श्लोक बनाऊन आपल्या तोंडापुढें द्विजत्वाची आरती आपल्याच हातानें ओवाळून वाक्देवादिप्रभृति सोनारांनीं घेतली यांत कांहीं आश्चर्य नाहीं. वाचक हो या सोनारांनीं आपणास ब्राह्मणत्व आणण्या करितां किती खटपट केली ती पहा. (१) स्कंदपुराणांतर्गत नागरखंडाचें नांव देऊन ९७ श्लोक बनावट घातले (२) रुद्रयामलांतील म्हणून वचनें खोटीं केलीं (३) शैवागम लिंग पुराणोक्त आहे असें लिहून त्यांतील श्लोकांच्या मिषानें दुसरे श्लोक करून घातले (४) अग्निपुराणाचा आधार व्यर्थ दिला (५) श्रुतींचा अर्थ खोटा केला (६) प्रभास वसूचा पुत्र विश्वकर्म्यास देवांचा बाप बनवून त्याच्या पांच मुखां पासून ५ पांचाळ ब्राह्मण उत्पन्न केले (७) ऋषींचा वेदाधिकार काढून घेतला. आणखी ही स्वर्णकारांच्या उद्धतपणाची मालिका पुढें वाढविली असती परंतु स्थलसंकोचामुळें ती येथें देत नाहीं. किती एक ठिकाणीं श्लोक ह्मणून लिहिले आहेत त्यांचा छंद, त्यांतील पदलालित्य व्याकरण इतक्या अप्रयोजक रीतीनें आहे कीं त्यांचें मनःपूर्वक अवलोकन केलें असतां स्वर्णकारांनीं गीर्वाण भाषेनें आपणास अर्वाचीनत्वच आणलें काय? असा भ्रम होतो. अस्तु. नूतन द्विजेच्छु सोनारांचे ग्रंथ अवलोकन करून त्यांत गर्भित असलेली सर्व खोड उघडीस आणावी व स्वर्णकार लोकांनीं द्विजत्वरूप मयूराचें पिच्छ चोरून आणून त्याच्या क्षणिक शोभेनें जो ते डौल मिरवित असतात तो त्यांस कितपत साजत आहे हें सुज्ञ जनांस दाखविण्या करितां आम्हीं हा "स्वर्णकार द्विजत्व खंडन" म्हणून ग्रंथ केला आहे. या सर्व ग्रंथांचें तात्पर्य निबंध रूपानें प्रस्तावनेंत देण्याचा विचार होता परंतु विस्तारभयास्तव त्या खटपटींत पडलों नाहीं. या "स्वर्णकार द्विजत्व खंडनांत" ब्रह्मविचारादि ग्रंथकर्ते सोनार यांनीं आपणास द्विजत्वाचा रंग देण्या करितां एकत्र केलेल्या सर्व स्वकपोल कल्पित वचनांचें सप्रमाण खंडन केलें आहे. स्कंदपुराण, रुद्रयामल, शैवागम, अग्निपुराण, वगैरे ग्रंथांच्या मिळतील तितक्या शुद्ध व जुन्या प्रती जमवून त्यांतील खरे

विषय कोणते व स्वर्णकारांनीं आपला मतलब साधण्या करितां ब्रह्मविचारादि ग्रंथांत वरील ग्रंथाच्या नावानें दिलेले विषय कोणते हें सर्व दाखविलें आहे. त्याच प्रमाणें खोटीं उपनिषदें, खोटीं स्तोत्रें यांचाही करदेल तितका परिस्फोट केला आहे. ऋषींस वेदाधिकार नव्हता त्यांनीं यज्ञ केले त्याचें प्रमाणे कोठें आढळत नाहीं हें ब्रह्मविचारादि ग्रंथकर्त्यांचें ह्मणणें किती बाष्कळ पणाचें आहे याचा विचार वाचकांनीच करावा. वसुदेवानें कृष्ण जननाच्या वेळेस "दैवज्ञ" विप्र जमविले होते म्हणजे सोनार भट्ट जमविले होते असें ब्रह्मविचारादि ग्रंथकर्ते सोनार म्हणतात. व यास आधार "आहूयविप्रान् देवज्ञान्" हा देतात. आतां "दैवज्ञ" ह्मणजे कोण याचें आम्ही सप्रमाण विवेचन केलें आहे. कदाचित् ज्या प्रमाणें सांप्रत आपलें कुलदैवत एकीकडे ठेऊन कितीएक मूढजन कितीएक वेळीं क्षुद्र ग्राम्य दैवतांस नवस करितात त्या प्रमाणें वसुदेवानें स्वर्णकाराराधन केलें होतें असल्यास कोण जाणे. तथापि ही कल्पना ही "आहूय विप्रान्" या भागवतीय वचनानें सिद्ध होत नाहीं. "येन केन प्रकारेण प्रसिद्धः पुरुषो भवेत्" हेंच वचन मनांत आणून ब्रह्मविचारादि ग्रंथकर्ते सोनारांनीं वर्तन केलें असें म्हणण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. अस्तु. हा "स्वर्णकारद्विजत्व खंडन ग्रंथ" आम्ही यथामति तयार करून बुधजनाच्या पुढें परम आदरानें ठेविला आहे. यांतील ग्रंथरचना, वाक्यरचना वगैरे जसी असावी तसी जाहली नाहीं याबद्दल सुज्ञवाचकांनीं क्षमा करावी. हा ग्रंथ तयार होण्याची मुदत रखपून बरेच दिवस झाले. परंतु ग्रंथारंभ केल्या नंतर मध्यें फार अजारी असल्या कारणानें ग्रंथ इच्छित वेळीं तयार झाला नाहीं हें ही आश्रय दात्यांस कळविणें जरूर आहे. शेवटीं सुज्ञ जनांस अशी विनंती आहे कीं त्याणीं या ग्रंथांतील दोषांकडे विशेष लक्ष्य न देतां त्यांतील गुणांस आपल्या प्रीतीस पात्र करून ग्रंथ आपल्या आश्रयाखालीं घ्यावा.

---

वि० शि० शा० ना०

# या पुस्तकास आधारभूत ग्रंथांचीं नांवें.

१ ऋग्वेद.
१ यजुर्वेद.
१ सामवेद.
१ अथर्वणवेद.
१ ऐतरेय ब्राह्मण.
१ तैत्तिरेयब्राह्मण.
१ गोपथ ब्राह्मण.
१ शतपथब्राह्मण.
१ षड्विंशति ब्राह्मण.
१ आरण्यके ४
१ आश्वलायनसूत्रे २
१ आपस्तंबीयसूत्र.
१ बौधायनसूत्र.
१ गोभिलसूत्र.
१ पारस्करसूत्र.
१ कात्यायनसूत्र.
१ नवखंडिकासूत्र.
१ त्रिखंडिकासूत्र.
१ निरुक्त.
१ शिक्षाचतुष्टय. ४
१ चरणव्यूह सटीक.
१ मुंडकादि उपनिषदें १२०
१ बृहद्देवताक.
१ सायणाचार्यकृत वेदभाष्य.
१ उवटाचार्यकृत वेदभाष्य.
१ महीधरकृत वेदभाष्य.
१ शंकराचार्यकृत वेदभाष्य.
१ ब्रह्मसूत्र महाभाष्य.
१ याज्ञवल्क्यादि स्मृति १८
१ उपस्मृति. ६
१ अष्टादश पुराणें १८
१ उपपुराणें ११
१ शिल्पशास्त्र.
१ व्याससूत्र.
१ योगसूत्र.
१ परशुराम प्रताप.
१ हेमाद्रिखंडे. ३
१ वाल्मीकीयरामायण.
१ भारत, हरिवंश.
१ आचारार्कादि आन्हिकें १४
१ नारद दिपंचरात्रें ५
१ रुद्रयामल.
१ शैवादि आगम ५
१ कमलाकरादि जातिविवेक १२
१ स्मृत्यर्थसार.
१ कर्मसिद्धांत.
१ धर्मप्रवृत्ति.
१ अमरादिकोश. ९
१ धर्मशास्त्रादि.
१ ज्योतिषग्रंथ.

# अथ सच्छास्त्रमंडनग्रंथप्रारंभः

श्रीगणेशायनमः ॥ ॥ नत्वाशिवंगुरुंवाणींपितृन्मंत्रदृशोऋषीन्॥ सच्छास्त्रमंडनंनामग्रंथोयंक्रियतेमया ॥ १ ॥ अर्थ– शंकर, गुरु, सरस्वती, पितर (मातापितरादिक) आणि मंत्रद्रष्टे (ब्राह्मण, निरुक्त, सूत्रें इत्यादि अनेक ग्रंथेंकरून वेदार्थ दाखविणारे) असे जे ऋषी यांस नमस्कार करून "सच्छास्त्रमंडन" या नांवाचा ग्रंथमी करितों॥ १॥ ह्या ग्रंथाचें "सच्छास्त्रमंडन" असें नांव असून यांत स्वर्णकारांच्या द्विजत्वाचें खंडन आहे म्हणून "स्वर्णकार द्विजत्व खंडन" असें प्रत्येक पत्रावर हेडिंग दिलें आहे. आतां स्वर्णकारांच्या द्विजत्वाचें खंडन यावरून स्वर्णकारांला द्विजत्व होतें. अशी कोणी शंका घेतील त्यांस असें सांगावें कीं. "स्वर्णकारैर्मन्यमानंयद्विजत्वंतस्यखंडनं" अर्थ– सोनारानीं नूतनमानलेलें द्विजत्व त्याचें खंडन असा मध्यमपदलोपि समासानें अर्थ करावा. असो. सांप्रत इंग्रजी मुळें स्वधर्म. सोडून परधर्म आचरण करणाऱ्या लोकांस राजदंड नसल्याकारणानें निर्भयपणें वागूं लागले. त्यांत मुंबई ही अधर्माचें माहेरच आहे. कारण येथें जें करावें तें चालतें असें समजून वासुदेव आत्माराम वोट, श्रीधर बाबाजी मठकर, नारायण केशव, ह्या त्रिवर्ग सोनारांनीं ब्रह्मविचार, सद्बोधचिंतामणि, सुखमासी ब्राह्मणवर्णन, अशा नावाचे ३ ग्रंथ छापून प्रसिद्ध करून जाहिराती व पत्रव्यवहाराचे भडिमार केले. परंतु त्या ३ ग्रंथांतील तथ्यातथ्य विचार आमच्या विद्वान् लोकांनीं मुळींच केला नाहीं. कारण. मनुस्मृति अध्याय ४ श्लोक ९ सत्यंब्रूयात्प्रियंब्रूयान्नब्रूयात्सत्यमप्रियं, प्रियंचनानृतंब्रूयादेषधर्मःसनातनः। १३८ भद्रंभद्रमितिब्रूयाद्भद्रंन्वेवमावदेत्।शुष्कवैरंविवादंचनकुर्यात्केनचित्सह, १३९॥ अर्थ– प्रिय व सत्य बोलावें तसेंच सत्य असून तें जर लोकांस अप्रिय आहे तरि बोलूं नये आणि

खोटे असून ते लोकांस प्रिय आहे तरि बोलूंनये. सार्वकाल शुभ बोलावें. अशुभ बोलूंनये आणि लोकांशीं शुष्क वैरव वाद करूंनये. तसेच नापृष्टकस्यचिद्ब्रूयान्नचान्यायेनपृच्छतः। अर्थ– कोणी विचारिल्या वांचून बोलूंनये व अन्यायानें विचारणाऱ्यासही उत्तर देऊंनये. अशा मनुस्मृती वरून विद्वान् लोकांनीं मौन धरिलें. हें सत्य आहे खरें. परंतु सोनारांचे ग्रंथ व जाहिराती पाहून कांहीं वेदशास्त्रानभिज्ञलोकांचीं मनें संशय युक्त झालीं. तो संशय दूर होण्या करितां व. पूर्वी मुंबई मुक्कामीं सोनारांनीं "जाहिराती" द्वारा केलेले प्रश्न पाहून सप्रमाण उत्तर देणें हें "स्तुत्यकृत्य" आहे. असें मनांत आल्यावरून आम्हीं "सच्छास्त्रमंडन" नामक ग्रंथद्वारा वाचकां कडून उत्तर देतो.

आतां सोनारांच्या तीन्ही ग्रंथांतील मुख्य विषय ३ ते येणें प्रमाणें.

१ ॐकार ब्रह्मा पासून विराट् विश्वकर्मा आकार त्यास घेऊन त्याणें सृष्टी उत्पन्न करून देवादि प्रजा उत्पन्न केल्या आणि या सृष्टीचा नियंता तोच आहे. अन्यदेवता ज्या आहेत त्या सर्व त्याचे अंशभूत आहेत. २ विराट् पुरुषा पासून पांच ब्राह्मण उत्पन्न झाले ज्यांस मुखमासीत् ह्मणतात ते मनु, मय, त्वष्टा, शिल्पि, दैवज्ञ हे आहेत त्यांचे अधिकार कोणते आहेत ते.

३ प्रस्तुत ऋषिसंततीचे लोक आपणास मुखमासीद्ब्राह्मणम्हणवितात हें खोटें आहे आणि त्यांची उत्पत्ति कशी झाली ती सांगितली आहे

या प्रमाणें सोनारांच्या ग्रंथांतील मुख्य तीन विषय हे विषय प्रतिपादन करण्या करितां स्कंदपुराणांतर्गत नागरखंड, रुद्रयामल, लिंगपुराण, शैवागम, शैवपुराण, अग्निपुराण, शिल्पशास्त्र, ऋग्वेद, यजुर्वेद, व भाष्ये, शंकराचार्यकृत स्तोत्र, इत्यादि ग्रंथाचे अध्याय व श्लोक यांचे अंक घालून श्लोक लिहिले आहेत. त्यांचा पूर्वापर संबंध पाहण्या करितां मी ते (पूर्वोक्त स्कंदपुराणादिक ग्रंथ) मिळवून अथपासून इति पर्यंत वाचून पाहतां त्या ग्रंथांत सोनारांनी लिहिलेले श्लोक मुळींच नसून त्या अर्थाचे अन्य श्लोक ही नाहींत. म्हणून खोटीं वचनें दाखवितों तीं येणें प्रमाणें.

नागरखंड अध्याय २रा श्लोक ज्योतिर्मयं शांतमयं प्रदीप्तं विश्वात्म
कं विश्वजितं निरीशं॥ आद्यंतशून्यं सकलंकलापं श्रीविश्वकर्माणमहं न
मि॥ ३१॥ निरंजनं निराकारं निर्विकल्पं निरूपकं॥ निराधारं निरालंबं निर्विघ्ना
सन्नमोनमः॥ ३२॥ अनादिंचप्रमाणंच अरूपंच दयास्पदं॥ त्रैलोक्यमय ना
मत्वं विश्वकर्म नमोस्तुते॥ ३३॥ नमोस्तु विश्वरूपाय विश्वरूपायतेनमः॥
नमो विश्वात्मभूताय विश्वकर्मन्नमोस्तुते॥ ३४॥ विश्वाय विश्वरूपाय नमस्ते
विश्वमूर्तये॥ विश्वकर्मसुमंगल्य विश्वविद्याविनोदिने॥ ३६॥ ॥ ॐकार प्र-
भवावेदा ॐकारप्रभवाः स्वराः॥ ॐकार प्रभवं सर्वं त्रै लोक्यं सचराचरं॥ ३९
शिवएकः पंचरूपो ज्योतिर्ज्योतिर्गुणैर्यथा॥ विश्वकर्माशिकं चैवनिर्मितं नि
र्मलं क्रमं॥ ५०॥ एतत्तत्त्वमिदं सार्थमत्र श्रुतिरुदाहृता॥ साशनानशने
स्यादिपादोस्येहाभवत्पुनः॥ ५१॥ एतत्वमितिहार्थंच वक्ष्ये शृणु षडानन॥ पंच
दासाख्ययामूर्ति कर्मप्रथमवाक्यवत्॥ ५२॥ पुरुषसूक्तं तदर्थेपि विश्वज्ञावे
दशीर्षतः॥ द्वयवाक्येन नाम्नाच विश्वकर्मत्वकारणं॥ ५३॥ सकर्मक्रियया-
विश्वं विश्वकर्मा जगद्गुरुः॥ गुरुवाक्यपरंचेदं विश्वकर्मक्रियात्मकं॥ ५४॥
गुरुः सर्वगुणोप्यार्थपरार्थं विश्वकर्मणः॥ श्रुतिर्वाक्यं स्मृतिर्वाक्यं विश्वकर्मा
गुरुस्तयोः॥ ५५॥ ॥ ओंकारश्श्रुतिरूपेण ओंकारं विश्वरूपिणः॥ प्रधान
मात्मरूपंच प्रणवं ज्ञानरूपकं॥ ६६॥ प्रणवं परमं लोके प्रणवं परदैवतः॥ प्र
णवं पंचमूर्तिश्च प्रणवं सद्गुरुस्तथा॥ ६७॥ प्रणवं पंचतत्वंच प्रणवं परमात्मकं॥
प्रणवं सर्वमूलानि प्रणवं पापनाशनं॥ ६८॥ ॥ वेदवेदज्ञ धर्मज्ञ वेदात्मा
विश्वकर्मणः॥ वेदो विश्वप्रसूतीनां वेदो वै विश्वकर्मणा॥ ६९॥ स्कंदपु
राण नागरखंड. अध्याय ३ रा श्लो० मुखे पद्मपुराणंच जिह्वायां ब्र-
ह्ममेवच॥ नासिके विष्णुपौराणं कराग्रे शंभुनायकं॥ १०॥ श्रोत्रे भागव
तंचैव नेत्रयोर्नारदीयकं॥ मार्कंडेयं नाभिमध्यस्थं आग्नेयं पादयोस्तथा
॥ ११॥ भविष्योत्तरकं जान्वोर्ब्रह्मवैवर्तकं तथा॥ नखे लिंगपुराणंच वामनं
मनसिस्थितं॥ १२॥ हृदि वाराहपौराणं ध्याने तन्मत्स्यरूपकं॥ कौर्मं
पुराणकंचैव ब्रह्मांडं यत्र जायते॥ १३॥ स्वरूपे स्कंदपौराणं गारुडं देह

एवच ॥ एते अष्टदश प्रोक्ताः पुराणावेद संमताः ॥१४॥ ॥ विश्वकर्मापु
ण्यदयश्चंद्रमादित्यलोचनः ॥ शरीरः सर्वदेवात्मायोगब्रह्मसमुद्भवः ॥२२
मुखाग्रे पंचमोवेदः कराग्रे रत्नहाटके ॥२३॥ अग्निज्वालासमुत्पन्ना मु-
खेमाहेश संभवः ॥ बाह्वोरुत्पद्यते विष्णु रूर्वोश्चत्वाष्ट्रसंभवः ॥४५॥ इं
द्रश्चरण संजातोचंद्रमा मनसोद्भवः ॥ चक्षुषः सूर्यउत्पन्नोवायुः प्राणात्स
जायते ॥४६॥ अंतरिक्षंतथानाभौ द्यौश्चापि शिरसो जनि ॥ भूमिःप
द्यांसमुद्भूताश्रोत्राभ्यांजज्ञिरेदिशः ॥४७॥ ॥ कर्मसादाख्यमीशानं
पंचसादाख्यमीश्वरं ॥ विश्वकर्मा परश्चैव मन्वीशस्तु न संशयः ॥५५॥
मन्वीशंत्वाष्ट्ररूपंच द्वितीयं विश्वकर्मणः ॥ त्वष्टाविश्वक्रिया प्राज्ञोराज
रूपोमुनीश्वरः ॥५६॥ एतदर्थप्रतिपादार्थश्रुति सूक्तं वदाम्यहं ॥ य-
जूंषिअद्भ्यः संभूत इत्यादि द्विपदेशंचतुष्पदे ॥५७॥ उल्लंघ्य वेदवाक्यानि
रौरवं नरकं व्रजेत् ॥ वेदशब्दं महद्वाक्यं विश्वासंपापनाशनं ॥ ५८ ॥ तथैव
वेदाविश्वासेविष्ठायां जायते कृमिः ॥ तदर्थं वेदविश्वासो कर्तव्यो ज्ञान
बोधिनः ॥ ५९ ॥ पंचब्रह्मात्मकंचैव पंचरूपंतमीश्वरं ॥ ईशंच सर्वभूतानां
पंचविंशतितत्वतः ॥ ६८ ॥ पंचब्रह्मपरंब्रह्मपंचभूतात्मकंविभुः ॥ सर्वदे
वपतीशश्च सहस्रांशोश्चभाषितं ॥ ६९ ॥ जननं सर्वदेवानां तद्धामविश्व
कर्मणः ॥ इनश्चंद्रकुजोज्ञश्च गुरुशुक्रशनैश्वरान् ॥ ७३ ॥ राहुकेतुमु
खान् सर्वान् विश्वकर्माविनिर्ममे ॥ ग्रहाणां ग्रहमुख्यानां प्रत्येकं वाहनान्य
पि ॥ ७४ ॥ आयुधानिस्वरूपाणि विश्वकर्मा चकारह ॥ एतेषांलोककृत्या-
नां मंडलं निर्मितंचतत् ॥ ७५ ॥ प्रकारंच विशेषण विश्वकर्मा ततानह ॥ तिथी
न्प्रतिपदाद्यांश्चपक्षयोः शुक्लकृष्णयोः ॥ ७६ ॥ रव्यादि सप्तवारांश्च च
कारबहुधाहि सः ॥ अश्विन्यादीनि नक्षत्राणि सप्तविंशतिसंख्यया ॥ ७७
योगास्तत्संख्ययाचापि करणानां चसप्तमं ॥ निर्ममे विश्वकर्मासोपंचां
गकर्मनिर्णयं ॥ ७८ ॥ मेषादिमीनपर्यंतं राशि द्वादशकंतथा ॥ विषामृ
तविभागाश्चलग्नहोरादिकंतथा ॥ ७९ ॥ द्रेष्काणांचनवांशंच त्रिंशां-
शंद्वादशांशकं ॥ षड्वर्गवर्गमुख्यांश्च ज्योतिःशास्त्रक्रमंतथा ॥ ८० ॥

चंद्रकालानलं चक्रं सूर्यकालानलं तथा॥ सर्वतोद्भव मुख्यांश्च चतुराशी
तिचक्रकान्॥८१॥सर्वशास्त्रक्रमं चापि पंचभूतादिलक्षणं॥ पंचपक्षि
क्रमं चापि सर्वशास्त्रविनिर्णयं॥८२॥ यथायथं चकारासौ विश्वकर्मा म
हामतिः॥ स्त्रीपुंसक्रमभेदांश्च सामुद्रिकवचांस्यपि॥८३॥ स्कं॰ नाग॰
अध्याय ४ श्लो॰ प्राणापानौ तथा व्यानौ समानोदान एव च॥ सर्वं सर्वम
यं शिल्पि सर्वायुष्यस्य कारणं॥ २२॥ दिवारात्रं चकारासौ मन्वीशो वि
श्वकर्मणः॥ जगतः पितरं चैव सर्वदेवपतिं तथा॥ २३॥ तस्मात्सर्वप्रयत्नेन
गायत्रीमभ्यसेद्द्विजः॥ सहस्त्रांशुगुणा शक्तिर्द्वितीया विश्वकर्मणः॥
३१॥ त्वष्ट्रोक्तेन विधानेन गायत्रीमभ्यसेद्द्विजः॥ गायत्रीं संपरित्यज्या
प्यन्यमंत्रांश्च योजयेत्॥ ३२॥ स याति नरके घोरे यावदाभूतसंप्लवम्॥
उदये सूर्यमामन्त्र्य मन्त्रांश्च वरयेत्ततः॥३३॥ यथाक्रमं नमस्कारः सह
स्त्रांशोश्च भाषितम्॥ एतदर्थस्य ज्ञानार्थं मत्रश्श्रुतिरुदाहृता॥ ३४॥
उदये च तथा मध्ये सायंकाले जपेत्सुधीः॥ आचारवेदधर्माश्च पांचा
लेषु प्रकीर्तिताः॥ ३५॥ विश्वकर्माकुलोत्पन्नस्त्रयीसंध्या महामुनिः॥
मन्वीशश्चाग्निरूपस्त्वं स्मरणे तत्वपंचके॥३६॥ धर्मार्थकाममोक्षं
च सायुज्यं लभते नरः॥ एतच्छ्रुतिं च संजप्य महापातकनाशनं॥३७॥
ओमित्येकाक्षरं प्रणवं रूपं त्वष्टा रूपाणि विश्वा॥ ओंकारे विश्वकर्मा-
णः ओंकारं विश्वनामकं॥३८॥ ओमित्येकाक्षरं ब्रह्म परमं पथि ग-
च्छति॥ मन्वीशे सर्वकर्तृत्वं मन्वीशे सर्वकारकं॥३९॥ तदर्थं मनुवंशज्ञा-
जीवन्मुक्ता न संशयः ब्राह्मणं त्वष्ट्रदैवत्यं विश्वकर्मांशपारगं॥४०॥
सर्वनिर्माणकर्तासौ स्थावरे जंगमेपि वा॥ तद्विद्धि निर्मितं कर्ता सर्वलो
कपितामहः॥ ४१॥ उत्पत्तिस्थितिसंहारे विश्वकर्मा स हि प्रभुः॥
त्वष्टा कर्ता समुत्पत्तिं मयो लोकस्य पालकः॥४२॥ संहारकर्ता स मनुः
शिल्पि लोकस्य पालकः॥ तक्षा निर्माणकर्ता च त्रैलोक्यं विश्वकर्मणः॥४३॥
स्कं॰ ना॰ अ॰ ५ श्लो॰ सर्वज्ञ सर्वलोकेश सर्वलोकजगद्गुरो॥ ८॥ भ
वत्तनयचारित्रं पापनाशं शृणोम्यहं॥ मनुर्मयस्तथा त्वष्टा शिल्पि त-

क्षस्तथैवच ॥ ९॥ एतेषुयज्ञकर्माणिअन्यजातोनविद्यते॥ एतेषुवेदवि
द्याचब्रह्मविद्याप्रवर्तते॥१०॥ शृणुवत्सद्विनाधीशगुह्याद्गुह्यतरंमहत्॥
वक्ष्येहंसर्वलोकानामुपकारायधीमते॥१२॥ अयस्कारंमनूनांचमया
नांदारुकर्मंच॥ कांस्यंचत्वाष्ट्रकंकर्मशिलाकर्मंचशिल्पिनां॥१३॥सौ
वर्णताक्षकंकर्मपंचकर्माणितानिवै॥ एतेपंचैकरूपंचयज्ञकर्मइतिस्मृतः
॥१४॥रथकारास्तथाचक्रुःपंचकृत्यादिसर्वदा॥ षट्दर्शनाद्यनुष्ठानं
षट्कर्मनिरताश्चते॥२७॥ तन्मुखेःकल्पिताःसर्वेलोकाश्चापिचतुर्दश॥
इत्युक्त्वाभास्करंविश्वकर्मात्रिजगतांगुरुः॥२८॥ एतेषांगोत्रमाचक्ष्येशृणु
षण्मुखतत्वतः॥ मनुःकौंडण्यगोत्रःस्यान्मयानामात्रिगोत्रकः॥५०॥ त्वष्टागो
त्रंभरद्वाजंतक्षागौतमगोत्रजः ॥ काश्यपंशिल्पगोत्रंस्यादेवंगोत्रमुदाहृतं
॥५१॥ स्कं॰ना॰ अ॰६ श्लो॰ शिवमूर्तिरमूर्तिश्चकर्ताकर्मक्रियादिषु॥ ए
तेषुपंचदासाख्यज्ञानगर्भोनसंशयः॥१७॥ सकलोत्पत्तिकालेषुक्रतु
कर्तास्वयंप्रभुः॥ उत्पत्तिसमयेब्रह्माविष्णुःसंस्थितिलीलया॥१८॥विश्व
संहारकेरुद्रस्त्रयीमूर्तिर्दिवाकरः॥ अशेषभूतोद्भवविश्वकर्तासुरासुरा
णांगुरुरीश्वरश्च॥सृष्टिःस्थितिःसंहरणप्रकर्तासविश्वकर्मातपयःस्व
रूपाः॥१९॥ ॥स्कं॰ना॰ अ॰७ श्लो॰ शृणुषण्मुखसुज्ञानिन्मनूनां
दारसंग्रहं॥२॥ मुनेरंगिरसःपुत्रीप्रसिद्धाकांचनाव्हया॥विश्वकर्मतनू
जस्यबभूवगृहिणीमनोः॥३॥ कौशिकस्यमुनेःपुत्रीत्रिजयंतीतिविश्रु
ता॥विश्वकर्मतनूजस्यभार्यात्वष्टुरभूत्स्वयं॥४॥कुमारीजैमिनीसाध्वी
चंद्रिकानामविश्रुता॥विश्वकर्मतनूजस्यभार्यातक्षस्यचाभवत्॥५॥
पराशरमुनेःपुत्रीसौम्यादेवीसुलोचना॥विश्वकर्मतनूजस्यमयस्यापिकु
लांगना॥६॥ करुणानामविख्याताब्रह्मर्षितनयाभृगोः॥विश्वकर्मतनू
जस्यभार्याभूत्तस्यशिल्पिनः॥७॥ पंचब्रह्मपरंब्रह्मसर्वमोंकाररूपधृक्॥
ओंकारेजनितंसर्वंपरंतत्वंचरूपकं॥२५॥ पंचब्रह्मपुनर्जन्मपंचवक्त्रस्यग
र्भजं॥पंचदासाख्यतत्वंचद्वितीयस्तुमुनीश्वरः॥२६॥ तृतीयंजन्मभेदंचस
कलेःकारणैःशृणु॥मनुःपूर्वमुखोद्भूतोमयोयाम्यमुखोद्भवः॥२७॥पश्चि

मास्येभवत्त्वष्टातक्षकश्चोत्तरास्यतः॥ ऊर्ध्वास्ये शिल्पिसंभूतिः पंचगर्भमुनी श्वराः॥२८॥ जननीजनमीशश्चरूपंपंचमयःशिवः॥यथापंचपतेर्जन्मज्योति र्ज्योतिर्गुणैर्यथा॥२९॥ परःशिवोविश्वकर्मापुत्रास्तस्येवमीश्वराः॥ नंदृह्वान्म द्रनामाश्वकुमाराविश्वकर्मणः॥३०॥द्विभुजोविश्वकर्माचस्थावरोजंगमः पिता॥ दशभुजोविश्वकर्मासर्वदेवपितामहः॥३८॥ मनुश्च ईश्वरोनामविष्णु- नाममयस्तथा॥ ब्रह्मणोप्रभवेत्वष्टाशिल्पिमाहेंद्रनामच॥४३॥तक्षानुसूर्यना मस्यान् नंदनोविश्वकर्मणः॥एकैकाजन्मनामानः वर्तमानाश्चनामभिः॥४४॥ आदिकर्ताविश्वकर्ताविश्वकर्माजगद्गुरुः॥ ब्रह्माविष्णुश्चरुद्रश्चईश्वरश्चस दाशिवः॥५०॥ सुरासुराहरिःसूर्योविश्वकर्माकुलोद्भवाः॥विश्वकर्मामहामू र्तिः सर्वभूतदयापरः॥५१॥ सत्यं सत्यंपुनःसत्यं सत्यंवदाम्यहं॥ परःशिवोवि श्वकर्मासत्यंवाक्यंचषण्मुख॥५२॥नमोस्त्वग्निरूपंचमयाद्वायुस्तथैवच॥ त्वाष्ट्रमाकाशकं निर्मितक्षादापस्ततोभवत्॥५३॥पाषाणंशिल्पिनं प्रोक्तं मु खेभ्यः पंचनिर्ममे॥पंचसादारवुनःपंचपंचवल्कोद्भवस्तथा॥५३॥ पितासर्वदे वानां सर्वलोकपितामहः॥सर्वलोकगुरुश्चैवविश्वकर्मापरःशिवः॥विश्वमुत्प त्तिकालेषुब्रह्मांडं विश्वकर्मणि॥विश्वस्थित्यर्थकालेषुविष्णुर्वैविश्वकर्मणि॥ ५४॥विश्वसंहारकालेषुरुद्रोवैविश्वकर्मणि॥ कर्मज्ञःक्रियते वश्यंविश्वकर्मा ह्यनामयः॥५ ॥ तांविश्वकर्मेश्रुत्यर्थसत्यंतथ्यमिदंशृणु॥ तत्विश्वकर्म नामेतिसत्यंनिगमभाषिणः॥५ ॥स्कं०ना०अ०८श्लो० तत्पुरुषोपदेशोच्च दीयतेपरमेश्वरं॥ ओंकारएकभेदेनरूपांश्चपंचधारयत्॥५॥श्रुत्यर्थेपंच तत्वानां लोकस्योत्पत्तिकारणं॥ क्रियाब्रह्मांडकोद्यस्य द्विभजेविश्वकर्मणि॥

वाचक हो तुम्ही ब्रह्मविचार ग्रंथकर्ते वासुदेव आत्माराम शेट सोनार यांस असें विचारा कीं हे सदरील १७ सत्याणव श्लोक नागरखंडाच्या २।३।४।५।६।७।८ या अध्या यांतील म्हणून ब्रह्मविचार ग्रंथांत जे तुम्हीं लिहिले आहेत ते स्कंदपुराणोक्त नागरखंडां त आहेत काय किंवा स्वकपोल कल्पित आहेत? मला बहुधा असें वाटतें कीं; हे श्लोक नागरखंडांतील नसून वासुदेव आत्माराम शेट यांच्या कृतीचे ही नव्हत; तर हे को- णापासून तरी पैसे देऊन विकतच घेतलेले असावे कारण कीं जर हे स्कंदपुराणोक्त

नागरखंडांत असते तर मी ज्या नागरखंडाच्या जुनाट अशा चार पांच प्रती पाहिल्या त्यापैकीं एके प्रतींत तरी आढळले असते त्यापेक्षां या सत्याण्णव श्लोकांपैकीं एकही श्लोक त्या प्रतींत आढळत नाहीं व त्यांतील कथाभाग ही सर्व नागरखंडांत कोठेंच आढळत नाहीं तस्मात् हे श्लोक कोणापासून तरी करवून आपल्या ग्रंथांत नागरखंडाच्या नांवानें घुसडून दिले आहेत् असें म्हणण्यास मला कांहींच भीति वाटत नाहीं आतां ही सोनारा प्रमाणेंच यथेच्छ मी लिहीत असेन अशी तुमच्या मनांत शंका येईल तर तन्निरसनार्थ व्यासोक्त स्कंदपुराणांतील नागरखंडाचे २।३।४।५।६।७।८ हे अध्याय आद्यंत श्लोकानुक्रमानें समग्र दाखवितों त्यांतील श्लोक व कथा आणि ब्रह्मविचारांतील श्लोक व कथा या दोहोंचा मेळ पडतो किंवा काय हें सर्वांनीं प्रत्यक्ष पहावें म्हणजे सर्व शंका दूर होईल. स्कंदपुराण नागरखंड अध्याय १ ला याचे श्लोक ७१ असून त्यांत शिवाच्या लिंगाची उत्पत्ती सांगीतली आहे. ब्रह्मविचार ग्रंथांत स्कंदपुराण नागरखंड अध्याय १ ला श्लोक अमुक असें हेडिंग कोठें नाहीं म्हणून येथें प्रथमाध्यायाचे श्लोक लिहिण्याचें कारण नाहीं.

अथ द्वितीयाध्याय श्लोकांचा आद्यंतानुक्रमः अध्याय २

सूत उवाच तस्मिन्नुत्पाटिते लिंगे० पाताले जान्हवीतोयं० १ सर्वपापहरं नृणां० तत्र स्वयंभूत पू० २ शृणुध्वं वदतो मेद्य० त्रिशंकुनामराजेंद्र० ३ तत्र स्नातः पुनर्ले० चंडालत्वं कथं प्राप्तं० ४ एतत्तु सर्वं नामाचक्ष्व० सू० उ० अहं ते कीर्तयिष्यामि० ५ सर्वपापहरां मेध्यां० सूर्यवंशोद्भवः पूर्वं० ६ आसीत्पार्थिव शार्दूल० वसिष्ठस्य मुनेः शिष्यो० ७ तेनेष्टं च मखे० ७ संपूर्णदक्षिणो रेव० ८ तथा स्नानानि० ब्राह्मणेभ्यो विशिष्ट० ९ व्रतानि च प्रचीर्णानि० पुत्रवल्लालिता० १० स्नातानि भूतलस्था० तपस्विभ्यो० ११ यथाकामं० कस्यचित्त्वथ का० १२ तेन प्रोक्तः सभा० त्रिशंकु० १३ भगवन्पृष्टमि० गम्यते त्रिदिवं० १४ तस्मात्कुरु प्र० तस्य यज्ञस्य० १५ वसिष्ठ उ० सनकश्चित्तु० अनेनैव शरीरेण० १६ अभिष्टोद० अन्यदेहांतरे० १७ यदि वा पृथिवीपाल० पार्थिवो वा० १८ स्वयं दृष्ट० स्वर्गगतं नारी० १९ त्रिशंकु उ० नासाध्यं विद्यते० तस्मात्कुरु प्रसा० २० व० उ० अनृतं नोक्त पू० तस्मान्ना

स्ति०२१ त्रि० उ० यदिमांविप्र० स्वर्गप्रदेन०२२ तत्किंतेतप० अपरंशृणु०
२३ शृण्वतां० यद्दिमेनकरोषित्वं०२४ तमुवाच० ततःप्रणम्य२५ ययौ
तत्रसु० तानपिप्रा०२६ वसिष्ठवचनं० ततस्तान्सपु०२७ अशक्तोमादि०
तस्माद्यदिनमा०२८ परित्यज्य० योमांयज्ञप०२९ अनेनैवशरीरेण० त
स्यतद्वचनंश्रुत्वा० ३० परंकोपसमायस्मात्त्वयागु०३१ तस्माद्भवाधु-
ना० अथतद्वचनं० ३२ बभूवांत्यजसू० यवमध्यकृश० ३३ कृष्णा
गत्रांकुक० अथात्मानं ३४ चंडालधर्मिणं० यदिपाहीति०३५ सर्वतः
सारमेयेश्व० काककोकिल०३६ ततः सचिंतयामा० किंकरोमिक्वगच्छा०
३७ किंमेयेतत्० तत्प्रभावेत० ३८ किंजले० भक्षयामिविषं० ३९ अनेनव
पुषाऽसद्दर्शनशरीरे० ४० कथंपुत्रान्त्वया० वीक्षयिष्यामि ४१ येमयानि
र्मिता० तेद्यमामीदृशं०४२ येमयातर्पिता० तेद्यमा० ४३ तथायेषु०काम
बाधां०४४ भद्रजा० मयाविना०४५ अश्वास्ति० कस्ताश्वा० ४६ त
थामे०माविना० ४७ सख्यार्द्रो० कस्यवास्य० ४८ तथामेसख्य०
भविष्यति०४९ एवंबहुवि०जगामनगरा०५० ततोरात्रौ० द्वारिस्थित्वा०
५१ कथयामास०दूरेस्थितः५२ अहंपुनःकार० मृत्युवासे०५३ एवमुक्त्वा
परि०जगामारण्य०५४ तेपिसन्मंत्रिता० राज्येनियोजयामासु र्नानावा
दित्रनिस्वनैः इतिश्रीस्कंदपुराणेतृतीयपरिच्छेदेनागरखंडेहरिश्चंद्ररा
ज्योपलंभोनामद्वितीयोऽध्यायः२ सूतउवाच० त्रिशंकुरिति० मनसा
सुचिरं०१ विश्वामित्र०२ यःकुर्यान्मेइ०३ कुरुक्षेत्रे०३ ततःकालेन०४
एवंचान्वेषणं०५ सदूरादेवस०६ आढिभिर्मदू०७ प्रतस्थे०८ आश्रमं०९
विविधे०१० मृषकेवन०११ स्वाध्यायनिरत०१२ तेजसातमसा०१३
अथगत्वास०१४ तथान्यानपि०१५ धूलिधूसरिता०१६ हर्षयामास
१७ कस्त्वपापे०१८ वेदध्वनिसमा०१९ तस्माच्छब्द०२० त्रिशंकुनामभू
योहं०२१ सोहंशरण०२२ वसिष्ठस्य०२३ कोपराध०२४ अनेनैवश
री०२५ तेनोक्त०२६ तच्छ्रुत्वा०२७ तदन्यंगुरु०२८ ततोहंतेन०२९ तत
स्तेशोक० ३० सोहंत्वाम०३१ नासाध्यं०३२ त्रिशंक उ० तस्यतद्वचनं०

३३ अहंत्वायो० ३४ तथायज्ञक्रिया० ३५ सू० उ० एवंसनिश्चयं०३६ कुरुक्षेत्रेसरस्वत्या० ३७ वाराणस्यां ३८ शक्रतीर्थे० ३९ एवंतस्य०४० मुच्यतेनच० ४१ ततः क्रमा० ४२ तत्रालोक्य० ४३ यावदा०४४ सोपि दृष्ट्वा० ४५ कोयंतवा० ४६ विश्वा० उ० एषपार्थिव० ४७ तस्मात्सर्व प्रय० ४८ वासिष्ठस्य० ४९ मार्कं० उ० यद्येवंमु० ५० पातालाजा०५१ तत्रप्रविश्य० ५२ पश्चात्सश्ये० ५३ सूतउवाच० तस्यतद्वचनं० ५४ पाताल दे० ५५ त्रिशंकु० ५६ बाढमित्येव० ५७ याजयित्वा० ५८ तस्मादाग० ५९ प्रगृह्याण० ६० ब्रह्म उ० तंयज्ञकर्म० ६१ इतिश्रीस्कंदपुराणे तृतीय परिच्छेदे० नागरखंडे विश्वामित्रमाहात्म्ये तृतीयोध्यायः ३ (अ० ४) सूतउवाच० ततः श्रुत्वा० १ याजयित्वा० २ एवमुक्त्वा० ३ ददौदीक्षा ४ बभूवसः स्वयं० ५ तस्मिन्होताचशांडिल्यो ब्रह्मागोतमएवच ६ अग्नीध्रश्च्यवनोनाम० उद्गातायाज्ञवल्क्यश्च० ७ प्रस्तोताशंकुपुलस्त्यो०ब्राह्मणाछसी० ८ नेष्टाचैवतथा० ९ वासोमि० १० एवंशृंगसमा० ११ एवंत स्मि० १२ तथान्येत० १३ दीनांधा० १४ भुज्यतांलोक० १५ यज्ञवाटेस दा १६ सुवर्णस्यचरौप्यस्यरत्नानांचविशेषतः १७ तथैववाजि०१८ व र्तमानेमहा० १९ केवलंवन्हित० २० व्यतीतानि० २१ ऋत्विजस्तर्पया मा० २२ संबंधिनो० २३ सव्रीडं० २४ परिपूर्ण० २५ त्वत्प्रसादेन २६ अनेने वशरीरेण० २७ अथवार्यश्च० २८ यत्त्वेनोक्तं २९ नकरिष्यसि० ३० इति श्रीस्कांदेतृतीयपरिच्छेदेनागरखंडेविश्वामित्रमहात्म्ये ४ ध्यायः अ०५ सू०उ० तच्छ्रुत्वावचनं १ माविषादं० २ तत्तत्कर्मकरिष्यामि ३ एवमु क्त्वापरं० ४ यथामया ५ ततस्तं० ६ विश्वामित्रउ० जयदेवजयाचिंत्य०७ जयचिंत्यजयामि० ८ जयसर्वगसर्वेश० ९ त्वंधाताचविधाताच० १० य थातिलस्थितंतैलं० ११ त्वंब्रह्मत्वंहृषीकेश० १२ अथवाबहुनोक्तेन० १३ किंचित्त्रिपुलोकेषु० १४ परितुष्टोस्मि० १५ वि० उ० यदितुष्टोसिदेवश० १६ एवमस्त्विति० १७ विश्वामित्रो० चक्रेचतुर्विधं० इतिश्रीस्कांदे तृ० नागरखंडेविश्वामित्रवरलब्धोनाम ५मो ध्यायः ( अथष-

**षष्ठोऽध्याय:** या अध्यायाचे श्लोक १९ असून यांत त्रिशंकु कर्णास स्वर्गलोक प्राप्त झाल्याचें वर्णन आहे. विस्तारभयार्थ आद्यंत घेतलें नाहीं.

अथसप्तमोऽध्यायप्रारंभः । सू० उ० एवंस्वर्ग०१ तत्तीर्थ०२ अस्पृष्टं०३ यस्तत्रत्य०४ समीक्ष्य० कृमिपक्षी०५ स्नानंयेतत्र० ६ धर्मार्तोवा०७ विश्वामित्रोपि० ८ तथान्येमुनयः । ९ तथैवमुनयः० १० एवंतस्यप्रति० ११ अग्निष्टोमादि० १२ नयच्छति० १३ ततः प्रगच्छ० १४ ब्रह्मविष्णुशिवा० १५ कृच्छ्रपरमनुप्रा० १६ ऊर्ध्वबाहु० १७ हाटकेश्वरसं० १८ ततः सत्वर०१९ ऋषिरुवा० ब्रह्महत्या० २८ रक्तशृंगो० २१ सू०उ० पुरात्वष्टाद्विजश्रेष्ठाहिरण्यकशिपोःसुता।।विवाहितारमानाम०२२ ततोवैरीव सं० २३ बलिपूजोपहारेण० २४ यच्छमाताद्विजाग्रे० २५ उवाचवरदो० २६ शूरशास्त्रे० २७ तेजसायज्ञ० २८ श्री०महादे०उ० भविष्यतिनसंदेहो० २९ अजेयः ३० एवमुक्त्वा० ३१ तस्यचक्रे० ३२ अथासौ० ३३ ततोस्म० ३४ सचापिच० ३५ ततोयेवन० ३६ ततश्चेंद्रजया० ३७ अथतेनसमं० ३८ हुतशेषे० ३९ वृत्तोपिनुमु० ४० यज्ञभाग० ४१ एवंत्रैलोक्य० ४२ ब्रह्मलोकं० ४३ येनशक्रं० ४४ नगतिर्विष्णु० ४५ तस्मात्त्रैलोक्य० ४६ यावत्तिष्ठति० ४७ कथंशक्रस्य० ४८ तेनपूर्वंतपस्तप्तं० ४९ तत्प्रभावा०५० योन्योपि० ५१ सू०उ०तच्छ्रुत्वा० ५२ त्रैलोक्यरक्षणार्थाय० ५३ वर्षास्याकाश० ५४ एवंतस्य० ५५ चक्रुश्चसततं० ५६ अथाब्रवी० ५७ विष्णुरु० तस्यशक्रस्य० ५८ अवध्यः सर्व० ५९ इंद्रउ० अस्तिभि० कस्य० ६० विष्णुरुवाच । हस्तप्रमाण० ७० इंद्रउ० तत्ता दृक् ० यस्यास्ति० ७१ विष्णुरु० दधीचिर्नामविप्रोस्तितपः० ७२ तत्रगत्वा प्रार्थ० ७३ ततः शक्रसुरैः० ७३ प्राचीसरस्वती० ७४ अथदेवान् समालोक्य ७५ दधीचिः संप्रार्थ० ७६ सप्रणम्य ७७ देयानर्घ्यादिभिः० ७८ ततः प्रोवाच० ७९ दधीचिरुवाच। किमर्थमागत० ८० शक्रउ० वृत्रेणनिर्जिता० ८१ सोस्तिसंभव० ८२ स्वकीयानि० ८३ कुरुकृत्यं० ८४ सूतउ० तच्छ्रुत्वासंप्र० ८५ अत्यजज्जीवितं० ८७ अथशक्रस्तदा० ८८ तत्रध्यानेस्थिता० ८९ सोपिवज्रप्र

प्रहारेण० १० शक्रोपिभय० ११ नजानाति० १२ एतस्मिन्नंतरेदेवा० १३ प्राप्तस्त्वं० १४ एतन्नागबली० १५ नोचेदागत्य० १६ अपिपाप० १७ प्रणिपत्यपुनः प्रोचे० १८ देवेंद्रत्व मनुप्रा० १९ सूत उ० एतद्वः सर्वमाख्यातं० १०० माहात्म्यंब्राह्मणश्रेष्ठा० १०१ सयातिपरमंस्थानं० १०२ इति० स्कां० तृ० नागरखं० वृत्रवधोनाम ७ ध्यायः ) सू० उ० अथशक्रसमाग० १ तंपूरयमा० २ वायुरुवाच। तवदेशात्० ३ यस्माल्लिंगं ममे० ४ यद्यत्कर्पूर० ५ तस्मात्कुरुप्रसा० ६ ततः संचिंतयामास० ७ ततस्तं प्राह० ८ कस्मात्त्वंव्यास० ९ अस्तिपर्वतमुख्यो० १० तस्यपुत्रत्रयंजाता० ११ मैनाकः प्रथमः प्रोक्तो० रक्तश्रृंगस्त्रियस्तु० १२ समैनाकः १३ पक्षिभ्यांस० १४ वसिष्ठाश्रमजो० १५ देवभूमिंपरित्यज्य० १६ नमानीय० १७ तमुत्कापर्व० १८ सूत उ० तच्छ्रुत्वा० १९ जगाम २० ततः प्रोवाच० २१ हाटकेश्वरजे क्षेत्रे० २२ पूजयिष्यंति० २३ तस्मात्पुत्रमिमं० २४ कुरुष्वत्वं० २५ स्वस्तितेस्तुगमिष्या० २६ सूत उ० रक्तश्रृंगोपि० २७ संजातानि मुनीनांच० २८ इतिश्रीस्कांदे तृतीयपरिच्छेदे नागरखंडे हाटकेश्वरमाहात्म्ये नागवलिभूतिमहात्म्यंनाम ८ ध्यायः समाप्तः। अध्या० ९ हाटकेश्वरमाहात्म्य० १० शंखतीर्थोत्पत्ति० ११ अचलेश्वरमाहात्म्य० १२ चमत्कारोत्पत्तिः। १३ चमत्कारपुर प्रदक्षिणामाहात्म्य० १४ हटकेश्वरमा० १५ चमत्कारपुरक्षेत्रमाहात्म्य० १६ गयाशिरप्रेतमोक्ष० १७ हाटकेश्वर क्षेत्रमाहात्म्य० १८ बाल सख्यतीर्थमाहात्म्य० १९ बालमंडनमाहात्म्य० २० मृगतीर्थमा० २१ विष्णुपदोत्पत्तिः। २२ गंगामाहात्म्य० २३ युगस्वरूप० २४ – ६ – ७८ षडक्षरमंत्रमाहा० २९ सिद्धेश्वरमाहात्म्य० ३० – ३१ सप्तर्ष्याश्रममाहात्म्य० ३२ अगस्त्याश्रममाहात्म्य० ३३ हाटकेश्वर माहात्म्य० )

या प्रमाणें नागरखंडांत विषय असून एकंदर या खंडाचे अध्याय २१० आहेत प्रत्येक अध्यायांत प्रत्येक देवतापरत्वानें विषय प्रतिपादित असून संपूर्ण ग्रंथाची श्लोकसंख्या ९०० हजारांवर आहे. त्यांतील संपूर्णविषयानुक्रम संक्षिप्तरीतीने येथें दर्शविण्याचा हेतु होता; परंतु ग्रंथवृद्धिभयार्थ सर्व न दाखवितां ब्रह्मविचार करत्यांने ज्या अ

ध्यायाचीं नामें घेतलीं त्याच त्याच्या अध्यायांतील संपूर्ण श्लोकानुक्रम मात्र दाखवि ला. तर या अनुक्रमावरून ब्रह्मविचार ग्रंथांतील प्रमाणें ब्रह्मविचार ग्रंथकर्त्यानें खरो-खर नागरखंडांतून घेतलीं किंवा स्वकपोल कल्पित असून त्या नागरखंडाचें नामदिलें याचा विचार करावा. अस्तु आतां ब्रह्मविचारादि ग्रंथांत रुद्रयामलांतील जीं खोटीं प्रमाणें पांचालां बद्दल दाखविलीं तीं प्रथमतः दाखवून नंतर खरीं दाखवितों. **खोटीं वचनें ॥ रुद्रयामल ब्र० अ०१ ॥ विभज्यमूर्तियोगेन तत्तदूर्भांकुरादिकं॥ अदृश्येनैवरूपेणविश्वकर्मासृजत्ययं॥ २१॥ अस्यदृश्यानिरूपाणि सर्वेशिल्पवतांवरा:॥ तानाविश्यह्यसौसर्वान्चित्रंसृजतिपार्वति॥२२॥ दिविभुव्यंतरिक्षेवापातालेवापिभामिनी॥ गृहंयंत्रंरथोभूषाप्रतिमावसनादिकं२३ यत्किंचिद्दृश्यतेचित्रंतत्सर्वंविश्वकर्मकं॥ यत्किंचिदिंद्रजालादिमूढदृष्टेवर्तते॥२८॥तत्वतःसर्वथानास्तिसामायामयनिर्मिता॥न सत्यंमानववन्नमृषामयत्रिशिल्पवत्॥२९॥ क्षणेक्षणेचयच्चित्रंनानारूपाकृतिक्रियं॥खचरंसर्वगंयच्चविशेदपिशिलोदरं॥ ३०॥क्षणात्स्थूलंक्षणात्सूक्ष्मंक्षणाल्लघुगुरुक्षणात्॥तत्वष्टानिर्मितंविद्यादिव्यंब्रह्मसभादिकं॥३१॥ ब्र० अ० २॥ मृदाकाष्ठेन लोहेन पाषाणैःपारदेनवा॥रचयंति विचित्राणिरूपाणिविविधानिये॥११॥दिव्यान्भौमानंतरिक्षान् भावान्संदर्शयंतिये॥ पंचालास्तेसदापूज्याः प्रतिमाविश्वकर्मणः॥१२॥ अचेतनंचेतन कार्यकारिकुर्वंतियंत्रप्रतिमादिकंये॥स्वयंवहंवोशिशुमारचक्रंरथान्विमानानिचरवेचराणि॥१३॥ ॥ब्र० अ० ३॥ पंचभिःसहितःपुत्रैर्विश्वकर्मागिरींद्रजे॥ द्वारकावासिभिर्नित्यंश्रीकामैःपूज्यतेसदा॥४२॥तस्माच्छिल्पिवरान्नित्यंपूजयंतिविचक्षणः तेह्किंशांतिकल्याणंगृहीणांजीविकार्थिनः॥४३॥ ॥ब्र० अ० ४ ॥ अमूर्तेनैवरूपेणभूतानिससृजेद्धरिः॥ मूर्तेनदृश्यादृश्येनरूपेणेहतुभौतिकान्॥१९॥ब्रह्मांडपिंडान्सृजतिविश्वकर्माभिधोहरिः॥२०॥शिवोमनुर्मयस्त्वष्टातक्षाशिल्पिचपंचमः॥२४॥विश्वकर्मासुतानेतान्विद्धिशिल्पप्रवर्तकान्॥एतेषांपुत्रपौत्राये तएतेशिल्पिनोभुवि॥२५॥ पंचालानामविज्ञेयाः**

पंचभेदाहितेमताः॥ ॥ब्र० अ० ५ श्लो० नस्वर्गेनचपाताले ब्रह्मलोकेपि नास्तितत्॥ सौंदर्यंप्राणिमात्रेयन्निचेपिद्वारकोकसि॥४५॥ नवैकुंठेनकैलासेनश्वेतद्वीपभुव्यपि॥ वृक्षाणांफलपुष्पंश्रीःसास्तियाद्वारकाभुवि॥४६॥ चतुर्विधेषुभूतेषुयत्किंचित्स्थाणुजंगमं॥ द्वारकायांमनोहारिमनुनानिर्मितं हितत्॥४७॥ मयस्त्वनेकरूपाणिमायाभिर्द्वारकाजनं॥ रमयत्यनिशंदेवि तच्छृणुष्वमयेरितं॥४८॥ अपिनीचतरोमर्त्योमनुतेनत्रपार्वति। मय्यवप्रीतिमान्कृष्णः पुत्रादपिगुरोरपि॥४९॥ उत्सवेषुप्रत्यगारंमनुतेनागरोजनः॥ ममैवगेहेकृष्णोस्तिनान्यत्रक्वापिगच्छति॥५०॥ एवंसर्वस्त्रियोदासामातरोभ्रातृबांधवाः॥ वणिजःशिल्पिनश्चैवसरवायंमन्वतेहरिं॥५१॥ अध्यास्यद्वारकांत्वष्टा भगवज्जनतुष्टये॥ सर्वंसर्वात्मकंवस्तुयथेयंदर्शयत्यपि॥५२॥ जलंस्थलीभवेत्सद्यः स्थलंचजलतामियात्॥ नीरंक्षीरत्वमभ्येतियथेष्टंस्मृतिमात्रतः॥५३॥ देवतानांविमानानिह्युपतिष्ठतियादवान्॥ इंद्राद्यादेवताःसर्वाःप्रत्येकंतानुपासते॥५४॥ नवैकुंठेनकैलासेसत्यसंकल्पतास्तिया॥ द्वारकावासिनिजनेतादर्शात्वष्टुराज्ञया॥५५॥ तथात्वनेकरूपाणिकृत्वास्तेप्रतिसद्मसः॥ काष्ठपाषाणजंचित्रंकुर्वन्योरमुदेसदा॥५६॥ बालानांक्रीडनार्थायस्थावरंचरकार्यकृत्॥ करोतिसनतंदेविगोहस्त्यश्वरथादिकं॥५७॥ तस्मात्पार्वतिकृष्णोनविश्वकर्मायथास्मृतः॥ तथास्मराम्यहमपित्वदभीष्टार्थसिद्धये॥ ६४॥ ॥ब्र० अ० ६ श्लो०॥ यत्किंचिद्विजसंभूतंभूतजातंचतुर्विधं॥२६॥ तस्यसर्वस्यसंस्थानंमनुर्घटयतिस्वयम्॥ मानवोभूतसंघोयंशास्त्रदृष्ट्याचतुर्विधः॥२७॥ गृहादिनिर्माणविधौतत्स्तानाद्यंतमध्येषुविनायकांश्च॥ संपूजयेद्रत्नधनादिभिश्चसौवर्णरूपैश्चतदायुधैश्च॥५॥ ॥ब्र० अ० ८ श्लो०॥ उत्कीर्यदारुदृषदंमूर्तिमुद्धरतेतुयः॥ सतक्षाक्ष्मातलेयेनकृतंपातालसप्तकं॥३२॥

या प्रमाणें सोनारांनीं खोटीं वचनें करून रुद्रयामल ग्रंथाचें नांव मात्र दिलें. परंतु रुद्रयामल ग्रंथ ह्मणजे काय व त्यांत विषय कोणते आहेत व संवाद कोणाचा आहे व या ग्रंथाची संख्या किती आहे हें सोनारांस माहित सुद्धा नसून हा ग्रंथ हिंदुस्थानांत

दुर्मिल आहे असें जाणून एकदम ह्या (रुद्रयामल) ग्रंथानें नांव देऊन या ग्रंथाची संख्या एक लक्षावर आहे असें आपल्या ग्रंथांत लिहून विद्वानांस भयमात्र दाखविलें. परंतु आह्मीं त्या (रुद्रयामल) ग्रंथाचा शोध करून ३ प्रती जुनाट मिळविल्या आहेत त्या विद्वानांस दाखवून त्यांचाही निर्णय सर्वांस कळावा ह्मणून या सदरा खालीं संक्षिप्त रीतीने करितों. कारण रुद्रयामल ग्रंथ ह्मटलें असतां यादेशांत अनुपलब्ध असल्यानें रुद्रयामल ग्रंथांतील प्रमाणांचा निर्णय करण्यास विद्वान्लोकांस अम्मळ विचारच करावा लागेल; परंतु त्यांस विचार करण्याचे परिश्रम न लागण्याच्या उद्देशानें संपूर्ण रुद्रयामल ग्रंथाची स्थिति संक्षिप्त रूपानें दाखवितों ती पहा. आणि विचार करा कीं ब्रह्मविचार सत्य किंवा मिथ्या तो

**खरा रुद्रयामल प्रारंभ श्लोकाः**

**॥ भैरव उवाच ॥ ॥ पुराश्रीपरमेशानी वदनांभोजनिःसृतं। श्रीयामलं महातंत्रं स्वतंत्रं विष्णुयामलं। शक्तियामल माख्यातं ब्रह्मणस्तुष्टिहेतुना। ब्रह्मयामल वेदांगं सर्वंच कथितं प्रिये। इदानीमुत्तराकांडं वदश्रीरुद्रयामलं॥ ॥ यदि भाग्यवशाद्देवि तवश्रीमुखपंकजे। यानियानिस्वतंत्राणि संदत्तातिमहीतले। प्रकाशय महातंत्रं नान्यतंत्रेषु तृप्तिमान्॥ सर्ववेदांत वेदेषु कथितव्यं नतःपरं। तदातेभक्तवर्गाणां सिद्धिः संजायते ध्रुवं। यदिभक्ते दयाभद्रे वदत्रिपुरसुंदरि। महाभैरव वाक्यंच पंकजायतलोचने। श्रुत्वावाक्यंमहाकाली कथयामासभैरवं॥ भैरव्युवाच ॥**

या प्रमाणें रुद्रयामल ग्रंथाचा प्रारंभ असून हा मांत्रिक विधेवर आहे. याचीं पटलें ६४ असून प्रत्येकांत कित्येक विषय ह्मणजे.

**" सर्वेषां प्राणमथनं श्रृणु आनंद भैरव। आदौ बाला भैरवीणां साधनंषट्कलात्मकं। पश्चात्कुमारी ललिता साधनं परमाद्भुतं। कुरुकुविप्रचित्ता साधनं शक्तिसाधनं। योगिनी खेचरी यक्ष कन्यका साधनं ततः। उन्मत्त भैरवी विद्या कालविद्यादिसाधनं। पंचमुद्रासाधनंच पंचबालादिसाधनं।**

(पांच मुद्रा ज्या अग्निपुराणांत सांगितल्या त्यांचा विस्तार. )

**प्रत्यंगिरा साधनंच कलौसाक्षात्करं परं। हरितालिका स्वर्णविद्या धूम्रविद्यादिसाधनं )** (स्वर्णविद्या ह्मणजे हरताला पासून स्वर्णनाम लोक किमया

---

* येथें तीन प्रतींतही अशुद्ध आहे म्हणून तसेंच ठेविलें आहे.

ह्मणतात ती विद्या करण्याचा प्रकार तो असा कीं. गोमूत्रं हरितालंच गंध कंचमनःशिला॥ समंसमंगृहीलातुयावच्छुष्यतिपेषयेत्।एकादशादिनं यावद्यत्नेनरक्षयेत्तुवै। मंत्रेणधूपदीपाद्यैर्नैवेद्यैर्दुग्धसंयुतैः। मंत्रः। ॐ नमोहरिहरायरसायणसिद्धिंकुरु कुरुस्वाहा। अयुतजपेनसिद्धिः। सबरी गोलकं कृत्वा वेष्ट्य वस्त्राणियत्नतः। मृत्तिकालेपयेत्तस्य छायाशुष्कं तुकारयेत्। मृत्कुंडेचविनिक्षिप्तेपलाश काष्ठवन्हिना। अष्टयामी नपर्यंतं नान्यथाशंकरोदितं। तद्भस्मजायतेसिद्धिः रिद्धिसि सनामकं ताम्रपात्रेअग्निमध्येबिंदुमानेविनिक्षिपेत्। तत्क्षणाज्जायतेस्वर्णं नान्यथा शंकरोदितं। देवाय गुरुभक्ताय नदद्याद्दुष्टमानसे। सिद्धिपीठेभवेत्सिद्धि गायत्रीलक्षजापके। यस्मै कस्मै नदातव्यं शिवभक्तिमवाप्नुयात्। इत्यादिक [illegible] साधनं तत। भुक्तिसाधनं सिद्धसानंदंतदनंतरं। इत्यादि प्रथमारंभीं अनुक्रमणिकाध्याय असून अंतीं प्रत्येक विषयाचें प्रतिपादन केलें आहे तें सर्व विषय प्रारंभरूपानें द्वितीयनुक्रमेंकरून दाखवितो. असें कीं, “ अथातःसंप्रवक्ष्यामिसद्दर्शनविद्यया.। सर्वज्ञः परमानंदो द्रुमधीयाभयंकर १ याचे श्लो० ११ या प्रमाणें कंसांतील श्लो० जाणावे. श्रृणुनाथप्रवक्ष्यामित्वंयोग्योसिस्कंद्रुमः॥२॥नानाविद्याविशेषज्ञ सावधानोविचारय। [illegible] श्रीचक्रंचकुलाकुलं ताराचक्रंकूर्मचक्रं राशिचक्रं तथापरं। त्रिकचक्रंविष्णुचक्रंब्रह्मचक्रंत्रिलक्षणं। देवचक्रं मृति धन सुग्धचक्रंततःपरं। रामाचक्रंचतुश्चक्रंसूक्ष्मचक्रंततोवदेत्। तथाकथहचक्रंच कथितंषोडशप्रभो। ३(१७) अथचक्रंप्रवक्ष्यामि कालाकालविचारकं। ४(१८) अथवक्ष्यामिचक्रेंद्रंश्रृणुभैरवसादरं।५(२४) ६(३२) महाकथहचक्रार्धसर्वचक्रोत्तमोत्तमं। ७(३७) अथ पूजांप्रवक्ष्यामिकुमार्याश्चातिदुर्लभां। ८(४१) अथवक्ष्येमहादेवकुमार्याजपहोमकं। ९(४४ अथातः संप्रवक्ष्यामिकुमारीकवचंशुभं। १०(४६) अथातः संप्रवक्ष्यामिकुमारीस्तोत्रमुत्तमं।

* येथें पुस्तकांत अशुद्ध आहे.

११ (५३) अथातः संप्रवक्ष्यामि दिव्यं भावादिनिर्णयं। १२(५८) तन्नाम सिद्धिदेहस्थ मष्टमांगमधोलिखेत्.।१३(५९) आज्ञाप्रश्नार्थभावज्ञव र्णविन्यासनिर्णयं। १४(६२) अथातः संप्रवक्ष्यामि योगमार्गेण शंकर। १५(६७) देवकार्यं वेदशाखापल्लवं प्रणवंपरं वदामि परमानंद भैरवत्वि दमाश्रृणु. १६(७०) श्रृणुष्वानंदरुद्रेश तृतीयदललक्षणं १७(७२) अथवक्ष्ये महादेव अथर्ववेदलक्षणं। सर्ववेदस्य सारं हि शक्त्याचारसम न्वितं। अथर्ववेदादुत्पन्नं सामवेदं तमोगुणं। सामवेदाद्यजुर्वेदं महासत्वस मुद्भवं। १८(७९) श्रृणुनाथ प्रवक्ष्यामि असाध्यसाधनं परं। १९(८४) इदानीं श्रृणु वक्ष्यामि सर्वतंत्रार्थगोपनं। तत्सर्वं प्रश्नचक्रे च षड्धोरम्य भेदनं। २०(८६) अथवक्ष्ये महादेव सिद्धिमंत्रविचारणां। २१(८८) स्थूलं स्यं श्रृणु मे नाथ महाकाल सभावग। योगमार्गानुसारेण वीरभावाश्रये तव। २२(९३) श्रृणु त्वं भो प्रवक्ष्यामि षट्चक्रस्य कलोदयं। २३(९७) अथातः संप्रवक्ष्यामि ब्रह्ममार्गमनुत्तमं। २४(१०२) अथवक्ष्ये महा कालयोगशास्त्रार्थनिर्णयं। २५(१०९) श्रृणु प्राणेश वक्ष्यामि योगना थप्रिया गुरो। योगांगं योगिनामिष्टं सर्वसिद्धिकरं परम्

२५(११४) श्रृणु प्राणेश सकलं प्राणायामनिरूपणं। २७(१२१) श्रृ णु लोके प्रवक्ष्यामि प्राणायामफलाफलं। २८(१२६) निश्चयं ते प्रव क्ष्यामि श्रृणु आनंदभैरव मंत्रसिद्धिलक्षणं तु योगमार्गानुकालतः। २९(१३२) अथषट्⁕ गंच प्रवक्ष्यामी हृतत्वतः। ३०(१३४)- अथ वक्ष्ये महाकालमूलपद्मविवेचनं। (३१(१३६) अथनाथ प्रवक्ष्यामि भेदिन्याः साधनं परं। ३२(१३९)- अथकांत प्रवक्ष्यामि श्रृणुष्व मम तत्वतः। शक्तिकुंडलिनी देवी सर्वभेदनभेदिनी। कलिकल्मषमहाचीर्ण जगतां मो- क्षदायिनी। तस्याः स्तोत्रं यथा ध्यानं न्यासं मंत्रं श्रृणु प्रभो ।३३(१४१)- अथवक्ष्ये महादेव कुंडलीकवचं शुभं। ३४(१४४)- अथ भेदान् प्रवक्ष्या मि हिताय जगतां प्रभो। ३५(१४६) धृतियोगं प्रवक्ष्यामि यत्कृत्वा नि र्मलो भवेत्। ३६(१४८) अथकांत प्रवक्ष्यामि कुंडलीचेतनादिकम्।

⁕ येथें प्रतीवरून लागलें नाहीं.

सहस्रनामसफलमित्या० ३७(१५७) इदानीं श्रोतुमिच्छामिस्वाधि ष्ठानंप्रकाशनं। ३८ (१५९) शृणुनाथप्रवक्ष्यामिश्रीकृष्णासाधनोत्त मं ३९(१६२) अथनाथप्रवक्ष्येहं संसारसाधनोत्तमं। ४०(१६४) अथनाथप्रवक्ष्यामिशृणुष्वावहितोमम। येनचक्रेणलोकानांयोग कार्यदृढोभवेदित्यादि० ४१(१६५) योगेंद्रपरमानंदसिद्धिश्रीरुद्र शंकरशृणुचीराकिणीस्तोत्रंपरमानंदवर्द्धनं। ४२(१६८) कथया मिमहाकालपरमाद्भुतसाधनं। कुंडलीरूपिणीदेवीवाकिन्याकुलव ल्लभा ४३(१०७५) इदानींशृणुयोगार्थमयिसंयोगमेवच ४४ (१७७) अथकामातुराणांचकालनिर्मूलहेतुना। कथयामिमहादे वयत्कृत्वाकामिनीवशं। ४५(१८०) मणिपूरविभेदार्थंशृणुवक्ष्या मितत्वतः। ४६(१८२) अथकालभयंवक्ष्येयत्कालेयोगिराड्भवेत्। ४७(१८५) शृणुभैरववक्ष्यामिरौद्राणीस्तोत्रमुत्तमं। ४८ (१८९) शृ णुकैलासशैलस्थचक्रमंडलसंस्थितं। ४९ (२०१) स्तोत्रंरुद्रस्यवक्ष्या मिसारात्सारंपरात्परं। ५ (२०२) षट्चक्रभेदनार्थायसर्वसिद्धिस्फ सिद्धये। वक्ष्यामिलाकिनींदेवीस्तोत्रंपरमदुर्लभं। ५१ (२०५) शा रीरंत्रिविधंप्रोक्तमुत्तमाधममध्यमं। ५२(२०८) अथषट्भेदना-र्थायवक्ष्येषट्पंकजस्यच। ५३ (२१६) कथयस्ववरारोहेमणिपू रमनुक्रमं। ५४(२१७)- इदानींकालज्ञानादिवारणंशृणुभैरव ५५(२२१) परापरविभेदज्ञनिगूढज्ञानसाधनं॥ इदानींशृणुसर्वज्ञपं चद्रव्यादिसाधनं. ५६ (२२२) कथयामितवस्नेहात्कायवश्यवि-शेषणात्। हठयोगंप्रकथितमिदानींशृणुतत्क्रमं। ५७ (२२३) अ थातः संप्रवक्ष्यामिविवेकगुणलक्षणं। ५८ (२२५) अथातःसिद्धिमा हात्म्यंशृणुश्रीचंद्रशेखर. ५९ (२२६) ज्ञानेश्वरीशुभकरीपरिता रणीयायोगेश्वरैर्हरिहरैर्गुरुभिर्महेंद्रैः। तांकाकिनीमात्मविष्णुजन नीपरमेशपत्नींसंस्तौतिचारुहृदयात्मनपीठमध्ये. ६०(२२८) वद कांतेपरानंदरहस्यंकुलसुंदरि. ६१(२३०) काकिनीश्वरयोगाख्ये

सहस्रनाममंगलं. ६२(२४०) अथनाथ प्रवक्ष्येहं काकिनी गुरुदेव
यो:। मंत्रोद्धारं भवज्ञानं केनसिद्धो भवेद्योगी०६३(२४२) इदानीं शृणुस
र्वज्ञ रुद्रचंडिकसत्तमं ६४ (२४५) इदानीं शृणु सर्वज्ञ शत्रूणां नाशनं
परं। ब्रह्मास्त्रं संप्रवक्षामि सद्यः प्रत्ययकारकं। साधकानां हितार्थाय स्तं
भनाय च वैरिणां। यस्य स्मरणमात्रेण पवनोपि स्थिरायते। ॐ ह्लीं बग
लामुखि सर्वदुष्टानां वाचं मुखं स्तंभय जिव्हां किलय किलय बुद्धिं नाश
य नाशय. ह्रीं ओं स्वाहा। इति श्री रुद्रयामले उत्तरतंत्रे महातंत्रो
द्दीपे सिद्धमंत्रप्रकरणे षट्चक्रप्रकाशे भैरवीभैरवसंवादे बगलामुखीस्तो
त्रविन्यासो नाम चतुःषष्टितमः पटलः समाप्तः या प्रमाणें रुद्रयामल ग्रंथा
ची विषयानुरूपानुक्रमणिका असून एकंदर या रुद्रयामल ग्रंथाची संख्या १०४४७
आहे. असत्. या प्रमाणें सोनाराच्या ग्रंथांत दोन लबाड्या आढळल्या त्या विद्वज्ज
नास संक्षिप्तरूपानें दाखविल्या आतां त्याच (ब्रह्मविचार नामक ग्रंथांत) वासुदेव आ
त्माराम शेट सोनार यानें दुसऱ्या अध्यायाच्या सातवे पत्रा पासून आरंभ करून ६
साहवे अध्यायाच्या १० वे पत्रा पर्यंत मध्यें एकंदर श्लोक ४६ घालून त्या श्लोकास
वर. लिं० शै० या प्रमाणें जागोजागीं हेडिंगें दिलीं आहेत, तेव्हां ह्या हेडिंगांवरून लिं०
ह्मणजे लिंगपुराण असा अर्थ करितां येतो परंतु शै० ह्याचे दोन अर्थ होतात. ते अ
से कीं, शै० (शैवपुराण अथवा शैवागम) आतां शैवपुराण असेल असें जर ह्मणावें
तर लिंगपुराणाचे व शैव पुराणाचे एकच श्लोक कसे येतील? तेव्हां शैवपुराण असा
अर्थ संभवत नाहीं. शैवागम असें ह्मणावें तरि तोच न्याय येतो. तेव्हां शै० याचा
अर्थ मुळींच होत नाहिं. परंतु मला असें वाटतें कीं, ब्रह्मविचार ग्रंथकर्ता जो वासुदेव
आत्माराम शेट सोनार याचा मनांत असें असेल कीं, लिंगपुराणांतर्गत शैवागमांत हे
४६ श्लोक आहेत. तरिही मोठा विरोध येतो. तो असा कीं, आगम मात्र जे आहेत ते
केवळ स्वतंत्रच आहेत. शिवाय कोणतेही पुराणासी व आगमासी अर्थाअर्थी संबंध
नसून वासुदेव आत्मारामादि प्रभृती सोनारास मुळींच याची स्मृती राहिली नाहीं शि-
वाटते असो जरी त्यास स्मृति राहिली नाहीं तरी त्यास स्मृती देणें हें गुणज्ञाचें कृत्य
आहे असें मनांत आल्यावरून संपूर्ण लिंगपुराण अनुक्रमरूपानें येथें दाखवितों.

त्यावरून वासुदेवाचार्यादि प्रभृती सोनारांनीं शैवागम हा लिंगपुराणांतर्गत आहे कीं काय याचा विचार करावा हें आमचें त्यांस सांगणें आहे. आतां येथें प्रथमतः वासुदेव आत्माराम सोनार यांनी आपल्या ब्रह्मविचार ग्रंथांत लिं० शै० असें हेडिंग देऊन जे ४६ श्लोक खोटे करून घातले आहेत. ते प्रथमतः वाचकांस दाखवितों. कारण खोट्या वांचून खऱ्याची परीक्षा होत नाहीं. **खोटे श्लोक** ॥ ब्र० अ० २ लिं० शै० ॥ श्लो० ॥ मनुःसंहारकर्ताच्चमयोवैलोकपालकः ॥ त्वष्टा चोत्पत्तिकर्त्ताचशिल्पिकोगृहकारकः ॥८॥ दैवज्ञःसर्वभूषादिकर्त्तावैहितकाम्यया ॥ लोकानांपंचपांचाला अभूवन्शिववक्त्रतः ॥९॥ ऐश्वरंमनुरूपंचमयरूपंचवैष्णवं ॥ वैरिंचत्वाष्ट्ररूपंचमाहेंद्रंशिल्पिकस्यच ॥११॥ रूपंनारायणस्यैवदेवज्ञस्यप्रकीर्तितं ॥ पंचरूपाणियोवेदमुच्यतेसर्वकिल्बिषात् ॥१२॥ ब्र० अ० ४ श्लो० ४ अयसांचमनुःकर्ताकाष्ठकारोमयस्मृतः ॥ त्वाष्ट्रिकःकांस्यकर्त्ताचशिलाकर्त्ताचशिल्पिकः ॥२३॥ देवज्ञःस्वर्णकारश्च पंचानामकपंचकं ॥ योवेदपंचकर्माणिसर्वपापैःप्रमुच्यते ॥ २४ ॥ विश्वकर्मानिदेशेनपुरासृष्टाविरिंचिना ॥ चत्वारोमनवोलोकानिर्मितासृष्टिहेतवे ॥२८॥ योविरिंचिःसवैराजाप्रजापतिरुदारधीः ॥ अंतरालेगणानांचवरिष्ठोलोककारकः ॥२९॥ वैराजस्यमुखाज्जज्ञे विप्रःस्वायंभुवोमनुः ॥ स्वारोचिषोमनुक्षत्रीब्रह्मणोबाहुमंडलात् ॥३०॥ रैवताख्योमनुर्वैश्योवैराजस्योरुमंडलात् ॥ तामसाख्योमनुःशूद्रोवैराजस्यांघ्रिमंडला ॥ ३१ ॥ स्वायंभुवस्यषट्पुत्राज्येष्ठोथर्वाप्रकीर्तिताः ॥ सामवेदोयजुर्वेदोक्रमादृग्वेदएवच ॥ ३२ ॥ वेदव्यासःपंचमोथप्रियव्रतउदीरितः ॥ एतेषणमुख्यविप्राश्चउपविप्रानथश्रृणु ॥ ३३ ॥ आद्याशिल्प्यायनश्चैवगौरवायनएवच ॥ कायस्थायनआख्यानस्ततोवैमागधायनः ॥३४॥ अथर्वादयआद्याश्चमनोःस्वायंभुवस्यते ॥ षट्पुत्रामुख्यविप्राश्चकथितावेदवादिभिः ॥३५॥ ऋग्वेदादिकवेदानामेषमध्ययनंस्मृतं ॥ तेमुख्यवेदिनःसर्वमुख्यब्राह्मणसंज्ञकाः ॥३६॥ स्वायंभुवमनोःपुत्राप्रोक्ताशिल्प्यायनादयः ॥ चत्वारोउपविप्राश्चकथितावेदवादिभिः ॥ ३७ ॥

आयुर्वेदादिवेदानामेषामध्ययनंस्मृतं॥ तेचोपवेदिनः सर्वेउपब्राह्मणसंज्ञ
काः॥३८॥ ब्राह्मणानांशिखासूत्रंमुख्यानांपरिकीर्तितं॥ तथान्चैवोपवि
प्राणांविहितंचविरंचिना॥३९॥ मुख्यानां ब्राह्मणानांन्चगायत्रीश्रवणंख
लु॥ तथान्चैवोपविप्राणांगायत्रीश्रवणंस्मृतं॥४०॥ मुख्यानांब्राह्मणानांन्च
तथान्चेवोपवेदिनां॥ संध्याविधिरुपास्योयंविहितोथविरंचिना॥४१॥ अ
थर्वणस्योपवेदःशिल्पिवेदःप्रकीर्तितः॥ तस्मादथर्वणःप्रोक्ताः सर्वेशिल्पि
नएवच॥४२॥ शिल्पायनस्ययेपुत्रास्तेषुज्येष्ठश्चलोहकृत्॥ सूत्रधारःप्र
स्तरारिस्ताम्रकारःसुवर्णकः॥४३॥ पांचालानांचसर्वेषांशाखावैविश्व
कर्मणि॥ तेषांवैपंचगोत्राणांप्रवरंपंचकंस्मृतं॥४४॥ तेषांवैरुद्रदैवत्यं
त्रिष्टुप्छंदस्यएवच॥ मुख्यानांब्राह्मणानांच पांचालानांप्रकीर्तितः॥४५॥
शिल्पवेदश्चशिल्पीनांपंचनांपरिकीर्तितः॥ अध्ययनंचतत्रैवसंहितापं
चकंस्मृतं॥४६॥ ॥ ब्र० अ० ५॥ ऋग्वेदश्चमनोश्चैवयजुर्वेदोम
यस्यच॥ सामवेदस्त्वाष्ट्रिकस्यत्वथर्वाशिल्पिकस्यच॥२५॥ सुषुम्नाभि
धवेदोसौदेवज्ञानांप्रकीर्तितः॥ पंचवेदाश्चयोवेदसायुज्यंलभतेनरः॥२६॥
॥ मनुर्मयस्तथात्वष्टाशिल्पिकश्चतथैवच॥ दैवज्ञःपंचमश्चैवब्राह्मणाः
पंचकीर्तिताः॥७॥ तमोगुणोमनुश्चैवमयोसत्वगुणस्मृतः॥ रजोगुणोथ
त्वष्टाचशिल्पिकस्त्रिगुणात्मकः॥१३॥ दैवज्ञःशुद्धसत्वश्चब्रह्मांडेसवि
जायत॥ योवैगुणत्रयंवेदमुच्यतेसर्वबंधनात्॥१४॥ मनुस्फटिकवर्णा
श्चनीलवर्णोमयस्मृतः॥ त्वाष्ट्रिकोरक्तवर्णश्चशिल्पिकोधूम्रवर्णकः॥१५
स्वर्णवर्णश्चदैवज्ञःपंचवर्णाःप्रकीर्तिताः॥ पंचवर्णाश्चयोवेदमुच्यतेस
र्वपातकात्॥१६॥ मनोःकुंडंत्रिकोणंचचतुष्कोणंमयस्यच॥ वर्तुलंत्वाष्ट्रि
कंचैवषट्कोणंशिल्पिकस्यवै॥१७॥ दैवज्ञस्याष्टकोणंतुपंचकुंडानितानि
वै॥ एतानिचैवयोवेदसर्वदोषाद्विमुच्यते॥१८॥ रजतस्यमनोर्दंडोवेणुदंडो
मयस्यच॥ त्वाष्ट्रश्चताम्रदंडश्चलोहदंडश्चशिल्पिनां॥१९॥ सुवर्णदंड
आख्यातोदैवज्ञस्यागमात्मकः॥ पंचदंडांश्चयोवेदमुच्यतेसर्वतोभयात्
॥२०॥ रजतस्यमनोःसूत्रंपद्मसूत्रंमयस्यच॥ ताम्रसूत्रंत्वाष्ट्रिकस्यकार्पासं

शिल्पिकस्यच ॥ २१ ॥ दैवज्ञस्य समाख्यात स्वर्णसूत्रं महर्षिभिः ॥ पंचसूत्रा
णियोवेद सर्वपापैःप्रमुच्यते ॥ २२ ॥ पांचालानांच सर्वेषां आचार इतिगी
यते ॥ अष्टांगयोगः षट्कर्म पंचयज्ञाद् इतिश्रुतिः ॥ ५६ ॥ यजनं याजनं
चैव तथाचाध्ययनं स्मृतं ॥ अध्यायनं ततः प्रोक्तं तथादानं प्रतिग्रहः ॥
॥ ५७ ॥ स्नानसंध्यात्रिकालेषु अग्निहोमं तथैवच ॥ षट्कर्माण्येवमेतानि
पांचालानां स्मृतानिच ॥ ५८ ॥ नित्यं नैमित्तिकं कर्म द्विजातीनां यथाक्रमं
पितृयज्ञं भूतयज्ञं देवयज्ञं तथैवच ॥ ५९ ॥ जपयज्ञं ब्रह्मयज्ञं पंचयज्ञाश्च
रेतिवै ॥ एवंत्रिविधमाचारं कर्तारस्ते द्विजातयः ॥ ६० ॥ ब्र० अ० ६ मनु
र्मयस्तथा त्वष्टा शिल्पिकश्चतथैवच ॥ दैवज्ञः पंचमः प्रोक्तः स्वर्गस्थायज्ञ
पोषकाः ॥ ५५ ॥ ऐश्वरं मनुरूपंच मयरूपंच वैष्णवं ॥ वैरिंचत्वाष्ट्ररूपंचमा
हेंद्रशिल्पिकस्यच ॥ ११ ॥ रूपंनारायणस्यैव दैवज्ञस्य प्रकीर्तितं ॥ पंचरू
पाणियोवेद मुच्यते सर्वकिल्बिषात् ॥ १२ ॥ या प्रमाणें ब्रह्मविचारक-
र्त्यानें आपल्या ग्रंथामध्यें नवीन कृतीचे श्लोक घालून त्यास लिंग पुराणांतर्गत अशी
संज्ञा ( लिं० शै० ) या हेडिंगानें जाणविली आहे. परंतु सर्व श्लोक खोटे आहेत
यांत संशय नाहीं. वाचकहो काकपक्ष्यानें आपण हंस व्हावें ह्मणून आपल्या अंगास
चुना मारवला तर त्यास हंसत्व येईल काय? येणार नाहीं. हें सर्वांस माहीतच आहे जा-
वत्कालपर्यंत त्याच्या अंगास तो कृतीचा शुभ्रपणा असेल तोंपर्यंत कांहीं अज्ञा
नी लोकमात्र हंसाविषयीं शंका घेतील आणि एकदा तो चुन्याचा वर्ण निघून गेला ह्म
णजे तर त्याची अबालवृद्ध उपहास्य करतील यांत संशय नाहीं हें या ब्रह्मविचारग्रंथ
कर्त्यास माहिती असून ओढून चंद्रबळ आणण्या प्रमाणें आपण ब्राह्मण अशाविष-
यीं नवीन श्लोक घातले तर याणें आपली उपहास्यता होईल हें त्यांस कसें समजलें ना-
हीं कोण जाणे असो आतां ब्रह्मविचार कर्त्यानें जे श्लोक लिहिले ते खोटे आहेत असें
आह्मीं लिहितों ह्यास आधार काय अशी शंका घ्याल तर याविषयीं मुख्य आधार लिंग
पुराण आहे जर हे श्लोक लिंगपुराणोक्त आहेत तर लिंग पुराणाच्या पुस्तकांत सांप-
डावे हें खचित आहे आणि आह्मीं तर चार प्रतींत या श्लोकांचा शोध केला परंतु
एकेही प्रतीत मिळत नाहींत यावरून दुसऱ्या आधाराची गरज राहिली नाहीं. कदाचित्

कोणी ह्मणतील कीं जसे ब्रह्मविचार कर्त्यांचे श्लोक मिथ्या आहेत त्या प्रमाणेंच यानें हें लिहिणें मिथ्या नसेल असें कशावरून तर सर्व जनाची ही भ्रांती निरसन व्हावी ह्मणून येथें लिंगपुराणांतील संक्षेपतः विषय लिहितों ते पहावे ह्मणजे ब्रह्मविचाराच्या श्लोकांतील विषय व क्वचित् स्थळींते श्लोक याची जुळणी होते कीं काय हें सर्वांच्या ध्यानांत येऊन खऱ्या खोट्याचा निकाल होईल. अथलिंगपुराणांतर्गतविषयानुक्रमणिका प्रारंभः ॥ ॥ श्रीगणेशायनमः ॥ नमो रुद्राय हरये ब्रह्मणेपरमात्मने ॥ प्रधानपुरुषेशायसर्गस्थित्यंतकारिणे। हें त्या लिंग पुराणाचें मंगलाचरण असून त्याचे अध्याय सर्व १५१ आहेत. आणि त्या प्रत्येक अध्यायांतील विषय ह्मटले असतां यारीतीनें ह्मणजे प्रथमाध्यायांत ईशानकल्पाचा वृत्तांत. २ संक्षेपें करून पुराणानुक्रमणिका. ३ प्राकृतप्राथमिक स्वर्ग कथन. ४-५ सृष्टिक्रम. ६- रुद्रादिकांचीसृष्टि. ७ रुद्रावतारांचेंवर्णन. ८ पाशुपतयोगप्रकरण. ९ योगानुष्ठानगुणाख्यान. १० आचार्यसत्यादिनिर्णय. ११-१२ वामदेवोत्पत्तिः। १३-तत्पुरुषोत्पत्तिः। १४-अघोररुद्रोत्पत्ति. १५ अघोरब्रह्मकूर्चप्रकरण. १६ रुद्रोत्पत्तोर्ईशानसंभव. १७-१८ - शब्दब्रह्मवपद्मलिंगोत्ति. विष्णुकृतलिंगस्तव. १९ ब्रह्मविष्णुप्रबोध. २० लिंगोद्भववर्णन. २१ ईश्वरस्तवन. २२ सृष्टिक्रमब्रह्मरुद्रसंवाद. २३ ब्रह्मरुद्रसर्वोत्तमत्वप्रतिपाद० २४ रुद्रावतारक्षेत्रनिर्देश. २५ स्नानाचमनविधि. २६ जलभस्मादिमंत्रस्नानविधि. २७-२८ लिंगार्चनविधि. २९ देवदारुवनाख्यान. ३० देवदारूचेवनांत मृत्युंजयजप. ३१ देवदारुवनप्रवेशींईश्वरदर्शन. ३२ देवदारुवनाचेंस्तवन. ३३ देवदारुवन प्रवेश. ३४ शिवभस्मप्रहितोत्पत्ति. ३५ दधीच, क्षुप संवादीं मृतसंजीवनीमंत्राचाविधि ३६ क्षुपदधीचसंवाद. ३७-३८ शक्र- शैलाद संवाद. ३९ चतुर्युगधर्मविचार. ४० चतुर्युगधर्मव्यवस्था. ४१ शक्रशिलादसंवाद. ४२ नंदीश्वरोत्पत्ति. ४३-४४ नंदिकेश्वराभिषेक. ४५ पा. ५८ पंचभुवनकोशाचेंवर्णन. ५९ ज्योतिषचक्राचा निर्णय. ६० ग्रहतारादिकांचाविचार. ६१ ज्योतिःप्रचारकथ० ६२ ध्रुव

चरित्र. ६३ सर्गक्रम. ६४ सृष्टिक्रमींवासिष्ठकथन. ६५ सूर्यवंशवर्णन. ६६ ययातिचरित्र. ६७-८ सोमवंशकथन. ६९ आदिसर्ग. त्रिपुरविजय. ७१ त्रिपुरहर. ७२ लिंगमाहात्म्य. योगनिर्णय. ७३ लिंगविवरण. ७४ नित्यानित्यत्वकथन. ७५ लिंगमूर्तिप्रतिष्ठाविधिः। ७६-७-८ रत्नादिकांनींदेवालयनिर्माणफल. ७९ पशुपाशविमोचन. ८० द्वादशव्रतकथन. ८१ व्यपोहस्तवन. ८२ प्रतिमासींलिंगव्रत. ८३ एकभुक्तव्रतविचार. ८४ पंचाक्षरमाहात्म्य. ८५ वैराग्यमाहात्म्य. ८६ शिवशक्त्यादिभेदनिर्णय. ८७ योगोपदेश. ८८ सदाचारवर्णन. ह्मणजे योगाध्यायांत सदाचाराचें वर्णन असून त्यांतील श्लोकांचा आद्यंत असा आहे कीं ऋषय ऊचुः। केनयोगेन वैसू . सू० उ० अतऊर्ध्वंप्रवक्ष्यामियोगंपरमदुर्लभं। पंचधायःस्मरेदादौ०यःपठेच्छृणुयाद्वापिश्रावयेद्वाद्विजोत्तमान्। दैवेकर्मणिपित्र्येवासयातिपरमांगतिं इत्यादि ९३ श्लोक या अध्यायाचे असून यांत "आचारा इतिगीयते" किंवा "पांचालानां" हें पद मुळींच नाहीं. ८९ प्रायश्चित्ताचाविधि. ९० अरिष्टवर्णन. ९१ श्रीपतिमाहात्म्य. ९२ अंधानुग्रह. ९३ वराहप्रभाव. ९४ नृसिंहमहिमा. ९५ जलंधरवध. ९६ विष्णुकृतरुद्रसहस्रनाम. ९७-८ दक्षयज्ञविध्वंसन. ९९ कामदहन. १०० ईश्वरस्वयंवर. १०१ गौरीमहेशविवाह. १०२ विनायक जन्मकथन. १०३ नृत्याचेंकारण. १०४-५ उपमन्युसिद्धि. १०६-७ कृष्णास पुत्रलाभ. इति पूर्वार्धसमाप्तं. अथोत्तरार्धानुक्रमणिका प्रारंभः॥ ॥ कृष्णास्तुष्यतिकेनेहसर्वदेवेश्वरेश्वरः॥ वक्तुमर्हसिचास्माकं सूतसर्वार्थविद्वान्। सू०उ०॥ पुरापृष्टो महातेजा मार्कंडेयोमहामुनिः। अंबरीषेणविप्रेंद्रा स्तद्वदामियथा तथं। हा असून यांतील विषय या खालीं लिहिल्या प्रमाणें आहेत.

अध्याय १ कौशिककथन. २ विष्णुमाहात्म्य. ३ वैष्णवगीता. ४ विष्णुभक्तकथन. ५ अंबरीषमाहात्म्य. ६ अचललक्ष्मीव्रत. ७ अष्टाक्षरद्वादशाक्षरमाहात्म्य. ८ षडाक्षरमंत्ररुद्रमाहात्म्य. ९ पशुप्रतिपा

दन १० ईशमाहात्म्य. ११ देवीमाहात्म्य. १२ अष्टमूर्तिवर्णन. १३ अ
ष्टमूर्तिविवरण. १४ पंचब्रह्मवर्णन. या अध्यायांत सद्योजातादि
पांच मंत्राचें वर्णन केलें आहे तें असें कीं, सनत्कुमार उवाच॥ पं
चब्रह्माणि मे नंदिन्नाचक्ष्व गणसत्तम। श्रेयस्करेण भूतानि
पवित्राणि शरीरिणां ॥ नंदिकेश्वर उवाच ॥ ॥ शिवस्यैवस्वरू
पाणि पंचब्रह्मा ह्वयानि ते। कथयामि यथा तत्वं पद्मयोनेः सुत्तोत्त
म। क्षेत्रज्ञप्रथमामूर्तिः शिवस्यपरमेष्ठिनः। भोक्ताप्रकृतिवर्गस्यभो
ग्यस्येशान संज्ञिनः। स्थाणोस्तत्पुरुषाख्याहि द्वितीया मूर्तिरुच्यते।
प्रकृतिः साहिविज्ञेया परमात्मा गुहात्मिका। अघोराख्या तृतीयाच शं
भोर्मूर्तिर्गरीयसी। बुद्धेः सा मूर्तिरित्युक्ता धर्माद्यष्टांगसंयुता। चतुर्थी
वामदेवाख्यामूर्तिः शंभोर्गरीयसी। अहंकारात्मकत्वेन व्याप्यसर्व व्यवस्थि
ता। सद्योजाताव्हयाशंभोः पंचमी मूर्तिरुच्यते। मनस्तत्वात्मकत्वेनस्थि
तासर्वशरीरिषु ॥१०॥ इत्याद्यारभ्य पंचविंशति तत्वात्मा पंचब्र
ह्मात्मकः शिवः। श्रेयोर्थिभिरतोनित्यं चिंतनीयः प्रयत्नतः इत्यंत २२
इत्यादि श्लोक आहेत शिवाय मनु, मया, त्वष्टा, शिल्पि, दैवज्ञादि नामें
मुळींच या अध्यायांत नाहींत. अध्याय १५ व्यक्ताव्यक्तस्वरूप
निर्णय. १६-७ ईश्वर माहात्म्य. १८ पाशुपतव्रत. १९ मंडलस्थ
रुद्रवर्णन. २० गुरुशिष्यसंवाद. २१ शिष्यप्रतिष्ठा. २२ सूर्यपूजा.
२३-२४-२५ शिवपूजा. २६ अघोरमंत्रपूजा. २७ विनयाभिषेक.
२८ तुलापुरुषदान. २९ सुवर्णमेदिनीदान. ३० कल्पपादपदान.
३१ स्वर्णादिधातुदान. ३२ लक्ष्मीदान. ३३ तिलधेनुदान. ३४ गोसह
स्रदान. ३५ कन्यादान, सुवर्णवृषदान. ३६ षोडश महादानें.
३७ जीवश्राद्धविधान. ३८ लिंगमाहात्म्य. ३९ लिंगप्रतिष्ठा. ४०
प्रतिष्ठातंत्र. ४१ अघोरमाहात्म्य. ४२ आभिचारकविधि. ४३ य
ज्ञेश्वरविद्यामाहात्म्य. ४४-५ गायत्रीमाहात्म्य. ४६-७ मृत्युं
जयविधान. ४८-९-५०-१-२-३-४-५५ पुराणमाहात्म्य

इतिउत्तरार्धसमाप्तम्॥ या प्रमाणें लिंगपुराणानुक्रमणिका असून यांत एकंदरींत अध्याय १६३ आहेत. हा ग्रंथ व्यासप्रणीत असून यांत लिंगपुराणांतर्गत शैवागम असें मूळींच कोठेंलिहिल्याचें आढळत नसून उक्त विषयांवरून देखील तो लिंगपुराणोक्त असेल असें अनुमान देखील करणें संभवत नाहीं. कारण जरकदाचित् शैवागम हा लिंगपुराणांतर्गत असता तर कदाचित् लिंगे शैवे हें हेडिंग संभवतें. ज्यापेक्षां लिंगपुराणांतर्गत तो आगम नाहीं त्यापेक्षां लिंगे॰ शै॰ हें हेडिंग भ्रममूलक असून स्वकपोलकल्पित आहे असें म्हटलें पाहिजे. असत पक्षांतरानें यदाकदाचित् लिंगांतर्गत शैवागम आहे असें जरी म्हटलें तरी तें शैवागमांतील अनुक्रमणिकाध्यायावरून मुळींच संभवत नाहीं. कारण प्राय: त्या आगमाची व्यवस्था म्हटली असतां तांत्रिक असून शैवमतवाद्यांनीं कोणते प्रकारें वर्तावें ज्ञान, भक्ति, स्तुति स्तोत्रादि कोणते प्रकारें शंकराचीं करावीं; एतद्विषयावर तो आगम असून, त्यांतील विषयानुरूप अनुक्रम पहातां ब्रह्मविचार ग्रंथांतील श्लोकांस व ह्या अनुक्रमास जमीन अस्मानाचें अंतर दिसून येत असून ब्रह्मविचारांतील शैवागम श्लोक अगदीं स्वकपोल असून अर्वाचीन दिसून येतात. हें ज्यांस खरें किंवा खोटें पाहणें असेल तर त्यांनीं या खालील प्रमाणावरून पहावें. श्री ग्रु॰ उ॰॥ भगवन् सर्वतत्वज्ञवेदवेदांगपारग। यद्यत्प्रकारं ज्ञानंच निगूढं श्रुतिसंमतम्। तेषु यत्सारभूतंचा प्यज्ञानांधप्रदीपकं। तत्तत्सर्वंसमालोच्य मांबोधयितुमर्हसि,॥ श्री व्या॰ उ॰ शुकधन्योसि मान्योऽसिपुण्यरूपोऽसिभारते। पुत्रेणभवताऽस्माकं कुलं मुक्तंचपावनं। पुनाति पुंसां शतकं जन्ममात्रेण लीलया। मातामहानां शतकं मातरं मातृमातरमित्याद्यारभ्य. सरस्वतीं नमस्कृत्य ज्ञानंवक्ष्ये सनातनं। श्रूयतांपंचरात्रंच वेदसारमभीप्सितं। पंचसंवादमिष्टंच भक्तानामभिवांछितं। प्राणाधिकंप्रियंशक्र्द्रं परंज्ञानामृतंशुभं। भक्त्यातंपूजयामास शंकरःपरमादरं। सुखासनेसमासीनं स्वस्थंभक्तंचपूजितं। पप्रच्छवार्तां विनयीं विनयेन सुखावहं। सर्वंतंकथयामास पंचरात्राधिकंशुभं। ज्ञानामृतं तमुक्त्वास ब्रह्मलोकं जगामह। शंभुश्च

कथयामासस्वशिष्यंनारदंमुनिं। इ० ग्रा० पंचरात्रमिदं शुद्धं भ्रमांधध्वंसदीपकं। रात्रं चज्ञानवचनं ज्ञानंपंचविधंस्मृतं। तेनेदं पंचरात्रंच्चप्रवदंतिमनीषिणः। ज्ञानंपरमतत्वंच जन्ममृत्युजरापहं। ततोमृत्युंजयः शंभुः संप्राप कृष्णवक्त्रतः। ज्ञानंद्वितीयंपरमंमुमुक्षूणांचवांछितं। परंमुक्तिप्रदं शुद्धंयतोलीनंपदे शिवे। ज्ञानंशुद्धंतृतीयंचमंगलंशिवभक्तिदं। तद्दास्यदमभीष्टंचयतोदास्यंलभेच्छिवे। चतुर्थंयौगिकं ज्ञानं सर्वसिद्धिप्रदंपरं। सर्वस्वंयोगिनांपुत्रसिद्धानांचसुखप्रदं। अणिमा लघिमाप्राप्तिःप्राकाम्यं महिमा तथा। ईशत्वंच वशित्वंचतथाकामावशायिता। सार्वज्ञंदूरश्रवणं परकायप्रवेशनं। काय व्यूहंजीवदानं परजीवहरंपरं। सिद्धंच षोडशविधंज्ञानिनांचयतोभवेत्। ज्ञानंच परमं प्रोक्तं तद्वैषयिकंनृणां। यदीष्टदेवीमायासापरंसंमोहकारणं। विषयेबद्धचित्तश्चसर्वेमिंद्रियसेवनं। पोषणंस्वकुटुंबानां स्वात्मनश्चनिरंतरं। प्रथमंसात्विकंज्ञानंद्वितीयंचतदेवच। नैर्गुण्यंच तृतीयंच ज्ञानंच सर्वतः परं। चतुर्थंच राजसिकं भक्तस्तन्नाभिवांछति। पंचमं तामसं ज्ञानंविद्वांस्तन्नाभिवांछति। ज्ञानं पंचविधंप्रोक्तं पंचरात्रं विदुर्बुधाः। पंचरात्रंसप्तविधंज्ञानिनां ज्ञानदंपरं। ब्राह्मं १ शैवंच २ कौमारं ३ वासिष्ठं ४ कापिलं ५ परं। गौतमीयं ६ नारदीयमिदं ७ सप्तविधं स्मृतं। षट्पंचरात्रंवेदांश्च पुराणानिच सर्वशः। इतिहासंधर्मशास्त्रं शा[illegible]सर्वेषामालोच्य ज्ञानं संप्राप्य शंकरात्। इति ॥

या प्रमाणें या शैवागमादिकागमाची व्यवस्था असून हे केवल शिव, विष्णु, ब्रह्मदेवादि देवतपर स्तुतिस्तोत्रानीं युक्त भक्तिरूपानें आहे. याचे अध्याय ६२ असून प्रत्येक अध्यायांत पूर्वोक्त अनुक्रमांतील एकेक ज्ञानाचें भिन्न भिन्न रूपानें संवाद प्रश्नोत्तरानें विवरण केलें आहे. हे सर्व अध्याय आद्यंत येथें दाखविण्याचा हेतु होता; परंतु सारांश नसून वृथा ग्रंथ वाढत असल्यानें सर्व अध्याय येथें न घेतां प्रकृतोपयोगी जो विषय पाहिजे तोच घेतला आहे तर ह्या प्रदर्शित अनुक्रमावरून ब्रह्मविचार कर्त्यांनें व मुखमासीन् ब्राह्मण माहात्म्य नामक पुस्तक कर्त्यानें (लिं० शै०) असें हेडिंग देऊन अध्याय श्लोकादि रहित असे जे तिमिंगिलाचार्योक्तीचे स्वकपोल

कल्पित श्लोक पांचळ श्रेष्ठ स्वार्थ दर्शविले; ते या शैवागमांत आहेत, किंवा असतील, यद्वा असण्याचा संभव तरि दिसतो कीं काय याचा विचार करावा. आतां ब्रह्मविचार ग्रंथकर्त्यानें मुद्राधारणाविषयीं ऋषींस अधिकार नसून आपणास ह्मणजे पांचालांसच अधिकार आहे व यज्ञोपवीत करण्याचा आणि धारण करण्याचा आपणासच अधिकार आहे आणि ऋषींस मुळींच नाहीं अशाविषयीं नवीन श्लोक करून ते श्लोक अग्निपुराणांतर्गत आहेत असें जाणविण्याविषयीं त्यांवर अग्निपुराण असें हेडिंग घालून अध्यायाचा अंक न घालितां यथेच्छ अर्थासहित आपल्या ग्रंथांत लिहिले आहेत ते येथें सर्व वाचकांपुढें सादर करितो.

अग्निपुराण ॥ श्लो०॥ मनुमुद्राशंखवच्च मयमुद्राच चक्रवत्॥ त्वष्टामुद्रागदाधाराशिल्पकोपद्मकस्तथा॥१॥ ॐकारमुद्रांदेवज्ञःपंचमुद्राप्रकीर्तितः॥ पंचमुद्राः नजानंतिब्राह्मणेजन्मनिष्फलं॥२॥ यज्ञोपवीतकृती॥ त्वष्टेनकांतितंसूत्रंमयेनत्रिगुणीकृतं॥ मनुनादीयते गंथिवेदमंत्रेनस्थापितं॥ ॥ या प्रमाणें हे तीन श्लोक अग्निपुराणांतील ह्मणून लिहिले आहेत परंतु हे अग्निपुराणांत मुळींच नसून स्वकपोलकल्पित आहेत असें श्लोकांच्या रचनेवरून ही अनुमान होतें. आतां वाचकहो हे सदरील तीन श्लोक अग्निपुराणांत आहेत किंवा नाहींत हें तुह्मांस दाखविण्याविषयीं येथें अग्निपुराणाच्या सर्व अध्यायांतील विषय संक्षेपानें लिहितों तें पाहिले ह्मणजे खऱ्याखोट्याचा निकाल होईल. अथ अग्निपुराणांतर्गत विषयानुक्रमणिकाप्रारंभः॥ अग्निपुराण अध्याय १ पुराणप्रश्न. २ मत्स्यावताराचें वर्णन. ३ कूर्मावताराचें वर्णन. ४-५-६-७-८-९-१० वराह, नृसिंह, वामन, परशुरामावताराचें वर्णन. ११ रामावताराचें वर्णन. १२ हरिवंशकथन. १३-१४-१५ भारताख्यान. १६ बुद्धकलंक्यवताराचें वर्णन. १७-१८-१९-२० नवसर्गप्रदर्शन. २१ विष्णादिदेवपूजन. २२ स्नानविधि. २३ वासुदेवादिपूजाविधि. २४ कुंडनिर्माणविधि. २५ वासुदेवादिमंत्रनिरूपण. २६ मुद्रालक्षणकथन. २७ सर्वदीक्षाकथन. २८ आचार्याभिषेक.

२९ सर्वतोभद्रमंडलादिलक्षण. ३० मंडलविधि. ३१ कुशापामार्जनविधान. ३२ कुशसंस्कार. ३३ विष्णुपवित्रारोपण. ३४-३५-३६-३७ सर्वदेवपवित्रारोहणविधान. ३८ देवालयनिर्माणफल. ३९ भूमिपरिहार. ४० अर्घ्यदानविधान. ४१ शिलाविन्यास. ४२ प्रासादलक्षण. ४३ देवतास्थापनविधान. ४४ वासुदेवादिप्रतिमालक्षण. ४५ पिंडिकाललक्षण. ४६ शालग्रामादिमूर्तिलक्षण. ४७ शालग्रामादिपूजा. ४८ विष्णुचतुर्विंशतिमूर्तिपूजा. ४९ मत्स्यादिप्रतिमालक्षण. ५० देवीप्रतिमालक्षण. ५१ सूर्यादिप्रतिमालक्षण. ५२ योगिनीप्रतिमालक्षण. ५३ लिंगलक्षण. ५४ व्यक्ताव्यक्तलिंगलक्षण. ५५ लिंगपिंडीकाललक्षण. ५६ दिक्पालयोग. ५७ कलशाधिवासकथन. ५८ देवस्थानविधि. ५९ देवाधिवासनविधि. ६० वासुदेवप्रतिष्ठा. ६१ द्वारप्रतिष्ठाध्वजारोहणादिप्रकार. ६२ लक्ष्मीप्रतिष्ठा. ६३ सुदर्शनचक्रादिप्रतिष्ठा. ६४ कपाटादिप्रतिष्ठा. ६५ सभागृहस्थापन. ६६ साधारणप्रतिष्ठाविधि. ६७ जीर्णमूर्त्युद्धार. ६८ देवयात्रोत्सव. ६९ यज्ञावभृथस्नानं. ७० वृक्षारामादिप्रतिष्ठा. ७१ विनायकपूजा. ७२ विशेषस्थानादिकथन. ७३ सूर्यार्चन. ७४ शिवपूजा. ७५ अग्निस्थापनादि. ७६ चंडपूजा. ७७ कपिलादिपूजा. ७८ पवित्राधिवासन. ७९ पवित्रारोहण. ८० मदनकारोहण. ८१ समयदीक्षा. ८२ संस्कारदीक्षा. ८३ निर्वाणदीक्षाधिवासन. निर्वाणदीक्षाधिवासन. ८५-६-७-८ एकतलदीक्षा. ८९ निर्वाणदीक्षांगीभूताभिषेक. ९१ नानामंत्रकथन. ९२ वास्तुपूजा. ९३-४ प्रासादशिलान्यासकथन. ९५ शिवलिंगप्रतिष्ठासामग्री. ९६ शिवलिंगाधिवासनविधिः ९७ शिवलिंगप्रतिष्ठाविधिः ९८ गौरीप्रतिष्ठा. ९९ सूर्यप्रतिष्ठा. १०० द्वारप्रतिष्ठा. १०१ प्रासादकृत्यप्रतिष्ठा. १०२ ध्वजारोहण. १०३ जीर्णशिवलिंगोद्धार. १०४ प्रासादन्यासलक्षण. १०५ गृहादिवास्तुकथन. १०६ नगरादिवास्तुकथन. १०७ स्वायंभुवसर्गकथन. १०८ भुवनकोशवर्णन. १०९ तीर्थमाहात्म्य. ११० गंगामाहात्म्य. ११ प्र

याग माहात्म्य. ११२ वाराणसीमाहात्म्य. १३ नर्मदादिमाहात्म्य. १४ ग
यामाहात्म्य. ११५-६ गयायात्राविधिकथन. ११७ श्राद्धकल्पकथन.
११८ भारतवर्षकथन. ११९ महाद्वीपादिकथन . १२० भुवनकोश.
१२१ ज्योतिः शास्त्रकथन. २२ कालगणनाकथन. २३ युद्धजार्ण
वीयनानायोगकथन. १२४ ज्योतिःशास्त्रसारकथन. १२५ युद्धज
यार्णवीयनानाचक्रकथन. २६ नक्षत्रनिर्णयकथन. २७ युद्धजयार्ण
वेनानाबीजानि. २८ कोटचक्रं. २९ अर्घ्यकांडकथन. १३० मंडलक
थन. ३१ घातचक्रादिकथन. ३२ सेवाचक्रकथन. ३३ नानाबलानि.
१३४ त्रैलोक्यविजयविद्या. १३५ नक्षत्रचक्रकथन. १३६ नक्षत्रचक्र
१३७ महामारीविद्या. १३८ षट्कर्माणि. १३९ षष्टिसंवत्सराः १४० व
श्यादियोगकथन. १४१ षट्त्रिंशत्पदकज्ञानकथन. १४२ मंत्रौषधा
दिकथन. १४३-४ कुब्जिकापूजा. १४५ मालिनीनाममंत्रकथन. ४६
अष्टाष्टकदेव्याः १४७ त्वरितापूजा. १४८ संग्रामविजयपूजा. ४९ ल
क्षकोटिहोमः १५० मन्वंतरकथन. १५१ वर्णेतरधर्मकथन. ५२ गृ
हस्थवृत्तिः ५३ ब्रह्मचर्याश्रम. ५४ विवाहकथन. ५५ सदाचारकथ
न. १५६ द्रव्यशुद्धिः. ५७ शावाशौचादिकथन. ५८ स्त्रावाद्या
शौचं. १५९ असंस्कृतादिशौचक. १६० वानप्रस्थाश्रमक० १६१
सन्यासधर्मक० १६२ धर्मशास्त्र कथन. १६३ श्राद्धकल्पकथ. ६४
नवग्रहहोमविधान. १६५ नानाधर्मा. १६६ वर्णधर्मादिकथ. ६७
अयुतकोटिहोमविधि. ८ महापातकादिकथ० १६९-७०-१-२-३-
४ प्रायश्चित्तादिक. १७५ व्रतपरिभाषा. १७६ प्रतिपद्व्रत. १७७ द्वि
तीयाव्रत. १७८ तृतीयाव्रत. १८९ चतुर्थीव्रतक० १९० पंचमीव्रतक०
९१ षष्ठीव्रतक० १९२ सप्तमीव्रतक० १९३ अष्टमीव्रतक० १९५-६ नव
मीव्रतक० १९७ दशमीव्रतक० १९९ द्वादशीव्रतक० २०० श्रवणद्वाद
शीव्रतक० २०१ अखंडद्वादशीव्र.क. २०२ त्रयोदशीव्रतक. २०३ चतुर्द
शीव्रतक० शिवरात्रीव्रत. अशोकपौर्णिमाव्र. वारव्रतानि. नक्ष

व्रतानि. दिवसव्रतानि. मासव्रत. नानाव्रतानि. दीपदानव्र. नवव्यूहार्चनक. पुष्याध्यायकथन. नरकस्वरूप. मासोपवास व्र. भीष्मपंचकव्र. अगस्त्यार्घ्यदानक. कौमुदीव्रतकथा. व्रतदानादिसमुच्चय. दानवभाषा. महादानानि. ११ नानादानानि. १२ मेरुदानकथ. १३ पृथ्वीदानक. १४ मंत्रमाहात्म्यकथ. १५ संध्याविधिकथन. १६ गायत्रीनिर्माण. १७ गायत्रीनिर्माणकथ. १८ राजाभिषेकक. १९ अभिषेकमंत्राः २० सहायसंपत्तिक. २१ अनुजीविकथन. २२-३-४-५-६-७ राजधर्म. २८ स्वप्नाध्याय. २९-३० शकुनफलक. ३१-२ यात्रामंडलचिंतादिक. ३३ षाड्गुण्यक. ३४ राजकर्म. ३५ रणदीक्षा. ३६ श्रीस्तोत्रकथन. ३७ रामोक्तनीतिकथ. ३८ राजधर्मक. ३९ षड्गुण्यक. ४० सामादिक. ४१ राजनीति. ४२ पुरुषलक्षण. ४३ पासून ६८ चतुर्वेद. ३६९ व्यवहार. ३७४ अथर्वणविधान. ३७९ श्रीसूक्त ३८० आयुर्वेद. ४१४ आधानादिलक्षण. ४५९ छंदःशास्त्र. ४६० अलंकारक. ४६१ व्याकरणसार. इत्यादि विषय असून सविस्तर याचें वर्णन आहे. परंतु ग्रंथ विस्तृत भयार्थ यांतील आद्यंत न घेतां केवळ विषयानुक्रममात्र घेतला आहे. सारांश या प्रमाणें अग्निपुराणाची व्यवस्था असून प्रागुक्त श्लोकास तें अग्निपुराणाचें नामाभिधान दिलें आहे परंतु हे श्लोक अग्निपुराणांत मुळींच नाहींत. अस्तु याप्रमाणें सोनारांनीं केलेलाजो ब्रह्मविचार ग्रंथ हा सर्वथा खोटा आहे असा खोटा ग्रंथ करण्याचें कारण इतकेंच कीं संस्कृतानभिज्ञ लोकांला मोह उत्पन्न करून आपणास ब्राह्मण ह्मणवून घ्यावें अशी सोनारांची इच्छा खरी परंतु ती ईश्वरास सहन झाली नाहीं ह्मणून त्या सोनारांच्या लबाड्या बाहेर निघाल्या. वाचक हो पहा ह्या सोनारलोकांचें धारिष्ट केवढें आहे. अहो आपणास ब्राह्मण ह्मणवून घेण्याकरितां आपल्या ग्रंथांत केवळ पुराणांतीलच खोटीं वचनें लिहिलीं असें नाहीं तरि त्याचप्रमाणें वेदांतील ह्मणून खोटीं उपनिषदें करून ही लिहिलीं आहेत. व कांहीं वेदांतील खऱ्या ऋच्या लिहून

त्यांचीं भाष्यें खोटीं करून लिहिलीं आहेत आणि तसीच कांहीं स्तोत्रेंही खोटीं लिहून शंकराचार्यादिकांचीं नांवें लिहिलीं आहेत असे खोटे ग्रंथ करून ते छापिले आणि ते सोनारांनींच विकत घेऊन आपण ब्राह्मण खरोखर झालों असें मानूं लागले. जे कोणी न मानितील त्यांस हीं बुकें वाचून दाखवून त्यांस सांगतात अहो आपण ब्राह्मण आहोंत पहा ह्या वेदांच्या ऋचा. पहा ह्यांचीं भाष्यें. हीं पहा पुराणाचीं वचनें असें ह्मणून ती खोटी वचनें व त्यांचा खोटा अर्थ सर्वांस वाचून दाखवून सर्वांचीं मनें आपणाकडे वळवून खरोखर जे ब्राह्मण त्यांची निर्भर्त्सना करितात. आतां ज्याप्रमाणें पूर्वी पुराणाचीं वचनें प्रथमतः खोटीं दाखवून नंतर खरीं दाखविलीं त्याचप्रमाणें. त्या ग्रंथांत जे खोटे अर्थ लिहिले आहेत ते सर्व ग्रंथाच्या अध्यायानुक्रमानें दाखवितों. आंता सोनारानें केलेला जो ब्रह्मविचार ग्रंथ याचे अध्याय ९ आहेत तरि प्रत्येक अध्यायाचे मुख्य विषय घेऊन त्याचें खऱ्या वाक्यांनीं खंडन करितों तें विद्वानांनीं वाचून पाहून खऱ्या खोट्याचा विचार करावा. ह्मणजे माझे श्रम सफल होतील. सोनाराचा ग्रंथ ब्रह्मविचार याची प्रस्तावना. हा ग्रंथ वेदाचे व अनेक ग्रंथाचे मतानें तयार करून त्यांतील विषय सिद्ध केले आहेत ते येणें प्रमाणें. १ ॐकार ब्रह्मा पासून विराट् विश्वकर्मा आकारत्वास येऊन त्याणें सृष्टि उत्पन्न करून देवादि प्रजा उत्पन्न केल्या आणि या सृष्टीचा नियंता तोच आहे अन्य देवता ज्या आहेत त्या सर्व त्याचे अंशभूत आहेत.

२ विराट् पुरुषा पासून पांच ब्राह्मण उत्पन्न झाले ज्यांस मुखमासीत् ह्मणतात ते मनु मय त्वष्टा शिल्पि देवज्ञ हे आहेत त्यांचे अधिकार कोणते आहेत तें.

३ प्रत्नत ऋषिसंततीचे लोक आपल्यास मुखमासीत् ब्राह्मण ह्मणवितात. हें खोटें आहे आणि त्यांची उत्पत्ति कशी झाली ती सांगितली आहे. या प्रमाणें तीन विषय सिद्ध केलेला ग्रंथ यास आश्रय देणारे वेदमूर्ति पांडुरंग गोविंद कुळकर्णी यसुदर अंतोबा आबलवलीकर यांचें ईश्वर कल्याण करो. या प्रमाणें प्रस्तावना लिहून पुढें स्कंदपुराण नागरखंड अध्याय २ असें हेडिंग देऊन शिव उवाच॥ असा आरंभ करून ९ नऊ श्लोक खोटे लिहून विश्वकर्म्याची स्तुति केली पुढें ७ श्लोक खोटे करून विराटाचें वर्णन केलें या प्रमाणें पहिल्या अध्यायाचीं चार

पत्रें जाहाली नंतर पांचव्या पत्राच्या आरंभीं स्कंद. पु. ना. अ. २ श्लोक शिवएक: पंचरूपो ज्योतिर्ज्योति र्गुणैर्यथा ॥ विश्वकर्मांशकंचैव निर्मितं निर्मलंक्रमं ॥ ५० ॥ अर्थ– शिव जो तो एक आहे. परंतु मनुमयादि पंचरूपात्मक शोभतो. जसें ज्योती ह्मणजे एक प्रकाश आहे, त्या प्रकाशाचे गुण किंवा रंग जसे निरनिराळे असतात; अथवा चंद्रसूर्यादि जसे निरनिराळे तेजानें शोभतात, तद्वत् पांच ब्राह्मण ह्मणजे यांच्या पंच ज्योतीनें तो शोभायमान पावन आहे. यास पंचरूपात्मक ह्मणावें, आणि निर्मल ह्मणजे शुद्ध क्रमानें जें निर्मित केलें तें सर्व विश्वकर्मा याचें अंशभूत आहे. यावचनावरून पांच ब्राह्मण ह्मणजे यांचा किती मोठेपणा आहे हें वाचकांनीं ध्यानांत आणावें. कीं, सर्वांस पूज्य असा शिवतो या पांच ब्राह्मणाचे तेजानीं शोभायमान पावत आहे आणि केलेला जो क्रम तो निर्मल असून सर्व कांहीं त्याचेच अंशभूत आहेत. वाचकहो पहा या सोनार लोकांची आपणास ब्राह्मण ह्मणून घेण्याविषयीं केवढी लबाडी आहे पहा पहाबरें एक तर श्लोक खोटा. खोटा असूनही पूर्वार्धाचा व उत्तरार्धाचा संबंध मुळींच नाहीं पूर्वार्धांत महादेवाचें वर्णन व उत्तरार्धांत विश्वकर्म्याचें वर्णन. बरें असें असूनही त्याचा अर्थ भलताच लिहितात तो असा कीं "शिवएक: पंचरूपो" याचा अर्थ शिव जो तो एक असून पंचरूपात्मक आहे असा होतो असें असून मनु, मय, त्वष्टा, शिल्पि आणि देवज्ञ असा पंचरूपात्मक शोभतो असा अर्थ कोठून आला आणि चंद्रसूर्यादि जसे तेजानें शोभतात तसा शिव पांच ब्राह्मणाच्या तेजानें शोभतो असा अर्थ वरील श्लोकांत आहे काय? याचा वाचकानींच विचार करावा ह्मणजे सोनार याचें बोलणें किती खरें आहे हें सहज ध्यानांत येईल. बरें असो आतां सोनारास असें सांगावें कीं "शिवएक: पंचरूपो" याचा अर्थ तुह्मी पांच ब्राह्मण असा होत नाहीं तर असा भलता अर्थ तुह्मी लिहून विद्वान् लोक खरें मानून तुम्हास ब्राह्मण ह्मणतील असें समजूनका. आतां शिवपंचरूपात्मक आहे असें खरें परंतु तीं पांचरूपें कोणतीं हीं तुह्मास मुळींच माहीत नाहींत पंचरूपेंयेणें करून लोहार,

कांसार, रूतार, पाथरवट सोनार हे घेतले जात नाहींत तरी याविषयीं लिंगपुराणाचा उत्तरार्धाचा चवदावे अध्यायांत सनत्कुमाराला नंदीकेश्वरानीं शिवाच्या पांच मूर्ति सांगितल्या आहेत त्या अशा कीं शिवाची ईशान संज्ञक क्षेत्रज्ञा अशी पहिली मूर्ती आहे व तत्पुरुषाख्या अशी दुसरी मूर्ति आहे इला प्रकृति असें ह्मणतात तसेच अघोराख्या अशी तिसरी मूर्ती आहे तिजला बुद्धी असें ह्मणतात व वामदेवाख्या अशी चवथी मूर्ती आहे इजला अहंकारात्मिका असें ह्मणतात आणि सद्योजाताख्या अशी पांचवी मूर्ती आहे आणि तिजलाच मनस्तत्वात्मिका असें ह्मणतात अशा शंकराच्या पांच मूर्ती आहेत व यालाच पंच ब्रह्म व पंचरूपात्मक असें ह्मणतात असें असून सोनार हे भलताच अर्थ लिहून अज्ञलोकांचीं मनें मोहित करितात हें त्याचें फार वाईट कर्म आहे असो आतां हीं शंकराचीं पांच रूपें जीं आह्मीं येथें लिहिलीं तीं खरीं किंवा खोटीं पाहणे असतील त्यांनीं याच ग्रंथाच्या पंचविसाव्या पत्रावर लिंगपुराणाच्या अनुक्रमणिकेंत सर्व श्लोक लिहिले आहेत ते पहावे ह्मणजे हा अर्थ खरा आहे किंवा कसें हें ध्यानांत येईल. प्रस्तुत कालाचे ठायीं विश्वकर्मा हा एक देवांचा कारागीर आहे असें जें कथा पुराणामध्यें ऋषि लोक दर्शवितात आणि हीं सर्व वचनें पाहिल्यावर अशी खात्री होती कीं, विश्वकर्मा हाच जगाचा नियंता ह्मणजे धनी आहे. ओंकार उद्भवून जें विराट्रूप जाहलें असा जो पुरुष तोच विश्वकर्मा, त्याचे नावावरून हें निःसंशयानें लक्षांत येतें कीं, विश्वकर्मा ह्मणजे विश्व हें आहे कर्म ज्याचें तो विश्वकर्मा, यावरून विचार पहातां विश्व हें ज्याणें केलें तोच त्या क्रियेचा मालक होतो आणि याविषईं वेदही साक्षी देतात, तरी वेदवचनाचा अर्थ महादेवांनीं केलेला आहे तो अमान्य करण्यास आह्मीं मानव समर्थ होणार नाहीं; असें असून ऋषिलोक हो? अभिमानाचा त्याग करून आतां तरी त्या खऱ्या परमेश्वराची निंदा करूं नका. कारण सर्व जगास जो नियंता त्याची निंदा केल्यावर त्या पापाची क्षमा कोणाकडे मागाल? सूर्याकडे पाहून जर थुंकलें तर ती थुंकी आपल्याच मुखावर पडणार आहे. तुम्हीं अज्ञान नसून शहाणे व विद्वान् आहांत, तरी विद्वान् जे आहेत त्यांचे अंगीं विचार बहुत असतो याजकरितां ऋग्वेद यजु-

वेदांत ज्या परमात्म्याची भक्ती करण्यास सांगितली आहे असा श्रेष्ठ त्याची भक्ती करून त्याचे गुणानुवाद गा. त्यास लपवून क्षुद्र दैवतांची महती कथा पुराणांत दाखवून विश्वकर्मा हा देवांचा कारागीर ह्मणणे त्याचे आश्रयानें राहणारा असें जें खोटें दाखवितां तें तुम्हांकडून पापाचें कामन व्हावें असें आमचें तुम्हांस सांगणें आहे. आणि विश्वकर्मा हा सर्वांस वडील असून त्यांस निंदेनें हीनत्व आणितां यावरून तुम्हीं पित्यास पुत्र व पुत्रास पिता असें ह्मणतां याबद्दल तुम्ही दोषी व्हाल आणि ज्या दैवताची भक्ति तुम्हीं करितां तें दैवत तुम्हांवर कोपेल. कारण कीं, तें दैवत विश्वकर्मा याजपासून झाहलें आहे, तेव्हां त्या दैवतांचे वडिलांची निंदा केल्यावर तें दैवत तुम्हांवर संतुष्ट होणार नाहीं; यास प्रत्यंतर तुमच्या वडिलांची तुमच्या समक्ष निंदा करून तुमची स्तुति केली तर ती मनांत न आणितां वडिलांची निंदा करणारावर तुम्हीं तात्काळ कोपाविष्ट व्हाल. तसें तुह्मीं ज्या दैवतांची भक्ती करितां तें दैवत विश्वकर्मा याणें उत्पन्न केलें. आहे ह्यासाठीं वडील विश्वकर्मा आहे तर त्या दैवताची भक्ती करून विश्वकर्मा याची निर्भर्त्सना केली तर तें दैवत कोपायमान होऊन केलेली भक्ती व्यर्थ जाऊन उलटा नाश होणार आहे, ह्यासाठीं विचार करून विश्वकर्मा ह्याची भक्ती करा. वाचकहो हा वरील सोनारांनीं अर्थ लिहिलेला वाचून पाहून त्यांस असें विचारावें कीं, ऋषिलोक पुराणांमध्यें विश्वकर्मा हा देवांचा कारागीर आहे असें बोलतात हें खरें आहे. तुम्हाला खोटें वाटत असेल तर स्कंदपुराणांतील काशिखंडाच्या ८६ व्या अध्यायांत महादेवानें पार्वतीप्रत सांगितलें आहे तें पहा ह्मणजे विश्वकर्मा हा [illegible]चाकारागीर आहे किंवा नाहीं हें समजेल आतां काशिखंड हा ग्रंथ संस्कृत [illegible] प्रणीत आहे याचा अर्थ तुम्हांस कळणार नाहीं याजकरितां चांगल्याविद्वानाच्या मुखेंकरून ऐका अथवा प्राकृत ओवीबद्ध काशिखंड आहे त्याचा कवि महिपति नामक आहे त्यांत या अध्यायाचा अर्थ केलेला आहे तो पहावा ह्मणजे खात्री होईल आतां तो अध्यायच पाहाण्याची इच्छा असेल तर तो अध्याय मोठा आहे याजकरितां येथें तो सर्व अध्याय न लिहितां सारांश लिहितों तो वाचून पहा आणि खात्री करून घ्या ह्मणजे ध्यानांत येईल. पार्वत्युवाच॥ ॥ विश्व

कर्मेश्वरं लिंगं यत्काश्यां प्रथितं परं। तस्य लिंगस्य कथय देवदेव समुद्भवं॥ श्रीमहे० उवा० श्रृणु देवि प्रवक्ष्यामि कथां पाप प्रणाशनीं। विश्वकर्मेशलिंगस्य प्रादुर्भावं मनोहरं। विश्वकर्माऽभवत् पूर्वं ब्रह्मण स्त्वपरा तनुः। त्वष्टुः प्रजापतेः पुत्रो निपुणः सर्वकर्मसु। कृतोपनयनः सोथ बाल्ये गुरुकुले वसन्। चकार गुरुशुश्रूषां भिक्षान्नकृतभोजनः। एकदा तद्गुरुः प्राह प्रावृट्काले समागते। कुरु टजं मदर्थं च येन प्रावृट् नबाध्यते। यत्कदाचिन्न भज्येत न पुरातनतां व्रजेत्। गुरुपत्न्याप्यभिहितो रे त्वाष्ट्र कुरु कंचुकीं। ममांगयोग्यं नो गाढं नश्लथं च प्रयत्नतः। विनैव वाससा चारु वल्कलं च मदोज्वलं। गुरुपुत्रेण चाज्ञप्तो ममार्थे पादुके कुरु। यदारूढस्य मे पादौ न पंकः संस्पृशेत्क्वचित्। चर्मादिबंध निर्मुक्तो धावतो मे सुखप्रदे। गुरुकन्यापितं प्राह त्वाष्ट्र मे श्रवणोचिते। भूषणे स्वेन हस्तेन कुरु कांचननिर्मिते। दंतिदंतकृतान्येव स्वहस्त रचितानि च। गृहोपकरणं, द्रव्यं, मुसलोलूखलादिकं। तथेति स प्रतिज्ञाय सर्वेषां पुरतो द्विज। मध्ये वनं प्राविशच्च महाचिंता भयार्दितः। किंचित् कर्तुं न जानामि प्रतिज्ञातं च तेन वै। सर्वेषां पुरतः सर्वं करिष्यामीति निश्चितं। यावदित्थं चिंतयति स त्वाष्ट्रो वनमध्यगः। तावत्तदैव संप्राप्त स्तेनैको दर्शि तापसः। गुरूक्तं गुरुपत्न्युक्तं गुर्वपत्योक्तमेव च। कथं कर्तुमहं शक्तः कर्म तत्रादि सद्भुतं। कुरु मे बुद्धिसाहाय्यं निर्जने बंधुतां गतः। तापस उवाच। ब्रह्मचारिञ्छृणु ब्रूयां किमद्भुततरं त्विदं। विश्वेशानुग्रहात् ब्रह्मा प्यभव त्सृष्टिकोविदः। यदि त्वं त्वाष्ट्र सर्वज्ञं काश्यामाराधयिष्यसि। ततस्ते विश्वकर्मेति नाम सत्यं भविष्यति। इत्थं त्वाष्ट्रतनूजस्य लिंगाराधनचेतसः। त्रिहायनः प्रसन्नोभूत्तस्येह करुणानिधिः। तस्मादेव हि लिंगस्य प्रादुर्भूत भवोब्रवीत्। वरं वरय रे त्वाष्ट्र दृढभक्त्या नयानव। वरं वरय रे त्वाष्ट्र दृढभक्त्यानयानव। प्रसन्नोस्मि भृशं बाल गुर्वर्थकृतमानसः। गुरुणा गुरुपत्न्या च गुर्वपत्यद्वयेन च। यथार्थितं तथा कर्तुं ते सामर्थ्यं भविष्यति।

सर्वकर्मसुकौशल्यंसर्वबुद्धिवरिष्टतां। सर्वेषांचमनोवृत्तिंत्वंज्ञास्यसिवरान्मम। इत्युक्त्वातदथ्थदवस्त्वाप्राापगुरुमासवान्। गुरोःसमाहितंभूरिविधायसगृहान्ययौ। का० खं० अ० ८६-श्लो०१५। १५०पर्यंत. **अर्थ**— प्रभासनामक आठव्या वसूचापुत्र विश्वकर्मा असून त्यास प्रजापतीहि ह्मणतात (प्रजापती सारिखा कलाकौशल्यादिक करणारा अर्थात साक्षात् प्रजापती शब्दानें परमेश्वर नव्हे ) हा धर्माचा नातू असून धर्म हा दक्षाचा जामात आहे असें असून यासच पांच मुखें अगर १०० मुखें यद्वा सहस्त्रावधि हस्तपादादिक किंवा विराट् शब्दादिक असल्याचें कोठेंच प्रमाण दिसत नसून हा साधारण मनुष्य अथवा देव असून यासही शिल्पविद्या प्राप्त होण्याचें कारण सांगतों तें ऐका. स्कंद पुराणकाशिखंड अध्याय ८६ याचे श्लोक १५० वर आहेत यांतील भावार्थ असा कीं, प्रभासाचा पुत्र हा उपनयन जाहल्या नंतर एका गुरुच्या घरीं विद्याभ्यास करण्या करितां गेला. विद्याभ्यास जाहल्यानंतर गुरूयानें त्यास सांगितलें कीं, हे शिष्या मजला गुरुदक्षिणा द्यावयाची ती अशी कीं एक पर्णशाळा बांधुन दे ती अशी कीं पावसानें कुजूंनये व कधीं मोडूंनये व कधींही जुनी होऊंनये असें गुरू सांगतात. इतक्यांत त्या गुरूची स्त्री येऊन ह्मणत्ये कीं, हे शिष्या मला एक चोळी दे ती अशी कीं, कधीं फाटूंनये आणि माझ्या अंगास योग्य व कधीं सईल व आंवळही होऊंनये असें गुरुपत्नी मागत असतां गुरुपुत्र ह्मणतो हे ब्राह्मणा मला दोन पादुका दे. त्या अशा कीं, त्या मी पायांत घालून चिखलांतून चाललों तरी चिखल लागूंनये. आणि त्यास कातड्याचे बंद वगैरे नसावें व त्या घालून पळत असतां पायांस दुःख होऊंनये असा गुरुपुत्र मागत असतां इतक्यांत गुरुकन्या घरांतून येऊन ह्मणते कीं, हे विद्यार्थ्या. मजला दोन कुंडलें सुवर्णाचीं व उखळ, मुसळ, इत्यादि मुलींच्या खेळण्याचें सर्व साहित्य हस्तिदंताचें तूं आपल्या हातानें करून दे. असें त्या तिघांचें भाषण ऐकून तो ब्राह्मण पुत्र बरें आहे असें ह्मणून अरण्यांत निघून गेला. आणि रडूंलागला. इतक्यांत एक तपस्वी येऊन त्यांस ह्मणतो. हे ब्रह्मचाऱ्या? या घोर अरण्यांत येऊन तूं दुःख पावतोस याचें कारण काय? असें विचारिलें

असतां त्या ब्राह्मण पुत्रानें त्यांस सर्व सांगितलें तेव्हां तो तपस्वी ह्मणतो हे ब्रह्मचा-
र्‍या असें रडून काय होतें तरी काशीस जा आणि तेथें कृपानिधि व शिल्पशास्त्रा-
चा कर्ता असा शंकर आहे त्याची आराधना कर ह्मणजे तो प्रसन्न होऊन तुझी
कार्यसिद्धि करील असें त्या तपस्याचें भाषण ऐकून त्या तपस्व्या सहित काशीस
जाऊन तेथें शंकराचें लिंगस्थापन करून आराधना करितांच शंकर प्रसन्न
होऊन ह्मणतात कीं, हे ब्राह्मणपुत्रा मी प्रसन्न झालों. तुला इच्छित असेल
तें माग. असें ऐकून गुर्वादिकानीं मागित त्याल्या वस्तु सर्व सांगितल्या. तेव्हां
शंकर ह्मणतात अरे मी प्रसन्न झालों असतां येवढेंच काय मागतोस असें ह्म-
णून शंकर त्या ब्राह्मणास वर देतात. तूं माझें लिंग स्थापन करून आराधना
केलीस तेणें करून मी तुला प्रसन्न जाहलो. तरि आजपासून तूं शिल्पशा
स्त्रांत निपुण होशील आणि तुझें नाम विश्वकर्मा असें होईल. व तूं जें लिंगस्था
पन केलेंस त्याचें नाम विश्वकर्मेश्वर असें होईल. अशीं अनेक वरदानें देऊन शं-
कर अदृश्य झाले. नंतर तो ब्राह्मण गुरु गृहीं जाऊन त्यानीं जेजे पदार्थ मा-
गितले होते ते त्यास देऊन आपल्या गृहाप्रत गेला. त्या दिवसापासून त्याचें वि
श्वकर्मा हें नामाभिधान प्रसिद्ध झालें. नंतर त्या शंकराचे वरप्रदानें करून तो
विश्वकर्मा देवांचें गृह निर्माणादिक सर्व शिल्प कर्म करूं लागला. अशी कथा स्कं-
दपुराणामध्यें आहे ती कथा ऋषि लोक सांगत असतां सोनारलोक हे त्यांची निं-
दा करितात हें त्यांचें केवढें अज्ञान आहे. आता येथें सोनारलोक अशी शंका घे-
तील कीं; प्रभास हा आठवा वसु असून त्याच्या पुत्राचें नांव विश्वकर्मा अ-
सें कोठें आहे? तर त्यास सांगावें कीं अष्टवसु याची उत्पत्ती व त्याचा वंशा विष-
यीं मत्स्यादिक पुराणांतील वचनें दाखवितों तीं पहा आणि आपल्या मनाची
खात्री करून घ्या. मत्स्यपुराण. अ. ५ श्लोक १२ पासून २८ पर्यंत.
"ततस्तेषु विनष्टेषु षष्टिकन्याः प्रजापतिः। वैरिण्यां जनयामासदक्षः
प्राचेतसस्तथा॥ प्रादात्सदश धर्माय कश्यपाय त्रयोदश। सप्तविंशति
सोमाय च्चतस्त्रोरिष्टनेमये। द्वेचैव भृगुपुत्राय द्वेकृशाश्वाय धीमते। द्वे
चैवांगिरसे तद्वत्तासां नामानि विस्तरात्॥ अ० दक्षप्रजापती शावल

हर्यश्वादिक पुत्र नष्ट झाले असतां दक्ष प्रजापतीनें वैरिणीनामक स्त्रीचे ठिकाणीं ६० कन्या उत्पन्न करून १० धर्माला, १३ कश्यपाला, २७ चंद्राला, ४ अरिष्टनेमिला, २ कृशाश्वाला आणि २ अंगिरा ऋषीला प्रजोत्पादनार्थ दिल्यात्या पैकीं, धर्माचा वंश सांगतात. "शृणुध्वं देवमातॄणां प्रजाविस्तारमादितः। मरुत्वती, वसु, र्यामी लंबा, भानु, ररुंधती,। संकल्पा, चमुहूर्ताच साध्या, विश्वाच भामिनी। धर्मपत्न्यः समाख्यातास्तासां पुत्रान्निबोधत॥ इत्यादिक नामाभिधाने सांगून पुढें यांचा वंश सांगतात. विश्वेदेवास्तु विश्वायाः साध्या साध्या नजीजनन्। मरुत्वत्यां मरुत्वंतो वसोस्तु वसवस्तथा। या प्रमाणें सांगून पुढें त्या अष्ट वसूचीं नामें सांगतात. "आपो ध्रुवश्च सोमश्च धरश्चैवानिलोऽनलः। प्रत्यूषश्च प्रभासश्च वसवोष्टौ प्रकीर्तिताः। इत्यादिक सांगून अनुक्रमानें पुढें यांचा वंश कथन करीत आहेत. पैकीं, यांतील ८ व्या वसूचा वंश मत्स्यादिकाष्टदशपुराणांवरून असा विदित होतो कीं, "विश्वकर्मा प्रभासस्य पुत्रः शिल्पीप्रजापतिः। प्रसादभवनोद्यानप्रतिमाभूषणादिषु। तडागारामकूपेषु स्मृतः सोऽमरवर्धकी। अर्थ- विश्वकर्मा हा प्रभास नामक आठव्या वसूचा पुत्र आहे आणि त्यासच प्रजापति असें ह्मणतात आणि तो शिल्प विद्येंत निपुण आहे बंगले घरें बागा प्रतिमा भूषणें तडाग कूप इत्यादि करण्या विषयीं तो देवांचा कारागिर आहे. असें मत्स्यपुराणामध्यें असून यास दुसरें प्रमाण. विष्णुपुराण शं० १ अध्याय १५ प्रभासस्यनु याभार्यावसूनामष्टमस्यच। विश्वकर्मा महाभागस्तस्यां जज्ञे प्रजापतिः ११५ कर्ताशिल्पसहस्राणांत्रिदशानां सवर्धकी॥ भूषणानांचसर्वेषां कर्ताशिल्पवतांवरः १२० यः सर्वेषांविमानानिदेवतानांच कारह॥ मनुष्याश्चोपजीवंति तस्यशिल्पमहात्मनः १२१ अर्थ- प्रभासनामक जो आठवा वसु त्याचा पुत्र विश्वकर्मा तो देवांचा शिल्पकर्म करणारा असा सुतार आहे आणि तोच देवांचीं विमानादिक करणारा आहे आणि त्याच्या शिल्पशास्त्रावरून मनुष्यही उपजीविका करितात, असें विष्णुपुराणामध्यें आहे

व अशींच वचनें अन्य पुराणांत ही आहेत परंतु ग्रंथविस्तारभयास्तव येथें दाखविली नाहींत आतां या दोनी वचनांमध्यें विश्वकर्मा हा देवाचा कारागीर आहे असें वरील वर्धकी शब्दानें सिद्ध होतें कारण अमरकोश कांड २ शूद्र वर्ग **तक्षातुवर्धकिस्त्वष्टारथकारस्तुकाष्ठतट्।** अशा कोशाच्या प्रमाणांवरून सिद्ध होतें तेव्हां विश्वकर्मा हा देवांचा कारागिरच आहे असें असून सोनार लोक हे ऋषींवर विनाकारण दूषण ठेवितात, तर हें दूषण व्यासावर ठेवावें. या प्रमाणें अष्टादश पुराणांच्या इतिहासावरून प्रभासाचा पुत्र विश्वकर्मा आणि तोच देवांचा कारागीर असें सिद्ध होतें आतां सोनारानें मुख्य ह्मणणें असें आहे कीं, विराट् विश्वकर्मा याच्या मुखापासून आम्ही पांच ब्राह्मण उत्पन्न झालों परंतु हें त्यांचें बोलणें सर्वथा निर्मूलक आहे तें असें कीं विराट् विश्वकर्मा असा मुळींच नाहीं आतां विराट् याला विश्वकर्मा असें विशेषण संभवतें खरें परंतु ज्या विश्वकर्म्यापासून सोनारादिकांची उत्पत्ती जाहाली त्या विश्वकर्म्याला विराट् विश्वकर्मा असें नांव मुळींच संभवत नाहीं असें ब्रह्मवैवर्त पुराणावरून सिद्ध होतें ती कथा पुढें ज्या वेळेस सोनारादिक पांचांची उत्पत्ती सांगू त्यावेळेस ती कथा सविस्तर लिहूं. आतां सोनारांचें ह्मणणें असें आहे कीं आह्मी विराट् विश्वकर्म्याच्या पांच मुखांपासून पांच ब्राह्मण उत्पन्न जाहालों ह्मणून आह्मास मुखमासीन् ब्राह्मण असें ह्मणतात परंतु हें त्यांचें ह्मणणें मुळींच संभवत नाहीं कारण असेंकीं विराटाच्या पांच मुखांपासून पांच ब्राह्मण उत्पन्न झाले अशी कथा श्रुति स्मृति पुराणें उपपुराणें व आगमादिक ग्रंथांत मुळींच नाहीं तर कसें आहे? असें जर ह्मणाल तर या विषयीं प्रमाणें लिहितों तीं पहा ऋग्वेद अष्टक आठवा. अध्याय चवथा यामध्यें विराट् स्वरूपाचें वर्णन आहे तें असें कीं **सहस्रशीर्षापुरुषः** असा त्याचा आरंभ आहे आणि या वाक्याचा अर्थ असा कीं सहस्र आहेत शीर्षं जाला येथें सहस्र शब्दानें हजार आहेत मस्तकें जाला असा अर्थ संभवत नाहीं तर येथें सहस्र शब्दानें अनंत आहेत मस्तकें जाला असा होतो यास उदाहरण सहस्रांशुः हें नांव सूर्याचें असून येथें सहस्र शब्द अनंतवाचक आहे यावरून विराटाला अनंत

मुखादिक अवयव आहेत असें सिद्ध होतें असें असून त्याच्या पांच मुखांपासून पांच ब्राह्मण उत्पन्न जाहले असा अर्थ सोनारांनीं कोठून केला असेल तो असो. आतां विराटाच्या मुखापासून ब्राह्मणांची उत्पत्ती जाहाली यास प्रमाण **ब्राह्मणोस्य मुखमासीद्बाहू राजन्यः कृतः ऊरू तदस्य यद्वैश्यः पद्भ्यां शूद्रो अजायत** भाष्य **ब्राह्मणः ब्राह्मणत्वजाति विशिष्टः पुरुषोऽस्य प्रजापतेर्मुखमासीत् मुखादुत्पन्न इत्यर्थः राजन्यः क्षत्रियत्वजातिविशिष्टो बाहू कृतः बाहुत्वेन निष्पादितः तत्तदानीमस्य प्रजापतेः यत् या वूरू तद्रूपो वैश्यः ऊरूभ्या मुत्पादित इत्यर्थः तथास्य पद्भ्यां शूद्रजातिविशिष्टःपुरुषोऽजायत उत्पंनः** या भाष्यावरून ब्राह्मण जातिविशिष्ट एक पुरुष उत्पन्न होता- झाला असें असून या ऋचेंत ही **ब्राह्मणः** असें एकवचनच आहे येथें जर **पंचब्राह्मणाः** असें असतें तर सोनारांचें ह्मणणें खरें होतें. परंतु तसें श्रुतींतच पद नाहीं तेव्हां पांच ब्राह्मण उत्पन्न झाले असें सोनारांचें ह्मणणें अगदींच खोटें आहे यास दुसरें प्रमाण. **गायत्र्या ब्राह्मण मसृजत् त्रिष्टुभाराजन्यं जगत्यावैश्यं नकेन चिच्छूद्रमितिश्रुतेः भा॰टी॰७** या श्रुतींतही ब्राह्मण शब्द एकवचनीच आहे पांच असा नाहीं यास तिसरें प्रमाण. ऋग्वेद अष्टक ६ अध्याय ३ वर्ग १६ मंत्र ४।५।६ **ब्रह्म जिन्वत मुतजिन्वतं धियो हतंरक्षांसि सेधतममीवाः॥ सजोष॰ क्षत्रं जिन्वतमुतजिन्वतं नृन्हतंरक्षांसि सेधतममीवाः॥ सजोष॰ धेनूर्जिन्वतमुतजिन्वतं विशो हतंरक्षांसि सेधतममीवाः॥ सजोषसा॰** या श्रुतींत फक्त ब्रह्म शब्द एकवचनी आहे तेव्हां विराटाच्या पांच मुखांपासून पांच ब्राह्मण उत्पन्न जाहले असा अर्थ जो सोनारांनीं लिहिला तो मुळींच खोटा आहे आतां सोनार अशी शंका घेतील कीं श्रुति मध्यें ब्राह्मण शब्द जो एकवचनी आहे तेथें **जातावेकवचनं** अशा न्यायानें ब्राह्मणजाती असा अर्थ होतो. तत्रापि पांच ब्राह्मण असा कोठून आला. तर हें सोनारांचें लिहिणें अगदीं खोटें आहे. आतां सोनारांस जर पांच ब्राह्मणच उत्पन्न

जाहले असें सिद्ध करणें होतें तर त्याला थोडी युक्ती होती आणि ती त्यांनी पू-
र्वी केलेली होती परंतु येथें कसे विसरले असतील ते असो. ती अशी कीं. **ब्राह्म
णोस्य मुखमासीत्** अशी जी वेदाची ऋचा आहे तेथें **पंचब्राह्मणोस्य
मुखमासीत्** असें स्वकपोलकल्पित करून आपल्या ग्रंथांत लिहिलें अस-
तें ह्मणजे कार्यसिद्धि जाहली असती परंतु तसें केलें नाहीं ही एक त्यांची चुकी
आहे. हह!! समजलों असें न करण्याचें कारण आहे खरें. जर असें करावें
तर पुरुषसूक्त हें ऋषिकुलामध्यें अबाल वृद्धांस येत आहे. तेव्हां ही लबाडी
कशी लपेल आतां पूर्वी जीं पुराणांतील ह्मणून खोटीं वचनें करून घातलीं
आहेत त्याचें कारण ते सोनार असें समजले कीं ही दुर्मिल पुराणें कोणी शोधू-
न पाहणार नाहीत. आणि आमची लबाडी बाहेर निघणार नाहीं असा त्यां
चा हेतू खरा. आणि त्याचप्रमाणें हा सोनारांनीं ग्रंथ छापून सुमारें सात आ-
ठ वर्षे झालीं परंतु कोणीच विद्वान लोक याचा विचार करील नाहीत तेव्हां आ-
पण जी लबाडी केली ती जिरली असें पाहून पुनः मुंबई येथें कांदेवाडींत उ-
रणकराच्या चाळींत राहणारा श्रीधर बाबाजी मठकर सोनार यानें सद्बोधचिं-
तामणि या नावाचें पुस्तक छापून सोनार मंडळींत प्रसिद्ध केलें. तसेंच*. **मुख-
मासी ब्राह्मणवर्णन** अशा नावाचें पुस्तक छापिलें आहे त्याचे तीन अ-
ध्याय असून पहिले अध्यायांत स्कंदपुराण नागरखंड अग्निपुराण रुद्र-
मल इत्यादि ग्रंथांचीं नांवें देऊन ब्रह्मविचार ग्रंथा प्रमाणेंच खोटीं वच-
लिहिलीं आहेत व दुसरे व तिसरे अध्यायांत चरणव्यूह याचा अर्थ व क-
वैद्यशास्त्रांतील काढे, चूर्णे वगैरे लिहिलीं आहेत तेव्हां तात्पर्यार्थविराटाच्या-
च मुखांपासून पांच ब्राह्मण उत्पन्न झाले असा जो सोनारांनीं अर्थ लि-
ला तो सर्वथा खोटा आहे. पूर्वी सांगितलेल्या अर्थांत परमात्मा ईश्वर-
ची वळख करून घेण्यास गुरु पाहिजे असें महादेव सांगतात; तो गुरु
कर्मा कुलांतील असावा, अन्य जातीचा योग्य नाहीं. स्कं. पु. ना. अ

गुरुःसर्वगुणैस्त्वार्थ परार्थविश्वकर्मणः॥ श्रुतिवाक्यस्मृतिपाठै
विश्वकर्मा गुरुस्तयोः॥५५॥ **अर्थ** - सर्वप्रकारें स्वार्थ आणि परमार्थ

* नारायण केशव वैद्य सोनार यानें.

यास विश्वकर्मा गुरु हें वचन श्रुति आणि स्मृति आधारें आहे असें शंकर कार्तिक स्वामीप्रत सांगतात. कोणी मनांत आणील की, विश्वकर्मा ह्मणजे महान् शिव जो विराट् विश्वकर्मा तो गुरु आपणास कोठून प्राप्त होणार? तर तसें नव्हे. या भूमंडलाचे ठिकाणीं पांच ब्राह्मण दोन भुजांचे जे विश्वकर्मा कुलांतील आहेत हें स्थावर जंगमास अथवा स्वार्थ परमार्थास गुरु म्हणून याची भक्ती केली पाहिजे. दश भुज जो विश्वकर्मा तो देवांचा गुरु आणि दोन[+] भुजांचा विश्वकर्मा हा स्थावर जंगमास गुरु आहे, यास प्रमाण देतों. (आमचें अप्रमाण भाषण मिळावयाचें नाहीं.) स्कं. पु. ना. अ. ७ **द्विभुजोविश्वकर्माच स्थावरोजंगमःपिता॥ दशभुजोविश्वकर्मा सर्वदेवपितामहः॥३८॥ अर्थ**— दोन भुजांचा जो विश्वकर्मा हा स्थावर जंगमास पिता व दशभुज विश्वकर्मा हा सर्व देवांचा पितामह आहे ह्मणजे आजा होतो. या वचनावरून ज्यास परमात्म्याची भक्ती करून परमार्थ साधन करून घेणें असेल तर हें शंकराचें बोलणें अमान्य न करून पांच जे ब्राह्मण यांच्या ठिकाणीं निष्ठा ठेविल्यास मान्य व्हाल आणि निष्ठा न करून निंदा कराल तर देवाचा अपमान केल्याबद्दल ईश्वराचे घरीं महान् अपराधी व्हाल, या साठीं अभिमान सोडून वेदांनीं सांगितल्या प्रमाणें गुरूला शरण जावें हें सर्व प्राणीमात्रांस योग्य आहे. वाचक हो सोनार वरील अर्थात असें ह्मणतात कीं, गुरु जो करणें तो विश्वकर्मा कुलांतील (सोनारादिकांच्या कुलांतील) असावा अन्यजातीचा योग्य नाहीं हे त्यांचें लिहिणें फारच खोटें आहे तें पहा असें कीं यास जीं प्रमाणें नागरखंडांतील ह्मणून वर दिलीं आहेत तीं व्यासोक्त नागरखंडांत मुळींच नसून त्या खोट्या वचनांचा अर्थहि बराबर नाहीं तो असा कीं दोन भुजांचा विश्वकर्मा हा स्थावरजंगमाचा पिता असा अर्थ त्याच्या कृतीच्या श्लोकांचा मुळींच होत नाहीं कारण कीं श्लोकांत <u>द्विभुजोविश्वकर्माच स्थावरोजंगमःपिता.</u> या श्लोकांत सर्वपदें प्रथमांत आहेत षष्ठ्यंत किंवा समासांत असें नसल्या <u>कारणानें स्थावर जंगमाचा पिता असा अर्थ व्याकरणानें होत नाहीं तरी</u>

+ श्रुति स्मृति पुराणादिकांला विरुद्ध मात्र आहे.

या वाक्याचा अर्थ असा होतो कीं दोन भुजांचा विश्वकर्मा हा स्थावर, जंगम, आणि पिता असा होतो असें असून स्थावर जंगमाचा पिता असा अर्थ सोनारांनीं कोणाच्या व्याकरणावरून केला असेल तो असो परंतु मला असें वाटतें कीं सोनारादिकांचें व्याकरण निराळेंच आहे आणि तें पाणिनीयादिकांच्या व्याकरणा प्रमाणेंच आहे. कारण पाणिनीयादिकांच्या व्याकरणांत पंचसंधी षड्लिंगे, सात विभक्त्या, प्रत्यय, सुबंत, तिङंत, धातु, आत्मनेपद, परस्मैपद, इत्यादि प्रकरणें आहेत त्याच प्रमाणें सोनारादिकांच्या व्याकरणांतही आहेत ते असे कीं हातोडा, सवाणा, अरणी, खागीरवार, चिमटा हे पांचसंधी मनु, मय, त्वष्टा, शिल्पी, दैवज्ञ, व शेट हीं सहा लिंगें पट्टी, गावी, कात्री, फिरकी ) ताजवा ) सहाण, कुंडी, फुकणी ह्या सात विभक्त्या. सोनें, रुपें, इत्यादिक धातु. मूस, वागेसरी, सांडस, इत्यादिक प्रत्यय. उडीद, गुंजा, मासे, वाल, तोळे इत्यादि नऊलकार इत्यादि विषय आमच्याच व्याकरणा प्रमाणें आहेत. त्या व्याकरणानें ताऊन ठोकून फुलारवून हे श्लोक तयार केले आहेत. व्यासोक्त नागरखंडांत असे श्लोक मुळींच नाहींत याचें कारण व्यासाला आठ व्याकरणें येत असून तो सर्वज्ञ होता. परंतु त्याला हें सोनारांचें व्याकरण येत नव्हतें आणि त्यानें भविष्यकथा वाल्मिका सारख्या वर्णन केल्या येवढें व्यासाला ज्ञान असून त्याला असें कळलें नाहीं कीं पुढें मुंबईंत वासुदेव आत्माराम शेट सोनार व श्रीधर बाबाजी मठकर इत्यादि सोनारलोक उन्मत्त होऊन ब्रह्मविचार सद्बोधचिंतामणि व मुखमासीन्ब्राह्मणवर्णन असे ग्रंथ छापतील आणि त्यांत स्कंदपुराण नागरखंड, वलिंगपुराण, रुद्रयामल, अग्निपुराण इत्यादि आपण केलेल्या पुराणांचीं नांवें लिहून खोटे श्लोक करून आपण ब्राह्मण अशी बडबड करतील. बरें असो व्यासाला कळलें नाहीं असें जर ह्मणावें तर कलियुगीं शूद्र ब्राह्मणाचा आचार करितील असें अष्टादश पुराणांत लिहिलें आहे तें असें कीं. **तद्वच्छूद्राश्चयेकेचि द्ब्राह्मणाचारतत्पराः** हा श्लोक अध्यात्म रामायणाच्या पहिल्या अध्यायांत आहे अशीं अष्टादश पुराणांत वचनें आहेत. ग्रंथविस्तार भयार्थ येथें लिहिलीं नाहींत. असो आतां सोनार आपले ग्रंथांत असें लिहितात

कीं, दोन भुजांचा विश्वकर्मा हा स्थावर जंगमाचा पिता. आणि दाहा भुजांचा विश्वकर्मा हा सर्व देवांचा पितामह (आजा) तरि त्या सोनारांस असें विचारावें कीं, त्या तुमच्या लिहिण्यांस आधार काय? सोनार ह्मणतील. हा पहा. स्कंदपुराणनागरखंडाच्या सातव्या अध्यायांतील ३८ वा श्लोक. द्विभुजोविश्वकर्माच स्थावरोजंगमःपिता॥ दशभुजोविश्वकर्मासर्वदेवपितामहः ॥ तरि त्यांस असें सांगावें कीं, स्कंदपुराण हें व्यासकृत असून एकच आहे त्यांत हा श्लोक मुळींच नाहीं तेव्हां मला असें वाटतें कीं, हा श्लोक ठोकडे पुराणांत अथवा हातवडा पुराणांत असेल. कारण व्यासांनीं जी १८ पुराणें व १८ उपपुराणें केलीं तीं पुराणें वेदांच्या अर्थाला अनुसरून आहेत. जेव्हां वेदांत विशयाला दहा भुजा आहेत असें नाहीं तेव्हां पुराणांत कोठून लिहितील. तेव्हां हें सोनारांचें लिहिणें खोटें असून वेदशास्त्र विरुद्ध आहे आतां दुसरें सोनारांचें लिहिणें असें आहे कीं, या भूमंडलाचे गई पांच ब्राह्मण दोन भुजांचे जे विश्वकर्मा कुलांतील आहेत हे स्थावरजंगमास अथवा स्वार्थपरार्थास गुरु ह्मणून यांची भक्ती केली पाहिजे. वाचकहो पहा हें सोनारांचें लिहिणें पाहून अंतःकरणास परम आश्चर्य वाटतें. अहो वरील खोट्या श्लोकांत ब्राह्मण शब्द नसून पांच ब्राह्मण असा अर्थ कोठून लिहिला असेल तो असो. वाहवा! काय हो सोनारांची युक्ती. पहिल्यानें लिहितात कीं; आह्मीं विराट् विश्वकर्म्याच्या पांच मुखांपासून झालों आणि आह्मींच मुखमासीत् ब्राह्मण पुनः असें लिहितात कीं, आह्मीं सर्वांचे गुरु. इतकें लिहून आतां असें लिहितात कीं, आह्मीं या भूमंडलाचे गई सर्वांचे बाप. तेव्हां ह्या लिहिण्यांत असा अर्थ होतो कीं, आह्मीं सर्व मनुष्य जेवढे आहोंत तेवढे सोनारादिकांच्या वंशांतील आहोंत. तेव्हां सोनार हे पाहिरी पाहिरीनें चण्याच्या झाडावर जाऊन बसले. हें त्यांचें कृत्य खरें आहे कारण. चंचुप्रवेशोमुसलप्रवेशः असा न्याय आहे. बोट गेलें ह्मणजे हात घालावा. आणि असें आहे. कीं, आधी खोटें बोलूं नये. आणि जर बोलणें आहे तर थोडें कां? एखादा मूर्ख मनुष्य निरुद्योगी असतो आणि त्यांस कोणी न विचारितां तो सर्वांस सांगतो कीं, मी राजा सार्वभौम आहें ह्मणून कोणी खरें मानील काय? कारण

सर्व ज्याला राजा ह्मणतील तो खरा. नसे सोनारादिकांनीं खोटे श्लोक लिहून त्याचा अर्थ मनास वाटेल तसा करून जरी आपल्या मुखानें आपणास आह्मी विराटाच्या पांच मुखांपासून पांच ब्राह्मण उत्पन्न झालो. व आह्मीं सर्वांचे गुरु, व बाप, अशी जरीबडबड केली तरी वेद, शास्त्र, पुराणानुयायी जे विद्वान् लोक आहेत ते तिकडे मुळींच लक्ष्य नदेतां मुकाट्यानेंच बसणार आहेत. कारण **मूर्खाणां बोधको रिपुः** अशीनीती आहे. आणि मूर्खाशीं भाषण करणारा तो शतमूर्ख. आतां येथें सोनारादिक अशी शंका काढितील कीं, तुम्हीं हें (स्वर्णकारद्विजत्वखंडन.) पुस्तक कशा करितां करितां? तरित्यांस (सोनारादिकांस) असें सांगावें कीं. तुम्ही खोटीं वचनें व त्यांचा खोटा अर्थ करून पुस्तकें छापितां आणि वेदशास्त्र, पुराणानभिज्ञ लोकांस किरस्तावाप्रमाणें उपदेश करून त्यांच्या मनांत विकल्प आणण्यास इच्छितां. याजकरितां वेद, शास्त्र, पुराणादिकांचीं खरीं वचनें दाखवून संशय दूर करणें हें एक विद्वानाचें स्तुत्य कृत्यच आहे. वाचक हो सोनारादिकांस असें विचारावें कीं, तुम्ही जर सर्वांचे गुरु आहां तर सूर्यकुलोत्पन्न जे राजे त्यांचे गुरु वसिष्ठ ऋषी व पांडवांचे गुरु धौम्य ऋषि, यादवांचे गुरु गर्गाचार्य इत्यादि वर्णनें अष्टादशपुराणांत आहेत. तरी हीं वचनें खरीं किंवा तुमच्या खोट्या श्लोकांप्रमाणेंच आहेत? जर खोटीं म्हणाल तर तुम्ही थोरच आहां. खरीं आहेत तर त्यावेळीं तुम्हीं (लोहार, कांसार, सुतार, पाथरवट, सोनार) कोठें गेलां होतां? मला असें वाटतें कीं, तुम्ही पांचजणाही या भूमंडळाचे ठाईंच होतां परंतु त्यावेळीं इंग्रजी नव्हती व छापखाने ही नव्हते जर इंग्रजी आणि छापखाने असते तर तुम्ही बडबड केल्यावांचून राहिलां नसता हें खचित आहे पण त्यावेळीं रामकृष्णादिक साक्षात् ईश्वरी अवतार होते व त्याखेरीज राजे मोठमोठे सोमवंशी सूर्यवंशी जाहले ते वर्णाश्रम धर्मेंकरून लोकांस वागविणारे होते तेव्हां जर तुम्हीं बडबड करितां तर तुमची अवस्था काय जाहली असती तें मला कळत नाहीं परंतु या इंग्रजीच्या पूर्वीं पेशवे सरकारच्या राज्यांत तुमच्या जिव्हा वगैरे तोडल्या असें तुम्हींच आपल्या ग्रंथांत लिहितां तेव्हां आतां या इंग्रजींत तुम्हांस बडबड करावयास फावलें परंतु ही तुमची बडबड ऐकून

तुम्हास गुरु करणार नाहींत कारण वर्णानां ब्राह्मणो गुरुः याच वचना प्रमाणें जसें पूर्वी पासून रामकृष्णादिकांनीं वसिष्ठ गर्गादिकांस गुरु करून यजन याजनादिक कर्मे केलीं आणि ते ज्याला गुरु व ब्राह्मण, असें मानित आले तसेच सर्व क्षत्रियादिक आजपर्यंत मानित आले आणि पुढें पुढें ही तसेच चालणार आहे तुम्ही वेदादिक शाळा घालून जरी आह्मीं ब्राह्मण ह्मणूं लागलां तरी तुमच्या पायांचें तीर्थ तुमच्याच जातीचे लोक घेतील इतर घेणार नाहींत हें तुम्हीं मनांत खास समजावें. असो या प्रमाणें सोनारांनीं वेदशास्त्रविरुद्ध लिहून पुढें सर्व पुरुषसूक्त सार्थ लिहून विराटाचें वर्णन दाखविलें आहे परंतु त्या पुरुषसूक्तावरून सोनारादिक ब्राह्मण असें ठरत नाहीं परंतु त्याणीं आपली विद्वत्ता दाखविण्या करितां लिहिलें आहे व तसेंच पुढें हि वेदाच्या खऱ्या ऋचा लिहून त्यांचीं भाष्यें खोटीं करून लिहिलीं आहेत तीं आह्मीं सर्व येथें दाखवितों त्याचा सर्व विचार विद्वान् वाचकांनीं करावा. या पुरुष सूक्ताचे वचनां वरून विराट् पुरुष जो हाच जगाचा नियंता असून याचे अवयवांचें वर्णन केलें. तें अवयव सर्वदेव भूतें आहेत, असें सांगतों. त्या विराटा पासून सर्व देव उत्पन्न झाल्या विषयीं समजतें. यावरून ब्राह्मण* जे पांच विराट् मुखा पासून झाले ते चित्पावनादिक हे नव्हेत कसें कीं त्यांची उत्पत्ती निराळे प्रकारें जहाली आहे ती कशी झाली या विषयीं पुढें वर्णन करीन मागील सर्व बोलण्यास वेद वचनाचे दाखले लिहितों. ॥ श्रुति ॥ ॥ विश्वकर्मा मनसा यद्विहाया धाता परमोत संदृक् ॥ तेषामिष्टानि समिषा मदंति यत्र सप्तर्षिन्परएक माहुः ॥ योनः पिता जनिता यो विधाता योनः सतो अभ्यासज्जजान ॥ विश्वकर्मणः समवर्तताधि तस्य त्वष्टा विदधद्रूपमेति ॥ तत्पुरुषस्य विश्वमाजानमग्रे वेदाहमेतं पुरुषं महांतं ॥ विष्णुर्योनिं कल्पयतु त्वष्टा रूपाणि पिंशतु ॥ आसिंचतु प्रजापतिर्दधा गर्भं दधातु ते ॥ यइमा विश्वा भुवनानि ज्याभृता विश्वकर्मणा विश्वदेव्यावता ॥ विराट् पुरुष हाच विश्वकर्मा यास बहुत प्रमाणें मिळतात आणि तो सर्वांस नियंता

---

* पुरुष सूक्तांत पांच ब्राह्मण असें नाहीं.

आहे असें जें स्थापित करीत आहे तें प्रसिद्ध होत आहे. विश्वकर्मा हा सर्वांस नियंता असून वेदही त्यास ध्यातो आणि वेद व देव हे ज्यापासून उत्पन्न झाले त्यास ऋषीलोक हे विश्वकर्मा ह्मणून देवांचा शिल्पिक शास्त्र जाणणारा आहे. तात्पर्य कीं, देवांच्या आश्रयानें वागणारा असें जें ह्मणतात आणि विचार करून पाहिल्यास हा सर्वांहून श्रेष्ठ असें वेदांत प्रसिद्ध आहे, यावरून त्यांच्या बोलण्यास व्यत्यय दिसून येतो. ॥ श्रुति ॥ आद्भ्यः संभूतः पृथिव्यैरसाच्च ॥ विश्वकर्मणः समवर्तताधि ॥ [illegible] ॥ तस्य रूपस्य विश्वमाजानमग्रे ॥ वेदाहमेतं पुरुषं महांतं ॥ आदित्यवर्णं तमसः परस्तात् ॥ तमेवं विद्वानमृत इह भवति ॥ [illegible] ॥ प्रजापतिश्चरति गर्भे अंतः ॥ अजायमानो बहुधा विजायते ॥ १ ॥ अर्थ- आद्भ्यः संभूतः, आद्भ्य ह्मणजे उदक त्या पासून पृथ्वी उत्पन्न करावी, या करितां त्वष्टा नारायण पुरुष झाला. रसाच्च विश्वकर्मणः या शब्दें करून सकल रस जे आहेत त्या रसाचें आदिकारण विश्वकर्मा त्या विश्वकर्म्या पासून समवर्तन ह्मणजे अधिकलें करून वृद्धि होती. रस किंवा बीज यां शिवाय कांहीं उत्पन्न होत नाहीं. या [illegible] आहे. तस्य त्वष्टा विदधद्रूप मेति त्वष्टा जो याणें त्या बीजाचीं वेगळीं रूपें दाखविलीं. ॥ भाष्य ॥ तत्राचेतनानि पंचमहाभूतानि ॥ कथमचेतनं शिल्पि [illegible] ॥ [illegible] विनायकीभावं गच्छेदित्यांशंक्याह ॥ अर्थ- भाष्यकार ह्मणतात, पंचमहाभूतें अचेतन आहेत, त्या अचेतनाला चेतविणारा जो शिल्पी याच्या वांचून चेतना कशी प्राप्त झाली? विश्वकर्मणः समवर्तताधिति या वाक्या वरून अचेतन जीं पंचमहाभूतें यांली विश्वकर्मी याजपासून चेतना प्राप्त झाली. शिल्पेंद्र सर्वभूतीं सारखा वर्तन करितो आहे याजवर :- ॥ भाष्य ॥ तस्य संघातस्य रूप आक्रांतो विशेषाविदधत् ॥ विविधाकारेण संपादयन् ॥ अर्थ- मृत्तिका, काष्ठ, पाषाण इत्यादि सामग्री अचेतन भिन्न आहे. शिल्पीवर जो आहे त्याचे योगानें मंदिरें अभिन्न होतात तद्वत्. तात्पर्य कीं, भाष्यकार म्हणतात, तो जो मृत् पाषाणाचा संघात याचा आकृति विशेष जो आहे या प्रत विविध प्रकारें करून केला.

* प्रभासाच्या पुत्रास ह्मणतात. * याची ऋच्या कां लिहिली नाहीं.

॥भाष्य॥ त्वष्टासएवविश्वकर्मा॥नि[illegible]लोके[illegible]भाव:॥ अर्थ– त्वष्टा जो तोच पृथ्वीवर नानाकृती प्रकटला आहे आणि तोच लोकांला प्रकाशितो. ॥भाष्य॥ मृत्काष्ठचूर्णपाषाणादिवदचेतनानिपृथिव्यादीनि॥भूतानियतश्चेतनमधिष्ठातारमंतरेणनएकीभवितुंशक्तानि॥ अर्थ– मृत्काष्ठ चूर्ण पाषाणादि या सारखी पृथ्वी आदि जी भूतें चेतन करणार जो विश्वकर्मा याचां चून कांहीं एक व्हावया कारणें समर्थ नाहींत. ॥भाष्य॥ कुतएवतेषांविसंहतानांविचित्ररूपेणाविर्भवितुंशक्तिरस्यात्॥ अर्थ– पृथग्वीध पंचभूतांतें विचित्रलें एकत्र पावणें कसें घडेल? तर तें अधिष्ठा जो विश्वकर्मा त्या यांचून तें घडणार नाहीं. ॥भाष्य॥ अतस्तेषांसंहताचित्रयिताचेश्वरोविश्वकर्मानामपृथक्कश्चिदस्ति॥ अर्थ– या कारणास्तव विसंहत ह्मणजे भिन्न त्यास अभिन्न करणारा व विचित्र गती पावविणारा असा ईश्वर विश्वकर्मानामक पृथक्* आहे. ॥भाष्य॥ तथाचाथंप्रयोगोदर्शित:॥ इदंअंकुरशरीरादिककार्यत्वात्॥ विचित्रप्रासादादिवदिति॥ त्वष्टुश्चरूपाणामीशेत्वष्टारूपाणामधिपति:॥ त्वष्टारूपाणि पिंशात्वित्याद्यनेकश्रुतिसिद्धं॥ रूपाणिगर्भस्थस्यचक्षुरादीनांस्वरूपाणिपिंशातु॥ विभजत्विति श्रुतिपदयोरर्थ:॥ अर्थ– तसाच मंत्रांतर प्रयोग दाखविला आहे. अंकुर शरीरादिक हे प्रथम विराट् पुरूष शरीराकार करून नंतर प्राणिमात्र शरीराकृती केल्या तो निर्माण कर्ता एकच चित्रोत्पादक विश्वकर्मा आहे तो असा कीं विचित्र प्रासादादिक गृह अथवा मंदिरें इत्यादि जसें तसें त्वष्टा जो याजपासून जीं रूपें त्यांचा ईश आणि रूपाचा आणि रूपाचा आधिपती तो त्वष्टा जो तो गर्भस्थ जे यांस चक्षुरादि रूपें देतो असा श्रुतिचा अर्थ आहे. प्राणिमात्रास चक्षु आदिकरून जीं इंद्रियें आहेत हीं त्या विश्वकर्मा रुपेनें आहेत. या साठीं त्या नियंत्याचे आपल्यावर केवढे मोठे उपकार आहेत आह्मी मानव त्यास विसरून त्याच्या आभाराविषयीं कधीं ही मनांत आणून त्याची स्तुती करीत नाहीं परंतु तो ईश्वर अपराधाची क्षमाच करितो ह्मणून मानवांचा परिणाम बराबर आहे

* यांला ऋषिलोक कारागीर ह्मणत नाहींत. प्रभासपुत्राला ह्मणतात.

कदाचित् तो कोपल्यास कहरच हो होईल परंतु तो दयावान् पुरूष आहे असा म-
हान् जो याची भक्ती के ल्यास तो रूपा करील यांत संशय नाहीं. ॥ भाष्य ॥ एवं
संघातादाकृतिविशेषात्त्वष्ट्रेवक्रियंतइतिभावः॥ अर्थ– समुदाय
युक्त आकृतिविशेषभूतपंचकें जीं तेणें करून त्वष्टा जो तो विविधभूत सृष्टी
आपल्या अंशेंकरून सचेतन रचिता झाला. ॥ रुद्रयामल श्लोक ॥ विभ
ज्यमूर्तियोगेनतत्तद्गर्भांकुरादिकं॥ [illegible] विश्वकर्मा
[illegible] ॥ ता
-सृजत्यय ॥ २१॥ अस्यदृश्यानि [illegible]
नाविश्य ह्यसौसर्वान् चित्रंसृजतिपार्वति ॥ २२॥ अर्थ– मूर्ती योगें
करून ह्मणजे स्त्री पुरुष संयोगेंकरून विभज्य ह्मणजे विभाग करून तेते गर्भां
कुरादि चतुर्विध ह्मणजे श्वेदज अंडज जारज उद्भिज रूपें आपण अदृश्य रू
पें करून विश्वकर्मा निर्माण करिता जाहाला आतां विश्वकर्मा जो यांचीं रूपें सर्व
कांहीं शिल्पि जे कला कौशल्य जाणणारे यांत श्रेष्ठ असे जे ते मनुमयादि पांच
आहेत ते विश्वकर्मा याचीं रूपें आहेत. हे पार्वति प्रवेश करून चित्र विचित्र जग
जें आहे याप्रत उत्पन्न करितो. ॥ भाष्य ॥ तदेवंविश्वकर्मपदंश्रुत्येवनि
[illegible]
रुक्तंविश्वंकृत्स्नं॥ अ[illegible]
श्वकर्मेति ॥ अर्थ– विश्वकर्म पद जे आहे तें श्रुतिनेंच अत्यंत उक्त आहे
संपूर्ण विश्व अंत्यावयविप र्यंत ह्मणजे मोठ्या पासून लहान पर्यंत कर्म क्रिया
व्यापार जो आहे हा त्याचाच आहे त्यास विश्वकर्मा त्वष्टा ह्मणावें असें भाष्य
कार ह्मणतात. ॥ श्रुति ॥ वेदाहमेतं पुरुषंमहांतं आदित्यवर्णंतमसः
परस्तात्॥ सर्वाणिरूपाणिविचित्यधीरोनामानिकृत्वाभिवदन्य
दास्ते ॥ धातापुरस्ताद्यमुदाजहारशक्रःप्रविद्वान्प्रदिशश्चतस्रः॥
तमेवंविद्वानमृतइहभवतिनान्यःपंथाविद्यतेऽयनाय॥ कश्चिदृ
षिःशिष्यान्प्रतिवदतिअहंएवंविश्वकर्माणंमहांतंपुरुषंपरब्रह्म
रूपंवेदजानामि॥ भाष्य॥ तमसाः आवरणात्तुबाह्यतोविलक्षणा
दांतराज्ञानात्पारेदूरस्थितमितिशेषः॥ तमसा आवृतत्वादेवान्येएनं
नजानंतीतिभावः॥ अर्थ– विश्वकर्मा जो त्या प्रत मी जाणतों तो परब्रह्म

* हे सर्व श्लोक खोटे आहेत. ** ते भाष्यकार सोनारादिकच असतील

रूप आहे तो महान् आहे महान् ह्मणजे मोठा ज्याचा अंत लागणार नाहीं असा जो अनंत त्याप्रत मी जाणतों आदित्यवर्ण॥ तेजाविषयीं उपमा सूर्यवत् तमसःपरस्तात्॥ अज्ञानाहून वेगळा आहे ज्यास अन्यलोक अज्ञानी असल्यानें जाणावयास समर्थ होत नाहींत असा प्रभु विश्वकर्मा. ॥भाष्य.॥ सर्वाणिरूपाणिविचिंत्यधीरोसोयंमहान्पुरुषः॥ धीरः धियंप्रेरयितेतिभाष्यकारः॥ अर्थ— सर्वरूपें यांस चिंतन ह्मणजे विचार करून बुद्धिला प्रेरणाकरणारा असा विश्वकर्मा हा महान् पुरुष आहे असें भाष्यकार ह्मणतात.॥भाष्य॥ सर्वाणिरूपाणिविचिंत्यरचयित्वातेषांरूपाणांनामानिचकृत्वा॥ नानियतःयतः अभिवदम् आस्तेनः सएवमहान्पुरुषोज्ञातव्य इत्यर्थः॥ अर्थ— चतुर्विध खाणियुक्त जीं रूपें त्यांप्रत विचार करून रचयिला ह्मणजे निर्माण करून त्या रूपाला नावें करून त्या नावाप्रत त्या त्या नावें करून अभिवंदन ह्मणजे त्यांची नांवें घेऊन पाचारण करणारा जो आहे या कारणास्तव तो विश्वकर्मा महान् पुरुष जाणावा ह्मणजे प्राणिमात्रांस नांवें जीं ठेविलीं आहेत तीं सर्व विश्वकर्मा याणें ठेविलीं आहेत. प्रस्तूत आपल्यास मुलें झालीं त्यांस नांवें त्या मुलाचा वडिल जो असतो तोच त्यास नावाभिदान देतो जसें तसें सर्व देव दानव मनुष्य इत्यादीही नांवें त्या प्रभुनें ठेविलीं आहेत देवदानव इत्यादि सर्व त्याचीं आपत्यें आहेत ॥भाष्य॥ धातापुरस्ताद्यमुदाजहार॥ धातेतिधाताचतुर्मुखः॥ यंपुरस्तात्पूर्वंउदाजहारज्ञातवेनउक्तवान॥ शक्रः प्रविद्वान्॥ शक्रः इंद्रोपियंप्रविद्वान्सम्यक्जानन्॥ इति भाष्यकारः॥ तथैवाह॥ प्रदिशश्चतस्रः॥ चतुर्दिगवस्थिताश्चसर्वेऊर्ध्वमध्याधः समंतस्थितायंजानंति॥ तंएवंभूतानांभौतिकानांतत्तद्रूपाणांचस्रष्टायमेवेत्येवंरूपेणायोविद्वान्सइहजीव इत्येवाह॥ अमृतो मुक्तोभवति अन्यस्तद्वेदनादितरःपंथामार्गः॥ अयनायस्वरूपप्राप्तये नविद्यतेइतिभाष्यकारः॥ अर्थ— धाता ह्मणजे पोषण करणारा जो चतुर्मुख ब्रह्मा याप्रत पूर्वी जाणून बोलता झाला आणि शक्र ह्मणजे इंद्र हाही ज्याप्रत जाणतो आहे तथैवाह ह्मणजे तसेंच सांगतो चतुर्दिगवस्थित ह्मणजे

जे राहणारे ते जाणत जाणतात त्या
चार दिशेंत ऊर्ध्व आधा किंवा आसमंतात् अयमेव ह्मणजे
प्रत या प्रकारें करून भूत- भौतिक तेतें रूप त्याचा उत्पन्न करणारा
ह्याच विश्वकर्मी यारूपें करून यो विद्वान् ह्मणजे जो जाणतो तोच या ठिकाणीं जीव
आहे याप्रकारें सांगतो. वाचक हो पहा हीं सोनारांनीं केलेलीं भाष्यें आणि विद्या
रण्य, कुवटाचार्य, श्रीमज्जगद्गुरुशंकराचार्य, मध्वाचार्य, महीधर इत्यादि
कांनीं केलेलीं भाष्यें यांची तुलना केली असतां बरोबरी होते. परंतु अर्थरूप मोल्य मात्र बरोबर
होत नाहीं. तें असें कीं, सोनें आणि गुंज या दोहींचें वजन सारखें होतें परंतु सोन्याची किंमत
गुंजेला येत नाहीं तसें विद्यारण्यादिकांच्या भाष्याची अर्थरूप किम्मत खोट्या भा
ष्याला विद्वान लोक देणार नाहींत. ॥ *रुद्रयामल- श्लोक. दिविभुव्यंतरि
क्षेवा पाताले वापि भामिनि ॥ गृहं यंत्रं रथो भूषा प्रतिमा वसनादिकं ॥२३॥
यत्किंचिद्दृश्यते चित्रं तत्सर्वं विश्वकर्मकं ॥ अर्थ- दिवि ह्मणजे स्वर्ग अं-
तरिक्ष ह्मणजे आकाश पृथ्वी ह्मणजे पाताल इत्यादि यांचे ठायीं गृह नाना प्रकार
ची यंत्रें व रथ इत्यादि उत्पन्न केले रथ भूषणें प्रतिमा वस्त्रादिक जें कांहीं वस्तुमात्र
दिसतें तें सर्व विश्वकर्मा याणें निर्माण केलें आहे. ॥ श्रुति ॥ प्रजापतिश्चरति
गर्भे अंतरजायमानो बहुधा विजायते तस्य धीराः परिजानंति योनिं मरी
चीनां पदमिच्छंति वेधसः ॥ प्रजापतिर्विश्वकर्मा मनो गंधर्व इति श्रुतेः ॥
॥ भाष्य ॥ प्रकरणाच्चात्र प्रजापतिपदेन विश्वकर्मैव गृह्यते स गर्भे गर्भ-
स्थस्य देहिनो निमित्तं ॥ अंतः ॥ मातुरुदरे चरति संचरति ॥ ततश्च स गर्भस्थ अ
जायमानः स्वयं ॥ अपरिणप्रमाणः अनेनच अंतश्चरता निमित्तभूतेन
॥ बहुधा बहुप्रकारेण अनेक सकलसंधिशिराद्याकारेण ॥ विविधरूपे
णाच जायते काष्ठतुल्यो गर्भः ॥ अनेनैवाकृतिविशेषं प्राप्नोतीत्यर्थः ॥
इयं भाष्यकारोक्तिः ॥ अर्थ- प्रकरणें करून या विषयाचे ठाईं प्रजापती पदें
करून विश्वकर्मा हाच सिद्ध होतो तो विश्वकर्मा गर्भाचे ठाईं गर्भस्थ जो ह्मणजे ग
र्भांत राहाणारा जो जीव त्याच्या निमित्तमात्रें माता स्त्रीच्या उदरांत संचार करि
तो तदनंतर आपण न उत्पन्न होत्साता न परिणाम पावणारा येणें करून निमित्त
भूतमात्र बहुत प्रकारें करून अनेक जो सकल संधी शिरादि आकारें करून

* हे श्लोक खोटे आहेत.

विविधरूपेंकरून उत्पन्न उत्पन्न होतो काष्ठतुल्यगर्भः जसा सूत्र धारी लांकडाचीं चित्रें हालवितो परंतु तो त्या ठिकाणीं लिप्त नाहीं तद्वत विश्वकर्मा जो तो येणें करून आकृती विशेषाप्रत प्राप्त होतो अशी भाष्य काराची उक्ती आहे. या वचनावरून प्राणिमात्रास जन्म देतो अथवा त्याचे उपजीविकेची तजवीज यथायोग्य ठेवणारा असा नियंता विश्वकर्मा आहे असें या भाष्या वरून समजतें.

॥ रुद्रयामल. श्लोक ॥ यत्किंचिदिंद्रजालादिमूढदृष्ट्यैववर्तते॥ २८॥ तत्वतः सर्वथानास्तिसामायामयनिर्मिता॥ नसत्यवंमानववन्नमृषामयशिल्पवत्॥ २९॥ क्षणेक्षणेचयच्चित्रं नानारूपाकृतिक्रियं॥ अर्थ- जेंकांहीं इंद्रजालादी मूढ दृष्टीनें वर्ततें तें खरेपणानें सर्वथा नाहीं ह्मणजे सर्व क्षण भंगुर असून हा बाजार मायेचा आहे ती माया मयानें निर्माण केली माया मयानें केली या साठीं माया नांव पावली. मनुष्या सारिखें सत्यत्व जिला नाहीं मिथ्यत्वही नाहीं असें मय याचें शिल्प जें तें क्षणाक्षणाचे ठाईं चित्रविचित्र दृष्टीस पडतें नानाप्रकारचीं रूपें आकृती कर्मे हीं उत्पन्न जाणें केलीं तें इंद्रजाल याचा कर्ता मयां* आहे. ॥ रुद्रयामल. श्लोक॥ खचरंसर्वगंयच्च विशेदपि शिलोदरं॥ ३०॥ क्षणात्स्थूलंक्षणात्सूक्ष्मं क्षणाल्लघुगुरुक्षणात्॥ तत्वष्टानिर्मितंविद्यादिव्यंब्रह्मसभादिकं॥ ३१॥ अर्थ- आकाश जें याचे ठाईं संचार करणार जो रवि किंवा विमानें यांस खचर ह्मणतात सर्व ठिकाणीं ज्याचें गमन होतें त्यास सर्वग ह्मणावें. असा जो तो वायु हे शिलोदराप्रत प्रवेश करितात शिलोदर ह्मणजे पाषाणगर्भ याचे ठाईं संचार करणें क्षणांत स्थूल होणें क्षणांत सूक्ष्म होणें क्षणांत लघु क्षणांत गुरू ते सर्व त्वष्टा याणें निर्माण केलें आहे असें पार्वती तूं जाण. ॥ भाष्य॥ तस्यविश्वकर्मणः॥ धीराः॥ ध्यानशीलाः योगिनोयोनिर्वासस्थानंविष्णोरिवशालिग्रामंपरिजानंतीति॥ साकल्येनवदंति॥ अर्थ- विश्वकर्मा जो याचे धीर ह्मणजे ध्यानशील जे योगि ते हेंच वासस्थान याप्रत जाणतात उदाहरण विष्णुचें वासस्थान शालिग्राम आहे त्याप्रत साकल्येंकरून जाणतात जसें तसें शालिग्राम हे विष्णुस्थानीं पूज्य जसें आहे तसें योगी जे त्यांचें निवासस्थान विश्वकर्मापरमात्मा

* हा अक्षर असून कश्यपाच्या कुळांतील आहे.

हेंच आहे. ॥भाष्य॥ तस्माद्विष्णोः शालिग्रामइवविश्वकर्मणःप्रति माभूतान्शिल्पिवरान्विश्वकर्मदृष्ट्याजानीयात्तेनचविश्वकर्मसायु ज्यप्राप्तिरितिभावः॥ अर्थ- विष्णु जो याची प्रतिमा जशी शालग्राम तसें विश्वकर्मा याचे प्रतिमाभूत जे शिल्पिवर पांच ब्राह्मण मनु मय त्वष्टा शिल्पि दैव ज्ञ हे आहेत याप्रत विश्वकर्म दृष्टी करून जाणावें तेणें करून विश्वकर्मा याचे स्वरूपाची प्राप्ती होती ह्मणजे सायुज्य पदास पोंचतो. असें भाष्य काराचा अभि प्राय आहे. वाचक हो मनुमय त्वष्ट शिल्पिदैवज्ञ हे जे पांच वेद पुरूष अथवा पांच ब्राह्मण हेच वेद मान्य आहेत यांची उपेक्षा न करून भक्ती करा यांची भ- क्ती केल्यानें ईश्वर संतुष्ट होतो शंकर या पांच ब्राह्मणाची पूजा करीत आहे.

॥रुद्रयामलश्लोक॥ दिव्यान्भौमानांतरिक्षान्भावान्संदर्शयंतिये॥ पंचालास्तेसदापूज्याः प्रतिमाविश्वकर्मणः॥१२॥ अर्थ- दिव्य ह्म- णजे स्वर्गातील भौम ह्मणजे भूमिवरील अंतरिक्ष ह्मणजे आकाशांतील भा- व ह्मणजे अभिप्राय दाखवितात जे ते पांचाल सदा पूज्य आहेत आणि विश्व कर्मा याचे प्रतिमाभूत आहेत. विराट् रूप ह्मणजे विश्वकर्मा जो त्याची पां- चाल हे प्रतिनिधीच आहे असें रुद्र ह्मणतात. रुद्रयामल ग्रंथ हा सवालक्ष आहे.

॥श्रुति॥ योदेवेभ्यआतपतियोदेवानांपुरोहितः॥ मनोरुचायब्रह्मणेद्र त्यनेनग्रंथेनतैत्तरीयंवक्षमाणरीत्याशाखांतरेषुन्वायमर्थउपलभ्यतेतत्र तावदुदाहृतयोर्मंत्रयोरयमर्थः॥ भाष्य॥ योदेवेभ्यइति॥ यस्त्व ष्टादेवेभ्यआतपति॥ देवानांअभिव्याप्यतपति॥ देवा आदित्याः॥ मनुष्यादीन्भूचरानेवतपंति॥तेषांतेजोहरंति॥ त्वष्टातुदेवानामपि तेजोहरतीत्यर्थः॥ अर्थ- जो त्वष्टा देवांला अभिव्याप्त करून देवांचीं तेजें हरण करितो देव ह्मणजे आदित्यादि हे मनुष्यांचीं तेजें हरण करितात परंतु त्व- ष्टा जो तो देवांची तेजें हरण करितो असें भाष्यकार ह्मणतात. या सर्व वचनां वरून जगाचा नियंता प्रभू विश्वकर्मा आहे तो नियंता विराट् रूप होऊन जें कांहीं पृथ्वीवर दिसत आहे हें सर्व त्याणें उत्पन्न केलें त्याच्या शिवाय दुसरा प्रभू

* यास खरा आधार दाखवावा. + १०४४७ असून ६५ पटलें आहेत.

नाहीं असें सिद्ध झालें आहे आणि ऋषीलोक हे विश्व कर्मा याचें नांव ऐकतां-च संतप्त होऊन * निंदेनें ह्मणतात कीं विश्वकर्मा ह्मणून देवांचा कारागीर आहे शिव शिव तोच सर्वांस नियंता हें जाणत असून ते अशी निंदा करितात त्यांनां काय ह्मणावें शिशुपाल यानामें एक मोठा अभिमानी राजा होता. तो श्रीकृष्णाची अशीच निंदा करीत होता. परंतु त्याच्या पापांचा घडा भरण्याची वाट पाहात असतां ज्या कालीं त्याचें पाप परिपूर्ण झालें त्यावेळीं त्यास क्षण न लागतां शिक्षा मिळाली या साठीं आह्मीं असें सूचवितों कीं. ज्या कृत्याने ईश्वराचे घरीं अपराधी होत आहां असें पापाचें काम न करून त्या मोठ्या परमेश्वरास शरण जाऊन केलेल्या अपराधी क्षमा मागा ह्मणजे तो परमेश्वर दयेचें स्थान आहे तो सहजी कृपा करील. ॥ इति प्रथमोऽध्यायः समाप्तः॥ ॥ ॥

वाचक हो पहा या वरील सोनारांच्या लिहिण्यांत केवढी लबाडी आहे. अहो वेदांच्या ऋचा तर खऱ्या लिहून त्यांचीं भाष्यें मात्र खोटीं करून मनः कल्पित अर्थ लिहितात. आणि आह्मी विराटाच्या पांच मुखांपासून पांच ब्राह्मण उत्पन्न झालों अशी बडबड करितात. परंतु त्यांना (सोनारादिकांना) वेदांचाव विद्यारण्यादिकांनीं केलेल्या भाष्यांचा अर्थ मुळींच माहीत नाहीं. कारण त्यांना जर वेद पठण किंवा श्रवण करण्याचा अधिकार असता तर वेदांच्या भाष्यांचा अर्थ कळता. हल्लीं इंग्रजींत मात्र अधिकार आहे असें बडबडूं लागलेत. ते ह्मांतेअसें समजता कीं ज्या वेदांच्या ऋचेंत **विश्वकर्मा** अथवा **त्वष्टा** पद आहे त्या ऋचेंत आमचें (सोनारादिक पांचांचें) वर्णन आहे. परंतु त्या ऋचांची भाष्यें पाहतां अर्थ आपल्या मनासारखा नाहीं तेव्हा भाष्येंच नवीं करावीं असें समजून खोटीं भाष्यें करून आपल्या ग्रंथांत छापिलीं. परंतु त्यांना असें माहित नाहीं कीं **विश्वकर्मा** किंवा **त्वष्टा** या पदें करून ईश्वराचें ग्रहण होतें. तुमचें (सोनारादिकांचें) होत नाहीं.. यास

पहा — ऋग्वेद अष्टक ८ अध्याय ३ वर्ग १७ ॥ "चक्षुषः पि-

तामनसाहि धीरो घृतमेने अजनन्नम्नमाने। यदेदंता अददृहंत पूर्व आदिद्यावापृथिवी अप्रथेतां हा असून नंतर ती "विश्वकर्मा"

* मत्स्यादिक पुराणांवरून ह्मणतात ती पूर्वी दाखविलीं आहेत.

असून याचे नंतरची " योदेवानांनामधाएकएवतंसंप्रश्नंभुवनायंत्यन्या । ३ । ही असून या उभय ऋचेंत आयंता वरून विशेष लिहिण्याची जरूरीच आहे असें नाहीं परंतु ज्यापेक्षां ब्रह्मविचारादि कर्त्यांनीं खोट्या भाष्याचा भडमार करून पुढें आपापला खरा मनोदय दाखविला त्यापेक्षा उक्त ऋचेचा अर्थ ही लिहावा. परंतु " येथें कोणी ब्रह्मविचारादि कर्त्यांच्या ज्या भाष्योक्ति दाखविल्या त्या खोट्या कीं काय? " असें ह्मणतील तर ज्या ब्रह्मविचारादि ग्रंथकाराच्या भाष्योक्ति खऱ्या किंवा खोट्या त्या या खालील खऱ्या भाष्या वरून पहा ह्मणजे या भाष्यांतील भावार्थाची आणि ब्रह्मविचारादिकांतील भाष्याच्या भावार्थाची तुलना करितां खऱ्या खोट्याचा निर्णय लागलाच करितां येईल. **विश्वकर्माविमनाआद्विहायाधाताविधाता परमोतसंदृक् ॥ तेषामिष्टानिसमिषामदंतियत्रासप्तऋषीन्परएकमाहुः ॥ भाष्य ॥** यत्र यस्मिन् लोके सप्त ऋषीन् सप्तच ते ऋषयश्च सप्तऽऋषयः । ऋतक् इति पा. (६-१-१२८) संध्यभावः । तान्परः विभक्तेः स्रुः परेण विश्वकर्मणा सहएक माहुः । एकीभूतान्बुधा वदंति यत्रलोके तेषां पुंसा मिष्टानि अभिलषितानि वस्तूनि इषा अन्नेन आहुतिरसभूतेन सह संमदंति संमोदंते । सम्यक् मोदयुक्तानि पुष्टानि भवंति तेविश्वकर्म लोके इष्ट भोगान्प्राप्नुवंतीत्यर्थः । तेषां केषां विश्वकर्मा एषां संदृक् सम्यक् पश्यतीति संदृक् सम्यक् द्रष्टा विश्वकर्म दृष्टाः । स्रुखिनोभवंतित्यर्थः । कीदृशोविश्वकर्मा विमनाःविशिष्ट मनो यस्य स तथा विभूतमनाः सर्व कर्मस इत्यर्थः । आत् अपिच विहायाः नभोव व्यापकः यद्वा विशेषेण जहाति त्यजति विहायाः संहर्ता । धाता धारयिता पोष्टा स्थितिकर्ता । विधाता उत्पादकः उत अपि परमः सर्वेभ्य उत्कृष्टः विभक्तेःश्राकारः । एवंविधो विश्वकर्मायेषां द्रष्टा ते मुच्यंते भक्तानिव पश्यंति तस्माद्भक्तिः कार्येत्यर्थः । **योनःपिताजनितायोविधाताधामानिवेदभुवनानिविश्वा ॥ योदेवानांनामधाएकएवतंसंप्रश्नंभुवनायंत्यन्या ॥ भाष्य ॥** योविश्वकर्मा नोस्माकंपिता पालकः जनिता जनयिता उत्पादकः जनिमन्त्रे इति पा० (६-४-५३

निपातः । योविधाता विशेषेण धारकः सेतुः यश्चविश्वा विश्वानि सर्वाणि धामानि स्थानानि भुवनानि भूतजातानि च वेदजानाति । यश्च एको, द्वितीय एवासन् देवानां बहूनां नामधा नामानि दधाति करोतीति नामधाः तानच पितेव करोति। तस्मादन्या अन्यानि भुवना भुवनानि भूतजातानि संप्रश्नं सम्यक् प्रश्नो यस्यां क्रियायां यथातथा तं विश्वकर्माणं पतिं गच्छंति प्रलयकाले एकत्वं प्राप्नुवंति । यद्वा संप्रश्नं सम्यक् प्रष्टुं स्वाधिकारप्रश्नं कर्तुं भुवनानि यं यंति सएव स्वाधिकारेषु नियुक्त इतिभावः । २७ । भा. पृ. ५२८ । **अर्थ**– हे सर्वज्ञ मंगलप्रदसर्वभूतेश्वर तूं विश्वकर्मा आहेस (ह्म०) नानाप्रकारचें जग उत्पन्न करणारा तसेंच 'विमनाः' च नानाप्रकारचें अनंत ज्ञानवान् आहेस तसेंच 'आद्विहाया' सर्वव्यापक व आकाशवत् निर्विकार अक्षय्य सर्वाधिकरण आहेस. तूंच सर्व जगताचा "धाता" धारण कर्ता आहेस. व विधाता' नाना प्रकारचें चित्र विचित्र जगतें जें त्या प्रत उत्पन्न कर्ता आहेस. तसेंच 'परमः' 'उत' सर्वोत्कृष्ट आहेस 'संदृक्' यथावत् सर्वांचें पाप व पुण्य यांप्रत पाहणारा आहेस. जे पुरुष तुझीच भक्ति तुझ्याच ठिकाणीं विश्वास तुझीच सत्कार पूर्वक पूजा करिताहेत तुला सोडून अन्य कोणाची लेशमात्रही उपासना करीत नाहींत; त्यास तूं सदैव इष्टापूर्त करीत असून स्वभक्तांस निरंतर सुखानंदादि गुणांत ठेवितोस. शिवाय अन्यास नाहीं तर ते भक्त ही 'सम्यक् ईषा' स्वेच्छापूर्वक 'मदंति' परमानंदांतच रहात आहेत. कधींच दुःसह दुःखाप्रत प्राप्त होत नाहींत. तर तो परमात्मा कसा आहे कीं अद्वितीय आहे. ज्या परमात्म्याचे सामर्थ्यांत सप्तलोक, पंचप्राण, अंतःकरण आणि जीव व ऋष्यादि लोक प्रलयकाळीं आश्रय धरून एक होऊन राहताहेत तोच जगताचा उत्पत्ति, स्थिति आणि प्रलयांत ही निर्विकार आनंद स्वरूप ही राहतो. आणि त्यां तशा त्या परमात्म्याची उपासना केल्यानें आम्हिलोक सदैव सुखानंदादिक भोगित आहों. १ हे मनुष्या जो आपला पिता नाम नित्य आमचें पालन करणारा 'जनिता' जनक (उत्पादक) 'विधाता' सर्व मोक्षादि सुखादिकामांचा विधायक (सिद्धिकर्ता) 'विश्व' सर्व

भुवनादि लोक लोकांतर 'धाम' स्थितीचे स्थानाप्रत याथा तथ्य जाणणारा, सर्व जा तमात्र भूतीं विद्यमान आहे, जो 'देव' सूर्यादि लोक तथा इंद्रियादि आणि विद्यादिकांची नामव्यवस्थादि करणारा 'एक एव' अद्वितीय असा तोच आहे. अन्य कोणीच नाहीं. तोच जगाचा स्वामी पितादि आपला लोकांचा आहे. यांत संशय नाहीं. तस्मात् त्याच परमात्म्याकारणें विद्वान् वेदादिशास्त्र भूत प्राणिमात्र सम्यक् प्रश्नोत्तर करण्यांत प्राप्त होऊन राहिले आहेत. कारण, सर्व पुरुषार्थ ह्मटला असतां हाच आहे कीं, परमात्म्याची आज्ञा व त्यानें उत्पादित जगताचा यथार्थ निश्चय करावा यानेंच धर्मार्थादिकांची सिद्धि होते शिवाय अन्यथा नाहीं. सबब सर्व मनुष्यांनीं तनु, मन, धन. आणि आत्मा यांहीं करून यत्नपूर्वक परमात्म्याची स्तुति प्रार्थनोपासनादि करण्याकडे चित्त द्यावें हा पहिल्या ऋचेचा भाष्यार्थ असून दुसऱ्या ऋचेचा असा आहे कीं. **भाष्य.** पूर्वकल्पे पुरुषमेधयाजी आदित्यरूपं प्राप्तः भूयते। अ अ्यः जलात् पृथिव्याः सकाशात् [illegible] ग्रहणां। भूतपंचकेलक्षण भूतपञ्चकात् यो रसः सस्भृतः पुष्टः तथा विश्वं कर्मणः [illegible]स्य विश्वकर्मणः कालस्य रसात् प्रीतेः यो रसोऽग्रे प्रथमं समवर्तत समभवत्। भूतपञ्चकस्य का[illegible]ऽस्यच सर्व प्रति कारणत्वात् पुरुषमेधयाजिनो लिंग शरीरे [illegible]चभूतानि तुष्टानि कालस्तस्तुष्टेभ्यः कश्चि द्रसविशेषफलरूपं उत्तमजन्मा[illegible]द् उत्पन्न इत्यर्थः [illegible] त्वष्टा आदित्यः एति प्रत्यह मुदयं करोति। अग्रे प्रथमं मर्त्यस्यमनुष्यस्य सतस्तस्य पुरुषमेधयाजिनः आजानंदेवत्वं मुख्य देवत्वं सूर्यरूपेण। द्विविधा देवाः कर्मदेवाः आजानदेवाश्च कर्मणोत्कृष्टेन देवत्वं प्राप्ताः कर्मदेवाः सृष्ट्यादा उत्पन्नाः आजानदेवाः ते कर्म देवेभ्यः श्रेष्ठाः। तेयशातं कर्मदेवानामानंदाः सएक आजान देवानामानंदः इतिश्रुतेः (बृहदारण्य ४-१-३५। सूर्यादय आजानदेवाः। १७। २ एतं महांतं सर्वोत्कृष्टं पुरुषं सूर्यमंडलस्थमहं वेद जानामि. इति ऋषेर्वचनं कीदृश मादित्यवर्णं आदित्यस्येव वर्णो यस्य तम उपमांतराभावा त्स्वोपमं। तथा तमसः परस्तात् दूरतमं तमोरहितमित्यर्थः।

तमः शब्देनाविद्योच्यते। तमेवादित्यं विदित्वा ज्ञात्वा मृत्युमत्येति अतिक्रामति परं ब्रह्मगच्छति अयनायाश्रयायान्यः पंथा मार्गः नविद्यते सूर्यमंडलांतः पूरुषात्मरूपं ज्ञात्वैवमुक्तिः। १८ यः सर्वात्मा प्रजापतिः अंतर्हृदिस्थितः सन् गर्भेचरति गर्भमध्ये प्रविशति यश्चा जायमानोऽनुत्पद्यमानो नित्यः सन् बहुधा —— कार्य कारणरूपेण वितायते मायया प्रपंच रूपेणोत्पद्यते धीराः ब्रह्मविदस्तस्य प्रजापतेः योनिं स्थानं स्वरूपं परिपश्यंति अहंब्रह्मास्मीति जानंति। विश्वा विश्वानि सर्वाणि भुवनानि भूत जातानि तस्मिन्हतस्मिन्नेव कारणात्मनि ब्रह्मणि तस्थुः स्थितानि। सर्वं तदात्मक मेवेत्यर्थः १९ हें असून यापुढील मंत्र यो देवेभ्य आतपति योदेवानांपुरोहितः। पूर्वो यो देवेभ्योजातो नमो रुचाय ब्राह्मये। शु॰ कृ॰ यजुर्वेद अ॰ ३१ मं॰ २० हा असून याचें भाष्य असें आहे कीं, ॥ भाष्य॥ यः प्रजापतिरादित्यरूपो देवेभ्योऽर्थायातपति। द्योतते यश्च देवानां पुरोहितः सर्व कार्येष्वग्रे नीतः यश्चदेवेभ्यः सकाशात् पूर्वः जातः प्रथम उत्पन्नः तस्मै आदित्यायनमः कीदृशाय रोचते ऽसौरुचस्तस्मै दीप्यमानाय 'इगुपधेति (पा॰ ३-१-१३५) कप्रत्ययः तथा ब्राह्मये ब्रह्मणो पत्यं ब्राह्मिः इनि रिलोपः ब्रह्मावयवभूताय वा॰ २० प॰ ७५८। या प्रमाणें असून याचा विचार हीन करितां ब्रह्मविचारादिकर्ते सोनार " योदेवेभ्य इति। यस्त्वष्टा देवेभ्य आतपति देवानामभिव्याप्य तपति देवा आदित्याः मनुष्यादीन् भूतरानेव तपति तेषां तेजो हरति त्वष्टा तु देवानामपितेजो हरतीत्यर्थः ब्रह्म॰ वि॰ अ॰ १ पृ॰ २० इत्यादि भाष्योक्ति दर्शवितात परंतु हें भाष्य कोणते वेदाचें कोणी केलें इत्यादि कांहींच सुचवीत नाहींत. यावरून सर्व विद्वानांनीं उभय भाष्यांची तुलना करून यांत खरे खोट्याचा जो निर्णय करणें असेल तो करावा. या प्रमाणें सोनारांच्या ग्रंथाच्या १ला अध्यायांतील विषयाचें खंडन जाहलें.

॥ अध्याय २॥

श्रीगणेशायनमः॥ ॥ पूर्वाध्यायाचे ठाईं विराट् विश्वकर्मा हाच सर्वांस नियंता ईश्वर आहे ही कथा लिहून पुढें मुखमासीत् ब्राह्मण कसे जाहले आणि त्यांचे धर्म कसे आहेत याविषयीं काहीं लिहितो

पहिल्या अध्यायांत विराट् विश्वकर्मा जो सर्वांचा नियंता त्याचे मुखापासून पांच ब्राह्मण उत्पन्न जाहले त्यासच मुखमासीत ब्राह्मण ह्मणावें तेच पंचब्रह्म तेच परब्रह्म तेच वेदपुरुष तेच पांच तत्वें असें वेदादिग्रंथांतरींही प्रसिद्ध आहे यास प्रमाणें. **स्कं० ना० अ० ७ ॥ पंचब्रह्मपरंब्रह्मसर्वमोंकाररूपधृक्॥ ओंकारेजनितंसर्वंपरंतत्वंचरूपकं॥२५॥ अर्थ–** पांच ब्राह्मण हेंच परब्रह्म ह्मणजे उत्कृष्ट ब्रह्म यांणींच ओंकाररूपधारण केलें आणि त्या ओंकाराचे ठाईंच उत्पन्न झाले तेच तत्वें आहेत. **स्कं० ना० अ० ७ पंचब्रह्मपुनर्जन्मपंचवक्त्रस्यगर्भजं॥ पंचदासाख्यतत्वंचद्वितीयस्तुमुनीश्वरः॥२६॥ अर्थ–** पंचब्रह्म हे पूर्वी ओंकार याचे ठाईं उद्भवले तदनंतर विराट् विश्वकर्मा याचे पांच मुखापासून पांच प्रकारचे नावें करून तत्वरूप होते जहाले मुनी ह्मणजे मनन करणारे ते मनुमय त्वष्टा शिल्पि दैवज्ञ यांचा हा पुनः अवतार होता जहाला. **स्कं० ना० अ० ७ ॥ तृतीयंजन्मभेदंच सकलैःकारणैः शृणु॥ मनुःपूर्वमुखोद्भूतो मयोयाम्यमुखोद्भवः॥२७॥ पश्चिमास्येभवत्वष्टा तक्षक** [illegible] ॥

**अर्थ–** सर्व लोकाच्या उपयोगा करितां पांच जे ब्राह्मण यांचा हा तिसरा अवतार आहे असें शंकर ह्मणतात– ओंकारा पासून जो विराट् विश्वकर्मा जाहला त्याचे पांच मुखापासून पांच ब्राह्मण उत्पन्न जाहले ते असे कीं, मनु हा पूर्व मुखापासून जाहला. मय हा दक्षिण मुखापासून उत्पन्न जाहला त्वष्टा हा पश्चिम मुखीं अवतरला. तक्षक हा उत्तर मुखीं उद्भवला शिल्पी ऊर्ध्व मुखीं उत्पन्न जाहला. हे पांच ब्राह्मण पांच मुखापासून उत्पन्न जाहले हे मुनी ह्मणजे मनन करणारे आहेत. वाचक हो पहा कीं सोनारांनीं आपल्या ग्रंथाच्या दुसऱ्या अध्यायांत आपण विराटाच्या पांच मुखापासून आह्मी पांच ब्राह्मण उत्पन्न झालों असें जें पूर्वी लिहिलें आहे तें अज्ञलोकांच्या मनांत पक्कें ठसावें ह्मणून स्कं० ना० अ० ७ असें हे ढिंग लिहून २७–२८ असे श्लोकांचे आंकडे घालून जे वर श्लोक लिहिले आहेत ते २ श्लोक व्यासोक्त नागरखंडांत मुळींच नाहींत तरी हे कोणीतरी एखाद्या भंगड शास्त्र्यानें केलेले आहेत कारण कीं वेद, शास्त्रें, पुराणें

इत्यादिकांमध्यें विराट् पुरुषाचें वर्णन आहे परंतु विराटाला पांचमुखें असून तीं चार दिशेस चार व वर एक आहेत आणि त्या पांच मुखां पासून पांच ब्राह्मण उत्पन्न जाहाले आणि ते लोहार, सुतार, कांसार, तांबट, आणि सोनार किंवा मनु, मय, त्वष्टा, शिल्पि आणि दैवज्ञ, असें वर्णन मुळींच नाहीं. विराटाचें वर्णन ह्मटलें असतां अनंत मुखें अनंत हस्तपादादिक असें आहे. किंवा **विश्व तश्चक्षुरुतविश्वतोमुखो** इत्यादिक वर्णन आहे. असें असून सोनारादीक असे खोटे श्लोक करून त्याच्या खालीं अर्थात असें लिहितात कीं, विराटा पासून हे पांच ब्राह्मण निरनिराळे उत्पन्न जाहाले. तेच मुखमासीत् ब्राह्मण मनुमयादि तेच मूर्तिमंत वेदपुरुष, तेंचपरब्रह्म, तींच पंचतत्वें असें लिहितात. परंतु वाचकहो तुम्ही सोनारादिकांस असें विचारावें कीं ही जी तुम्हीं बडबड करितां यास प्रमाण काय? आतां ते असें ह्मणतील कीं हें पहा! स्कं० ना० अ० ७ वा श्लोक २७-२८ स तर त्यांनां असें सांगावें कीं तुम्हीं आपल्या ग्रंथांत ना० खंडांतील ह्मणून जे लिहिले आहेत. तेवढे श्लोक व्यासकृत ना० खंडांत मुळींच नसून ज्यापेक्षां तुम्हीं बनावट करून लिहितां त्यापेक्षां तुमचें कसब मोठें समजलें पाहिजे. किंवा मला असें वाटतें कीं तुह्मीं ना० खंड असें लिहून खऱ्या व्यासोक्त नागरखंडास दूषण लाविता त्या पेक्षां नागरखंड येथें ना ह्या अक्षरावरती अनुस्वार देऊन नांगरखंड असें लिहावें. ह्मणजे तुमच्या बडबडीला व तुमच्या खोट्या श्लोकांच्या कृतीला आणि नांगरखंड या नांवाला मोठीच शोभा येईल. कारण कीं नांगर करणें हें काम तुमचें (सुतार लोहार) यांचेंच आहे आणि नांगरणें हें कृत्य तुमचेंच आहे. तेव्हां हे तुमचे खोटे ग्रंथ ही एक जमीनच समजा आणि तीमध्यें हीं खोटीं वचनें रूप नांगर घालून तुमच्या मनास वाटेल तसें नांगरा! परंतु खोट्या जमिनींत खोट्या कृतीचें बीज पेरून पीक उत्पन व्हावयाचें नाहीं, जरी झालें तरी तें खोटेंच होईल, कारण कीं **यथाबीजंतथांकुरः** जसें बीज असेल तसा अंकुर उत्पन्न होतो. तेव्हां तुम्हाला खोटीं वचनें लिहिल्यापासून खोटेंच फल प्राप्त होणार आहे. आतां तुम्हाला जर खरें फल प्राप्त करून घ्यावें अशी इच्छा असेल तर

अशीं खोटींवचनें न लिहितां वेदशास्त्रपुराण इत्यादिकांतील खरी वचनें दाखवून त्यात आह्मी विराटाच्या पांच मुखां पासून पांच उत्पन्न जाहालों व मनु, मय, त्वष्टा, शिल्पी, दैवज्ञ, अशीं नावें व आह्मी मूर्तिमंत वेद असें वर्णन दाखवा ह्मणजे तुमच्या बोलण्यास सर्व विद्वानलोक मान देतील. असो सोनार पुढें असें लिहितात कीं आह्मीं विराट् विश्वकर्म्याचे पुत्र आहोंत हें त्यांचें लिहिणें खोटें आहे कारण विराटा पासून जे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य शूद्र उत्पन्न जाहाले तेवढे त्या विराटाचे पुत्रच आहेत. परंतु लोम, विलोम, अनुलोम, प्रति लोम अशा ज्या जाती आहेत त्याना मात्र हें बोलणें शोभत नाहीं. तेव्हां तुम्हीं (सोनारादिकपांच.) हे लोमविलोम जातीपैकीं आहांत. या विषयीं प्रमाणें ब्रह्मवैवर्तपुराणामध्यें आहेत तीं पुढें जावेळीं तुमची उत्पत्ती लिहूं तेव्हां वाचून पहा आणि खऱ्या खोट्याचा विचार करा. **वाचकहो. हीपहासोनारांची बडबड.** विश्वकर्मा याचे पुत्र जे पांच ब्राह्मण यांचा अधिकार ग्रंथांतरीं मिळाला तो सांगतों वाचकांनीं स्वस्थमनें वाचावा. पांच जे ब्राह्मण यांस वेदकर्माचा अधिकार आहे आणि गायत्री मंत्र हा पांच ब्राह्मणा साठींच उत्पन्न केला वैदिक कर्म हें पांचाल ब्राह्मणाचेच ठिकाणीं आहे अन्य जातीस अधिकार नाहीं. असा श्रुतीचा अर्थ करून महादेव कार्तिक स्वामी यांप्रत सांगतात. स्कं० ना० अ० ५ ॥ **त्रिसंध्यावंदनज्ञश्च गायत्री वेदपाठकः ॥ ८ ॥ ओंकार प्रणवज्ञश्च विश्वकर्मादिवर्णनं ॥ विश्वकर्मेतिगायत्री चतुर्विंशाक्षरात्मिका ॥ ९ ॥ षट्कुक्षिः पंचशीर्षाच त्रिपदाच भवेच्चसा ॥ ए तच्चोपनयाद्यंच पंचाननकुलोद्भवम् ॥ १० ॥** **अर्थ**– पांचाल ब्राह्मणा याणीं त्रिकाल संध्यावंदन करावें व गायत्रीचा जपकरावा ओंकार आणि प्रणव यांप्रत जाणणारा जे– विश्वकर्मा हीच गायत्री ती चोवीस अक्षरांची आहे साहा जिला कुक्षी आहेत. पांच जिला मस्तकें आहेत तीन पाय जिला आहेत अशी जी गायत्री ही विश्वकर्मा कुलापासून उत्पन्न जाहली आणि उपनयनादि संस्कार उत्पन्न केले. स्कं० ना० अ० ५ **सूर्यउवाच सर्वज्ञ सर्वलोकेश सर्वलोक जगद्गुरो ॥ ८ ॥ भवत्तनयचारित्रं पा-**

पनाशं शृणोम्यहम् ॥ मनुर्मयस्तथा त्वष्टा शिल्पितक्षस्तथैवच ॥ ९॥ एते षुयज्ञकर्माणि अन्यजातोनविद्यते॥ एतेषुवेदवेद्याच ब्रह्मविद्याचवर्तते॥ १०॥ अर्थ— सर्वज्ञ ह्मणजे सर्व जाणणार सर्व लोकांचा ईशा ह्मणजे ईश्वर सर्व प्राणिमात्र यांस गुरु ह्मणजे उपदेष्टा ब्राह्मणजे मनु मय त्वष्ट शिल्पि दैवज्ञ हे पांच सूर्य ह्मणतात. आपले पुत्र पांच ब्राह्मण यांचें जें चरित्र आहे तें सांगा हे पापाचे नाश करणारे आहेत ह्मणजे यांचें चरित्र गाइलें अथवा वर्णन केलें तर तो प्राणी पापा पासून मुक्त होतो असे जे पांच ब्राह्मण यांसच यज्ञ कर्माचा अधिकार आहे यांच्या शिवाय अन्य जातीस अधिकार नाहीं आणि यानींच वेदविद्या ब्रह्मविद्या करावी अन्यास अधिकार नाहीं. सूर्य व शंकराचे वाक्यावरून असें सिद्ध होंकीं, गायत्रीमंत्र व ब्रह्मविद्या आणि यज्ञकर्मे हें पांचालानींच करावें (अन्यजातोनविद्यते) याचा अर्थ असा होतो कीं हा अधिकार अन्य जातीस नाहीं. असें सिद्ध होतें असून ऋषिलोक हीं कर्मे करितात यावरून वाचक हो पहा हा अधिकार यांचा नसून हे धटाइनें या कर्मास प्रवर्तक होतात आणि प्रस्तुत यांच्याकडून जे लोक हीं कर्मे करवितात ते ईश्वराचे घरीं केवढे अपराधी आहेत परंतु यांस या कामांत समजत नाहीं या साठीं ते ऋषिलोकांकडून हीं कर्मे करवितात आणि ऋषि हे तर विद्वान् असून हा अधिकार आपला नव्हे असें जाणत असून याणीं परधर्माचा स्वीकार केला आहे यासाठीं सर्व ज्ञातीस आह्मीं असें सूचवितों कीं आज पावेतों नकळून तुम्हाकडून जें पाप झालें त्या गोष्टीस इलाज नाहीं परंतु आतां तरी सावध व्हा आणि यज्ञादि कर्मे या ऋषिलोकांकडून करवूं नका असें आह्मीं तुम्हास कळवितों परंतु पूर्ववत् जर तशीच वहिवाट चालवाल तर ईश्वराची आज्ञा समजून उमजून मोडल्या बद्दल तो नियंता कोपाविष्ट होईल. वाचकहो हा वरील सोनारांनीं लिहिलेला अर्थ वाचून पहा आणि त्यांस असें विचारा कीं तुम्ही "श्रुतीचा अर्थ करून महादेव कार्तिक स्वामीप्रत सांगतात." असें जें लिहिलें ती श्रुती कोणती व महादेवानें कार्तिक स्वामीप्रत सांगितलें असें कोणत्या पुराणांत किंवा आगमादिक ग्रंथांत आहे? येथें सोनार असें ह्मणतील कीं हें पहा स्कंदपु०

नागरखंडांतील ८।९।१० वे श्लोक तरी त्यांस असें सांगावें कीं, अहो. नागर खंड या नांवाचे ग्रंथ तरी किती आहेत. पूर्वी शालिवाहन शके १७४७ वर्षापर्यंत या भूमंडलाचे ठाईं नागरखंड हा ग्रंथ स्कंदपुराणांतर्गत व्यासप्रणीत एकच होता त्याजवर तिमिंगिलाचार्य ह्मणून एक रामानुज मताचा द्रविड शास्त्री झाला त्यानें द्रव्य संपादन करण्याकरितां सोनारांस एक रथकार कल्पद्रुम या नांवाचा ग्रंथ करून दिला. त्यामध्यें स्कं. पु. ना. अ. श्लोक याचे अंक स्थलीं घालून खोटे श्लोक लिहिले. त्याजवर मुंबई येथें वासुदेव आत्माराम सोनार याने हा (ब्रह्मविचार) ग्रंथ केला. त्यांतही स्कं. पु. ना. अ. असें हे डिंग देऊन खोटे श्लोक लिहिले तसेंच नारायणकेशववैद्य सोनार यानें मुखमासी ब्राह्मण वर्णन या नांवाच्या ग्रंथांत स्कं. पु. ना. अ. असें हे डिंग देऊन खोटे श्लोक लिहिले. तेव्हां व्यासानीं केलेलें नागरखंड खरें किंवा सोनारादिकांनीं केलेलें खरें. व्यासानीं केलेलें खरें. असें जर ह्मणतील तर व्यासकृत नागरखंडांत हे श्लोक मुळींच नसून पांचाल, किंवा मनु, मय, त्वष्टा, शिल्पी, दैवज्ञ, याचें वर्णन किंवा यांना वेदकर्माचा अधिकार किंवा हे विराटाच्या पांच मुखांपासून पांच उत्पन्न झाले हेच ब्राह्मण असें वर्णन मुळींच नाहीं. तेव्हां अशा खोट्यावचनांवरून सोनारादिकांला वेदकर्माचा अधिकार आहे असें मुळींच सिद्ध होत नाहीं. पुढें सोनारांनीं असें लिहिलें कीं गायत्री मंत्राचा जप सोनारादिकानीच करावा अन्यास (ऋष्यादिकांस) अधिकार नाहीं. आणि गायत्रीला सहा कुक्षी व पांच मस्तकें आहेत. असें कोठेंच वर्णन नाहीं. गायत्रीचें ध्यान हें सर्व ऋषींस येत आहे संध्याकालीं सर्व ऋषी ह्मणतात. सबब येथें विस्तार केला नाहीं. याचा विस्तार अग्निपुराणांत मोठा आहे. वाचक हो पहा हे सोनारलोक ऋषींला ख्रिस्त्यांवा प्रमाणें बापतिस्मा (उपदेश) करितात.

ऋषी लोक हो तुह्मास आह्मीं कळवितों कीं, तुम्हीं गायत्री मंत्राचा जप करितां व यज्ञकर्म चालवितां परंतु हा अधिकार तुमचा नव्हे पांचालांचा आहे यासाठीं सदरीं नमुद केलेलीं कर्में तुम्हीं करावीं असा कांहीं तुम्हांस आधार नाहीं असें या वचनावरून सिद्ध होत आहे कदाचित् तुम्हांस मिळाल्यास चालविलेली वहिवाट

ठीकच आहे आणि तसा आधार नसल्यास तुम्हीं या कर्माचा त्याग केला पाहिजे कारण दुसऱ्याचे धर्माचे आचरण केलें तर त्याचा नाश होणार आहे याजकरितां तुम्हीं हा परधर्म याप्रत आचरण न करावें सांप्रत कालीं तुम्ही आपल्यास ब्राह्मण असें ह्मणऊन हीं कर्में आचरावयास लागलां परंतु ब्राह्मण ते तुम्ही मुळींच नव्हत ब्राह्मण असें तुम्हीं ह्मणवितांमात्र परंतु तुम्हांस वेदं ब्राह्मण ह्मणत नाहीं यासाठीं तुम्हीं सदरीं नमुद केलेलीं कर्में आचरावयास लागलां आहां परंतु हें तुम्हांस अयोग्य आहे गायत्री मंत्राचा वगैरे अधिकार तुमचा मुळींच नव्हे असें खचित सिद्ध होतें यासाठीं तुम्हीं अभिमान सोडून ब्राह्मण ह्मणवणें व यज्ञकर्मादि आचरण करणें सोडून द्या. सर्व लोकांस आह्मीं असें सुचवितों कीं, हा जो ग्रंथ आह्मी केला यांतील वचनें प्राचीन ग्रंथांतील आहेत त्यांतील आधार घेऊन फक्त रचना केली आहे यांत आमच्या पदरचें वचन नाहीं जें ग्रंथांत आढळ जाहलें तेंच लोकांच्या उपयोगाकरितां लिहिलें आहे. वाचक हो पहा कीं या वरील अर्थात सोनारादिक असें ह्मणतात कीं ऋषिलोकांस वेदाचा अधिकार मुळींच नाहीं तेव्हां वेदकर्म तुम्हीं करूनका. हा त्यांचा बापतितिस्मा (उपदेश) आह्मीं (ऋषिलोकांनीं) कबूल केला असता परंतु काय करावें आमचा उपाय नाहीं कारण वेदशास्त्रें पुराणें आगमादिक जे हिंदुधर्मशास्त्राचे ग्रंथ त्यामध्यें ऋषिलोकांला वेदाचा अधिकार आहे असें वर्णन केलें आहे तेव्हां वेदादिकांची आज्ञा मोडणें हे कृत्य ऋषिकुलास अयोग्य आहे. आतां ऋषिलोकांसच वेदाचा अधिकार आहे याजविषयीं प्रमाणें दाखवितों तीं पाहून खऱ्या खोट्याचा विचार करणें हें एक विद्वान् वाचकाचें स्तुत्य कृत्यच आहे. विद्वान् वाचक हो पहा अनादि अपौरुषेय असा जो वेद तो पूर्वी (सृष्टीच्या आरंभीं) परमेश्वरापासि होता. नंतर विष्णूच्या नाभिकमलापासून ब्रह्मदेव उत्पन्न जाहला. तेव्हां त्या ब्रह्मदेवाला विष्णूनें वेदाचा उपदेश केला. नंतर ब्रह्मदेवानें दहा मानासिक पुत्र उत्पन्न करून त्यास वेद सांगितले त्या पासून पुढें विस्तार जाहला. आतां विष्णूनें ब्रह्मदेवास वेद सांगीतला असे कोठें आहे असें जर सोनारादिक ह्मणतील तर

* वेद कोणाला ब्राह्मण ह्मणतात तें दाखवा. + एवढें मात्र खोटें लिहितात.

त्यांसही प्रमाणें दाखवावीं. ऋग्वेद अष्टक ३ यामध्यें समुद्रादूर्मिर्मधुमान् १०।११ असे २ दोन वर्गाचें सूक्त आहे त्या सूक्तांचे वामदेव गोतमादि ऋषि आहेत त्यांत वामदेव ह्मणतात कीं वयंनाम प्रब्रवामा घृतस्यास्मिन्यज्ञे धारयामा नमोभिः ॥ उपब्रह्माशृणवच्छस्यमानं चतुः शृंगोवमीद्गौरएतत् ॥ अर्थ— वामदेव ह्मणतात हे ऋषिलोक हो आह्मी या यज्ञामध्यें घृतस्य (परमेश्वराचें) नाम प्रब्रवाम (नामोच्चारण करितो. आणि नमोभिः धारयाम (नमस्कार सहित धारण करितो कारण ज्या परमेश्वराच्या नाममध्यें (वेदामध्यें) सामर्थ्य असें आहे कीं पूर्वी उपशस्यमानं (समीपभागचे ठाईं परमेश्वरानें उपदेशित) असा जो वेद त्याप्रत ब्रह्मा अशृणवत् (*श्रवणकरिता जाहला) नंतर त्या वेदश्रवणमात्रेंकरून तो ब्रह्मदेव गौर (ज्ञानी) व चतुःशृंगः चार आहेत शृंगें ह्मणजे वेद जे ते ज्याला असा होत्साता. एतत् अवमीत् त्या वेदाप्रती चार मुखांतून काढिता जाहला. ह्या ऋचेच्या अर्थावरून परमेश्वरानें ब्रह्मदेवास वेद सांगितला असें सिद्ध होतें व यास दुसरें प्रमाण. श्रीमद्भागवताच्या प्रथम श्लोकामध्यें असें सांगितलें आहे कीं तेने ब्रह्म हृदाय आदिकवयेमुह्यंति यत्सूरयः यः आदिकवये ब्रह्म हृदा तेने इत्यन्वयः अर्थ— परमेश्वर ब्रह्मदेवाकारणें अंतःकरणें करून वेदाचा उपदेश करिता जाहला अशा अनेक वचनांवरून ब्रह्मदेवास वेदाचा अधिकार प्राप्त जाहला असें सिद्ध जाहलें. आतां त्या ब्रह्मदेवानें दह मानसिक पुत्र उत्पन्न करून त्यांनीं वेदादिकांचा अभ्यास केला. याजविषयीं प्रमाणें मत्स्यपुराण अ॰ ३ वेदाभ्यासरतस्यास्य प्रजाकामस्य मानसाः। मनसः पूर्वसृष्टा वै जाता यत्तेन मानसाः ॥५॥ मरीचिरभवत्पूर्वं ततोत्रिर्भगवानृषिः अंगिराश्चाभवत्पश्चात्पुलस्त्यस्तदनंतरं ॥६॥ ततः पुलह नामा वै ततः क्रतुरजायत। प्रचेताश्च ततः पुत्रो वसिष्ठश्चाभवत्पुनः ॥७॥ पुत्रो भृगुरभूत्तद्वन्नारदोप्यचिरादभूत् ॥ दशेमान्मानसान्ब्रह्मा मुनीन्पुत्रानजीजनत् ॥८॥ अर्थ— १ मरीचि २ अत्रि ३ अंगिरा ४ पुलस्त्य ५ पुलह

* वेदपठण करितो.

६ क्रतु ७ प्रचेता ८ वसिष्ठ ९ भृगु १० नारद असे दहा पुत्र ब्रह्मदेवाच्या मना पासून जाहाले. आतां दहा वेद येत होते किंवा नव्हते याचा विचार सुज्ञ वाचकांनींच करावा. आणि यांनांच ऋषिशब्द ही अष्टादश पुराणोपपुराणांत प्रसिद्ध आहे सबब येथें विस्तार लिहीत नाहीं आतां ऋषिशब्द हा देव, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, यांस आहे अन्यास नाहीं. यास प्रमाणें. सर्वानुक्रम सहस्त्रशीर्षा षोडश नारायणः पौरुषमानुष्टुभंत्रिष्टुबंतंतु. अर्थ– सहस्त्रशीर्षा या सूक्ताचा नारायण ऋषिः आणि अनुष्टुप्छंद. व शेवटल्या (यज्ञेनयज्ञ) या ऋचेचा मात्र त्रिष्टुप्छंद. ते व्हां ह्या सर्वानुक्रमावरून नारायणास ऋषिसंज्ञा आली आणि तसेंच प्रणवस्य स्वयंभूर्ब्रह्माऋषिः। अस्यश्री प्राणप्रतिष्ठामंत्रस्य ब्रह्मविष्णुमहेश्वरा ऋषयः। एतेषां कवचार्गला कीलकानां हरिहर ब्रह्माण ऋषयः। अशा अनेक प्रमाणावरून देवास ऋषिशब्द आहे असें सिद्ध होतें. वस प्रानां व्याहृतीनां विश्वामित्रभरद्वाजभृगव ऋषयः। इत्यादि प्रमाणां वरून विश्वामित्र, भरद्वाज भृगु इत्यादिकांलाही ऋषिसंज्ञा सिद्ध होती. असें असून हे सोनारलोक ऋषींला वेदाचा अधिकार नाहीं. असें लिहितात. परंतु त्यांना (सोनारांदिकांना) असें माहित नाहीं कीं, वेदामध्यें जेवढे मंत्र आहेत त्या प्रत्येक मंत्राला ऋषि, देवता, छंद आहेत यास प्रमाण सर्वानुक्रम यस्यवाक्यं सऋषिर्याते नोच्यते सादेवता यदक्षरपरिमाणं तच्छंदः

अर्थ– ज्याचें वाक्य तो ऋषि, ज्याचें मंत्रांत वर्णन ती देवता आणि जशी मंत्राचीं अक्षरें वगण असतील त्या प्रमाणें छंद. असें असून प्रत्येक मंत्राला छंद ऋषि आहेत. आतां येथें सोनारलोक अशी शंका घेतील कीं, तुह्मी व्याहृतीला जे ऋषि लिहितां यास प्रमाण काय? तरि त्यांस प्रमाण दाखवितो. अग्निपुराण अध्याय २१५ व्याहृतीनां तु सर्वासामृषिरेव प्रजापतिः। व्यस्ताश्चैव समस्ताश्च ब्राह्ममक्षरमोमिति। विश्वामित्रो जमदग्निर्भरद्वाजोथ गोतमः। ऋषिरत्रिर्वसिष्ठश्च काश्यपश्च यथाक्रमं। अग्निर्वायूरविश्चैव वाक्पतिर्वरुणस्तथा। इंद्रो विष्णुर्व्याहृतीनां दैवतानि यथाक्रमं। गायत्र्युष्णिगनुष्टुप्च बृहती पंक्तिरेवच। त्रिष्टुप्च जगतीचेति छंदांस्याहुरनुक्रमात्। अशा अनेक वचनां

वरून प्रत्येक मंत्राला ऋषि आहे असें सिद्ध होतें. पुनः येथें अशी शंका सोनारलोक काढतील कीं, अहो वेद हे अपौरुषेय आहेत आणि त्यांतील प्रत्येक मंत्राला ऋषि कोठून आले तेव्हां ऋषिनीं वेद केले असें सिद्ध होतें तरि सोनारादिकांस असें सांगावें कीं, वेद हे अपौरुषेयच आहेत ऋषीनीं केलेले नव्हेत खरे. परंतु प्रत्येक मंत्राला ऋषि कां लागले याजविषयीं बृहदारण्यादिकांत विस्तार मोठाच आहे. येथें ग्रंथविस्तारभयास्तव सर्व न लिहितां सारांश लिहितो. पूर्वी कालमानें करून वेद नष्ट झाले त्या योगानें ऋष्यादिकांचीं कर्में राहिलीं. तेव्हां पिप्पलायन आणि भरद्वाज हे उभयतां ब्रह्मलोकास जाऊन तपश्चर्येनें ब्रह्मदेवास प्रसन्न करून वेद मागते झाले तेव्हां ब्रह्मदेवानें त्या भरद्वाज ऋषीस सांगितलें कीं, हे भरद्वाजऋषे वेद अनंत आहेत हे सर्व वेद घेण्याविषयीं तूं समर्थ नाहींस. तेव्हां ह्या गिरिरूप वेदांतून तुला जे वेद जातील ते वेद घेऊन जा. असें ह्मणून ते वेदरूप तीन पर्वत त्या भरद्वाजाला दाखविले तेव्हां भरद्वाजानें त्या वेदरूप ३ पर्वतांपासून तीन मुष्टी वेद घेतले आणि पिप्पलायन ऋषीसह भूमंडळाचे ठाईं प्राप्त जाहला. तेव्हां सर्व ऋषी वेदाविषयीं बुभुक्षित होत्साते त्या भरद्वाजाची वाट पहात होते. इतक्यामध्यें त्या भरद्वाजाच्या हातांत वेद पाहतांच सर्व ऋषि एकदम उठून वेद घेण्याकरितां झोंबूं लागले तेव्हां भरद्वाजानें ते वेद सर्व ऋषिंपुढें थोडे थोडे टाकिले. नंतर सर्व ऋषीनें यथासंभव ते लिहिले ते असे कीं, कोणी एक ऋचा कोणी दोन ऋचा कोणी सूक्त या प्रमाणें सर्व वेद लिहिला ह्मणून ते त्या मंत्राचे कर्ते जाहले. ते असे कीं प्रथमतः मधुच्छंदस् ऋषीनें अग्निमीळे पुरोहितं ही ऋचा लिहिली ह्मणून या ऋचेचा ऋषि मधुच्छंदस् जाहला. या प्रमाणें सर्व वेदाच्या व्यवस्थे वरून वेदपठणादि करण्याचा अधिकार ऋषिला आहे असें सिद्ध होतें. आतां भरद्वाजानेंच वेद आणिले यास प्रमाण. तै० ब्रा० ३ का० १० प्र० त ९ हत्रीन्गिरिरूपानविज्ञातानिवदर्शयांचकार। तेषां ह् हैकैकस्मान्मुष्टिनाददे। सहोवाच। भरद्वाजेत्यामंत्र्य। वेदा वा एते। अनंता वै वेदाः। इत्यादिक प्रमाणावरून ऋषींला वेदाचा अधिकार आहे

असें सिद्ध होते. व याजविषयीं गुरुचरित्रांत ही सांगितलें आहे. आतां वेदाच्या शाखा करणारेही ऋषीच झाले ते असे कीं, ऋग्वेद एक असून त्याच्या आठ शाखा झाल्या. या प्रमाणें चारही वेदांच्या शाखा झाल्या हें सर्व वर्णन चरणव्यूहांत आहे तें येथें संक्षिप्तरूपानें दाखवितों तें पहा ह्मणजे ऋषींची योग्यता केवढी आहे हें सहज ध्यानांत येईल. चरणव्यूह खंड १।२।३।४

अथातश्चरणव्यूहं व्याख्यास्यामस्तत्रयदुक्तं चातुर्वेद्यं चत्वारो वेदा विज्ञाताभवंति ऋग्वेदो यजुर्वेदः सामवेदोथर्ववेदश्चेति तत्र ऋग्वेदस्याष्टौभेदाभवंति। चर्चा श्रावका श्चर्चक श्रवणीयपारः। क्रमजटः क्रमशटः। क्रमदंड श्चेति। तेषामध्ययनमध्यायाश्चतुषष्टि ६४ मंडलानि १० दशैवतु। वर्गाणांपरिसंख्यानं द्वेसहस्रे २००० षडुत्तरे ६। सहस्रमेकं १००० सूक्तानांनिर्विंशंकं विकल्पितं। दशसप्तसप्तत्यंते संख्यातं वैपदक्रमं। एकं शतं सहस्रंवा त्रिपंचाशत्सहस्रार्धमितानि चतुर्दशवासिष्ठानामितरेषां पंचाशीति। क्रमकालेतुवेष्टव्यंचतुस्त्रिंशत्सहस्राणि द्विखंडानां सहस्राणां द्वात्रिंशत्तंचषोडशोत्तराश्चत्वारःशतसहस्राणि द्वात्रिंशत्तं चाक्षर सहस्राण्यृचांदशसहस्राणि। ऋचां पंचशतानिच। ऋचामशीतिपादश्चैतत्पारायणमुच्यते ॥१॥ यजुर्वेदस्य षडशीतिर्भेदाभवंति। तत्र चरकानामदशभेदाभवंति। चरका आह्वरकाः कठाः प्राच्य कठाः कपिष्ठलकठाः चारायणीया वार्तान्तवीयाः श्वेता श्वेततरा मैत्रायणीयाश्चेति। तत्रमैत्रायणीयानाम सप्तभेदाभवंति। तान्येवत्रिगुणान्यधीता क्रमपारोभवति। तान्येवद्विगुणान्यधीत्यपदपारोभवति। तान्येवत्रिगुणान्यधीता क्रमपारोभवति। षडंगान्यधीता षडंगविद्भवति। शिक्षाकल्पो व्याकरणंनिरुक्तंछंदो ज्योतिषमित्यंगानि। तत्रप्राच्यामुदीच्यानिनिर्ऋतांनैर्ऋताः तत्रवाजसनेयानामसप्तदशभेदाभवंति। जाबाला, बौधेयाः, काण्वाः, माध्यंदिनाः, शापेयाः स्थापयनीयाः कापोलाः, पौंड्रवत्साः आवटिकाः परमावटिका, पाराशर्याः वैनेया, वैधेया, ओधेया गालवा, वैजवा, कात्यायनीयाश्चेति। प्रतिपदमनुपदछंदोभाषाधर्मामीमांसान्यायस्तर्कइति। श्रुत्युपांगानि। उपज्योतिषंसांगलक्षणंप्रतिसातुंवाक्यपरिसंख्यांचरणव्यूहंश्राद्धकल्पः प्रवराध्यायश्चशास्त्र

क्रतु संख्यानुगमयज्ञंपार्वातिहोत्रिकं पशवोकानि कूर्मलक्षणमित्यष्टादश परिशिष्टानिभवंति। द्विसहस्रे तेन्यूने मंत्रावाजसनेयके। इत्युक्तं परिख्यातमे तत्सकलं सशुक्रियं । ग्रंथाश्चपरिसंख्याता ब्राह्मणंच्चतुर्गुणं तत्र तैत्तिरीया नामनवभेदाभवंति। आख्याः कांडिकेयाश्चेति। तत्र कांडिकेयानामपंचभेदा भवंति। आपस्तंबी, बोधायनी, सत्याषाढी, हिरण्यकेशी, औधेयी चेति। तत्र कठानांतु गायविशेषः । चतुश्चत्वारिंशदुपग्रंथाः । मंत्रब्राह्मणयोर्वेद-स्त्रिगुणंयत्रपठ्यते। यजुर्वेदः सविज्ञेय अन्येशाखांतराः स्मृताः। तेषामध्य यनं वचनीयाश्चेति। सामवेदस्याखिल सहस्रभेदाभवंति। तेष्वध्याये ष्वधी यानाः। शक्रेणापिहताः प्रनष्टाशेषान् प्रवक्ष्यामः। आस्कुरायणीया वास्कुरा यणीयाः प्रांजलिद्वैनेभीयाः प्रांतमेयाः प्राचीनयोग्याश्चेति। तत्रराणारणी यानाम नव भेदाभवंति। राणायणीयाः शाट्यातवेया, शाद्य, मुद्गवा, ख ल्वला महाखल्वला, लांगला कौथुमा गौतमा जैनीयाश्चेति। तेषामध्यय नमष्टेसामसहस्राणि सामानिचचतुर्दश अष्टेदशतानि द्विशति। दश सप्त स वालखिल्याःसस्कुपर्ण प्रयश्चेतत्स मगणंस्मृतं। अथर्ववेदस्य नवभेदाभवंति। पैप्पला, दांताः प्रदांता स्तोता औता ब्रह्मदा, बला शौनकी देवदर्षी चरण विद्याश्चेति तेषामध्ययनं पंचकल्पानिभवंति। नक्षत्रकल्पो विधिवि धानकल्पः संहिताकल्पः शांतिकल्पश्चेति। सर्वेषामेव वेदानामुपवेदाभ वंति। या प्रमाणावरून वेदाच्या शाखा करणारे ऋषीच आहेत असें सिद्ध होतें. आतां पूर्वी वेद एक असून त्याचे चार भाग कसे झाले. त्यांच्या शाखा क शा झाल्या याविषयीं प्रमाणें दाखवितों तीं पाहून ऋषींला वेदाचा अधि कार आहे किंवा सोनारादिकांस आहे याचा निर्णय विद्वान् वाचकांच्या लक्षांत सहजच येणार आहे. अग्निपुराण. अ. १५० श्लोक ॥ प्रवर्तियंतिवे दांश्चभुविसप्तर्षयोदिवः। देवायज्ञभुजस्तेतु भूपुत्रैः परिपाल्यंते ॥२२॥ ब्र ह्मणोदिवसे ब्रह्मन्म नवस्कचतुर्दश । मन्वाद्याश्च हरिर्वेदं द्वापरांतेविभेद सः ॥२३॥ आद्येवदश्चतुष्पादः शतसाहस्रसंमितः। एक श्वासी द्यजुर्वेदस्तं चतुर्द्धाव्यकल्पयत् ॥२४॥ आध्वर्यवंयजुर्भिस्तु ऋग्भि होत्रं तथामुनिः।

औद्गात्रं सामभिश्चक्रे ब्रह्मत्वं चाप्यथर्वभिः ॥२५॥ प्रथमं व्यासशिष्यस्तु पैलो ऋग्वेदपारगः । इंद्रः प्रमतये प्रादाद्बाष्कलाय च संहितां ॥२६॥ बोध्यादिभ्यो ददौ सोपि चतुर्धा निजसंहितां । यजुर्वेदतरोः शाखाः सप्तविंशा महामतिः ॥२७॥ वैशंपायन नामासौ व्यासशिष्यश्चकार वै । काण्वा वाजसनेयाद्या याज्ञवल्क्यादिभिः स्मृताः ॥२८॥ सामवेदतरोः शाखा व्यासशिष्यः स जैमिनिः । सुमंतुश्च सुकर्मा च एकैकां संहितां ततः । गृह्यते च सुकर्माख्यः सहस्रसंहितां गुरुः ॥२९॥ सुमंतुश्चाथर्वतरुं व्यासशिष्यो विभेदतं । शिष्यानध्यापयामास पैप्पलादीन्सहस्रशः ॥३०॥ द्वापरे तु पुरावृत्ते मनोः स्वायंभुवेंतरे । ब्रह्मा मनुमुवाचेदं वेदज्ञश्च महामते । परिवृत्तं युगं जातं स्वल्पवीर्या द्विजातयः । संवृत्ता युगदोषेण सर्वं चैव यथा क्रमं ॥ भ्रष्टमानं युगवशादल्पशिष्टं हि दृश्यते । दशसाहस्रभागेन ह्यवशिष्टं कृतादिदं । वीर्यं तेजो बलं त्वान्यं सर्वं चैव प्रणश्यति । वेदे वेदा हि कार्याः स्युर्माभूद्वेदविनाशनं । वेदनाशमनुप्राप्ते यज्ञो नाशं गमिष्यति । यज्ञे नष्टे देवनाश स्ततः सर्वं प्रणश्यतीत्याद्यारभ्य अस्मिन्युगे कृतो व्यासः पाराशर्यः परंतपः । द्वैपायन इति ख्यातो विष्णोरंशः प्रकीर्तितः । ब्रह्मणा चोदित स्तस्मिन्वेदं वक्तुं प्रचक्रमे । अथ शिष्यान्स जग्राह चतुरो वेदकारणात् । जैमिनिं च सुमंतुं च वैशंपायनमेव च । पैलं तेषां च तुर्थं तु पंचमं लोमहर्षणम् । ऋग्वेदः श्रावकं पैलं जग्राह विधिवद्द्विजं । यजुर्वेद प्रवक्तारं वैशंपायनमेव च । जैमिनिं सामवेदार्थं श्रावकं सोन्वपद्यत । तथैवाथर्ववेदस्य सुमंतुमृषिसत्तमं । इतिहासपुराणस्य वाको वाक्यस्य चैव हि । मां चैव प्रति जग्राह भगवानीश्वरः प्रभुः । एक आसीद्यजुर्वेदस्तं चतुर्धा व्यकल्पयत् । चातुर्होत्रमभूत्तस्मिंस्तेन यज्ञमकल्पयत् । आध्वर्यवं यजुर्भिस्तु ऋग्भिर्होत्रं तथैव च । औद्गात्रं सामभिश्चक्रे ब्रह्मत्वं चाप्यथर्वभिः । ब्रह्मत्वमकरोद्यज्ञे वेदेनाथर्वणेन तु । ततः स ऋच उद्धृत्य ऋग्वेदं समकल्पयत् । इत्याद्यारभ्य- ऋचो गृहीत्वा पैलस्तु व्यभजत्तद्द्विधा पुनः । द्विः कृत्वा संयुगे चैव शिष्याभ्यामददात्प्रभुः । इंद्रप्रमतये चैकां द्वितीयां बाष्कलाय च । चतस्रः संहिताः कृत्वा बाष्कलिर्द्विजसत्तमः । शिष्यानध्यापयामास शुश्रूषाभिरतान्हितान् । बोध्यं तु प्रथमां शाखां द्वितियामाग्निमाठरं । पराशरं तृतीयां तु याज्ञवल्क्यमथापरां । इंद्रप्र

भृतिरेकांतुसंहितांद्विजसत्तमं। अध्यापयन्महाभागंमार्कंडेयंयशस्विनं। सत्य श्रवसमग्र्यंतुपुत्रंसतुमहायशाः। सत्यश्रवाः सत्यहितंपुनरध्यापयंद्विजं। इत्या द्यारभ्य. सत्यश्रियस्तुविद्वांसः शास्त्रग्रहणतत्पराः। शाकल्यः प्रथमस्ते षांतस्मादन्योरथीतरः। बाष्कलाश्च भरद्वाज इतिशाखाप्रवर्तकाः। देवमित्र स्तु शाकल्यो महात्माद्विजसत्तमः। चकारसंहिताःपंच बुद्धिमान्पदवित्तमः। तस्यशिष्याभवन्पंचवत्स्यः शालीय एवच प्रोवाचसहितास्तिस्रःशाकपूणिर थीतरः। निरुक्तंचपुनश्चक्रेचतुर्थंद्विजसत्तम। तस्यशिष्यास्तुचत्वारः केज योवामनस्तथा। धर्मशर्मादेवशर्मासर्वव्रतधराद्विजाः। शाकल्येयेमृतेसद्येब्र ह्मघ्नास्तेबभूवतुः। तत श्चितांपरांप्राप्य गतास्ते ब्रह्मणांतिकं। भरद्वाजोयाज्ञव ल्क्योगालविः शालकिस्तथा। धीमान्शतबलाकश्च नेगमश्चद्विजोत्तमाः। इत्याद्यारभ्याध्यायपर्यंतमिदमेवविस्तारोस्तिविस्मृतभयान्नदर्शितः। अस्य संक्षेपार्थस्तु तथा शुक्लयजुर्वेदभाष्ये। वर्ततेसचाधरेदृष्टव्यः। भा. तत्रा दौब्रह्मपरंपरयाप्राप्तंवेदंवेदव्यासोमंदमतीन्मनुष्यान्विचिंत्य तत्कृपयाचतुर्धा व्यस्य ऋग्यजुः सामाथर्वाख्यांश्चतुरोवेदान्पैलवैशंपायनजैमिनिसुमंतु भ्यः क्रमादुपदेश। तेच स्वशिष्येभ्यः। एवंपरंपरयासहस्रशाखोवेदोजातः। तत्रव्यासंशिष्योवैशंपायनो याज्ञवल्क्यादिभ्यः स्वशिष्येभ्योयजुर्वेदमध्यापय त्। तत्र दैवात्केनापिहेतुना क्रुद्धोवैशंपायनोयाज्ञवल्क्यं प्रत्युवाच मद धीतंत्यजति। सयोगसामर्थ्यान्मूर्तांविद्यांविधायोद्वाम। वांतानियजूंषिगृ हीतेति। गुरूक्त्वा अन्येवैशंपायनशिष्यास्तित्तिरयोभूत्वा यजूंष्यभक्ष यन्। तानियजूंषिबुद्धिमालिन्यात्कृष्णानिजातानि। ततो दुःखितोयाज्ञ वल्क्यः सूर्यमाराध्यतानि। शुक्लानियजूंषिप्राप्तवान्। तानिच जाबा ल गौधेय काण्व माध्यंदिनादिभ्यः पंचदशशिष्येभ्यः पाठितवान्। तथा चश्रुतिः "आदित्यानीमानिशुक्लानियजूंषिवाजसनेयेनयाज्ञवल्क्ये नाख्यायंतइति" अस्यार्थः– आदित्या दधीत्यादित्यानि शुक्लानिशु क्लानि. वाजस्यान्नस्यसनिर्दानंयस्य सवाजसनिस्तदपत्यं वाजसनेयस्तेनयाज्ञ वल्क्येनशिष्येभ्य आख्यायंते। कथ्यंतइत्यर्थः। तत्र मध्यंदिनेनमहर्षिणाल

आ यजुर्वेदशाखाविशेषा माध्यंदिनः यद्यपि याज्ञवल्क्येन बहुभ्यः शिष्येभ्य उपदिष्टः तथापीश्वरकृपया मध्यंदिनसंबंधीतया लोके प्रख्यायते। तं माध्यंदिनं। वेदं येऽधीयंते विंदति वा शिष्यपरंपरया वर्तमानास्तेऽपि माध्यंदिनाउच्यंतेति" अशा वचनांवरून वेदाच्या शाखा करणारे ऋषीच झाले आणि पुढें हीवेदाचें अध्ययन ऋषींनींच केलें. यास दुसरें प्रमाण श्रीमद्भागवत द्वादशस्कंध अध्याय ६ याच्या ३६ व्या श्लोकामध्यें वेदाच्या शाखेविषयीं शौनकाचा प्रश्न. आणि ३७ श्लोकापासून अध्याय समाप्त होऊन ७ व्या अध्यायाच्या १ श्लोका पर्यंत सूतांनीं वेदांचे शाखा करणारे ऋषींचेंच वर्णन केलें आहे. आणि कांहीं कारणें करून शाखेंचीं नांवें पडलीं तींही सांगितलीं आहेत. तीं अशीं कीं वैशंपायन ऋषीचे शिष्य बहुत होते त्यामध्यें एक याज्ञवल्क्य या नांवाचा शिष्य होता त्यानें सर्व शिष्यांची निंदा केल्यावरून वैशंपायन क्रोधायमान होत्साता तो याज्ञवल्क्यास ह्मणतो कीं श्लोक ६३ इत्युक्तो गुरुरप्याह कुपितोयाह्यलं त्वया॥ विप्रावमंत्रा शिष्येण मदधीतं त्याजाश्विति॥ अर्थ- हे याज्ञवल्क्या तूं शिष्य असून सर्व ब्राह्मणाचा अपमान करितोस त्यापेक्षां मजपासून अध्ययन केलेला वेद परत दे असें गुरूचें भाषण ऐकून याज्ञवल्क्यानें तो वेद ओकून टाकिला आणि तेथून निघून गेला नंतर तो ओकलेला वेद ब्राह्मणास अग्राह्य असें समजून. ततो गतोथ मुनयो ददृशुस्तान्यजुर्गणान्॥६४॥ यजूंषि तित्तिरा भूत्वा तल्लोलुपतयाददुः॥ तैत्तिरीया इति यजुः शाखा आसन् सुपेशलाः॥६५॥ अर्थ- ते शिष्य तित्तिर पक्षी होऊन त्या यजुर्वेदाप्रत ग्रहण करिते झाले. त्या दिवसापासून यजुर्वेदाची तैत्तिरीय शाखा प्रसिद्ध झाली. नंतर त्या याज्ञवल्क्यानें सूर्याची आराधना केली सूत उवाच॥ एवंस्तुतः स भगवान् वाजिरूपधरो हरिः॥ यजूंष्ययातयामानि मुनयेदात्प्रसादतः॥७३॥ अर्थ- तेव्हां सूर्य प्रसन्न होऊन त्या सूर्यानें घोड्याचें रूप धारण करून याज्ञवल्क्यास यजुर्वेद सांगितला. यजुर्भिरकरोच्छाखादशपंचशतैर्विभुः॥ जगृहुर्वाजसन्यस्ताः काण्वमध्यंदिना

दय: ॥७४॥ अर्थ- नंतर तो याज्ञवल्क्य अपरिमित यजुर्वेदकरून
१५ शाखा करिता झाला. त्या काण्व मध्यंदिनादिक प्रसिद्ध झाला. आतां सू-
र्यानें वाजि (घोड्याचें) रूप धारण करून याज्ञवल्क्यास उपदेश केला ह्मणून
त्यादिवसापासून वाजसनीय अशी शाखा प्रसिद्ध झाली. अशा अनेक शा
खा ऋषींनीं केल्या. नंतर. भा. स्कं. १ अ. ४ तएवऋषयोवेदंस्वंस्वं
व्यस्यन्ननेकधा॥ शिष्यैः प्रशिष्यैस्तच्छिष्यैर्वेदास्ते शाखिनोभ
वन्॥२३॥ अर्थ- ते संपूर्ण ऋषि आपल्या वेदाप्रत बहुत प्रकारें विभाग
करून आपल्या शिष्यस सांगते झाले नंतर तो शिष्य आपल्या शिष्यांस सां-
ते झाले असे शिष्यपरेकरून ते वेद शाखारूप होते झाले. तेव्हां अशा
अनेक श्रुतिस्मृतिपुराणांवरून वेदांचा अधिकार ऋषींलाच आहे असें सि
द्ध असून सोनारलोक बडबड करितात. तेव्हां बडबड करणें हा एक सोना
रांचा कुलधर्मच आहे असें समजलें पाहिजे. आतां सोनारादिक असें ह्म-
णतात कीं ऋषिलोकास यज्ञकर्म करण्याचा अधिकार मुळींच नाहीं. व त्या-
नीं (ऋषिलोकांनीं) कोठें केलें हि नाहीं. तरि येथें ऋषीला अधिकार आहे किं-
वा नाहीं याजविषयप्रमाणें लिहावयास नकोत. कारण ज्याला वेदाचा अ
धिकार आहे त्यांस यज्ञाचा अधिकार आहेच असें सिद्ध आहे आतां ऋ
षींनीं यज्ञ कोठें केले होते याजविषयीं सोनार साक्षी मागतात. तरि वाचक हे
सोनारांस असें सांगवें कीं- तुह्माला १ रुपयाचे १६ साक्षीदार खोटे मिळतात
आणि ते जे खोटे श्लोक करून देतात ते तुम्ही आपल्या ग्रंथांत छापता. ते
आमचे साक्षीदार नव्हेत आमची साक्ष देणारे वेद, शास्त्र, पुराणें, आगमादि-
क आहेत. तीं वचनें येथें थोडकींच दाखवितों तीं पहा. आणि ऋषींस यज्ञकर्मा
चा अधिकार नाहीं. अशी जी बडबड करितां याजबद्दल आपल्या हातानें आप
ल्याच तोंडांत मारून घ्या. ऐतरेय ब्राह्मण पंचिका २ खंड १९ ऋषयोवैसर
स्वत्यांसत्रमासततेकवषमैलूषंसोमादनयन् दास्याः पुत्रः कितवोऽ
ब्राह्मणः कथंनोमध्येदीक्षिष्टेति अर्थ- सरस्वतीतीराचे ठाईं ऋषि य-
ज्ञ करिते झाले. यावरून ऋषीच यज्ञ करीत होते असें सिद्ध होतें. परंतु येथें

*: व्यस्यन् विभक्तवंत:

सोनार अशी शंका घेतील कीं. वरील प्रमाणांवरून ऋषि यज्ञ करीत होते हें खरें आहे परंतु ऋषि तुह्मी नव्हेत. तर ब्रह्मविष्णुशिवादिक होते. तरि त्या सोनारास असें सांगावें कीं तुह्मी जेवढे कुतर्क घ्याल तेवढे आह्मास फार दृष्टच आहेत. आतां कोणत्या ऋषीनें कोणतें कर्म केलें याजविषयीं प्रमाण. ऐतरेयब्राह्मण पंचिका ७ खंड १६ पासून जयतिपरमंलोकं. पर्यंत तस्यहविश्वामित्रो होतासीज्जमदग्निरध्वर्युर्वसिष्ठोब्रह्मायास्यउद्गातेत्यादि अर्थ सातव्या पंचिकेच्या ३ अध्यायांत हरिश्चंद्र राजाचें आख्यान आहे तेव्हां त्या हरिश्चंद्राच्या यज्ञामध्यें विश्वामित्र ऋषि हा होता ( हवन करणारा ) होता. तसाच जमदग्निऋषि. अध्वर्यू. व वसिष्ठऋषी हा ब्रह्मा. आणि अयास्य ऋषी हा उद्गाता. याप्रमाणें बहुत ऋषींची वर्णनें आहेत. यास दुसरें प्रमाण स्कंदपुराण नागरखंड. अ० ४ श्लोक ५ पासून १६ पर्यंत. तस्मिन्होताचशांडिल्योब्रह्मागोतमएवच। आग्नीध्रश्च्यवनोनाम० उद्गाता याज्ञवल्क्यश्च ० पुलस्त्योब्राह्मण० इत्यादि अनेक प्रमाणें आहेत. वाचकहो सोनारांस असें सांगावें कीं, आह्मी वर नागरखंडांतील ह्मणून जे श्लोक दाखविले आहेत. ते श्लोक व्यासकृत स्कंदपुराणांतर्गत नागरखंडांतील आहेत. सोनारकृत नागरखंडांत नाहींत. कारण व्यासकृत नागरखंडाच्या ३।४ अध्यायांत विश्वामित्र ऋषीचें माहात्म्य वर्णन केलें आहे आणि सोनारकृत नागरखंडाच्या ४ अध्यायांत मनु, मय, त्वष्टा, शिल्पि, दैवज्ञ यानीं अलंकारादिक कर्मे करावीं असें वर्णन आहे. तेव्हां खऱ्याखोट्याचा विचार करणें हें कृत्य सुज्ञ वाचकांचें आहे. आतां ऋषीनें यज्ञ केल्या बद्दल दुसरें पुराण प्रमाण. श्रीमद्भागवत स्कंध १ अध्याय १ श्लोक ४ नैमिषेनिमिशक्षेत्रे ऋषयःशौनकादयः॥ सत्रंस्वर्गायलोकाय सहस्रसममासत॥ ४॥ ॥ अर्थ-- नैमिषारण्याचे ठायीं शौनकादिक ऋषी स्वर्गलोकप्राप्त्यर्थ हजार वर्षे पर्यंत यज्ञ करिते झाले. अशा अनेक श्रुति स्मृति पुराणावरून वेदकर्माचा व यज्ञादि कर्मे करण्याचा अधिकार ऋषिंलाच आहे, असें

---

* लोहार, कासार, सुतार, सोनार, पाथरवट.

सिद्ध होतें असो आतां वाचक हो– सावध व्हा, आणि हे सोनारांचें गप्पाष्टक पहा, संहिता ब्राह्मण तृतीयो ध्यायः ॥ आकोदेमनुब्रह्मणे महिमारन्विश्वकर्मा वहुरूपदेक रूपस्करम्नि विश्वकर्म ब्राह्मण म भरूा ब्रवंति क्षत्रियो राजन्यो मरुद्भ्यो वैश्यं तपसे शूद्रं तपसिरस्करं नरकाय विरणायतेनमः नमदद्रे णामहाभिषण= कालाग्निमनुविश्वकर्मण= मापूवज्योतिपरात्परमेनसंचरित्यं चरंव्योसंस्ते व्य ९ नानिकापूयन् ब्रेयविष्णूर्भिवं कापतिंमनुरुद्र आम्नयजेदं योनिसंचरित्यं मनुनारौद्र मभेनस्सांप्रदां मयविष्णमैग्निनस्सांप्रदां त्वष्टाब्रह्म यज्ञेनस्सांप्रदां शिल्पिदंद्रमोग्नेनस्सांप्रदां विश्वज्ञासूर्यो यज्ञेनस्सांप्रदां श्रीकांतःश्रीकंठः अथि माब्रह्म लोके स इत्य तान् विश्वकर्म ब्राह्मणं ब्रह्मभित्युद्रवंत्रिगुणवितंमहातीतंलोकातीतं जगत्पतीं या सर्वयज्ञीं सर्वदेवत्वं विश्वकर्मपितामहत्वष्टा रूपाणि धारयन् ॥ वाचक हो पहा ह्या सोनारांनीं नवीन केलेल्या वेदांची रचना पाहून अंतःकरणास परम आश्चर्य वाटते. तें असें कीं, कांहीं खऱ्या वेदांतील पदें व कांहीं खोटीं पदें घालून एकंदर एक वेदरूप डागिना बनविला आहे परंतु जे परीक्षक विद्वान् लोक आहेत ते हा सोनारांनीं केलेला खोटा वेदरूप डागिना हातांत देखील घेणार नाहींत. असें खचित आहे. आतां ह्या खोट्या वेदाच्या आरंभीं संहिता तृतीयोऽध्यायः असें लिहिलें आहे. ह्मणून मी चार वेदांचे तिसरे अध्याय वाचून पाहिले परंतु ही (सोनाराची) कादंबरी कोठेंच आढळली नाहीं तेव्हां पुनः मी आदिपासून अंतपर्यंत चारी वेद तपासून पाहिले तत्रापि हें गप्पाष्टक कोठेंच सांपडलें नाहीं. परंतु कांहीं पदें यजुर्वेदाच्या ३० अध्यायांत मंत्र ५ यांत आढळतात तीं वाचकांस दर्शवितों. यजुर्वेद अ. ३० मंत्र ५ " ब्रह्मणे ब्राह्मणं क्षत्राय राजन्यं मरुद्भ्यो वैश्यं तपसे शूद्रं तमसे तस्करं नारकाय वीरहणमि॰ इत्यादि नामें घेतल्याचीं उपलब्ध होतात यावरून तिमिंगिलाचार्यादि पंडितानीं द्रव्य लोभार्थ बाकीची कादंबरीची योजना स्वकपोल केली असें ह्मणण्यास कांहींच बाधक नसून रचनाही पाहतां वेदास सोडून आहे. का

रण, कोणतेही वेदांत ' विश्वकर्मब्राह्मण मबलाभवंति हें अथवा मनुमया त्वष्टा शिल्पि दैवज्ञादिक नामें एका पंक्तींत बिलकूल नाहींत जरी हीं नामें विषयरूपानें आलीं तरी तीं पृथक् रूपानें असून अर्थांतरानें अथवा कथांतरानें त्याचा उपयोग केला जातो असें असून यांतील हीं नामें एकाच पंक्तींत पाहतां हीरचना ब्रह्मविचारांतील नागरखंडानुसारच आहे असें ह्मणण्यास कांहींच बाधक नसून ' सांप्रदा ' याचा अर्थ विद्वानास कोणते रीतीनें लागत असेल तो असो कारण वेदवाणी ह्मटली असतां श्रोत्रेंद्रियांस रमविणारी असून श्रवाच्य व सार्थ युक्त आहे हें वेदांतील यजुर्वेद. ३।१८ मं. १९ " आयुर्यज्ञेन कल्पतां प्राणोयज्ञेन कल्पतां चक्षुर्यज्ञेन कल्पतां श्रोत्रंयज्ञेनकल्पतां। वाग्यज्ञेन कल्पतां मनोयज्ञेनकल्पतामात्मायज्ञेन कल्पतां ब्रह्मयज्ञेनकल्पतां ज्योतिर्यज्ञेनकल्पतां स्वर्यज्ञेनकल्पतां पृष्ठं यज्ञेनकल्पतां यज्ञोयज्ञेनकल्पतां स्तोमश्च यजुश्च, ऋक्च सामच बृहच्च रथंतरंच स्वर्देवा अगन्मामृता अभूम प्रजापतेः प्रजा आभूम वेट् स्वाहा। भाष्य कल्पहोमः कल्पनामितिलिंगात् (अथ कल्याञ्जुहोतीति श्रुतेः। यज्ञेननिमित्तेना सुर्जीवनकालः कल्पतां साध्यतां प्राप्यतां प्राणचक्षुः श्रोत्रवाङ्मनांसि मम यज्ञे क्लृप्तानिभवंतु आत्मादेहः आत्मेंद्रियमनोयुक्तो भोक्तेत्याहुर्मनीषिणइतिस्मृतेः। ब्रह्मा वेदो यज्ञेन कल्पतां ज्योतिः स्वयंप्रकाशः परमात्मायज्ञेन साध्यतां पुण्यकर्मानुष्ठानं परमात्मज्ञानेकारणं ब्राह्मणाविविदिषंति यज्ञेनदानेन तपसा नाशकेनेति श्रुतेः (१४-७-२-२४) कर्मणेवहिसंसिद्धिमास्थिता जनकादयः। इतिस्मृतेश्च गी- ३-२०) स्वः स्वर्गः पृष्टं स्तोत्रं स्वर्गस्थानं वा कल्पतां। यज्ञोयज्ञेनेच क्लृप्तोभवतु नाहंयज्ञ क्लृप्तोसमर्थः यज्ञेनयज्ञमयजंतदेवाइति श्रुतेः ३१।१६। किंचस्तोमयजुर्ऋक्साम बृहद्रथंतराणिच यज्ञेन क्लृप्तानिभवंतिं सनुषंगः। स्तोमस्त्रिवृत्यंचदशादिः। यजुरनियत

पादोमंत्रः ऋकुनियतपादा सामगीतिप्रधानं बृहद्रथंतरे तद्विशेषो वसोर्धारएवमग्निमभिषिच्यात्मानं यजमानः प्रशंसति वयं यजमानदेवा भूत्वा स्वः स्वर्गमगमन्गतवंतः । गमेर्लङ्गि शब्लुपे मस्तनत्वे रूपं चामृता अमरणधर्मिणोऽभूमभूताः भवतेर्लुङ्गि रूपं नतः प्रजापतेर्हिरण्यगर्भस्य प्रजाअभूमेतिफलवचनं । अनेन वसोर्धारायाः सर्वकाम प्राप्तिहेतुत्वमुक्तं । वेट् स्वाहेति वसोर्धाश होमार्थो मंत्रः वेडिति वषट्कारो हेषपरोक्षं यद्वेट्कारो वषट्कारेणवावैस्वाहाकारेणवा देवेभ्योऽन्नं प्रदीयत इति श्रुतेः ९।३।३। ४। इत्यादिवचनावरून उघड दिसतें असें असून या कादंबरीची रचना झाली ती त्यांतील "सांप्रदां" पदावरून 'यांतील कल्पतां' पदाधारानेंच त्यानी केलेली असावी असें अनुमान होतें कारण, त्यांतील कांहीं रचनेचा मूलपाया या वेदांतील असून तात्पर्यार्थही जवळचा दिसून येत असल्यानें त्यांत मनुमयादिक शब्द जे घेतले ते केवळ स्वकपोल असून बाहेरचे आहेत असें ह्मणण्यास किंचित्मात्रही बाधक नाहीं. असो आतां हे जसे संहितातृतीयोध्यायप्रारंभः असें ह्मणून खोटें वाक्य करून घातलें याचप्रमाणें सोनारांनीं आपण विराट्विश्वकर्म्याच्या पांच मुखांपासून पांच ब्राह्मण उत्पन्न जाहलों हें खरें करण्या करितां एक पंचब्राह्मणोपनिषद खोटें केलें आहे. तें याचकांस प्रदर्शित करितों. " उपनिषद्वाक्य सोमायस्माद्विश्वागुरूः समस्तक्रियतोमां विश्वकर्मः पातु विश्वश्रेष्ठ विश्वभर्तविश्व शांतिकः जीवान्तुभुवनानां सिद्धा किन्नरेंद्राणां यः पुराणांश्च जीतवर्षकः श्रेलानुमता पुरुषः विराट्विश्वकर्मस्वराट् विश्वकर्मासंराट् विश्वकर्मा ब्रह्मविष्णुरुद्र शतमखादयो वा जायंते विश्वेदेवाः वसवः पितरो मुनयो गंधर्वो इमे सर्वसर्वलोकाश्च इतिविश्वकर्मणः व्योमामारुतामाता द्वैश्वानरं वैश्वानरं जलं जलद्भूमिं भूमेर्यौषधीबीजानि बीजाभ्यः कीलकसस्यानिसस्येभ्यः धान्यं धान्यभवं अन्नं अन्नभवति । अन्नाद्देवरसः तद्रसेनजंतूनाः सर्वेषाः रेतशुक्लशोणितरूपमेवा तस्मात्पिंड समुत्पन्नानि समुत्पन्नानि जंगमरूपाणि

स्थावरजंगमरूपाणि जातानने कापिंडांड ब्रह्मांड इति विश्वकर्माणि भूतानि विश्वकर्माणि वृद्धानि तानि तस्मान्नेवा प्राणिश्वानि पंचमुखेभ्यः पंचशीर्षम नुसूत्रकर्ता प्रथममयो द्वितीयः त्वष्टातृतीयः शिल्पिचतुर्थः तद्दैवज्ञः समेवा कोंवि धीयते सानगसनातन अभुवन प्रतनप रूपर्णास्येन्वय सर्वगोत्राः कृताः मारूत स्वधाद्या ईश्वरः विश्वकर्माहः। कास्यप प्रपोत्रस्य ताभ्या १ सूर्यचंद्रो दयजायंतं गावोद्याः कुंभिनीसूत्रस्येति पंचब्रह्मोपनिष. " इत्यादि उपनिषदोक्तिचा आधार ही आहे असें ह्मणतील," तर विद्वानानीं येथें किंचित् विचार करावा कीं, ह्या उपनिषदाची रचना किती वर्षांवर झाली व हें कोणते वेदांतर्गत आहे त्याचे कारण खरोखर आपल्या चतुर्वेदभागांतील उपनिषदें ह्मटलीं असतां धर्मस्थापक अशा शंकर मध्वाचार्यादि प्रभृतींनें वेळेस ईश, केन, कठ, मुंड, मांडुक्य, प्रश्न, ऐतरेय, तैत्तीरेय, छांदोग्य, बृहदारण्य, श्वेताश्व, कैवल्य, जाबाल, हंस, आरुणि, गर्भ, नारायण, बिंदु, नाद, शिर, शिखा, मैत्रायणी, कौषितकी, बृहज्जाबाल, तापिनि, कालाग्नि, मैत्रेय, स्कबाल, क्षरिमंत्रिको, निरालंब, वज्रसूची, तेजो, नाद, ध्यानविद्या, योग, परिव्राट् त्रिशिखी, सीता, चूडा, निर्वाण, दक्षिणामूर्त्यो० शरभ, स्कंद, महानारायणद्वय, रामतापिनी, वासुदेव, मुद्गल शांडिल्य, पैंगल, भिक्षु, शारीरक, सन्यासो० अव्यक्त, एकाक्षर, अन्नपूर्णी, सूर्यो० अध्यात्मकुंडिका, सावित्रि, पाशुपत, अवधूत, त्रिपुरतापिनी, देवी, तारोप, कुंडली, भस्मो, गणेशोप० पंचब्रह्मोपनि० अग्निहोत्रोप० गोपालतापिनी, कृष्ण, याज्ञवल्क्य० वराहा, दि १०८ उपनिषदें असून यांत भाष्यादिकें करून प्रसिद्ध व वेदचतुष्टयांत उपलब्ध असीं उपनिषदें ईशादि श्वेतांत मिळून ११ असून यांची रचना व यांतील संवाद तत्त्वद्वैद भागास मिळता असून मागील पंचब्रह्मोपनिषदाभिध कल्पित उपनिषदाची रचना सरासरी ५-८ वर्षा आलीकडे एखाद्या भंगड अशा अविचारी वेदोपनिषदादि विचारशून्य सोनारानें केलीं असावी असें खन्या पंचब्रह्मोपनिषदाच्या संक्षिप्तानुक्रमणिके वरून विद्वानास अनु

मान करितां येईल. पंचब्रह्मोपनिषद्. ॐ. शौनको हवै महाशालोंगिरासर
भगवंतं पिप्पलादं पप्रच्छ दिव्ये ब्रह्मपुरे संप्रतिष्ठिता भवंति कथं सृतिकस्यैव म
हिमा बभूव ये ह्येष महिमा बभूव क एष तस्मै सहोवाच ब्रह्मविद्यया वरिष्ठा प्राणो
ह्येष आत्मा आत्मनो महिमा बभूव देवानां आयुः सदेवानां निधनमनिध
नं दिव्ये ब्रह्मपुरे विरजं निष्कलं शुभ्रमक्षरं यद्ब्रह्म विभाति इत्यादि प्रारंभ
असून यावर ' यथैवैष प्राणो० देवतास्ताः सर्वानाड्यः ० यः स्वत्रयेणमा
श्रि० यथैवैष देवदत्तो० वेद एवरं ज्याति० भूयः स्तेनैव स्वप्नाय० यथाजलो
काग्रमग्नं० परं सदयत्परं० तथैवैष कपालाष्टकं० तमेव स्तन इव लंबत० शुभा
शुभनिरुक्तं भस्य० खगः कर्कटगः ० ब्रह्मास्मादेवता० इति प्रथमखंडः।
ॐ अथास्य पुरुषस्य चत्वारि स्थानानि भवंति ० नाभि हृदयं० जागरितं
स्वप्नं० जागरिते ब्रह्मा० स्वप्ने विष्णुः । परमाक्षरं स आदित्यो० स पुरुषः स
प्राणः स जीवः सोग्नि: ०। परंब्रह्म विभाति० अश्रोत्रमपाणिपादं० लो
कानलोका० मातापितानपिता० चोक्कसो नपो क्लृतः परं ब्रह्म भाति० इ
दं सच्चविरच्चति० विधेः प्रजाः सन्यं० ईशते एक ए० हृदिस्था देवताः ०।
हृदि चैतन्ये तिष्ठति० यज्ञोपवीतं० आयुष्यमग्र्यं० सशिखं वपनं० पदक्ष
रं परंब्रह्म० सूचनात् सूत्रमि० तत्सूत्र विदि० येन सर्वमिदं० तत्सूत्रं धार
ये द्यो० बहिःसूत्रं त्याज्ये० ब्रह्मभावमयं सूत्रं० धारणात् तस्य० इति द्वितीयखं
डः। सूत्रमंतर्गतं० तैवै सूत्रविदो० ज्ञानशिखिनो० ज्ञानमेव परं ते० सशिखी
त्सु० अग्नेरिवशि० कर्मण्याधिकृता येतु० तैः संधार्यमिदं सूत्रं० शिखा ज्ञानमयी
यस्य० ब्राह्मण्ये सकलं तस्य० इदयज्ञोपवीतं तु० सविद्वान्य० एको देवः सर्वभूते
षु गूढः। कर्माध्यक्षः सर्वभू० एको मनीषी० आत्मानमरणिं कृत्वा० ध्यानिनि
र्मथनाभ्यासा० तिलेषु तैलं० एवमात्मनि० ऊर्णनाभिर्यथा तंतून० जागृत्
स्वप्ने तथाजी० यः प्रकोश प्रतीकाशं० हृदयं तद्वि जानीया० नेत्रस्थ जाग्र
तं विद्या० सुषुप्तं हृदयस्थं च० यदात्मा प्रज्ञयात्मानं० तेन संध्या ध्यानमेव०
निरूदका ध्यान सं० संधिनी सर्वभूतानां० यतो वाचो निवर्तंते० आनंदमेत
ज्जीवस्य० सर्वव्यापित आत्मविद्या तपोमूलं० इति कृष्णयजुर्वेदगत पंचब्र

ह्मोपनिषदस्य ३ खंड समाप्तं० शांतिः शांतिः शांतिः। इत्यादि विषय या उपनिषदांत असून विचार करितां निराकारार्थ भासतो. तर हा विषय एकीकडेस ठेऊन 'मनः पूतं समाचरेत्' या ह्मण्यानुरोधें मनःकल्पित वचनें लिहून त्यास वेदभाग असें नामाभिधान देणें हें केवळ नीचाचें कृत्य असून अविचारी पुरुषाचें कृत्य होय. कारण; प्रस्तुतचे कित्येक द्रव्यलोभी विद्वान् स्वार्थसाधकेच्छेनें पूर्वापर विचार देखील न करितां "मेमानावंध्या" या न्याया प्रमाणें सरासरीनें संस्कृताचें ज्ञान होतांच (ह्म०) रामोहरिःकरीभूभृत्करितां' येतांच ते आपणास पंडित असें जाणून अवाच्यादिक शब्दांनीं पूरित पूर्वापर विरोधकारक असे छिचोर ग्रंथ रचून पाहिजे तेवढे पैसे काढण्यास पाहतात. परंतु असा विचार करीत नाहींत कीं, पुढें अशा या खोट्या लेखाचा परिणाम कोठपर्यंत जाऊन पोंचेल, व असे आपण कपोल कादंबरी रचल्यानें कालांतरें करून लोक वेदादि शास्त्रांवर विश्वास ठेवतील किंवा नाहींत. कारण आह्मीं तर खचीत समजतों कीं अशा पोरकट लिहिण्यानें कालमानस्थित्यनुरोधानें विचार करितां कांहीं लोक निर्वेदी झाले असून अशा पोरकट चाळ्यानीं अधिकाधिक्य वेदशास्त्रादिका विश्व सनीय होऊन उत्तरोत्तर निर्वेदी व वर्णसंकर मार्गावलंबन करतील. कारण, सांप्रतची काळमान स्थिति तद्वतच असून दुष्टानुकूलभूत असी आहे. अस्तु एतावता एतादृश कल्पित वाक्यांनीं आजकाल सोनारच भांडतात असें नाहीं; तर कालांतरानें यवनादिकही भांडतील असें पक्कें समजा कारण जसें हें पंचब्रह्मोपनिषदाख्य कल्पित उपनिषद सोनारांस विद्वानीं करून दिलें तद्वत् अकबर पादशाहींत कांहीं विद्वानानीं लाचधारुपय भक्षून अल्लाख्य एक उपनिषद बनवून दिलें आहे. या सदराखालीं सर्व आमच्या विद्वज्जन वाचकावलोकनार्थ लिहितों तें पहा. आणि विचार करा कीं, विद्वानांचा किती जुलूम तो. " अस्मल्लां इल्ले मित्रा वरुणो दिव्यानि धत्ते इल्लल्ले वरुणो मित्रोराजापुन

ददुह्यामित्रा इल्लां इल्लल्ले इल्लं वरुणो मित्रो तेजकामा होबार मिंद्रो होतार मिंद्रो महासुरिंद्र अल्लो ज्येष्ठंश्रेष्ठं परमंपूर्ण ब्राह्मणं अल्ले अल्लो रसूल महमदरकं बरस्य अल्लो अल्लां आदल्लुं उकमेककं अल्लां उकंब नीर बातकं अल्लां यज्ञेन हुतहुतला: । अल्लासूर्यचंद्र: सर्व नक्षत्रा: अल्लो ऋषीणां सर्वदिव्यानिंद्रायपूर्वं मायापरमं अंतरिक्षं अल्लोपृथिव्यां अंतरिक्षंविश्वरूपं दिव्यानिधत्ले इल्लल्ले वरुणोराजा पुनर्ददु: इल्लल्लां अल्लइल्लला अनादिस्वरूपाय अथर्वणीस्यामा ह्रांह्रीं जनान्य शून्सिं ह्रां जलचरां अदृष्टं कुरुकुरु फट् असुरसंहारिणं ह्रौं ह्रीं रकं बरस्य अल्ले अल्लां इल्लल्लेति इल्लल्ला: इत्यथर्वणवेदीयगत अल्लोपनिषद ." या च प्रमाणें एक गर्दभोपनिषद झालें असून त्याची रचनाशक्तिही उपयोपनिषदांसाररवीच आहे. विद्वानानीं अशापोरकट लेरवांचा मनःपूर्वक विचार करावा अस्त वस्तुतः प्रागुक्तउपनिषदांचा विचार करितां तें अक्षरशः रवोटें ठरत असून शशविषाणन्यायानें जरी तें खरें मानलें तरी मनुमयादिक विश्वकर्म्यांच्या पांच मुरवांपासून उद्भवले असें सिद्ध होत नाहीं. आतां वाचकहो तुह्मी सोनारांस असें विचारावें कीं, अहो. तुह्मी ऋषींला वेदांचा अधिकार मुळींच नाहीं असें लिहिता याजविषयीं श्रुति स्मृति पुराणादिकादिकांचे आधार दारवविले तरि तुमचें बोलणें **ममजिव्हानास्ति** या न्यायानें कबूल करितों. परंतु तुह्मी ज्यावेळीं ब्रह्मयज्ञ, श्रावणी वगैरे करितां. त्यावेळीं ऋषितर्पणादिकाबद्दल कोणाचें करितां ? कारण ब्रह्मयज्ञांत ऋषितर्पण हें मुख्य आहे यास प्रमाण. **आश्वलायनगृह्यसूत्र** अध्याय ३ रवंड ४ देवतास्तर्पयति प्रजापतिर्ब्रह्मावेदादेवाऋषयः येथें ऋषयस्तृप्यतु असें असून पुढें (त्याच रवंडांत ) अथ ऋषयः शतर्चिनोमाध्यमा गृत्समदोविश्वामित्रो इत्यादिक नामाभिधानें ऋषींचीं असून पुढें प्राचीनावीती स्रुमंतुजैमिनिवैशंपायनपैलसूत्रभाष्यभारतमहाभारतधर्माचार्याजानंति बाहवि गार्ग्यगौतम शाकल्यबाभ्रव्यमां

उव्यमांडूकेया. इत्यादि सर्व नामें ऋषींचींच आढळतात. तेव्हां तुह्मी (सोनारादिक) ब्रह्मयज्ञ करते वेळीं मनुस्तृप्यतु । मयस्तृप्यतु । असें ह्मणतां किंवा लोहारस्तृप्यतु । कासारस्तृप्यतु । सुतारस्तृप्यतु । पाथरवटस्तृप्यतु । सोनारस्तृप्यतु. असें ह्मणतां ? तसेंच श्रावणीमध्यें प्रधानदेवता आहेत त्यामध्यें ऋषींचें अन्वाधान असून होमही आहे. यास प्रमाण. **आश्वलायन गृह्यसूत्र** अध्याय २ खंड ५ **अथातोध्यायोपाकरणं** असा आरंभ असून त्याच खंडामध्यें प्रधानदेवता **सावित्रीं ब्रह्माणं श्रद्धां** इत्यादिक असून पुढें **छंदांसिऋषीन्** असें अन्वाधान व छंदोभ्य ऋषिभ्यः स्वाहा । छंदोभ्यऋषिभ्यइदं० असा त्यागही आहे. आणि तसेंच ऋषिपूजनही आहे. आतां आह्मीं ऋषिलोक १ कश्यप २ अत्रि ३ भरद्वाज ४ विश्वामित्र ५ गोतम ६ जमदग्नि ७ अरुंधतीसहित वसिष्ठ या सप्त ऋषींचें पूजन करितों. तुह्मी (सोनारादिक) कोणाचें करितां ? मला असें वाटतें कीं सोनारादिक आपण ब्राह्मण ह्मणविणारे आपणच आसनावर बसून एकमेकाची पूजा करीत असतील. परंतु आमच्या ऋषिपूजनामध्यें वसिष्ठस्त्री अरुंधती आहे. तेव्हां सोनारादिक कोणाची स्त्री आणित असतील ती असो. तसेंच ब्रह्मांडपुराणामध्यें ऋषिपंचमी व्रत आहे. तेथें ही सप्तऋषींचें पूजन आहे आणि तें व्रत सोनारादिक सांप्रतकाळीं करितात. हें एक त्याचें अज्ञानच समजलें पाहिजे असो. ग्रंथ कहो जेवढा कोळसा उगाळावा तेवढा काळाच. **सारांश** अशा श्रुति, स्मृति, पुराणेतिहासागमावरून. सर्वानुक्रम, चरणव्यूहादिकावरून ऋषींलाच वेदाचा अधिकार व यज्ञादिकर्में त्यांनीच करावीं आणि आजपर्यंत तेच करीत आले. असें सिद्ध झालें. आतां सोनारादिक असें ह्मणतील कीं, तुह्मी ऋषी खरे आहांत. परंतु ब्राह्मण नव्हेत. ब्राह्मण ते आह्मी (लोहार, कासार, सुतार, पाथरवट, सोनार) असे पांच आहोंत तरी याच कहो. त्या सोनारादिकांस असें सांगावें कीं, पूर्वी वेदादिकांचे अधिकारी जे ऋषी सांगितले त्यांनांच ब्राह्मण शब्द आहे. अन्यास (सोनारादिकांस)

नाहीं. कारण ब्राह्मण शब्दाचा अर्थ असा आहे कीं, ब्रह्म जानातीति ब्राह्मणः ब्रह्म (वेद) यांप्रत जे जाणतात ते ब्राह्मण हा मुख्यार्थ असून तो ब्राह्मणशब्द पंकज शब्दाप्रमाणें योगरूढ्यात्मक आहे. सारांश ज्यापेक्षां वेदाच्या पठण पाठणाविषयीं ऋषींला अधिकार आहे असें सिद्ध होतें. त्यापेक्षां **ब्राह्मणशब्द** हा मुख्यत्वें करून ऋषींलाच आहे. आतां येथें कदाचित् सोनारादिक अशी शंका घेतील कीं, ज्यांस वेदाचा अधिकार आहे त्यास ब्राह्मण शब्द आहे. तरी क्षत्रियवैश्यांस कां नाहीं? तर क्षत्रियवैश्यांस ही ब्राह्मण शब्द आहे. परंतु तो योगात्मक आहे. रूढ्यात्मक नाही. आतां ऋषींचें ठाईंच **ब्राह्मणशब्द** योगरूढ्यात्मक आहे आणि क्षत्रियवैश्यास नाहीं. याजविषयीं प्रमाणें बहुत आहेत परंतु येथें ग्रंथवृद्धिभयार्थ सर्व न दाखवितां किंचित् प्रदर्शित करितों तीं वचनें **कुंभीपुलाक** न्यायाप्रमाणें विद्वान् वाचकांनीं अवलोकन करून ब्राह्मण शब्द हा ऋषींला आहे किंवा सोनारादिकांस आहे याचा विचार करावा. **भा० स्कं० १ अ० १८ श्लो० २ ब्रह्मकोपोत्थिताद्यस्तु तक्षकात्प्राणविप्लवात् ॥ नसंमुमोहोरुभयाद्भगवत्यर्पिताशयः ॥ २ ॥ अर्थ**– सूत शौनकादिक ऋषींप्रत सांगतात कीं, परीक्षिति राजा ब्राह्मणाच्या शापापासून उत्पन्न जाहलेला जो मृत्युरूप तक्षक यापासून किंचिन्मात्रही भय पावला नाहीं. कारण त्याणें परमेश्वराचे ठायीं मन धारण केलें होतें. **सारांश** या श्लोकामध्यें ब्राह्मणशब्द हा ऋषीलाच आहे कारण ज्याच्या गळ्यामध्यें **परीक्षिति** राजानें मृत सर्प घातला त्याचें नांव **शमीकऋषी**. आणि त्याच्या पुत्राचें नांव **श्रृंगी** तेव्हां ह्या भागवतवचनावरून ब्राह्मणशब्द हा ऋषींचे ठायीं योगरूढ्यात्मक आहे. यास दुसरें प्रमाण. भागवतस्कं० ३ **नाहं तथाद्मि यजमानहविर्विताने श्च्योतद्घृतप्लुतमदन् हुतभुङ्मुखेन ॥ यद्ब्राह्मणस्य मुखतश्चरतोनुघासं तुष्टस्य मय्यवहितैर्निजकर्मपाकैः ॥ ८ ॥ टीका** किंच ब्राह्मणो ममैव श्रेष्ठं मुखमतोयुष्मद्वज्ञया मन्मुखतिरस्कार एव इत्या-

ह। नाहमिति। विताने यज्ञे यजमानस्य हविश्चरु पुरोडाशादि हुत भुग भि स्तेन मुखेन अदन् अश्नन्नपि तथा नाग्निनाश्नामि तद्यथाश्च्योततात्क्ष रता घृतेन प्लुतं विलोडितं पायसादि प्रतिग्रासं रसास्वादपूर्वकं चरतो भुंजा नस्य ज्ञानिनो ब्राह्मणस्य मुखतोश्नामि मयि समर्पितैः कर्मफलैः तुष्टस्य निष्कामस्येत्यर्थः ।८। **अर्थ**— भगवान् सनत्कुमारादि चार ऋषींप्रत ह्मणतात कीं. हे ब्राह्मणहो. जसा मी ब्राह्मण मुखें करून तृप्त होतो तसा यज्ञादिकामध्यें अग्निमुखें करून तृप्त होत नाहीं या प्रमाणें या श्लोकांतील भावार्थ असून पुढील ९।१० श्लोकांमध्यें द्विज, विप्र, ब्राह्मण हीं नामें ऋषीं ला आहेत. तसेंच भागवत स्कं० ११ अ० १ **विश्वामित्रोसितः कण्वो दुर्वासा भृगुरंगिराः। कश्यपो वामदेवोत्रिर्वसिष्ठो नारदादयः॥१२॥** येथून आरंभ करून २० श्लोक पर्यंत **अर्थ**— या ऋषींनीं कृष्णाचा पुत्र जो याजला शाप दिला तो असा कीं, हे सांबा तुला एक मुसळ होईल आणि त्यापासून सर्व यादव कुलाचा नाश होईल. तात्पर्यार्थ वरील श्लोकामध्यें ऋषीलाच विप्र, द्विज, ब्राह्मण, अशी संज्ञा आहे. तसेंच. एकादशस्कंध. अ. ६ **श्रीभगवानुवाच॥ एतेवैसुमहोत्पाता ह्युत्तिष्ठंतीह सर्व** [illegible] ॥३५॥ **अर्थ**— भगवान् द्वारकावासी यादवांप्रत ह्मणतात कीं, हे यादवहो पहा चहूंक डून **उत्पात** उठताहेत याचें कारण आपल्या यादवकुलास ब्राह्म णांचा **दुर्निवार्य** असा शाप झाला आहे. **सारांश** या श्लोकामध्यें ही विश्वामित्र, असित, कण्व, दुर्वास, भृगु, अंगिरा, कश्यप, वामदेव. अत्रि, वसिष्ठ, नारद आदिकरून ऋषींलाच ब्राह्मण असें भगवान् बो- लले आहेत. तेव्हां अशा अनेक प्रमाणांवरून. ब्राह्मण, द्विज, विप्र इत्यादि नामें ऋषींचे गईच योगरूढ्यात्मक आहेत. आतां क्षत्रिय वैश्यां- च ठाईं ब्राह्मण शब्द योगरूढ्यात्मक नाहीं. यास प्रमाण. अध्यात्म रामा- यण. अयोध्या कांड. अध्याय ७ **ब्रह्महत्या स्पृशेन्नत्वां वैश्योहं त पसिस्थितः। पितरौ मां प्रतीक्षेते क्षुत्तृड्भ्यां परिपीडितौ॥२७॥**

**अर्थ** - ज्याकाळीं दशरथ राजानें श्रावणास बाण मारला तेव्हां तो श्रावण दशरथाप्रत ह्मणतो कीं, हे राजा भिऊं नकोस तुला ब्रह्महत्या लागली नाहीं. कारण मी तपश्चर्या करणारा वैश्य आहें. अशा अनेक वचना वरून क्षत्रिय वैश्यास ब्राह्मण शब्द मुख्यत्वें करून नाहीं असें सिद्ध होतें. आणि जेथें प्रायश्चित्तें सांगितलीं आहेत तेथें ही ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र इत्यादिकांचा वध केला असतां प्रायश्चित्तें निरनिराळीं सांगितलीं आहेत. तेव्हां ब्राह्मण शब्दें करून क्षत्रिय वैश्य येत नाहींत. आतां ऋषी आणि ब्राह्मण हे जर भिन्न असते तर ऋषि वध प्रायश्चित्त निराळें आणि ब्राह्मणवध प्रायश्चित्त निराळें सांगितलें असतें. अस्तु तात्पर्यार्थ अशा अनेक श्रुति, स्मृति, पुराणादिकावरून ब्राह्मण शब्द हा ऋषींचे ठायींच योगरूढ्यात्मक आहे. क्षत्रिय वैश्यांचे ठायीं नाहीं. असें सिद्ध असून **लोमविलोम** जात्युत्पन्न असे जे सोनारादिक हे आपणास ब्राह्मण ह्मणतात. हे त्यांचें (सोनारादिकांचें) बोलणें **मसमानावंध्या** या प्रमाणेंच समजलें पाहिजे. या प्रमाणें अनेक खोटे विषय लिहून **सोनारांनीं** आपल्या ग्रंथाचा दुसरा अध्याय समाप्त केला.

अध्याय. ३ श्रीगणेशायनमः॥ मागील दोन अध्यायांत पांचाल ब्राह्मण हेंच मुखमासीत असें सिद्ध जाहलें यास आणखी प्रमाणें देतों श्रीकृष्णानीं अर्जुनास गीता सांगितली त्यांत ह्मणतात. **श्लोक॥ देवाधीनं जगत्सर्वं मंत्राधीनंच देवतं॥ ते मंत्र ब्राह्मणाधीना ब्राह्मणो मम देवतं॥ अर्थ**- परमात्मा याचे आधीन सर्व जग असून तो मंत्रांचे स्वाधीन आहे ते मंत्र ब्राह्मणाच्या आधीन आहेत ते ब्राह्मण माझें दैवत आहे असें श्रीकृष्ण ह्मणतात. वाचकहो हा वरील श्लोक सोनारांनीं लिहिला आहे तो* खरा असून त्याचा अर्थही खरा आहे. परंतु हा अर्थ सोनारादिकांकडे लागू पडत नाहीं. कारण ब्राह्मण शब्द हा ऋषींचे ठायींच योगरूढ्यात्मक आहे. सोनारादिकांस मुळींच नाहीं. पुनः सोनार लिहितात कीं परमात्मा जो विश्वकर्मा याचे आधीन हें जग आहे असें ह्मणण्याचें कारण काय कीं विश्व

---

*: हा श्लोक गीतेंत नसून अन्य ठिकाणीं आहे.

कर्म्यानें जग उत्पन्न केलें आणि तोच सर्वांस नियंता परमेश्वर आहे हें मा-गील अध्याय वाचल्यावरून ध्यानांत आलेंच आहे या साठीं त्याचे आधीन आहे असें ह्मणतात तें खरें आहे असा जो जगाचा नियंता तो मंत्रानें साध्य होतो परंतु ते मंत्र ब्राह्मणाच्या आधीन आहेत असें जें पद आहे याचें कार-ण असें कीं स्वतः ब्रह्मणानींच जे मंत्र उत्पन्न केले ते त्यांच्या आधीनच आ-हेत या साठीं ते मंत्र ब्राह्मणाधीन असें पद कृष्णानीं घातलें. पांचाल ब्रा ह्मणानींच मंत्र उत्पन्न केले याविषयीं वचन लिहितों वाचकांनीं श्रवण करून खातरी करून घ्यावी. **स्कं० ना० अ० २ वेदवेदज्ञधर्मज्ञवेदात्माविश्वकर्मणाः ॥ वेदोविश्वप्रसूतीनः वेदोवैविश्वकर्मणः ॥७१॥** **अर्थ**– वेद पुरुष हा वेद जाणून धर्म जाणणारा आहे तोच पुरुष वेदाचा आ-त्मा होय असा जो तो विश्व हें ज्याचें होय कर्म तो विश्वकर्मा तो वेद पुरुष विश्वाप्रत प्रसवता झाला तोच वेद अथवा तो विश्वकर्मा. वाचक हो हाव रील श्लोक व्यासकृत नागरखंडांत मुळींच नाहीं. या पांच ब्राह्मणा नीं जर कोणतेंही मंत्रानीं अनुष्ठान केलें किंवा जपकेला तर त्वरित कार्य साध्य होतें याविषयीं खातरी जी होणें ती करून पाहिल्यास हो-ईल असे जे ब्राह्मण ते कृष्णाचें दैवत आहे भागवत द्वितीयस्कंधांत अध्याय १ ला यांत लिहितों कीं विश्वकर्मा याजपासून अश्विनीकु मार सूर्य दिशा औषधी उदक रेत मृत्यु इंद्र विष्णु उत्पन्न जहाले असें जें लिहिलें आहे यावरून कृष्णाचें दैवत ब्राह्मण आहे असें ह्मण तात तें वास्तविक आहे. वाचक हो. वरील अर्थात सोनार ह्मणतात कीं, आह्मी मंत्राचें अनुष्ठान केले असतां त्वरित कार्यसिद्धि होती आणि ज्यास खातरी करून घेणें असेल तरि करून पाहिल्यास होई-ल हें त्यांचें लिहिणें लोकांस फसविण्याचें आहे. **रुद्रयामलश्लो-क ॥ पंचभिः सहितः पुत्रैर्विश्वकर्मागिरींद्रजे ॥ द्वारकावा-सिभिर्नित्यंश्रीकामैः पूज्यतेसदा ॥ ४२ ॥ तस्माछिल्पिवरा न्नित्यंपूजयंतिविचक्षणाः ॥ तेहिकांशांतिकल्याणं गृहीणां**

जीविकार्थिनः ॥४३॥ अर्थ— हे पार्वती विराटाचे पांच पुत्र जे मनु मय त्वष्टा शिल्पि दैवज्ञ हें विश्वकर्म पंचायतन आहे यांचें द्वारकावासी लोक नित्य निरंतर लक्ष्मि संपन्न व्हावें या साठीं सार्वकाल पूजा करितात- तस्मात् शिल्पिवरजे यांची विचार वंत ह्मणजे विचार करणारे जे आहेत ते पुजन करितात तेणे करून ते मनुयादि संतुष्ट होत्साते त्यांचा मनोदय पूर्ण करितात. वाचक हो- हे वरील रुद्रयामलांतील ह्मणून ४२। ४३ असे दोन श्लोक लिहिले आहेत ते रुद्रयामल ग्रंथांत मुळींच नाहींत आतां त्या खोट्या श्लोकांतील अर्था प्रमाणें द्वारकावासी लोकसोनारादिकांची पूजा करीत होते किंवा काय याचा विचार विद्वान् वाचकानींच करावा- भागवत स्कंध २ अध्याय १ इंद्रादयो बाहव आहुरुस्राः कर्णौ दिशः श्रोत्रममुष्य शब्दः॥ नासत्य दस्रौ परमस्य नासे घ्राणोऽस्य गंधो मुखमग्निरिद्धः॥२९॥ द्यौरक्षिणी चक्षुरभूत्पतंगः पक्ष्माणि विष्णोरहनी उभे च॥ तद्भ्रूविजृंभः परमेष्ठिधिष्ण्य मापोऽस्य तालू रस एव जिह्वा॥३०॥ अर्थ— इंद्र ज्यांत मुख्य आहे असे जे देव ते ज्याचे बाहू आहेत दिशा ह्या कर्ण आहेत श्रोत्राचा शब्द हा विषय ह्मणोन श्रोत्रेंद्रिय ज्यास ह्मणतात अश्विनी कुमार हे नासापुटाचे ठायीं आहेत गंध घेणें हा त्या नाशिकाचा विषय आहे अग्नि हा मुखाचे ठाईं आहे तो अग्नि प्रदीप्त आकाश हें नेत्रगोलकाचे ठायींच क्षु हें इंद्रियें पतंग ह्मणजे सूर्य हें दैवत त्या नेत्रांपासून उत्पन्न झालें असा जो विश्वकर्मा त्याच्या रात्र आणि दिवस या खाल वरच्या पापण्या आहेत त्याचा भृकुटी विलास जो आहे हा ब्रह्मपद उदक जें आहे हें ज्याचीं तालुरस जो हाच जिव्हेंद्रिय. कोणीएक मोठा सत्ताधारी आपल्या गादीवर बसला असतां त्याचे आश्रित बाजूनें बसलेले असतात आणि धणी जो असतो तो मध्यें उंचासनीं बसतो तसें परमात्मा विश्वकर्मा याचि जागा मध्यें आहे आणि त्याचे आश्रित बाजूनें बसलेले आहेत त्यांस अष्टदिक्पाळ

ह्मणजे दिशेचे स्वामी आहेत ते अष्टदिक्पाळ लिहितों. प्राचिदिशिइंद्रायनमः अग्नयदिशाअग्नयेनमः दक्षिणदिशायमायनमः नैऋत्यदिशानैऋत्येनमः प्रतीचीदिशावरुणायनमः वायव्यदिशावायव्येनमः उदीचीदिशासोमायनमः ईशान्यदिशाईश्वरायनमः ऊर्ध्वायांदिशाऊर्ध्वब्रह्मणेनमः आधारदिशापृथ्वीयनमः यांत ऊर्ध्वदिशेस जोस्वामि आहे तोच परमात्माईश्वर हा निर्णय संधेंत आहे संधेंतिल मंत्र हे सर्व वेदोक्त आहेत दररोज संध्या करितात त्यावेळीं उर्ध्व दिशेचा स्वामि यास नमस्कार करितात आणि असावादित्यो विश्व ब्रह्मा ह्मणोन उदक आपल्यासभोवती फिरवितात-परमात्मा विश्वकर्मा हेंच परब्रह्म आहे हें कोणी जाणत नाहींत तें जाणतिल तर सर्व पापापासून मुक्त होतील यांत अंदेशा नाहीं आणि हें ब्रह्म ओळखल्यास जागा राहिलीच नाहीं ब्रह्म ओळखल्यावर पापानें जावें कोणाकडे. विश्वकर्मा हींरूपें मनुमयादि पांच आहेत तेच मुखमासीन ब्राह्मण तेच वेदपुरुष आणि तेंच परब्रह्म तिंचपंच भुतें किंवा तिंच तत्वें तेच जगद्गुरु तेच स्थावर जंगमास गुरु तेच सर्व देवांसपितामह तेचसर्व प्रजेस पितामह याविषयी मागें वचनें लिहिलीं आहेत. परंतु आणखीही लिहितो. वाचक हो. वरील सोनारांनीं लिहिलेल्या अर्थात भागवतांतील २ दोन श्लोक खरे आहेत परंतु त्यावरून सोनारादिक ब्राह्मण ठरत नाहींत. व प्राचिदिशिइंद्रायनमः असें जे संध्येंतील मंत्र लिहिले आहेत ते किती अशुद्ध आहेत याचा विचार विद्वान् वाचकांनीं करावा. हे मंत्र कृष्णयजूच्या अरणांत सविस्तर आहेत. तसेंच असावादित्योविश्वब्रह्मा असा सोनारांनीं मंत्र लिहिला आहे परंतु असा मंत्र कोणत्या वेदांत किंवा वेदांगांतही आढळत नाहीं खरा मंत्र असावादित्योब्रह्म असा आहे. यास प्रमाण. कृष्णयजु अरणप्रपाठक १ कांड १० अनुवाक ३ असावादित्यो ब्रह्मेति प्रदक्षिणंकुर्वंतितेपापमवधुन्वंति- दुसरें प्रमाण शुक्ल यजु अ. ४० मंत्र समाप्तीचा. योसावादित्योसोसावहंखंब्रह्मेति ॥ तसेंच गृह्यपरिशिष्टे. असावादित्योब्रह्मेतिप्रदक्षिणंपरिपतन्परिषिच्यापउ

पस्पृशति. अशीं अनेक प्रमाणें असून ह्या मंत्रामध्यें विश्वपद सोनारानीं कोठून घातलें असेल तें असो. परंतु मला असें वाटतें कीं, सोनारानीं विश्व पद खोटे घातलें यापेक्षां असावादित्योसोनारब्रह्म असा खोटा मंत्र लिहिला असता ह्मणजे वास्कदेव आत्मारामादिक सोनारांस फारच मोठेपणा आला असता असो. सारांश असा सोनारलोकांनीं अनर्थ मांडला आहे याचें कारण कलियुग आहे असें समजून विद्वानानीं मौन धरलें पाहिजे कारण. मूर्खांशीं भाषण करणें हें विद्वानास अयोग्य आहे: असो पुढें सोनार असें लिहितात कीं, या सर्व लेखावरून असें सिद्ध होतें कीं, जगाचा नियंता विश्वकर्मा जो पांचरूपानें आकारत्वास आला यांचीच भक्ति सर्वांनीं करावी जन्मास आल्यादिवसापासून या पांच ब्राह्मणाचे उपकारांत सर्व लोक आहेत पृथ्वी आप तेज वायु आकाश यांची गरज कोणास लागत नाहीं. असें कधींही होणार नाहीं. हीं पांच तत्वें तेच पांच ब्राह्मण आहेत मागील सर्व मजकूर ध्यानांत आणून वाचकानीं याजवर पुरें ध्यान द्यावें आणि सूक्ष्म विचार करून पाहावा पाणी अग्नि इत्यादि या पांचांशिवाय प्राणी मात्राचें मुळींच चालावयाचें नाहीं असो हीं पंचतत्वें विश्वकर्मा प्रभु याणें उत्पन्न केलीं आहेत तर यावर सुज्ञानानीं असा विचार करावा कीं परमेश्वर जो सर्वांचा नियंता यास विसरूं नये हेंच मुख्य दैवत आहे याशिवाय वेद दुसऱ्या कोणत्याही दैवतास मानीत नाहीं यासाठीं क्षुद्रदैवतांची भक्ती न करावी मुख्य दैवत विश्वकर्मा असून या दैवतास लोक कसे विसरले आणि हे मुख्य दैवत कोणासही माहित नाहिं क्षुद्रदैवतास लोक भजावयास लागले ही वहिवाट विक्रम शकांतच चालू झाली याचें कारण पुढें लिहितों. कलियुगांत युधिष्ठिर शक होता त्या शका पर्यंत धर्म चांगल्या रीतीनें चालत आला असें आढळतें भागवतांत लिहिलें आहे कीं श्रीकृष्णाचा जन्म झाला त्याकालीं नंद गौळी यास मोठा आनंद होऊन दैवज्ञ ब्राह्मण यांस बलाऊन स्नान करून अलंकार धारण केले तदनंतर त्या ब्राह्मणाकडून स्वस्तिवाचन करऊन त्याना दानादिकें केलीं [illegible]

जें जातकर्म तेंही करविलें तसेंच पितरांचें व देवांचें पूजन दैवज्ञा कडून करविता झाला नंतर दोन लक्ष गाई सुवर्णाचे अलंकार घालून त्या दैवज्ञ ब्राह्मणास दिल्या आणि तिळांचे सात पर्वत त्यांत रत्नें पुष्कळ घालून व भर जरीचीं वस्त्रें यांणी वेष्टित केलेले असेंही दिल्हे ही कथा दशमस्कंदांत अध्याय ५ यांत लिहिली आहे. या वचनानें अर्वाचीन काळा पर्यंत पांचालांची वहिवाट ब्राह्मणत्वा बद्दल पुरवारी करीत आहे शिवाय प्राचीन काळाची वहिवाट यजुर्वेद सांगतो यजुर्वेदांत सांगितलें आहे कीं त्वष्टा हा देवाचा पुरोहित आहे त्यास आणखी प्रत्यंतर भागवतांत षष्ठस्कंदांत लिहिलें आहे कीं त्वष्टा हा सर्व देवांचा पुरोहित आहे. श्रीशुक उवाच. नंदस्त्वात्मज उत्पन्ने जाताल्हादो महामनाः ॥ आहूय विप्रान् दैवज्ञान्स्नातः शुचिरलंकृतः ॥१॥ वाचयित्वा स्वस्त्ययनं जातकर्मात्मजस्य वै ॥ कारयामास विधिवत्पितृदेवार्चनं तथा ॥ २ ॥ धेनूनां नियुते प्रादाद्विप्रेभ्यः समलंकृते ॥ तिलाद्रीन्सप्त रत्नौघ शातकौंभांबरावृतान् ॥ ३ ॥ अर्थ- सदरीं नमुद केला आहे. वृणीमहे त्वोपाध्यायं ब्रह्मिष्ठं ब्राह्मणं गुरुम् । यथांऽजसा विजेष्यामः सपत्नांस्तव तेजसा ॥ ३२ ॥ अर्थ- ब्रह्मानें ठायीं तुझी स्थिती आणि ब्राह्मण गुरू असा तुज मन उपाध्या विषईं इच्छा करितों त्या तुझा तेजानें शत्रु जे दैत्य यांचा पराभव करूं.

वाचक हो. वरील अर्थात सोनार लोक असें लिहितात कीं "कलियुगांत युधिष्ठिर शक होता त्या शका पर्यंत धर्म चांगला चालत आला असें आढळतें." परंतु ह्या सोनारांच्या लिहिण्यांत त्यांचा (सोनारांचा) मतलब साधत नाही. कारण युधिष्ठिर (धर्मराज) यांचा कुलगुरु धौम्यऋषी होता आणि तोच यजन याजनादिक कर्मे करित होता. या वरून सोनारादिकांस बोलावित नव्हता असें सिद्ध होतें. आणि यथाराजा तथा प्रजा या न्याया प्रमाणें प्रजाही बोलावीत नसेल असें खचित आहे आतां धर्मराजा राज्य नीतीनें करित होता किंवा नाहीं तें सर्व आबाल वृद्धांस माहित आहे असें असून जर हे सोनारादिक ब्राह्मण असते तर यांना टाकून धौम्यऋषी

कडून याजनादिक कर्मे कां करविलीं असतीं? तेव्हां युधिष्ठिर आकांत करून सोनारादिकांस ब्राह्मणत्व आलें नव्हते. आतां इंग्रजी झाल्या पासून मात्र सोनारादिक आह्मी ब्राह्मण असें बडबडण्यास पात्र झाले खरे. असो पुढें सोनार आपल्या ब्राह्मणत्वा विषयीं वहिवाट दाखवितात. ती अशी कीं, ज्यावेळीं श्रीकृष्णाचा जन्म झाला त्या वेळीं नंदगोळी याणें दैवज्ञ ब्राह्मणासबोलावून जातकर्मादिक केलें आणि दानें ही त्यानांच दिलीं" वाचक हो. पहा सोनारांनीं आपल्यास ब्राह्मण ह्मणवून घेण्या करितां एक पोकळ युक्ती काढिली आहे. अहो भागवताच्या श्लोकांत आहूय विप्रान् दैवज्ञान् असें आहे यांत दैवज्ञ पद आहे ते वढ्या पदावरून आह्मीच ब्राह्मण आम्हालाच नंदानें दानें दिलीं असे बडबडतात. परंतु दैवज्ञ पदाचा अर्थ काय. व दैज्ञ कोणाला ह्मणावें? किंवा आपल्यालाच (सोनारांलाच) दैवज्ञ नांव आहे याज विषयीं आधार काय? इत्यादिक विचार न करितां दैवज्ञ तेच आह्मी असें जें सोनार बोलतात हें त्यांचें फार अज्ञान आहे तेव्हां त्यांच्या अज्ञान निरसनार्थ मी येथें वचनें दाखवितों तीं पाहून विद्वान वाचकांनीं सोनारांचें अज्ञान दूर केलें असतां माझे कृतश्रम सफल होतील. दैवज्ञ पदास प्रमाणें अमरकोश कांड २ क्षत्रियवर्ग श्लोक १४।१५ सांवत्सरो ज्योतिषिको दैवज्ञगणकावपि॥ स्युर्मौहूर्तिक मौहूर्तज्ञानिकार्तांतिका अपि॥ तांत्रिको ज्ञातसिद्धांतः सत्री गृहपतिः समौ॥ ह्या अमरकोशावरून दैवज्ञ हें नाम गणकाचें आहे आणि दैवज्ञ या पदाचा अर्थही असाच आहे दैवं जानातीति दैवज्ञः पूर्वकर्मोपार्जितं सदसत्कर्मविपाको दैवमित्युच्यते तज्जानातीति दैवज्ञः। अर्थ— पूर्व कर्मार्जित (संपादित) जे सदसत्कर्म त्याचा जो विपाक (परिणाम) त्याप्रत जो जाणतो त्याला दैवज्ञ असें नाम आहे अशा अनेक प्रमाणावरून दैवज्ञ हें नाम गणित करणारा ज्योतिषी याचें आहे आणि ज्योतिः शास्त्र हें वेदांग आहे तेव्हां जानां वेदाचा अधिकार आहे त्यांनाच ज्योतिः शास्त्राचा अधिकार आहे असें सिद्ध होतें. आतां ज्योतिःशास्त्राला वेदांगत्व आहे यास प्रमाण. शिक्षा च चरणव्यू-

६. ज्योतिषामयनं चक्षुर्निरुक्तं श्रोत्रमुच्यते । यथाशिखामयूराणां नागानां मणयो यथा । तद्वद्वेदांगशास्त्राणां ज्योतिषं मूर्ध्न्यवस्थितम् ॥ अशा प्रमाणावरून ज्योतिः शास्त्र हें वेदांचे नेत्र आहेत असें सिद्ध होतें तसेच शिक्षा चतुष्टयामध्यें **पंचसंवत्सरमयं** असें ज्योतिः शास्त्र आहे आणि ब्रह्मयज्ञामध्यें त्याचें पठण करितात तेव्हां वेदांगपठण करण्याचा अधिकार सोनारादिकांस मुळींच नाहीं. कारण ह्या सोनारादिकांची उत्पत्ती लोमविलोमापैकीं आहे यांस आधार वाचकांस पुढें सविस्तर निवेदन करूं. असो वाचकहो. सोनारास असें विचारावें कीं, **दैवज्ञ** हें नांव सोनारासच आहे अशाविषयीं प्रमाण काय? येथें सोनार असें ह्मणतील कीं, हीं प्रमाणें पहा. लिं० शै० **दैवज्ञस्वर्णभूषादि ० दैवज्ञः स्वर्णकारश्च०** तरी सोनारास असें सांगावें कीं लिं० शै० असें जें आपण हेडिंग दिलें त्यावरून आह्मी लिंगपुराण, शैवपुराण, शैवागम इत्यादि ग्रंथ साद्यंत चार पांच प्रती तपासून पाहिल्या परंतु हीं तुम्ही लिहिलेलीं वचनें एकाही पुस्तकांत आढळत नाहींत व अशा अर्थाचे श्लोक अन्य कोणत्याही ग्रंथांत नाहींत तेव्हां तुह्मी लिहिलेले श्लोक सर्व खोटे आहेत. तेव्हां असे खोटे श्लोक करून आपणास **दैवज्ञ** ह्मणवितात आणि भागवताच्या श्लोकामध्यें दैवज्ञपद आहे त्यावरून ब्राह्मण आह्मीच व नंदानें आह्मासच दानें दिलीं असें ह्मणता. परंतु हें तुमचें बोलणें अगदींच **ममभाता वंध्या** या प्रमाणें आहे. कारण ज्यावेळीं श्रीकृष्णाचा जन्म जाहला त्यावेळीं जर नंदानें सोनाराकडून जातकर्म संस्कार केला तर नंदाचे उपाध्याय सोनारच होते असें सिद्ध होतें आणि जातकर्म केलें तर श्रीकृष्णाचें नामकर्मादिक संस्कार सोनारांनींच करावे. असें असून श्रीकृष्णाचे नामकर्मादिक संस्कार गर्गाचार्यांनीं केलें असें वर्णन आहे तेव्हां नंदानें पुत्राचें जातकर्म करण्याकरितां सोनारासच बोलाविलें आणि नामकर्मादिकास गर्गाचार्य कां? बरे सोनारास जडावाचे वगैरे मोठ्या कामामुळें किंवा आशौचादिकामुळें फावलें नसेल तर त्यांनीं (सोनारानीं) आपल्या बंधूस (लोहार, सुतार, कांसार, पाथर्वट, यांस पाठवावयाचे होते तसें न

भागवतदशमस्कं
होतां गर्गाचार्यांनींच सर्व संस्कार केले यास प्रमाणें
ध अध्याय ८ श्रीशुक उवाच॥ गर्गः पुरोहितो राजन्यदूनां
[illegible] प्रचोदितः ॥१॥ अर्थ-
शुकाचार्य राजा परीक्षितीप्रत ह्मणतात कीं, यादवाचा पुरोहि[illegible]त गर्गाचार्य [illegible] पाठविलाहोता तो, नंदाच्या गोकुलाप्रति येता झाला. नंतर नंदानें
त्या गर्गाचार्यांची अर्घ्यपाद्यादिक पूजा करून ह्मणता [illegible] ...तिषामयनं
साक्षाद्यत्तज्ज्ञानमतींद्रियं। प्रणीतं भवता येन पुमान्वेद परावरं॥६॥
त्वंहि ब्रह्मविदां श्रेष्ठः संस्कारान्कर्तुमर्हसि। बालयोरनयोर्नृणां ज
न्मनाब्राह्मणो गुरुः॥७॥ टीका त्वया बालयोर्नामकरणादि करणी
यमिति वक्तुं तस्य ज्ञानातिशयमाह। ज्योतिषामयनमिति यदतींद्रियज्ञा
न साधनं ज्योतिषामयनं तत्प्रतिपादकं ज्योतिः शास्त्रमित्यर्थः तत्सा
क्षाद्भवता प्रणीतं येनान्योपि पुमान्परावरं परं कारणं पूर्वजन्मकृतं कर्म अ
वरं कार्यं तस्मिन्जन्मनि भाविफलं तद्वेद। उक्तंच जातके यदुपचित मन्यज
न्मनि शुभाशुभं तस्य कर्मणः प्राप्तिं व्यंजयति शास्त्रमेतत् तमसि द्रव्या
णि दीपइवेति ५ विवक्षितमाह। त्वंहीति देवज्ञो मंत्रविच्च त्वमतो नामक
रणादिसंस्कारान्कर्तुमर्हसीत्यर्थः नन्वेतद्गुरुणा करणीयमिति चेत्तत्राह नृ
णामिति ६ अर्थ- नंद ह्मणतो हे गर्गाचार्य इंद्रियाला अतिक्रमण
करणारें जें ज्ञान त्याचें प्रतिपादन करणारें आणि ज्याच्या योगें करून
भूत भविष्य कळणारें असें जें ज्योतिः शास्त्र तें तुह्मी प्रत्यक्ष जाणताह्म-
पून आपण दैवज्ञ असून मंत्र जाणणारे अहांत. याजकरितां हीं जीं
दोन बालकें यांचें नामकर्मादिक संस्कार करण्यास आपण योग्य आहां
त कारण जन्मनाब्राह्मणोगुरुः ब्राह्मण जो आहे हा सर्वांचा गुरु
आहे आतां ज्या प्रमाणें कृष्णाचे नामकर्मादिक संस्कार गर्गाचार्यानीं
केले तसेच उपनयनादिक संस्कार ही गर्गाचार्यांनींच केले यास प्रमाण
भा० द० स्कं० अ० ४५ अथशूरसुतो राजन्पुत्रयोः समकारयत्॥
पुरोधसा ब्राह्मणैश्च यथावद्द्विजसंस्कृतिं॥२६॥ तेभ्योगाद्दक्षि

* पुरोधसा गर्गाचार्येण द्विजसंस्कृतिमुपनयनं २६

णागावोरुक्ममाल्यः स्वलंकृताः। स्वलंकृतेभ्यः संपूज्यसवत्साः
क्षौममालिनीः ॥२७॥ ततश्चलब्धसंस्कारौद्विजत्वंप्राप्यसुव्रतौ।
गर्गाद्यदुकुलाचार्याद्गायत्रंव्रतमास्थितौ ॥२९॥ अर्थ- शुका
चार्य राजा परिक्षितीप्रत ह्मणतात कीं, हे राजा कंसवध झाल्या नंतर
वसुदेव याणें आपला उपाध्याय गर्गाचार्य यांच्याकडून ब्राह्मणांसह-
वर्तमान आपल्या पुत्रांचा उपनयन संस्कार करून त्या ब्राह्मणांस दक्षि
णासहित सालंकृत गोप्रदानें दिलीं नंतर उपनयन झालेले असे जे रा-
म कृष्ण हे ब्रह्मचर्यव्रत धारण करून विद्याभ्यास करण्या करितां अ-
वंति नगरांत (ह्मणजे उज्जयिनींत) सांदिपनि ऋषीच्या गृहीं राहते झा-
ले यास प्रमाण. भा० द० स्कं० अ० ४५. अथोगुरुकुलेवास
मिच्छंतावुपजग्मतुः। काश्यंसांदीपनिंनामह्यवंतिपुरवासिनं॥
३१॥ तयोर्द्विजवरस्तुष्टः शुद्धभावानुवृत्तिभिः॥प्रोवाचवेदान
खिलान्सांगोपनिषदोगुरुः॥३२॥ सरहस्यंधनुर्वेदं धर्मान्न्यायप
थांस्तथा। तथाचान्विक्षिकींविद्यांराजनीतिंचषड्विधां॥३४॥ अ-
र्थ- नंतर त्या रामकृष्णाची शुद्ध वृत्ती पाहून सांदीपनीऋषीनें चारही
वेद ववेदांगे, उपानिषदें, धनुर्वेद, धर्मशास्त्र, राजनीति इत्यादिक सर्ववि-
द्या सांगितल्या वाचक हो पहा. ह्या सर्व भागवत वचनां वरून श्रीकृष्णा
चे संस्कार गर्गाचार्यांनीं केले.व विद्याभ्यासही सांदीपनी ऋषीपासून
च केला असें असताना सोनारलोक आह्मीच कृष्णाचे नामकर्मादिक
संस्कार केले. व आह्मासच नंदानें गाई दिल्या असें ह्मणतात. हे त्या सो-
नारांचें बोलणें सर्वथा मिथ्या आहे. असोंया मागील सर्व वचना वरून दैवज्ञ
हें नांव सोनारांचें नव्हे व श्रीकृष्णाचे संस्कार सोनारां नीं केले नाहीं असें सि-
द्ध होतें आतां सोनारास नंदानें दानें दिलीं किंवा काय याचा निर्णय पुढें
ज्यावेळीं सोनारांची उत्पत्ति सांगूं त्यावेळीं सोनारास दान घेण्याचा अधिकार
आहे किंवा नाहीं व सोनारादिकापासून ब्राह्मणानें दान घेतलें असतां त्या

* गायत्रंव्रतं ब्रह्मचर्यं.

त्या ब्राह्मणानें काय प्रायश्चित्त करावें हें सर्व सविस्तर लिहूं पुढें सोनारलोक असें लिहितात कीं, त्वष्टा याचा पुत्र विश्वरूपा हा देवांचा पुरोहित झाला. ही कथा सर्व खरी आहे परंतु ह्या कथेवरून सोनारादिक ब्राह्मण ठरत नाहींत. याविषयीं अनेक ग्रंथांचीं प्रमाणें आहेत तीं सर्व प्रमाणें पुढें (सोनारादिकांच्या उत्पत्तीच्या वर्णनांत वाचकांस निवेदन करूं. आतां त्वष्टा याचा पुत्र विश्वरूपा हा देवांचा पुरोहित होता येवढ्याच कथेवरून सोनारलोक आह्मी ब्राह्मण असें समजून सर्व वाचकांस उपदेश करितात. तो असा कीं, वाचक हो पहा आतां पांचालांची वहिवाट प्राचीन कालापासून अर्वाचीन पावेतों ब्रह्मकर्मविषयीं दाखविली आहे- युधिष्टिर शका पावेतों ब्राह्मणाचा धर्म यथास्थित चालला आलीकडे विक्रम आणि शालिवाहन यांचे शकांत जैन धर्म वाढून वाद विवादानें ब्राह्मण हरून ते जीतले याकारणानें ब्राह्मणत्व बुडालें होतें पुढें कांहीं दिवसानें ऋषीकुलांत शंकराचार्य उत्पन्न झाला त्याणें ब्राम्हणत्व बुडालें अशी संधी पाहून आपण विद्वान् होता त्या बलानें जैनधर्माचा नाश करून आपण ब्राह्मण अशा धर्माची स्थापना केली हा चमत्कार असा झाला कीं दोघांचा कज्जा आणि तिसऱ्यास लाभ या प्रमाणें झालें नंतर कांहीं वर्षांनीं शंकराचार्यांचे मिळवलेलें ब्राह्मणत्वास सदृढपणा पेशव्यांनीं आणिला सर्व लोक विद्वान नसोन ऋषिलोक हेच विद्वान् असल्यानें बाकी सर्व ज्ञातीचा धर्म बुडवून टाकिला आहे हिंदुधर्मांत माहान् माहान् जे ग्रंथ आहेत त्यांत विश्वास ठेवण्यास योग्य असे ग्रंथ मुख्य चार वेद सहा शास्त्रें आणि अठरा पुराणें व शास्त्रें या पेक्षां वेदावरच सर्व लोक विश्वास ठेवितात आणि वेदास कोणी अमान्य ह्मणावयाचा नाहीं असे जे वेद सर्वांस मान्य ते या पांच ब्राह्मणांनीं उत्पन्न केले ते वेद दुसऱ्या कोणत्याही देवतास मुख्य मानीत नाहींत विष्णु हें परब्रह्म आलीकडे ऋषिलोकांनीं ठरविलें आहे वेदांत काय जें ब्रह्म तें विश्वकर्मा आणि ब्राह्मण जे काय ते पांच पांचाल हालीं ऋषी जे ब्राह्मण ह्मणवतात यांस वेदांनीं ब्राह्मण ह्मटलें नाहीं ऋग्वेदांत व यजुर्वेदांत सांगितलेले ब्राह्मण पांच मनु मय त्वष्टा शिल्पि

दैवज्ञ हे पांच यांचीं नांवें व यांची स्तुती संहितेंत आहे पंच द्रवीड व पंच गौड यांचें वर्णन मुळींच नाहीं द्रवीड व गौड हीं देशाचीं नांवें आहेत पंच द्रवीड व पंचगौड हे ब्राह्मण आलीकडे शंकराचार्यापासून झाले आहेत पूर्वीं यांची उत्पत्ती होती परंतु ब्राह्मण असे जे शब्द ते मात्र आलीकडे शंकराचार्यापासून मिळाले आहेत ऋग्वेद बोलतो ज्ञानेकरून विश्वकर्मा प्रभु ओळखावा यजुर्वेदांत सांगतो कीं यज्ञयागादि कर्मै करून विश्वकर्मा याची ओळख करा सामवेदांत सांगतो कीं, विश्वकर्मा याचे गुण गायन करा इहीं करून गा अथर्वण वेद ह्मणतो कीं जो प्रभु विश्वकर्मा ज्याणे धनुष्यादि शस्त्र अस्त्रें उत्पन्न केलीं व शंख चक्र गदादी उत्पन्न केले त्याचा मंत्रेंकरून जप करून नंतर त्या अस्त्रादिकांचा उपयोग युद्धांत करा तात्पर्य यांत सर्व मांत्रिक विषय सांगितलें आहेत लढाईचे कामांत अती प्रसंगाचे वेळेस ब्रह्मास्त्र किंवा त्वष्ट्रास्त्र सोडावें हें त्वष्ट्रास्त्र धनुर्विद्येंत फार जाज्वल आहे. ज्या काळीं कौरव पांडवांचे युद्ध झालें त्यावेळीं कौरवांकडील योद्धा अलंबुष राक्षस याणें पांडवांस फार त्रास दिल्हा त्यानीर यत्नाचे समई भीम या नावाचे पंडुपुत्रानें त्वष्ट्रास्त्र सोडून अलंबुषाचा पराभव केला ही कथा भारथांत द्रोणपर्वांत अध्याय १०८ यांत आहे. सुज्ञ वाचक हो. ह्या वरील अर्थांत सोनारांचें ह्मणणें असें आहे कीं, विक्रम शालिवाहन शकांत जैन धर्म वाढून आमचें ब्राह्मणत्व गेलें आणि ऋषिकुलांत शंकराचार्य उत्पन्न झाला त्यानें आमचें ब्राह्मण्यत्व घेऊन सर्व ऋषींला ब्राह्मण केले आणि पेशव्यांनीं त्या ऋषिलोकांच्या ब्राह्मणत्वाला दृढपणा आणिला. तेव्हां ह्या सोनारांचा लिहिण्याचा मतलब असा दिसतो कीं, शालिवाहन शकांत शंकराचार्य झाल्यापासून ऋषि ब्राह्मण झाले पूर्वीं ऋषी हे ब्राह्मण नव्हते. आतां ऋषींला ब्राह्मणत्वाचा अधिकार आहे किंवा नाहीं याजविषयीं पूर्वीं श्रुति, स्मृति, पुराणाचे आधार बहुत दाखविले परंतु सोनारांची समजूत होण्याकरितां पुनः श्रुत्यादिकाचे आधार दाखवितों ते पहा ह्मणजे ऋषींला वेदाचा अधिकार शंकराचार्यांनीं दिला किंवा पूर्वींपासून असून पुढें ही तसा आहे याचा

निर्णय सहज लक्षांत येईल. ऋग्वेद अष्टक १ अध्याय १ मंत्र २ अग्निःपूर्वेभिर्ऋषिभिरीड्यो नूतनैरुत ॥ सदेवाँएह वक्षति ॥ यास्कनिरुक्त उत्तरषट्क अध्याय १ खंड १६ अग्निर्यःपूर्वैर्ऋषिभिरीडितव्यो वंदितव्योस्माभिश्चनवतरैः सदेवानिहावहत्विति सनमन्ध्येतायमेवाग्निरित्यप्येते उत्तरेज्योतिषी अग्नीउच्येते ततोनुमध्यमः ॥१६॥ अर्थ- अग्नीजोतो पूर्वीचे जे मरीच्यादिक ऋषी आणि नूतन ह्मणजे अह्मीं या उभय ऋषींनीं ईडितव्यः वंदन करण्यास योग्य आहे. असा यास्कानीं निरुक्तांत अर्थ केला आहे यावरून ऋषीला पूर्वींपासून सांप्रत कालपर्यंत पुढेंही वेदाचा अधिकार आहे असें सिद्ध होतें. कारण नूतनैःऋषिभिः येथें यास्कानीं अस्माभिः असें बहुवचनांत पद घातलें आहे यावरून सर्व ऋषींलाच वेदाधिकार आहे. असें ठरतें. आतां जर सोनारादिकांस अधिकार असता तर स्वर्णकारादिभिः अथवामनुमयादिभिः असें यास्कानीं लिहिलें असतें. आतां येथें सोनार लोक कदाचित् असें ह्मणतील कीं, यास्क हा ऋषी होता ह्मणून त्याच्या मनास वाटेल त्या प्रमाणें लिहिलें परंतु हा अर्थ खरा नव्हे. तरि वाचक हो त्या सोनारांस असे सांगावें कीं ही तुमची बडबड बिलकुल खोटी आहे कारण. निरुक्त हें वेदांग आहे यास प्रमाण शिक्षा ज्योतिषामयनंचक्षुर्निरुक्तंश्रोत्रमुच्यते ॥ अर्थ- ज्योतिष हें वेदाचे नेत्र आणि निरुक्त हें कान आहेत. या प्रमाणावरून निरुक्त हें वेदांग आहे व ब्रह्मयज्ञामध्यें समाम्नायः समाम्नातः सव्याख्यातव्यः इत्यादिक पाठही करित असतात. तेव्हां निरुक्त हें सर्वांस वेदाप्रमाणें मान्य आहे. वेदास किंवा वेदांगास अमान्य करणारे जैन, यवन, किरिस्तांव इत्यादिकांशिवाय अन्य कोणीही झाले नाहींत असें असून जर कोणी खोटें मानितील तर त्यासही तसेच (यवनादिकांसारिखेच) समजलें पाहिजे असो आतां या निरुक्तामध्यें ऋषींविषयीं जीं वचनें आहेत तीं संक्षेपें करून दाखवितो तीं पहा ह्मणजे ऋषींला वेदाचा अधिकार पूर्वींपासून आहे किंवा शंकराचार्यांनीं दिला हें सहज लक्षांत येईल. निरुक्तपूर्वषट्क अध्याय१

खंड २० उत त्वं सख्ये स्थिरपीतमाहुर्नैनं हिन्वंत्यपि वाजिनेषु। अधे न्वाचरति माययैष वाचं शुश्रुवाँ अफलामपुष्पां। वचः फलपुष्पमाह याज्ञदैवते पुष्पफले देवताध्यात्मे वसाक्षात्कृतधर्माणो ऋषयो बभूवुस्ते वरेभ्यो साक्षात्कृतधर्मेभ्य उपदेशेन मंत्रांत्सप्रादुरुपदेशाय ग्लायंतो वरे बिल्मग्रहणा येमं ग्रंथं समाम्नासिषुर्वेदं च वेदांगानीति चेति। या मध्यें साक्षात्कृतधर्माणो ऋषयो बभूवुः असें यास्कांनीं लिहिलें आहे. याचा अर्थ— केले आहेत धर्म जे ते ज्यानीं असें ऋषी होते झाले. येथें क्रियापदही भूतकालचें आहे यावरून धर्मप्रवर्तक ऋषीच झाले असें सिद्ध होतें. तसेंच निरुक्त पूर्वषट्क अध्याय २ खंड १० तत्रेतिहासमाचक्षते देवापिश्चार्ष्टिषेणः शंतनुश्च कौरव्यौ भ्रातरौ बभूवतुः सशंतनुः कनीयानभिषेचयांचक्रे देवापिस्तपः प्रतिपेदिरे ततः शंतनो राज्ये द्वादशवर्षाणि देवो न ववर्ष तमूचुर्ब्राह्मणा अधर्मस्त्वया चरितो ज्येष्ठं भ्रातरमंतरित्याभिषेचितं तस्मात्ते देवो न वर्षतीति स शंतनुर्देवापिं शिशिक्ष राज्येन तमुवाच देवापिः पुरोहितस्ते सानि याजयानि च त्वेति तस्यैतद्वर्षकामसूक्तं तस्यैषा भवति॥ १०॥ आर्ष्टिषेणो [illegible] ऋषिषेणदेवापिर्देवसुमतिं चिकित्वान् [illegible] समुद्रमपो दिव्या असृजद्वर्ष्या अभि॥ आर्ष्टिषेण ऋष्टिषेणस्य पुत्र इषितस्य सेनस्येति वा सेना सेश्वरा समानगतिर्वा पुत्रः पुरुत्रायते विपराणाद्वा पुंनरकं पुनरकं ततस्त्रायत इति वाहोत्रमृषिर्निषीदन्नृषिदर्शनात्सोमां ददर्शेत्यौपमन्यवस्तद्यद्वेनांस्तपस्यमानान्ब्रह्मस्वयंभ्वभ्यानर्षत्त ऋषयो भवं स्तदृषीणामृषित्वमिति विज्ञायते०॥ हीवरील शंतनुराजाची कथा भारतामध्यें स्पष्ट आहे येथें ग्रंथविस्तरभयार्थ लिहिली नाहीं. याशिवाय ऋषींच्या महत्वाविषयीं श्रुति, स्मृति, पुराणामध्यें बहुत वचनें आहेत तीं या पुस्तकाच्या उत्तरार्धांत लिहीन. आतां सोनारलोक असें लिहितात कीं, बाणादिक शस्त्रास्त्रें विश्वकर्मा प्रभु याणें उत्पन्न केलीं आहेत ही कथा गणेशपुराणांत आहे. मत्स्यपुराणांतही आहे. ज्याकालीं गणपतीचा जन्म झाला त्याकाळीं दैवज्ञ विश्वकर्मा याणें येऊन गणपतीस अध्ययन सांगून शंखचक्रादि

आयुधें दिलीं यावरून गणपतीचा गुरू विश्वकर्मा आहे त्याकालीं गजानन विचारितात कीं हीं देदीप्यमान हत्यारें आपण कशीं केलीं तेव्हां दैवज्ञ याणीं सांगितलें कीं सूर्यास आमची संज्ञा नामें कन्या दिल्हीं तिला सूर्याचें तेज सहन न होई याकारणानें सूर्यास चक्रावर घालून त्याचे तेजाचे बारा भाग करून त्यांतून एक भाग ठेऊन अकरा भाग तेज काढून घेतलें त्याची शस्त्रादि हत्यारें करून देव दैत्यास देऊन गजानना तुझ्या साठीं ठेविलीं होतीं तीं तुला आणिलीं आहेत. वाचक हो हीसर्व कथा खरी आहे परंतु त्या विश्वकर्म्यास प्रभु ही संज्ञा नाहीं हा प्रभास वसूचा पुत्र आहे याजविषयीं पूर्वी कथा सांगितली आहे. पूर्वी सोनार विराट् विश्वकर्मा असें ह्मणत होते आणि आतां प्रभासाचा पुत्राला प्रभू ह्मणतात तरि त्या कथे वरून सोनार ब्राह्मण ठरत नाहींत. पुढें सोनाराची उत्पत्ती लिहीन तीपाहिली ह्मणजे खात्री होईल. आतां सोनारलोक आपलें **रडगाणें** गातात तें सर्व वाचकांस दर्शवितों. चार वेद मिळून एक परब्रह्म ओळखा. असें सांगतात ते वेदांत काय जें सार तें सर्व पांचालांचें आधिपत्य आहे श्रुतीचा अर्थ कोणास समजत नाहीं ह्मणून (पंचब्रह्मपरं ब्रह्म) हें कोणास माहीत होत नाहीं पुराणांतील वगैरे कथा सर्वांस बहुत करून समजतात परंतु यांतील कितीएक ग्रंथ ज्यांत विश्वकर्मा याची फारच उघड स्तुती होती ते पेशवाई राज्यांत पेशव्यानीं बुडवून टाकिले हालीं विलायत सरकारानीं जसें तलवारा बंदुका वगैरे हत्यारें शोधून बुडवून टाकिलीं या प्रमाणें पेशव्यांनीं जितका शोध लागला तितके ग्रंथ आपल्या राज्यांतून रयतां कडून आपल्या सत्तेच्या जोरानें जुलूम करून ग्रंथ घरांतून काढून ते जाळून टाकिले या प्रमाणें महान् ग्रंथांची व्यवस्था झाली. आहे या कारणानें कांहीं ग्रंथ अजीबाद नाहिंसारखे झाले आहेत त्यांचीं नांवें लिहितों. १ सह्याद्री खंड हा ग्रंथ यांत चित्तपावन वगैरे उत्पन्न कसे झाले ही कथा लिहिली आहे. चित्तपावनाचें हें मोठें वर्म ह्मणोनच त्याणीं या ग्रंथाचा नाश केला तो ग्रंथ बुडाल्या पासून हे ब्राह्मण ह्मणावयास लागले आहेत कदाचित् तो बाहेर पडल्यास गरुडास पाहून सर्प जसा बिळांत लपतो तद्वत हे लपतील. आणि कांहीं कालानीं

ईश्वर कृपेनें तसेंच होणार आहे. असें वाटतें. २ शिल्पशास्त्र यांत पांचब्राह्मणाच्या पांच संहिता आहेत त्या आधारें कला कौशल्यादि काम चालवयाचें. लोह संहिता काष्ठसंहिता ताम्र संहिता । शिला सहिता सुवर्णसंहिता या पांच संहिता ग्रंथांतरीं प्रशिद्ध आहेत. ३ स्कंद पुराण यांत सर्व सृष्टी विश्वकर्मा याणें केली ही कथा आहे. ४ तुकाराम यानावें येक साधु होता त्याणें विश्वकर्मा स्तुतीचे स्कंदपुराणाचे आधारें केलेले अभंग. येणें प्रमाणें व आणाखी ही कांहीं आहेत ते ग्रंथ शोधून काढून अग्न लाऊन दिल्हा या साठीं पांचाल हे ब्राह्मण असें कोणासही माहीत नाहीं. पेशव्यांनीं ग्रंथ बुडविले यांत अवघड नाहीं कारण ते सत्ताधारी होते हाल्लीं ऋषिकुलांतील लोक विद्वान असल्या मुळें भागवतादि मोठ मोठे ग्रंथ ज्यांत विश्वकर्मा याची स्तुती होती त्या कथा अजीबाद गाळून टाकिल्या यास प्रमाण सुमारें ७५ वर्षामागील भागवत, भारत, गणेशपुराण, मत्स्यपुराण, इत्यादि ग्रंथ जे आहेत त्या स आणि हाल्लीं छापून विकतात यास बहुत फारफेर झाला आहे. या विषयीं सर्वांनीं खातरी करून घ्यावी महान् पुरुषाच्या हातचे ग्रंथ त्यांत त्याणीं आपल्या बडी वारी करितां अशी गाळागाळ केली हें मोठ्या पापाचें काम आहे फार काय लिहावें परंतु पंचांगावर पंचांग कर्ता जो विश्वकर्मा याचें नांव होतें तें अलीकडे काढून टाकिलें ही कथा पुढें लिहीन भुक्ति मुक्ति देणार तें पांचाल ब्राह्मण असें असून हाल्लीं या ब्राह्मणास कोणी मानीत नाहींत आणि चित्तपावनादि जा ज्ञाती ऋषी कुलांतील आहेत यांसच ब्राह्मण असें अविचारपणानें लोक मानित आले त्यांस असें कोणीं विचारीत नाहींत कीं. ब्राह्मण ह्मणजे परमेश्वराचे मुखा पासून उत्पन्न झाले असे पुरुषसूक्त वेदांत लिहिलें आहे त्यांत तुह्मी कोणत्या मुखापासून झालेत मुखापासून झाले असाल तर तुह्मास नावें मुखमासीत अशीं असतीं चित्तपावन, कराडे, देशस्थ, कनोजे, कानकुबजे, हालो, देवरुखे, तैलंगण, द्रवीड, सारस्वत, गौड, पळशी, किरवंत, सवाशे, नागर, रंडगोळक,

सुंड गोळक, मेत्राणी इत्यादि अशीं नसतीं तरी यावरून असें समजतें कीं, इतर लोक अविद्वान असल्यामुळें गैर समजुतीनें भलत्याचें ज्ञातीस ब्राह्मण ब्राह्मण असें ह्मणत आले ही ऋषींची ज्ञात एकच कुळांतील आहे असें नाहीं पशू पक्षी इत्यादि पासून उत्पन्न झाले आहेत. पशू पक्ष्यां पासून जरी हे उत्पन्न झाले अशीच जरी यांची उत्पत्ती असती तरी बहुत चांगली होती कांहीं चर्मकापासून कांहीं मांगापासून व कांहीं रजस्वले पासून ह्मणजे अगदींच नीच ठिकाणीं उत्पन्न झाले हे मुखमासीत कसें नांव पावतील असो त्यांचे उत्पत्तीचा प्रकार पुढें लिहीन असे जे हे बनावट ब्राह्मण ते आपल्यास मुखमासीत ब्राह्मण कसे ह्मणवितात या गोष्टीचें फार आश्चर्य वाटतें कीं आपला वडील वाईट असल्या सबबेनें दुसऱ्याचे वडिलास आपला पिता ह्मणणें. हे केवळ अयोग्य काम असून असें नीच यांच्या शिवाय दुसऱ्याचे हातून होणार नाहीं; असें मला वाटतें आणि याच प्रकारें बहुतेक लोकही सल्ला देतील असें जाणोन उमजोन कूल बदल करणें त्यास या गोष्टीची कांहींच भीती वाटत नाहीं व पापासही मानीत नाहींत परंतु माझें इतकेंच बोलणें आहे कीं, स्वपिता वाईट किंवा हलक्या पदवीचा जरी असला तरी कांहीं चिंता नाहीं त्यासच आपला पिता ह्मणावा. परंतु एखादा महान पराक्रमी पाहून त्यास आपला बाप ह्मणावें, एवढें मात्र करूं नये. मुखमासीत ब्राह्मण विश्वकर्मा याजपासून झाले आहेत याविषयीं मी प्रसिद्धपणें ग्रंथांत लिहीत आहें हें माझें लिहिणें आपल्या युक्तीचेंच आहे असें नाहीं वेदाचे व पुराणाचे आधारें लिहिलें आहे आणि तो आधार जो विषय लिहिला त्याच ठिकाणीं लिहिला आहे याबद्दल माझ्यावर कोपाविष्ट होऊं नका. निस्पृह पणानें जें खरें आढळलें तेंच लिहिलें आहे. हल्लीं ऋषी लोकांस विचारिलें असतां ते आपण मुखमासीत ब्राह्मण ह्मणतात आणि मुखमासीत हे विश्वकर्मा याचे पुत्र आहेत असें वेद बोलतो यावरून ऋषी याणीं आपला वडील सोडून दुसऱ्याचे पित्यास वडील ह्मणतात कीं नाहीं याविषयीं वाचकांनीं आपली खातरी करून घ्यावी ऋषी हे ब्राह्मण कसे ह्मणाल तर जसें लोखंडावर सोन्याचें गिलीट द्यावें तसें

आहेत. त्यांस वेदानीं कोठें ही ब्राह्मण ह्मटलें नाहीं यावरून वेद हीच कानस त्या कानसेनें त्या गिलिटी ब्राह्मणास घांसलें असतां अमावास्येच्या निशी प्रमाणें याचा प्रकाश पडतो आणि खरेजे ब्राह्मण त्यास वेद कानसेनें घांसलें असतां शुक्ल पौर्णिमा प्रमाणें प्रकाशतात. पांच ब्राह्मणाची वहिवाट जैन धर्मापासून मोडली हें कारण योग्य आहे परंतु स्नान संध्यादि कर्मास कसें विसरले याविषयीं कोणी अंदेशा घेतील यासाठीं तो संशय दूर करितों. पेशव्यांचें राज्य असतां चित्पावनादिक याणी या पांच ज्ञाती ज्या ब्राह्मणाच्या यांजवर असा कहर केला होता कीं, दैवज्ञ आदीं करून पांच ब्राह्मण ज्ञातींनीं संध्या वगैरे ब्रह्म कर्म करूं नये अशा ताकिदी दिल्या. व श्रावणी आदी करून जीं ब्रह्मकर्में तीं जर कोणी केलीं तर त्याशी दांडगाई करून त्यास सर्कारापासून शिक्षा द्यावी. आणखी पंडरपुरांत तर येवढा अनर्थ झाला होता कीं दैवज्ञ ज्ञातींत व्रतबंधादि कर्में करावयाचीं असल्यास गांवाबाहेर जाऊन चोरून करावीं. आणि तें समजल्यास शिक्षा देत होते. परंतु एक व्रतबंध गांवाचे बाहेर केला त्याची बातमी लागल्यामुळें व्रतबंध करणारे व दैवज्ञ उपाध्यांस कैद करून सातान्यास आणिलें होतें आणि त्यांची धिंड काढण्याचा ठराव झाला असतां कैदी याणीं तकरार केली कीं याबद्दल सभा करून निर्णय ठरवावा त्यांत आह्मी ब्रह्मकर्माचे अधिकारी नव्हत असें ठरल्यास मग काय शिक्षा योजिली आहां ती करावी. ही तकरार महाराजानीं कबुल करून शास्त्री बोलावून सभा केली त्यांत शास्त्री हरले आणि दैवज्ञ जीतले यासाठीं राजानें आणलेले कैदी सोडून देऊन हुकूम दिल्हा कीं, हे आपल्या ज्ञातींत वेदोक्त कर्म करितील तर त्यांस कोणीं अटकाव न करावा त्या दिवसापासून पंदरपुरांत ब्रह्मकर्म कांहीं चालावयास लागलें हा कज्या शके १७४२ शकांत झाला आहे याशिवाय दैवज्ञ ब्राह्मण याणीं वेदोक्त कर्म न करावें ह्मणोन बहुत ठिकाणीं जुलुम चालला होता पटवर्धन याणीं आपल्या अमलांत कितीयेक दैवज्ञ ज्ञातीच्या जिल्हा काढिल्या कितीयेकांस मारामार करून ठार मारलें कितीयेकांचीं धोत्रें नेसलेलीं फेडूनि टाकिलीं रत्नागिरी जिल्हा हा चित्पावनाचें माहेर त्याणीं तर कहरच

करून दिल्हा होता दैवज्ञ ज्ञातीची वरात आलीकडे सन १८३६ साला पावेतों रस्त्यानें मुळींच गेली नाहीं तो कज्या नारायणशेट वाटुककर आमचे आजोबा होते त्यांणीं सदर अदालत पावेतों कज्या जिंकून त्या खर्चाचा पैसा तत्र पक्षी जे होते त्यांजवर टांच काढून भरून घेतले. त्या दिवसापासून रत्नागिरी जिल्ह्यांत वरात चालू झाली. वरात रस्त्यानें न न्यावी हा शास्त्रार्थ कोठेंच नाहीं परंतु द्वेषानें अबरू खलील करवावयाची हाव त्यांना दुष्ट मानस दुसरें कांहीं नाहीं सत्तेच्या बळानें गरीबांस त्रास द्यावा हें वाजवी नाहीं विशाळगड संस्थान कोलापूर अमलांत आहे त्या ठिकाणीं दैवज्ञ याणीं अगदीं मलीन असावें असा त्या सरकारचा मानस होता. दैवज्ञलोक याणीं यज्ञसूत्र गळ्यांत घालावयाचें तें म्हशीच्या पाठीवर चोळून अगदीं मळऊन नंतर गळ्यांत घालावें दोन जानवीं गळ्यांत घालावयास देत नवते. येकच घालावें विशाळ गडावर कितीयेक रस्त्यानें जाणारे दैवज्ञ यांची अबरू घेतलेली आहे जिकडे जिकडे ऋषींचा अंमल होता तिकडे तिकडे मोठा जूलूम चालविला होता परंतु ती गोष्ट ईश्वरास सहन न होतां ऋषी लोकांचे राज्याचा काय परिणाम झाला हें आबाल वृद्धांस माहीत आहे वाईट परिणाम होणें हा पाया शिवाय होत नाहीं या प्रमाणें जुलूम चालला होता. त्या पासून दैवज्ञ ब्राह्मण ब्रह्मकर्मास विसरले फक्त त्याणीं आपला जीव बचाऊन घेतला संध्या करण्यास भीती मग वेद कोण ह्मणेल. या प्रमाणें बहुत प्रकारें त्रास दिल्हेले आहेत. त्या दुःखाचें आतां स्मरण झालें असतां आंगावर रोमांच उभेरा हातात - असो या कारणास्तव पांचाल ब्राह्मणानीं स्नान संध्यादी कर्म थोड थोडें सोडून दिल्हें असे अनर्थ पूर्वीं किती एक ठिकाणीं झाले आहेत आंग्रे यांचे राज्यांत बराच यांच्यावर कहर चालला होता असो असें पापाचें काम करणारे यांचें निवारण ईश्वरानें केलें इतकी कथा सांगून तृतीयोध्याय पुरा केला. राहिलेली कथा उत्तर ग्रंथीं निवेदन करीन. वाचकहो ह्यावरील सर्व मजकुरावरून पेशव्यांनीं धर्म केला किंवा अधर्म केला याचा विचार सूज्ञ वाचकांनीं करावा. आतां पेशव्यांनीं सोनारांचीं नांकें कापिलीं ह्मणोन त्यांचें राज्य गेलें असें सोनार लिहितात परंतु हें त्यांचें अज्ञान व द्वेषबुद्धी समजली पाहिजे. कारण. नाश हा सर्वांचा आहे

पूर्वी मन्वादिक धर्मसंस्थापक राजे झाले आणि वेन, शाल्वादिक महान् दुष्ट राजे झाले परंतु कालांतरें करून सर्वांचा नाश झाला. मग पेशव्यांची कथा कांय? पेशव्यानें सोनाराचा छळ केला तो श्रुति, स्मृती, पुराणे, आगम, इत्यादिकांच्या आधारानेंच केला. कारण श्रुत्यादिकामध्यें सोनारांस ब्रह्मकर्माचा अधिकार आहे असें कोठेंही सांपडत नाहीं. हल्लीं मुंबईमध्यें मात्र वासुदेव आत्मारामादि प्रभृति सोनारास नवीन वेद व पुराणें करण्याचें ज्ञान फुटलें आहे. परंतु याचा परिणाम न पाहतां सोनारलोक असें समजतात कीं हा आह्मी ब्रह्मकर्मरूप अधर्मास आरंभ केला आहे हा आमचा निरंतर निर्बाधकपणानें चालेल. असें त्यांचें (सोनारादिकांचें) बोलणें इंग्रजीच्या बळावर आहे आणि हें तूर्त खरेंच समजलें पाहिजे परंतु हें कृत्य निरंतर न चालतां परिणामही चांगला होणार नाही. कारण गीतेमध्यें असें सांगितलें आहे कीं, यदायदाहिधर्मस्यग्लानिर्भवतिभारत। तदातदावतीर्णोहंतरिष्याम्युत्कटंतमः। परित्राणायसाधूनांविनाशायचदुष्कृतां। धर्मसंस्थापनार्थायसंभवामियुगेयुगे। अर्थ- भगवान् अर्जुनाप्रत सांगतात कीं हे अर्जुना. जा जा कालीं धर्माचीग्लानि (नाश) होती त्या त्या काळी मी अवतार धारण करून धर्मसंस्थापना करितों. तसेंच साधूंचें रक्षणार्थ व दुष्टांचे नाशार्थ आणि धर्माची स्थापना करण्या करितां प्रत्येक युगामध्यें मी अवतार धारण करितों. अशा अनेक प्रमाणा वरून पुन्हा सोनारादिकांचीं इंग्रेजीमुळें मोठीं वाढलेलीं नाकें व कान हीं तुटलीं जाणार नाहींत असें समजूनये. आतां पुराणातील वचनें ऋषींनीं बुडविली असें लिहितात आणि वेदांतील बुडविलीं असें लिहीत नाहींत हें एक त्यांचे (सोनारांचे) उपकारच समजले पाहिजेत असो याप्रमाणें सोनाराच्या ब्रह्मविचार ग्रंथाचे तीन अध्याय समाप्त झाले.

सोनारांच्या ग्रंथाच्या ४ अध्यायांतील मुख्य विषयांचें खंडन.

पांचाल ब्राह्मणांचें स्नान संध्यादि उपजीविका कर्म सांगतों असें लिहून स्कं० पु० ना० अ० ५ असें हेडिंग देऊन खोटे श्लोक लिहून त्याचा खोटा अर्थही लिहिला आहे. पुढें लिं० शे० असें हेडिंग

देऊन खोटे श्लोक लिहून पाचालांसच (लोहार, कांसार, सुतार, पाथर्वट, सोनार,) यज्ञकर्माचा अधिकार आहे असें लिहिलें आहे. व मनु (लोहार) हा लोहमय पदार्थ उत्पन्न करणारा. मय (सुतार) हा काष्ठाचें काम करणारा. त्वष्टा (कांसार) कांस्याचें काम करणारा. शिल्पि (पाथर्वट) हा शिला काम करणारा. दैवज्ञ (सोनार) हा सुवर्णाचें काम करणारा. या प्रमाणें पांच कर्में ह्या वेदपुरुषांचीं आहेत. हीं जे जाणतील ते सर्व पापा पासून मुक्त होतील. असें सोनारांनीं लिहिलें आहे तें खरें आहे परंतु पांच कर्में ह्या वेदपुरुषाचीं आहेत इत्यादिक जें लिहिलें तें मात्र सर्वथा खोटें आहे. कारण वरील सोनारांनीं दाखविलेलीं वचनें सर्वथा निर्मूलक आहेत आणि त्यांच्या वृत्तीला स्मृत्यादिकांचा आधार आहे सबब वृत्ती खऱ्या आहेत त्या स्मृत्या पुढें वाचकांस दाखवूं. असो वाचकहो. पुढें सोनार लोक असें लिहितात कीं, हे पांच वेद पुरुष यांस ऋषींच्या नावा प्रमाणें गोत्रें आहेत. अशीं गोत्रें असण्याचें कारण काय तें लिहितों. विराट् पुरुष जो विश्वकर्मा यास अनेक मुखें असून त्या अनेक मुखांचीं नांवें भिन्न होतीं त्यांत कौंडण्य मुख होतें त्या पासून मनु उत्पन्न झाला. त्यानीं कौंडण्य गोत्र सांगीतलें. मय अत्रि मुखापासून झाला त्याणें अत्रेय गोत्र सांगितलें त्वष्टा भरद्वाज मुखीं झाला त्याणें भरद्वाज गोत्र सांगितलें गोतम मुखा पासून दैवज्ञ झाला त्याणें गोतम गोत्र सांगितलें काश्यप मुखापासून शिल्पि झाला तो कश्यपगोत्री जाणावा. असें ज्या ज्या मुखा पासून जेजे झाले त्याणीं तीं तीं गोत्रें वागविलीं प्रस्तुत कालीं मानवित अशी वहिवाट आहे कीं, आपल्यास पुत्र झाला ह्मणजे त्यांस देवांचीं नांवें ठेवितों तसें ऋषींनीं आपल्या पुत्रांस विश्वकर्मा मुखांचीं नावें ठेविलीं आहेत ऋषीं पासून पांचाल ब्राह्मण झाले नाहींत पांचाल ब्राह्मणा पासून ऋषी झाले आहेत. आणि ही पांचालांचीं गोत्रें ग्रंथांतरांत प्रसिद्ध आहेत. यास देव गोत्रें असें ह्म० पांचाल ब्राह्मणा पासून ऋषी झालें असें जें सदरीं लिहिलें त्यावरून ते ब्राह्मण आहेत असा निर्णय होतो परंतु हे सर्व पांचालाचे पोटीं अवतरले असें नाहीं फक्त कश्यपाचे सातवे स्त्री पासून जे झाले ते मात्र

पांचालांचे वंशांतील होत कारण कश्यप हा मनु वंशांतील आहे बाकी सर्व ऋषी पशू पक्ष्यादिकांपासून झाले आणि पशू पक्ष्यादि सृष्टी पांचालानीं उत्पन्न केलीं. रुद्र यामल ग्रंथांत सांगतो कीं, मानव जे आहेत ते सर्व मनुची संतती आहे मनूपासून झाले या साठीं मानव नांव पावले यावरून ऋषी हे पांचाला पासून झाले असें ह्मणण्यास चिंता नाहीं आणि रुद्र यामल ग्रंथांत सांगतो कीं, लहान पासून मोठ्यापरयंत जें कांहीं आहे तें सर्व विश्वकर्मा याणें निर्मित केलें या वरून साफ लक्षांत येतें कीं, ऋषी हे पांचाला पासून झाले आहेत स्कं० ना० अ० ५ एतेषां गोत्रमाचक्ष्ये शृणु षण्मुखतत्वतः॥ मनुः कौंडण्यगोत्रस्या न्मया नामात्रिगोत्रकाः ॥५०॥ त्वष्टागोत्रंभरद्वाजं तक्षा गौतमगोत्रजः॥ काश्यपं शिल्पिगोत्रंस्या देवंगोत्रमुदाहृतम् ॥५१॥ अर्थ— शंकर ह्मणतात हे कार्तिका पांचाल ब्राह्मणांचीं गोत्रें सांगतों ऐक मनु हा कौंडण्य गोत्री आहे मया अत्रिगोत्री त्वष्टा भरद्वाज गोत्री तक्षा हा गौतमगोत्री काश्यप गोत्री शिल्पी हीं पांच गोत्रें पांचांचीं ग्रंथांत प्रसिद्ध आहेत् या प्रकारें गोत्रें सांगितलीं. सूर्यवंशांत दशरथ या नांवें एक राजा महान् पराक्रमी झाला त्यास चार पुत्र होते त्यांत ज्येष्ठ पुत्राचें नांव रामचंद्र व दुसरा लक्ष्मण तिसरा शत्रुघ्न चौथा भरथ हे आबाल वृद्धांस माहित आहेत- आणि कोणी एका शेतकऱ्यानें दोन बैल बाळगलेले होते त्याने ही एका बैलाचें नांव राम ठेविलें व दुसऱ्याचें लक्ष्मण ठेविलें ह्मणोन दाशरथी रामाची व या बैलांची साम्यता होणार नाहीं तसेमनु आदीकरून पांच ब्राह्मण यांचीं गोत्रें कौंडण्य अत्री भरद्वाज अशीं आहेत तरीं हीं नावें ऋषींनीं आपल्यास ठेविल्यानें यांची त्यांची साम्यता होणार नाहीं ऋषीनीं पांचालांचे गोत्रांचीं नांवें आपल्यास ठेविलीं असें साफीने ध्यानांत येईल ऋषींच्या पूर्वींचे पांचाल असून ते पंच ईश्वर आहेत यावरून त्याणीं हीं चांगलीं नांवें पाडून आपल्यास ठेविलीं हे पांच ईश्वर आहेत हें जाणोन द्वारकावासी लोक या पांचालांची भक्ती करीत होते त्या भक्तीनेच ते तरलेगेले आणि त्यांचा महिमा अतिशय वाढला होता हें सर्वांस माहीत

आहे पांचाल ब्राह्मण हींच पांच तत्वें आहेत असें मागें दर्शविलें आहे याविषयीं किंचित लिहितों. कोणत्याही देवताची पूजा केली तत्रापि नैवेद्याचे वेळेस प्राण, पान, व्यान, उदान, समान यांचें स्मरण करितात बाणायनमः शालिग्रामायनमः बहिरोबायनमः खंडोबायनमः वगैरे नांवें कशा करितां घेतनाहींत ह्मणजे प्रत्यक्ष ज्या देवताची पूजा करावी तें दैवत नैवेद्याचे वेळेस सोडून प्राणपानादि यांचें स्मरण करितात याचें कारण उघड दाखवितों. मनुमयादि पांच ब्राह्मण हींच पांच तत्वें आहेत आणि सर्व देवता ह्मणजे ब्रह्मा विष्णू महेश इंद्र चंद्र सूर्य आदिकरून सर्व यांस पांच ब्राह्मणांनीं उत्पन्न केलें सबब कोणत्याही देवताची पूजा केली तत्रापि नैवेद्य पांचालाला अर्पण करावा लागतो. कारण पांचाचे अंगभूत सर्व दैवतें आहेत. यासाठीं प्राण, अपान, व्यान, उदान, समान, यांचें स्मरण करावें लागतें यास प्रमाण भागवतांत शष्ठमस्कंदांत अध्याय ७ यांत लिहिलें आहे कीं, कोणत्याही देवताची पूजा केली तरी नैवेद्य विश्वकर्मा प्रभू यास पोंचतो याशिवाय आणखी बहुत प्रमाणें मिळतात.

वाचक हो ह्या वरील अर्थात सोनार असें लिहितात कीं विराट् विश्वकर्म्याला अनेक मुखें असून त्यांतील पांच मुखांचीं नामें १ कौंडण्य २ अत्रि ३ भरद्वाज ४ गौतम ५ कश्यप अशीं होतीं आणि त्या मुखांपासून आह्मी पांच ब्राह्मण झालों ह्मणून आमचीं पांचांचीं पाच गोत्रें जाहलीं. तरि त्या सोनारादिकांस असें विचारावें कीं, विराट् विश्वकर्म्याच्या मुखांचीं नांवें कोणत्या ग्रंथांत आहेत. तुम्ही वर जें स्कं० ना० अ० ५ असें हेडिंग देऊन एतेषांगोत्रमाचक्ष्ये असे ५०।५१ दोन श्लोक लिहिलेत. ते व्यासकृत स्कंद पुराण नागरखंडांत मुळींच नाहींत. आणि मुखांच्या नावा वरून गोत्रमानणें यास आधार काय? जर मुखा पासून उत्पन्न झाले ह्मणून मुखाच्या नावाचें गोत्र झालें तर जे योनी पासून झाले त्यानाही तसेंच गोत्र लागावें. बरें जशीं गोत्रें झालीं त्या प्रमाणें पुढें ही प्रवर तसेंच लागावें. कारण प्रवर ह्मणजे जो पुरुष ज्या वंशामध्यें उत्पन्न झाला त्या वंशाचें गोत्र व तो प्रवर ह्मणजे गोत्राचे व वंशाचे भेद दाखविणारे जे तद्वंशीय पुरुष ते प्रवर जाणा ले

जातात. या न्यायानें ह्मटलें अस तां या पांचांचें गोत्र विश्वकर्मा असावें व मनु, मय, त्वष्टा, शिल्पी दैवज्ञ हे प्रवर असावें. यद्वा मनु गोत्र असून मनु पासून पुढें वंश दाखवणारे (मनुवंशीय जे झाले) त्यास प्रवर असें जाणावें **उदाहरण** जसे मनुगोत्राचा. मान वैल पौरूरव हा प्रवर येतो. असेज रते सोनारादिक कबूल करितील किंवा १ लोहाराचें कौंडण्यगोत्र २ सुतारा चें अत्रिगोत्र ३ कांसारांचें भरद्वाजगोत्र ४ पाथरवटांचें गौतमगोत्र ५ सोना- रांचें काश्यपगोत्र. या प्रमाणें सोनारादिकांचें ह्मणणें आहे तरी एकगोत्रांत- किंवा प्रवरांत परस्पर विवाह होतनाहीत याजविषयीं **श्रौतसूत्र उत्तर षट्काच्या** शेवटल्या अध्यायांत गोत्रप्रवर याचा निर्णय केला आहे व धर्म शास्त्रप्रवर्तक स्मृत्यादिकांमध्यें स्पष्ट आहे. तेव्हां सोनारांचें जर काश्यप गोत्र आहे तर काश्यपगोत्राशीं विवाह होणार नाहीं असें असून सोनारा दिक आपल्या एकगोत्राशीं विवाह करितात यावरून ते भातृभगिनीशीं विवाह करून संतती उत्पन्न करितात असें त्यांच्यात्त खोट्या वचना वरून सिद्ध होतें. आतां सोनार असें लिहितात कीं १ प्राण २ अपान ३ व्यान ४ उ- दान ५ समान हे पांच वायू आह्मी (सोनारादिकपांच) आहोंत ह्मणून नैवे द्याच्या वेळीं आमचें च नांव घेतात. बाणायनमः शालिग्रामायनमः असें ह्म- णत नाहींत हें त्या सोनारांचें लिहिणें सर्वथा खोटें आहे व त्याजविषयीं स्कं. पु. ना. अ. ४ श्लो. २२ असें हे डिंग देऊन खोटे श्लोक लिहिले आहेत. तरी पंच प्राण याशि मनु, मय, त्वष्टा, शिल्पि, दैवज्ञ अशी संज्ञा मुळींच नसून ऋषीला असें नांव आहे यास प्रमाण. **यजुर्वेद.** व निरुक्त उत्तरषट्क अ. ६ खंड २७ **सप्तऋषयः प्रतिहिताः शरीरे सप्त रक्षंति सधम प्रमादं। सप्तापः स्वपतो लोकमीयुस्तत्र जागृतो अस्वप्नजौ सत्र सदौ च देवौ।** ५५। **भाष्य** अध्यात्मवादिनी जगती। सप्तऋषयः प्रा णाः त्वक् चक्षुः श्रवण रसना घ्राण मनो बुद्धिलक्षणाः शरीरे प्रतिहिताः त एव सप्त संधं सदा रक्षमप्रमादं सावधानं यथा तथा शरीरं रक्षंति ते सप्त स्वप तो नरस्य लोकमात्मानमीयुः। प्राप्नुवंति। लोकशब्देन विज्ञानात्मा हृद

याकाशप्रतिष्ठ उच्यते। किंभूताः सप्तआपः प्राप्नुवंति। देहमित्यापः व्यापनाः तत्तत स्यामृषीणां लोकगमनावस्थायां। देवौदीप्यमानौ प्राणापानौ जाग्रतः जागरणंकु र्वाते कीदृशौ। अस्वप्नजौ नस्वप्नोनिद्राज्ञेयतेययोस्तौ अस्वप्नजौ। तथा सत्रसदौस तां जीवानां त्राणं रक्षणं सद्मं तत्रसीदतः तौसत्रसदौ जीवितदातारावित्यर्थः॥५५॥ निरुक्त सप्तऋषयोव्याख्यातास्तेषामेषाभवति॥३६॥ सप्तऋषयः प्रतिहिताः शरीरेरश्मय आदित्ये सप्तरक्षंति सधम प्रमादं संवत्सरमप्रमाद्यंतः सप्तापनास्तएव स्वपनो लोकमस्तमितमादित्यं यंति तत्र जाग्रतोऽस्वप्नजौ सत्रसदौच देवौ वाय्वादि त्यावित्यधिदैवतमथाध्यात्मं सप्तऋषयः अनिहिताः शरीरे षडिंद्रियाणि विद्यासप्त म्यात्मनि सप्तरक्षंति सधमप्रादं शरीरमप्रमाद्यंति सप्तायनानीमान्येव स्वपतो लोक मस्तमितमात्मानं यंति तत्र जाग्रतोऽस्वप्नजौ सत्रसदौचदेवौ प्राज्ञश्चात्मा तैजस श्चेत्यात्मगतिमाचष्टे तेषामेषापराभवति॥३७॥ **तिर्यग्बिलश्चमसऊर्ध्वबु ध्नोयस्मिन्यशो निहितं विश्वरूपं। अत्रासत ऋषयः सप्त साकंयेअ स्यगोपामहतोबभूवुः॥** तिर्यग्बिलश्चमसऊर्ध्वबंधनऊर्ध्वबोधनोवायस्मि न्यशोनिहितं सर्वरूपमत्रासतऋषयः सप्तसहादित्यरश्मयोये अस्यगोपामहतोब भूवुरित्यधिदैवतयथाध्यात्मंतिर्यग्बिलश्चमसऊर्ध्वबंधनऊर्ध्वबंधनोवायस्मि न्यशोनिहितंसर्वरूपमत्रासतऋषयः सप्तसहेंद्रियाणियान्यस्यगोप्तृणिमहतो बभूवुरित्यात्मगतिमाचष्टे देवाव्याख्यातास्तेषामेषाभवति॥३८॥ अशा अनेक प्रमाणावरून ऋषिशब्द हावायु व इंद्रियें रश्मि इत्यादिकांचा वाचक असून ऋषिलो क हे आह्मि प्राण किंवा इंद्रियें असें ह्मणत नाहींत आणि सोनारादिकांस आधार नस तां खोटे श्लोक करून आह्मीच पंचप्राण अशी बडबड करितात हें त्यांचें (सो नारांचें) मोठें अज्ञान आहे. असो पुढें सोनार असें लिहितो कीं, वर लिहिलेले ब्राह्मण स्वायंभुव मनूचे पुत्र आहेत असें साफीनें सांगतों आणि ऋषी हे आपल्या स ब्राह्मण ह्मणवितात तें खोटें असून त्यांची उत्पत्ती मनुपासून नसून मनूला आपला वडील असें ह्मणत असल्यास ह्मणोत पण मनु हा लोहकार आहे त्याचा मात्र त्याणीं विचार करावा. कांहीं ऋषी अवलादीचे लोक आपल्यास मुख मासीन ब्राह्मण ह्मणवितात परंतु मुखमासीन ब्राह्मण मनुमयादी पांच अ

सून विश्वकर्मा याजपासून झाले आहेत. असें मागील सर्व लेखावरून ठरत आहे यास्तव आतां ते ऋषी आपल्यास मुखमासीत ब्राह्मण असें ह्मणणार नाहींत असें खचित वाटतें त्यांतूनही कांहीं ब्रह्मदेवा पासून ब्राह्मण झालों असेंह्मणवितात तर ते ब्राह्मण ब्रह्मदेवाच्या वंशांतील जो स्वायंभूव मनु या जपासून झाले आहेत यावरून ब्रह्म देवा पासून झालों असें जें त्यांनें बोलणें तें ही खुंटलें आतां तसेंही त्यांस बोलतां येणार नाहीं. कारण मनु ह्मणजे लव्हार याचे पुत्र आम्हीं आहों असें कसें सांगतील. स्वायंभूव मनू पासून ब्राह्मण जे झाले त्यांच्या आचारा विषयीं खालीं लिहितों. वाचकहो. ह्या वरील सोनारांच्या लिहिण्यावरून त्यांच्या (सोनाराच्या) जिव्हेला किती फांटे फुटलेले आहेत याचा विचार करा- कारण प्रथमतः आह्मी विराट्विश्वकर्म्याच्या पांच मुखां पासून मनु, मय, त्वष्टा, शिल्पी, दैवज्ञ (लोहार, सुतार, कांसार, पाथरवट, सोनार) असे पांच ब्राह्मण उत्पन्न झालों असे तीन अध्यायपर्यंत आपण केलेल्या ब्रह्मविचार ग्रंथांत खोटीं वचनें पुढें चवथ्या अध्यायांत आह्मी ब्राह्मण स्वायंभुव मनूचे पुत्र आहोंत असें लिहून ऋषी हे स्वायं भुव मनू पासून झाले नाहींतसबब ते ब्राह्मण नव्हेत. असें लिहितो. परंतु हें त्यांचें लिहिणें सर्वथा निर्मूल आहे. कारण स्वायंभुव मनू पासून जर तुम्हीं सोनारादिक उत्पन्न झाला असें ह्मणावें तर. स्वायंभुव मनूच्या वंशांत तुमचें (सोनारादिकांचें) वर्णन मुळींच नाहीं. यास प्रमाण.

भागवत स्कं० ३ अ० १२ एवंयुक्त कृतस्तस्य दैवं चावेक्षतस्तदा। कस्यरूपमभूद्द्वेधायत्कायमभिचक्षते ॥५१॥ ताभ्यांरूपविभागाभ्यांमिथुनंसमपद्यत। यस्तुतत्रपुमान्सोभून्मनुःस्वायंभुवःस्वराट् ॥ ५२॥ स्त्रीयासीच्छतरूपाख्यामहिषस्यमहात्मनः। तदामिथुनधर्मेण प्रजाह्येधांबभूविरे॥५३॥ सचापिशतरूपायांपंचापत्यान्यजीजनत्। प्रियव्रतोत्तानपादौतिस्रः कन्याश्चभारत॥५४॥आकूतिर्देवहूतिश्च प्रसूतिरितिसत्तम। आकूतिं रुचये प्रादात्कर्दमाय तु मध्यमां। दक्षायादात्प्रसूतिंचयतआपूरितंजगत् ॥ ५५॥ अर्थ-ब्रह्मदेवाच्या शरीराचे दोन भाग झाले. आणि प्रथम भागा पासून स्वायंभुवमनु

झाला. आणि दुसऱ्या भागा पासून **शतरूपा** नामें स्त्री झाली. नंतर त्या शतरूपास्त्री च गर्यी स्वायंभुव मनु मिथुन धर्मेंकरून ५ अपत्यें उत्पन्न करिता झाला. तीं अशीकीं, **१ प्रियव्रत २ उत्तानपाद** असे दोन पुत्र व.१ आकूति २ देवहूती ३ प्रसूती अशा ३ कन्या. अशी ५ अपत्यें उत्पन्न करून नंतर आपली आकूति नामक कन्या. **रुचिनामक** ऋषीला दिली व देवहूती नामें २री कन्या कर्दम ऋषीला दिली प्रसूति नामक तिसरी कन्याही **दक्ष प्रजापतीस** दिली नंतर त्या ऋषीं पासून पुढें वंशवृद्धि जाहली त्यांचा विस्तार बहुत आहे येथें ग्रंथ विस्तार भयार्थ लिहित नाहीं. सारांश अशी स्वायंभुवमनूची उत्पत्ती असून त्याला **लोहार** ह्मणणें किंवा आह्मी (सोनारादिक) त्याचे पुत्र असें बोलणें **मममातावंध्या** (माझी मातुश्रीवंध्या) या प्रमाणें समजलें पाहिजे. असो असें सोनारांनीं लिहून त्याचविषयीं लिं० शौ० या प्रमाणें हेडिंग देऊन खोटे श्लोक बहुत लिहिले आहेत ते सर्व खोटे श्लोक पूर्वीं दाखविले आहेत ते वाचून पाहिले ह्मणजे विद्वान् वाचकांची खात्री होईल. पुढें खोटीं भाष्यें जीं पूर्वीं लिहिलीं तीच पुन्हा लिहून नंतर ग्रंथाचें नाव व अध्याय श्लोक नलिहिता ४ श्लोक लिहिले आहेत ते वाचकांनीं पाहून त्या श्लोक करणाऱ्या कवीला जें बक्षीस देणें असेल तें द्यावें. **ललाटे ब्रह्मणोजातिर्क्षत्रियोबहुजन्मकः॥ वैश्यानांउरु उत्पत्तिर्पादयोः शूद्र संभवः॥ सामान्यवर्णसंभूतिर्सगोपालतपोधराः॥ जगन्यजाल गोरंच अंगुष्ठनख छेदिनः॥ मालिनाभीतथा जन्म रजकस्यच जंतथा॥ कोल्हाळे जातिसंजातिर्तिलघातिनउद्भवः॥ उच्चिष्टंबुरुडाश्चैव पृष्टनष्टविनंस्तथा॥ इत्याष्टादशवर्णाश्च विश्वकर्माशरीरयोः॥** **अर्थ**— ब्राह्मण १ क्षत्री २ वैश ३ शूद्र ४ ऋषी ५ वैद्य ६ ज्योठ ७ नापीक ८ माळी ९ रजक १० कुंभार ११ कोष्टी १२ तेली १३ भिल्ल १४ कोळी १५ भोई १६ महार १७ बुरुड १८ हे विश्वकर्मा याणें उत्पन्न केले यास दुसरें प्रत्यंतर भागवतांत द्वितीयस्कंदांत अध्याय १ यांत सांगतो कीं ब्राह्मण क्षत्रीय वैश शूद्र हे चार वर्ण विश्वकर्मा याजपासून उत्पन्न झाले हीं वचनें मागें लिहिलीं आहेत. आणि भागवतांत शष्ठमस्कंदांत विश्वकर्मा हा जगास गुरू असें साहावें

अध्यायांत ३२ व्या श्लोकांत सांगतों. आणि चार वर्ण विश्वकर्मा प्रभु याणें उत्पन्न केले असें लिं० पु० श्री० यांत ही सांगितलें. या वचनावरून ब्राह्मण आणि ऋषि हे निरनिराळे आहेत असें समजतें. वाचक हो ह्या वरील श्लोकांचा कर्ता कोण असेल तो असो वेदाशिवाय सर्व ग्रंथकारांचीं नांवें आढळतात. व ते ग्रंथ वेदाला अनुसरून व व्याकरण, न्याय, मीमांसादिकें करून युक्त आहेत. आणि या श्लोकांची रचना पाहतां व्याकरण व वेद यांला सर्वथा सोडून आहे ती अशी कीं, वेदामध्यें विराटाच्या मुखा पासून ब्राह्मण जाती उत्पन्न झाल्या असें आहे याजविषयीं पूर्वी **वासुदेव आत्माराम सोनार** यानीं आपल्या ब्रह्मविचार ग्रंथांत सर्व पुरुषसूक्त अर्थसहीत लिहिले असून. या श्लोकामध्यें ललाटा पासून ब्राह्मण झाले असा अर्थ आहे यावरून हे श्लोक वेदार्थाला सोडून आहेत असेंसिद्ध होतें. आणि सामान्य वर्णसंभूतीं संगोपाल तपोधनाः। जगन्य जालगौरं च। मालिनापी तथा जन्म रजकस्य यजं तथा। कोल्हाळे जाति संजाति। उचिष्टं बुरुडा श्चैव पृष्ट नष्ट विनंस्तथा। विश्वकर्माशारीरयोः। इत्यादि वाक्यांची रचना व त्यांचा अर्थ पाहून हे श्लोक किती व्याकरण शुद्ध व **कोल्हाळे** इत्यादि शब्द कोणत्या कोशांत उपलब्ध कोणत्या धातूपासून साधित याचा विचार विद्वान् वाचकांनीं करावा. आणि हें आमचें पुस्तक पाहून वासुदेव आत्माराम नेट सोनार किंवा अन्य कोणी **सोनारादिक** जर ह्या ४ श्लोकांचा अर्थ वेद, शास्त्र, पुराण, कोश इत्यादिकांच्या आधारें करून दाखवितील. तर मी (पुस्तककर्ता) त्यांचा आभारी होईन असो पुढें सोनार काहींच मन्त्कारिक विषय लिहितात तो वाचकांस प्रदर्शित करितो. पारशी हीज्ञात अग्नी इत्यादि पंच तत्वांस भजती सर्वांचे मतापेक्षां यांचें मत फार उत्कृष्ठ आहे किती ही देवांची भक्ती केली तत्रापि ती पांच तत्वांस किंवा पांचाल ब्राह्मणास पोंचती. पंचतत्वें हाच विश्वकर्मा या विषयीं मागें बहुत प्रमाणें दिलीं आहेत. यावरून पारशी लोक यांस गुरू विश्वकर्मा आहे असें शिद्ध होत आहे. आतां सर्व ज्ञातीस गुरू विश्वकर्मा असें शिद्ध करून दाखविलें आहे युरोपियन चिनी, वगैरे लोक हे पूर्वी ज्यांस

आपण दैत्य ह्मणत आलों त्यांचेच वंशी हे आहेत. देव आणि दैत्य विश्व कर्मा प्रभू याणें उत्पन्न केले याविषयीं मागें कथा आलीच आहे यावरून चिनी युरोपियन वगैरे याचा गुरू विश्वकर्मा आहे असें प्रशिद्ध झालें आहे ही कथा सांगून राहिलेला विषय उत्तर ग्रंथीं निवेदन करीन. इतिचतुर्थोऽध्यायसमाप्त. ॥ **वाचकहो**. ह्या वरील सोनारांच्या लिहिण्यांत. **पारशी, चिनी, युरोपियन** इत्यादिकांचे गुरु सोनारादिक आहेत असें सिद्ध होतें. असें असून ते लोक सोनारादिकांचा उपदेश घेत नाहींत याचें कारण पेशव्यादिकांनीं चीन देशांत किंवा विलायतेस जाऊन बंद केले किंवा काय हें लिहित नाहींत. असो याप्रमाणें सोनारांच्या ब्रह्मविचार ग्रंथाच्या चवथ्या अध्यायांतील खोट्या वचनाचें खंडन झालें. **अध्याय ५ वा** यांतील खोट्या विषयांचें खंडन. श्रीगणेशायनमः ॥ मागील अध्यायांत विश्वकर्मा जगद्गुरू असें सिद्ध झालें असून शंकराचार्य ह्या आपल्यास जगद्गुरू ह्मणवितो तरी त्यास जगद्गुरू असें कोठें ग्रंथांत ह्मटलें नाहीं आणि जगद्गुरु असें ह्मणून घेण्यास योग्य होणार नाहीं ज्याची समजूत कमी असे जे आहेत त्याणीं शंकराचार्यास जगद्गुरु असें ह्मणून उगीच महती वाढविली आहे जगद्गुरू ह्मणजे सर्व जगाचा गुरू तर तसें कृत्य याच्या हातून कांहींच झालें नाहीं तोच शंकराचार्य विश्वकर्मा यास जगद्गुरु आपल्या मुखें ह्मणतो याविषयीं प्रमाण देतों शंकराचार्य याणें स्तोत्र केलें आहे तें लिहितों.

**स्तोत्र श्रीविश्वकर्मणेनमोनमः ॥ विश्वकर्माविप्रनाथः विश्वधाताविश्वस्यपरंतेज्योविश्वज्योतिः विश्वमूलंच्चविश्वदेवता विश्वब्राह्मणोमाहामुनिः स्थायदाभिः महापुरुषस्य देवादिदेवः तदेवं जगद्गुरुः त्रैलोक्यंव्याप्य वेदादि वेदंते पुरुषस्य विश्वकर्मणः आद्यादिः विश्वज्योतिश्चमनुर्मयत्वष्ट्रशिल्पिदैवज्ञ आर्क ब्राह्मणाव्यापितंसचराचरंचसर्वकलाकुशलध्याला सर्वजनानां विश्वकर्मामहामुनिर्विश्वकर्मा जगदादिदेवो महाब्रह्मचमहाब्रह्मणो आद्यो योगंचपरंतेजोब्रह्माविष्णुः महेशश्चतेचविश्वकर्मणः जग**

त्सर्वत्रैलोक्यंविश्वपरिज्ञाताविश्वबाहोविराजवल्लभंवेदकर्तादिवि श्वकर्मणः मुनिदानवश्चैवआत्मापतिः यतिः सर्वात्मानांविश्वक र्मणःपरिब्राह्मणोमहाकर्तव्योमहाज्योतिः सर्वशास्त्रादिशास्त्रंच पुरुषस्यविश्वकर्मणः विश्वेंद्रसर्वदेवानांसर्वदेवध्यात्वाविश्वक र्मणः विश्वब्राह्मणोमहामुनिर्विश्वकर्माआदिगुरुः विश्वकर्माजग द्गुरुः सत्यंसत्यंश्रुतिर्वाच्यं ततसाक्षंविश्वकर्मणः इतिश्रीमत्शंक राचार्यविरचितंविश्वकर्मणः स्तोत्रंसंपूर्णमस्तु ॥ वाचक हो. हें वरी- ल स्तोत्र शंकराचार्यकृत आहे असें वासुदेव आत्माराम शेट सोनार लि- हितात. परंतु हें शंकराचार्यकृत आहे असें माझ्यानें ह्मणवत नाहीं कारण मी सुमारें २०० स्तोत्रें शंकराचार्यकृत मिळविलीं परंतु त्या स्तोत्रांची यह्या (वरील लिहिलेल्या) स्तोत्राची व्याकरण व अर्थाशी तुलना होत नाहीं. ह्मणून हें स्तोत्र मीं बहुत विद्वानांस दाखविलें परंतु ह्या स्तोत्रांतील अर्थ व व्याकरण क र्ता कर्म क्रियापदादिकांचा विचार कोणाला झाला नाहीं सबब हें स्तोत्र सर्व विद्वानास प्रदर्शित केलें आहे तरि हें स्तोत्र पाहून खरें किंवा खोटें याचा विचार विद्वान वाचक करितील ह्मणून येथें सर्व स्तोत्र लिहिलें आहे. असें च- मत्कारिक स्तोत्र लिहून पुढें वासुदेव आत्मारामशेट सोनार हे रुद्रयामल अ- सें हेडिंग देऊन पंचभिः सहितः पुत्रैर्विश्वकर्मागिरींद्रजे। द्वारकावा सिभिर्नित्यं श्रीकामैः पूज्यतेसदा॥ ४२॥ तस्माच्छिल्पिवरान्नित्यंपूजयं तिविचक्षणा। तेहिकांशांतिकल्याणं गृहीणांजीविकार्थिनः॥४३॥ अ- र्थ– हे पार्वती पांच पुत्र जे मनु मय त्वष्टा शिल्पि दैवज्ञ हे विश्वकर्म पंचायतन आ हे यांचें द्वारकावासी लोक नित्य निरंतर लक्ष्मि संपन्न व्हावें यासाठीं सार्वकाल पूजा करितात. तस्मात् शिल्पिवर जे यांची विचारवंत जे आहेत ते पूजन करि- तात तेणें करून ते मनुमयादि संतुष्ट होत्साते त्यांचा मनोदय पूर्ण करितात. वाच क हो हे दोन श्लोक रुद्रयामल ग्रंथांत मुळींच नाहींत आणि द्वारकावासी लोक सोनारादिकांची पूजा करित होते किंवा काय याचा विचार भागवतादिक ग्रं- थ अवलोकन करणाऱ्या विद्वान वाचकांनीं करावा. पुढें सोनार असें लिहितात कीं,

पूर्वी पंचायतन ह्मणोन जें पूजा करावयाचें तें हेच पांच ब्राह्मण यांची पूजा सर्व लोक करीत होते असें ध्यानांत येतें त्याचे मोबदला अलिकडे ऋषिलोकांनीं येक नवीन पंचायतन सिद्ध केलें आहे तें असें कीं, येक बाण ह्मणजे तो शिवरूपी असें मानितात दुसरें शालिग्राम हा विष्णुरूपी आहे ह्मणोन तो एक तिसरें सूर्याचें मोबदला सूर्यकांत चवथें गणपती आणि पांचवें स्वर्णमुखी देवीचे मोबदला मानितात या प्रमाणें शिव शालिग्राम सूर्य गणपती आणि देवी असें प्रतिमारूप मानून त्याची पूजा आदरानें करून पांचालांची निर्भर्त्सना करितात यासाठीं वाचकांस माझें सांगणें असें आहे कीं; शंकर विष्णु इत्यादि देव ज्यांची पूजा करितात तेच पांचाल सर्वांस पूज्य आहेत तर त्यांचीच पूजा केलीअसतां तुह्मी सायुज्य पदास जाल आणि हे पांचाल भूमंडलाचे ठिकाणीं मूर्तिमंत वेद असून त्यांचा त्याग करून शालिग्राम बाण इत्यादि यांची पूजा करावी हें वाजवी नाहीं यास उदाहरण पुरुषानें मातापितरांची पूजा करावी हें योग्य असून तें दैवत सोडून देवांची पूजा करितात व स्त्रियांनीं पतीची सेवा करावी तिला अन्य व्रत नाहीं अन्यव्रतास स्वीकारील तर तें फलद्रूप होणार नाहीं तसें सर्व मानवांनीं पांचालांचीच पूजा करावी हें योग्य आहे.

वाचक हो. ह्या वरील अर्थात सोनार लोक असें ह्मणतात कीं, पंचायतन ह्मणजे कायते आह्मी (लोहार, कांसार, सुतार, पाथर्वट, सोनार,) आहों आणि पूर्वी देवही आमची पूजा करित होते हें सोनारांचें बोलणें दग्ध ममजिह्वानास्ति (मलाजीभ नाहीं) या प्रमाणें समजलें पाहिजे. कारण कीं आधारभूत ह्मणोन जे वर दोन श्लोक लिहिले आहेत ते मुळींच खोटे आहेत. आतां ऋषीलोकांनीं नवीन पंचायतन काढिलें किंवा पुरातन आहे त्याजविषयीं प्रमाणें दाखवितों तीं पहा ह्मणजे खात्री होईल **हरिहरादिकांच्यापूजेविषयीं प्रमाण आचारार्के स्कांदे** कामासक्तोथवाक्रुद्धः शालिग्रामशिलार्चनात्। भक्त्यावा यदिवाभक्त्या कलौ मुक्तिमवाप्नुयात्। शिलाप्युक्ता प्रयोगपारिजाते। शिलाप्यामलकी तुल्या पूजा सूक्ष्मैवयाभवेत्। यथा यथा शिला सूक्ष्मा तथा स्यात्तु महत्फलं। तत्रैव स्कांदे शिवनाभिरुक्तः। यस्मात्त्वंतुगर्तेऽस्या द्यवार्धलिंगमुच्यते। शिवनाभिरिति ख्यातस्त्रि

षुलोकेषुदुर्लभः। अशा अनेक वचनांवरून शालिग्राम पूजा अवश्य करावी असें सिद्ध होतें. सोनारलोक अशी शंका घेतील कीं, हा सर्व प्रकार कलियुगामध्यें आहे? तरी यास प्रमाण. आचारार्कें श्रीभारते. कलौकलिमलध्वंसंसर्वपापहरंपरं। येर्चयंति नरानित्यं तेपिवंद्यायथा हरिः। ब्रह्मा कृतयुगे देव स्त्रेतायां भगवान्हरिः। द्वापरे भगवान् विष्णुः कलौ देवो महेश्वरः। पूज्य इति भावः। अशा प्रमाणांवरून द्वापारांत विष्णुची पूजा करावी असें असून सोनारलोक आमची पूजा द्वारकावासी लोक करीत होते असें खोटे श्लोक करून लिहितात तेव्हां ही एक सोनारांची विलायती कल्पनाच समजली पाहिजे. असो बाणाच्या पूजे विषयीं प्रमाण - आचारार्कें - शिवपूजनं बाणलिंगेऽतिप्रशस्तमित्युक्तंभविष्ये। बाणलिंगानिराजेंद्र ख्यातानि भुवनत्रये। न प्रतिष्ठान संस्कारस्तेषामावाहनंनचेतिहेमाद्रौ पक्वजंबूफलाकारंकुक्कुटांड समाकृति। भुक्तिमुक्तिप्रदं चैवबाणलिंगमुदाहृतं। या वचना वरून बाण शालिग्रामादिकांची पूजा करावी असें सिद्ध होतें। आतां पंचायतन पूजेचा प्रकार लिहितों. आचारार्कें। गृहस्थपंचायतनपूजोक्तपरशरामनिबंधे कूर्मपुराणे। स्नानंसंध्यांततो होमं गृहस्थोक्तेनवर्त्मना। कृत्वासूर्यगणपतिं लक्ष्मीमीशं तथा हरिं। पौरुषेणतु सूक्तेन नित्यमर्चांसमारभेत्। पंचायतनप्रकारो ज्ञानमालायां। सहस्रांशुर्यदामध्ये ईशान्यांपार्वतीपतिं। आग्नेय्यामेकदंतंच नैर्ऋत्यामच्युतं तथा। वायव्यां पूजयेद्देवीं भोगमोक्षेकभूमिकामिति सूर्यपंचायतनं॥ हेरंबंतु यदामध्ये ईशान्यामच्युतं यजेत्। आग्नेय्यां पंचवक्त्रं तु नैर्ऋत्यां जगदंबिकां। वायव्यांद्युमणिं चैव यजेन्मंत्री ह्यतंद्रितः। इतिगणपतिपंचायतनं। भवानींतुयदामध्ये ईशान्यांमाधवंयजेत्। आग्नेय्यां पार्वतीनाथं नैर्ऋत्यांगणनायकं। प्रद्योतनंतुवायव्यामाचार्यस्तु प्रपूजयेत्। इतिलक्ष्मीपंचायतनं। शंकरंतु यदा मध्ये ईशान्यांश्रीपतिंयजेत्। आग्नेय्यांचतथा हंसंनैर्ऋत्यांपार्वतीसुतं। वायव्यांचसदापूज्याभवानीभक्तवत्सलेतिशिवपंचायतनं। यदातुमध्येगोविंदमैशान्यांशंकरं यजेत्। आग्नेय्यां गणनाथंचनैर्ऋत्यांतपनंतथा। वायव्यामंबिकांचैव यजेन्मंत्रीस

माहितमितिविष्णुपंचायतनं। स्वस्थानवर्जितादेवाः शोकदुःख भयप्रदाः। तन्मंडलस्थितोराजा साधकश्चविनश्यति। बोपदेव श्च। शंभोमध्यगते हरीन हरभूदेव्योहरौशंकरे भास्येनागस्कतारवौ हरगणेशाजांबिकास्थापिताः। देव्यांविष्णुशिवैकदंतरवयो लंबोदरेजेश्वरे नार्याः शंकरभागतोतिस्फरवदा व्यस्तास्तु ते हानिदाः। वाचक हो. या प्रमाणें पंचायतनाचा प्रकार बहुत ग्रंथांत आढळत असून **सोनारलोक** स्वकपोल कल्पित श्लोक करून आमचीच पूजा करीत होते असें लिहितात परंतु हें त्यांचें लिहिणें स्वप्नावस्थेंतील आहे असें समजलें पाहिजे. **सारांश** सोनारादिकांचा मतलब असा दिसतो कीं जेथें पांचांचें वर्णन येईल तेथें आह्मीच आहो. असें ह्मणतात कांहीं दिवसांनीं प्रेतवाहक आह्मींच होतों असें ही ह्मणतील. कारण प्रेत नेण्यासही पांच लागत असतात. असो असें सोनारांनीं अवढू लिहून पुढें **लिं० शै० स्कं० ना० रुद्रयामल.** अशीं हेडिंगें देऊन खोटे श्लोक लिहून त्यांचा अर्थही लिहिला आहे आणि पूर्वीं दाखविलेलीं खोटीं भाष्यें ही पुनः लिहून. मनु, मय, त्वष्टा, शिल्पि, दैवज्ञ. यांचे रंग, कर्मे कुंडे यांचें वर्णन खोट्या श्लोकें करून केलें आणि पुढें ह्या पांचालांला मौंजीबंधनामध्यें दंड धारण करण्या विषयीं **लिं० शै०** असें हेडिंग देऊन दोन श्लोक खोटे लिहिले आहेत ते सुज्ञ वाचकांस दाखवितों.

रजतस्य मनोर्दंडो वेणुदंडो मयस्यच॥ त्वाष्ट्रश्च ताम्रदंडश्च लोहदंडश्च शिल्पिनां॥१९॥ सुवर्णदंड आख्यातो दैवज्ञस्यागमात्मकैः॥ पंचदंडांश्च योवेद मुच्यते सर्वतोभयात्॥२०॥ वाचक हो पहा हे सोनारादिक आह्मीं ब्राह्मण ह्मणवितात. आणि त्याविषयीं खोटीं वचनें लिहितात परंतु त्यांच्या खोट्या श्लोकांला आणि वेदशास्त्रादिकांला केवढा भेद आहे तो किंचित् दाखवितों तो सुज्ञ वाचकांनीं पाहून खऱ्याखोट्याचा विचार करावा. ब्राह्मणादिकांला दंडधारणाविषयीं प्रमाण. **आश्वलायनगृह्यसूत्र अध्याय १ खंड १९** तेषांदंडाः पालाशो ब्राह्मणस्यौदुंबरः क्षत्रियस्य बैल्वो वैश्यस्य॥ **अर्थ-** ब्राह्मणास दंड पळसाचा व क्षत्रियांस उंबराचा आणि वैश्यास बेलाचा असें स्मृत्यादिकांमध्यें वर्णन असून सोनारांनीं रुपें,

वेणु, ताम्र, लोखंड, सोनें याचे दंड कोरून काढिले आहेत याचा विचार वाचकांनींच करावा. असो पुढें सोनार यज्ञोपवीता विषयीं खोटे श्लोक लिहितात ते असे कीं, **रजतस्यमनोः सूत्रं पद्मसूत्रं मयस्यच ॥ ताम्रसूत्रंत्वाष्ट्रिकस्य कार्पासंशिल्पिकस्यच॥२१॥ दैवज्ञस्यसमाख्यातंस्वर्णसूत्रंमहर्षिभिः॥ पंचसूत्राणियोवेद सर्वपापैःप्रमुच्यते॥२२॥ अर्थ-** रुपें, कमळ, तांबें, कापूस, सुवर्ण, अशीं पांच सूत्रें पांचांचीं आहेत असें लिहितात. परंतु वाचक हो ह्या सोनारांच्या लिहिण्यास व वेदशास्त्रादिकांस मुळींच संबंध नाहीं असें असून आह्मी पांच ब्राह्मण विराट् विश्वकर्म्याच्या मुखापासून उत्पन्न झालों. असें पूर्वी लिहितात. आणि पुढें पांचांचे दंड निरनिराळे व सूत्रें, कुंडें ही निराळीं आहेत. असें खोट्या श्लोकें करून दाखवितात. तरि वाचकांनीं त्या सोनारांस असें विचारावें कीं, **श्रुतिस्मृत्यादिकग्रंथांत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र** ह्या चार जातींला पृथक् धर्म सांगितले आहेत. परंतु एकाच जातीमध्यें निराळे धर्म सांगितले नसून आह्मी पांच ब्राह्मण असें ह्मणून पांचांचीं कुंडें व दंड, यज्ञोपवीतें हीं निराळीं लिहिता याचें कारण काय? जर तुह्मी पांचही ब्राह्मण आहांत तर तुमचे धर्म ही एक असावे. कारण वेदशास्त्रादिकांमध्यें ब्राह्मण जाती ही एकच असून सर्व जातींचा धर्मही एक सांगितला आहे. असें असून तुह्मी (सोनारादिक) खोटेश्लोक लिहून वेदशास्त्रांला दूषण लाविता हें फार अनुचितकर्म आहे असो पुढें सोनार असें लिहितात कीं, **लिं० शै० ऋग्वेदश्चमनोश्चैवयजुर्वेदोमयस्यच॥सामवेदस्त्वाष्ट्रिकस्यत्वथर्वाशिल्पिकस्यच॥२५॥ सुषुम्नाभिधवेदोसौदैवज्ञानांप्रकीर्तितः॥ पंचवेदांश्चयोवेद सायुज्यंलभतेनरः॥२६॥ अर्थ-** ऋग्वेद हा मनुचा अथवा मनुहाच ऋग्वेद आहे. यजुर्वेद हा मयाचा किंवा मया हाच स्वता यजुर्वेद आहे. त्वष्टा जो याचा सामवेद अथवा त्वष्टा हाच सामवेद आहे अथर्वणवेद शिल्पिचा आहे किंवा शिल्पि हाच अथर्वण सुषुम्नाख्यवेद हा दैवज्ञाचा आहे किंवा हाच स्वतां सुषुम्नाख्यवेद या पांच मूर्तिमंत वेदांप्रत जाणतो तो सायुज्य पदास पावतो.

विराट् विश्वकर्मा याज पासून पांच ब्राह्मण उत्पन्न झाले नंतर शिवाचे पांच मुखां पासून पांच उत्पन्न झाले त्यांस शिवपांचाल ब्राह्मण ह्मणावें आणि ब्रह्मदेवाचे वंशांत स्वायंभुव मनु पासून पांच ब्राह्मण अवतरले आहेत. त्यांस ब्रह्मपाचाल ह्मणावें. आणि अग्नीच्या मुखापासून पांच अवतरले आहेत त्यांस अग्निपांचाल ह्मणतात. या अग्निपांचालांची उत्पत्ति कशी जाहली तें पुढील दुसऱ्या भागांत सांगुं. ब्रह्मपांचाल जे स्वायंभुव मनु पासून झाले तेव शैव पांचाल व पूर्वीचे वीराट मुखापासून झाले ते किंवा अग्नि पांचाल यासर्वांचा धर्म एकच असोन त्यात्यांत कांहीं फरक नाहीं आणि ते सर्व एक ठिकाणीं वागत आहेत. वाच कहो. वरील दोनश्लोक खोटे असून त्याचा अर्थही खोटा आहे. कारण. **श्रुति, स्मृति, पुराणे, उपपुराणे, इतिहास, आगमादिकामध्यें** चारवेदांविषयीं प्रमाणें सांपडतात. वत्यांचीं **ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्वणवेद,** अशीं नांवें ही सांपडतात. असें असून सुषुम्ना यानांवाचा पाचवा वेद कोठून सोनारांनीं आणिला असेलतो असो. वेदांविषयीं प्रमाण ऋग्वेद अ. ८ अ. ४ वर्ग १६ पासून १९ पर्यंत विराटाचें वर्णन आहे. त्यामध्यें. तस्मा यज्ञात्सर्वहुत ऋचः सामानिजज्ञिरे॥ छंदांसिजज्ञिरेतस्माद्यजु, स्तस्मादजायत॥ यामध्यें सुषुम्ना असें नांव नाहींव. चरणव्यूह. तत्रयदुक्तंचातुर्वेद्यंचत्वारी वेदविज्ञाता भवंति ऋग्वेदो यजुर्वेदः सामवेदोऽथर्ववेदश्चेति. यावरून व अनेक पुराणवाक्यां वरून ही वेदचार असे ठरतात. आतां सुषुम्ना हें नांव वेदाचें नसून नाडीचें मात्र आहे यास प्रमाण. अग्निपुराण. अ. २१४ नाभेरधस्ताद्यत्कंदमंकुरास्तत्रनिर्गताः। द्वौसमाप्तिसहस्राणिनाभिमध्येव्यवस्थिताः॥१॥ तिर्यगूर्ध्वमधश्चैव व्याप्तं ताभिः समं ततः। चक्रवत्संस्थिता ह्येताः प्रधानादशनाडयः॥२॥ इडाचपिंगलाचैव सुषुम्नाच तथैवच॥३॥ नारदपंचरात्रागम॥रात्र ५ अ. ११ इडावामेस्थिता नाडी पिंगलादक्षिणेमता। तयोर्मध्यगतानाडी सुषुम्नातत्समाश्रिता॥३॥ अशा अनेक प्रमाणांवरून सुषुम्ना हें नांव नाडीचें मात्र आहे वेदाचें मुळींच नाहीं. सुषुम्ना हा पांचवा वेद आमचा (सोनारांचा) आहे असेंलिहितात याला आधार नसुळींच नाहीं परंतु एक युक्ती मात्र आहे. ती अशी कीं, कोशादिकामध्यें

नाडींधम असें नांव सोनारांचें आहे आणि त्याचा अर्थ " नाडींधमयतीतिनाडींधमः " ह्मणजे फुंकणीनें फुंकणारे असा आहे. तेव्हां नाडी हें नाव फुंकणीचें आहें आणि ती फुंकणी आपली कुलदेवता आहे असें समजून सुषुम्ना ह्मणजे फुंकणी तोच आमचा वेद असा त्यांचा (सोनारांचा) अभिप्राय दिसतो. आणि ऋष्यादिकांची निंदा करावी व. ऋषींला वेदाचा अधिकार नाहीं. किंवा खोटे श्लोक करून व्यासादिकांस दूषण द्यावें आणि विराटाच्या पांचमुखां पासून आह्मी (लोहार, कांसार, सुतार, पाथर्वट, सोनार,) पांच ब्राह्मण उत्पन्न झालों. आह्मी सर्वांचे बाप व गुरू अशी बडबड करावी. इत्यादिक धर्म त्या सुषुम्ना (फुंकणी) वेदांतच असतील. असो या प्रमाणें सोनारानें लिहून पुढें कांहीं पांचालांचे धर्म करितां लिं॰ शै॰ असें हे डिंग देऊन खोटे श्लोक लिहिले आणि सर्वांस बाप्तिस्मा (किरिस्तांवा प्रमाणें उपदेश) करितो. तो असाकीं. या प्रमाणें पांचालांचे धर्म सांगीतले आहेत हेच ब्राह्मण यानांच वेदकर्माचा अधिकार सांगितला व गायत्री मंत्र व यज्ञकर्मांचे अधिकारी हेच आहेत. गायत्री मंत्र व यज्ञ कर्म करण्यास पांचालां शिवाय अन्यांस अधिकार नाहीं ह्मणोन मागें कथा येऊन निकाल केला आहे यावरून विचार पाहतां ऋषी अवलादीचे लोक गायत्री मंत्राचा जप करितात व यज्ञादिक कर्मेंही करितात हें आजपावेतों अनन्वित झालें आहे आतां वाचक हो या ऋषी अवलादीस विचारा कीं, तुह्मास गायत्री मंत्राचा व यज्ञ कर्माचा अधिकार असल्यास याविषयीं काय वचन व कोणत्या ग्रंथांत आहे असें विचारून पहा. नंतर त्यांच्या कडून काय जबाब येतो तें पाहा ह्मणजे खातरी होईल. मागें पासून करीत आले यासाठीं, त्यांजकडून आतां करवू नका त्याणीं आपल्यास हा अधिकार आहे असा शास्त्रार्थ दाखवावा- ऋषीलोकांनी अन्य जातींस आपण ब्राह्मण आहोंत असें सांगून फसविलें आहे यासाठीं आह्मीं या ग्रंथाची रचना करून सर्वांस विदित होण्या साठीं छापून प्रसिद्ध केला आहे तर यांत लिहिल्या गोष्टींचा सर्वांनीं चांगला विचार करून आतां तरीं सावध व्हा आणि ऋषी

अवलादीकडून कांहीं हव्यकव्यादी कर्मे करवूं नका यामागें नकळून जें झालें तें व्यर्थ गेलें आहे. ही कथा सांगून राहिलेला विषय उत्तर ग्रंथीं निवेदन करीन. पंचमोध्यायः समाप्तः वाचक हो. हा वरील सोनारानें लिहिलेला अर्थ वाचून पाहा. आणि त्या सोनाराचें लिहिणें खरें किंवा मी जीं वेदादिकांतील वचनें दाखविलीं तीं खरीं, याचा विचार करा ह्मणजे ऋषींला वेदाचा अधिकार आहे किंवा सोनारादिकांस आहे. तें सहजच ध्यानांत येईल. असो या प्रमाणें सोनाराच्या ब्रह्मविचार ग्रंथाच्या ५ व्या अध्यायांतील मुख्य विषयांचें खंडण झालें. अथषष्ठाध्यायप्रारंभः ॥ श्रीगणेशायनमः ॥ सांप्रतकालीं ऋषिलोकांत तऱ्हतऱ्हेच्या चाली आढळतात त्या अशा कीं, कांहीं लोक स्मार्त कांहीं वैष्णव मताचे कांहीं शाक्त मताचे या प्रमाणें जसें ज्याचे मर्जीस आलें त्या प्रमाणें वहिवाट चालवीत आहेत. वीर वैष्णव जे आहेत ते अंगावर तप्तमुद्रा घेतात ह्मणजे मुद्रा तापऊन आपल्या आंगावर ठेवितात तेणेंकरून मुद्रेवरील अक्षरें आंगावर उठतात तीं कधींही जावयाचीं नाहींत अशा प्रकारच्या मुद्रा घेणारे जे आहेत त्यांची समजूत काय झाली असेल ती असो परंतु असा शास्त्रार्थ मुळींच नाहीं आणि मुद्रा घेण्याचा यांचा अधिकारही नाहीं त्याणीं हा दांभिक धर्म काढिला आहे यांत ईश्वर प्राप्ति होईल असें नाहीं. रामदाशी पंथाचे जे आहेत त्यांच्या मुद्रेवर (श्रीराम जयराम जय जयराम) हा मंत्र असतो अशा मुद्रा मस्तकास दंडावर छातीवर आणि नेत्रांचे बाजूस आखांवर या प्रमाणें लावितात. परंतु असाही शास्त्रार्थ आढळत नाहीं या मुद्रा ते लोक अशासाठीं लावितात कीं लोकांनीं आपल्यास साधु साधु असें ह्मटलें पाहिजे आणि नेत्रांचे बाजूस आंखांवर लाविल्यानें चेहेऱ्यास शोभा येते हाच त्यांचा मानस परंतु मुद्रा लावण्याचा यांचा धर्म नव्हे. तर कोणी कशा लावाव्या याविषयीं ग्रंथाधार ही मिळाले वचना सहित लिहितों. अग्निपुराण. मनुमुद्राशंखवच्च मय मुद्रान चक्रवत्॥ लग्नामुद्रा गदाधारा शिलिकोपद्मकन्नया॥१॥ ओंकारमुद्रा देवस्य पंचमुद्राःप्रकीर्तिताः॥ पंचमुद्रा नजाना

ति ब्राह्मणे जन्मनिष्फलं ॥ २॥ "यज्ञसूत्रपां चालानें केलें तें सांगतो" त्वष्टेनकांति तंसूत्रंमथनत्रिगुर्णाकृतं ॥ मनुनादीयतेग्रंथिर्वेदमंत्रेणस्थापितं ॥ **अर्थ**- त्वष्टा यानें सूत कांतून मयानें त्रिगुणी केलें नंतर मनूनें ग्रंथी देऊन वेदमंत्रें करून स्थापन केलें. चाती करण्याचें काम दैवज्ञाचें आहे म्हणून दैवज्ञानें चाती केली मयानें त्या चातीस लांकडाचा दांडा घातला नंतर मनूनें लोखंडाचें पात्र करून त्वष्टा यानें भस्म दिलें याप्रमाणें पांचांनीं जें लागलें तें पुरविलें. मनु हा लोहकार यासाठीं त्यानें लोखंडाचें पात्र केलें त्वष्टा हा अग्निरूप असल्यामुळें त्यानें भस्म दिलें आणि शिल्पि जो हा वनस्पतीचा स्वामी होय त्याणें आपल्या हृदयांतून कापुस दिला. वाचकहो- हे वरील २ श्लोक **व्यासकृतअग्निपुराणांत** मुळींच नाहींत व अशा अर्थाचे अन्य पुराणांत दुसरे श्लोकही नाहीत. तेव्हां हे २ श्लोक स्वकपोलकल्पित असोन व्याकरणविरुद्धही आहेत. कारण. **त्वष्टा मुद्रा** अशी संधि होत नाहीं. त्वष्टमुद्रा किंवा **त्वष्टुर्मुद्रा** अशी होते तसेंच शिल्पिकोपघ्नकस्तथा असा प्रयोगही अशुद्ध आहे व **त्वष्टेनकांतितंसूत्रं** येथें **त्वष्टेन** ही तृतीया कोणत्या व्याकरणानें होत असेल ती सोनारांस माहीत असेल **त्वष्ट्रा** अशी सर्वांस माहीत आहे आतां वरील तीन श्लोक अग्निपुराणामध्यें आहेत किंवा काय असें पाहण्या करितां मी अग्निपुराणाच्या प्रती मेळवून सर्व वाचून पाहतां त्याच्या (अग्निपुराणाच्या) २६ अध्यायांत मुद्राधारण विधि आहे. परंतु हे दोन श्लोक मुळींच नाहींत. याकरितां येथें अग्निपुराणाचा २६ वा अध्याय लिहावयाचा होता परंतु ग्रंथवृद्धिभयास्तव सर्व न लिहितां संक्षिप्त अनुक्रमणिका लिहितों ती पाहून **स्थालीपुलाक** न्याया प्रमाणें निश्चय करणें हें विद्वान् वाचकाचें अवश्य कृत्य आहे. अग्निपुराण अध्याय २६ मुद्रालक्षणम् नारद उवाच ॥ मुद्राणांलक्षणं वक्ष्ये सांनिध्यादिप्रकारकं अंजली प्रथमा मुद्रा वंदनीया द्वितीया तृतीया ऊर्ध्वांगुष्ठो वाममुष्टिर्दक्षिणांगुष्ठबंधनं ॥ सव्यस्यतस्य चांगुष्ठो यस्य चोर्ध्वे प्रकीर्तितः ॥ तिस्रः साधारणाव्यूहे अथासाधारणा इमाः कनिष्ठादिविमोकेन अष्टौ मुद्रा यथाक्रमात् ॥ अष्टानां पूर्ववीजानां० अंगुष्ठेन कनिष्ठांतं० ऊर्ध्वं कृत्वा संमुखं च० वामहस्तमधोन्नानं० वराहस्य स्मृता मुद्रा० एकैकां मोचयेद्द्वा०

आकुंचयेत्पूर्वमुद्रा० ऊर्ध्वांगुष्ठो वाममुष्टी० इत्यादि महापुराणे आग्नेये मुद्राप्रदर्शनंनाम षड्विंशोध्याय: । याप्रमाणें अग्निपुराणामध्यें सबंध २६ वा अध्याय मुद्राधारणाविषयीं असून त्यास अग्निपुराणाचें नांव देऊन खोटे श्लोक लिहिणें हें सोनारांचें कृत्य "**उचलली जीभ आणि लावली टाळ्यास**" या स्त्रियांच्या म्हणीप्रमाणेंच समजलें पाहिजे. असो पुढें हरिदास, पुराणीक, रामदाशी **श्रीमज्जगद्गुरु शंकराचार्य,** इत्यादिकांची निंदा करून पेशव्यांनीं आमचा धर्म बुडविला असें रडगाणें लिहून पुन: सोनार असें लिहितो कीं. ऋषी आपआपल्यांत पत्र लिहावयास लागले तर वेदमूर्ति अमुक शास्त्रीबावा असें पत्रांत लिहितात परंतु असें लिहिण्यास ते योग्य नाहींत वेदमूर्ति म्हणजे ते साक्षात् वेद तर असे साक्षात् वेद पांच पांचाल ब्राह्मण कीं ज्यांच्या पासून मूर्तिमंत वेद उत्पन्न झाले तेच वेदमूर्ती नांव पावतील अन्याचा हा अधिकार नाहीं मूर्ति-

३ असें हेडिंग देऊन दोन खोटे श्लोक करून लिहिले आहेत ते येथें ग्रंथवृद्धिस्तव लिहीत नाहीं. आणि या (ब्रह्मविचार) ग्रंथांत स्कं. ना. लिं. शे. रुद्रयामल, अग्निपुराण, अशीं हेडिंगें देऊन जे श्लोक लिहिले आहेत ते सर्व खोटे आहेत. सबब सर्व ठिकाणीं लिहीत नाहीं. असो पुढें सोनार असें लिहितो कीं वास्तुशांतीमध्यें लोहारादिकांचीच पूजा करावी असें आहे यास प्रमाण. **अथ भाष्यकार:**[*] वाचकहो. हें वरील लिहिलेलें भाष्य तर खोटेंच आहे आणि त्याचा अर्थ असा होतो कीं वास्तुकर्मामध्यें लोहारादिकांला सोडून ब्राह्मणादिकांचीच पूजा करितात त्यांचें अज्ञत्व आहे. आणि **वासुदेव आत्माराम शेट सोनार** हेही अर्थ असाच लिहितात परंतु त्या खोट्या भाष्या वरून व सोनाराच्या लिहिण्या वरून ही लोहारादिक निराळे व ब्राह्मण निराळे असा अर्थ उघड निघतो याचा विचार भाष्यकर्ते वेळीं किंवा अर्थ लिहिते वेळीं तरी वासुदेव शेट सोनार यांनीं कसा केला नसेल तो नसो. परंतु मला असें वाटतें कीं खरें असेल तें पुढें येतें. असो याप्रमाणें **वासुदेव शेट सोनार** यांनीं केलेला ब्रह्मविचार ग्रंथ याच्या सहाव्या अध्यायांतील खोट्या विषयाचें खंडन झालें. आतां सातवा अध्याय

* हें भाष्य पूर्वीं लिहिलें आहे

तर सोनारादिकांच्या पूर्वपुण्याचा कळससमजला पाहिजे कारण सोनारादिकांचा कुलपरंपरागत धर्म असा आहे कीं वेदमार्गप्रवर्तक जे ऋषी त्यांची निंदा करावी त्या प्रमाणें ह्या ७ व्या अध्यायांत त्यांनीं आपलें कर्तव्यकर्म केलें आहे तें वाचकांस प्रदर्शित करितों. आतां ऋषींची उत्पत्ती कशी झाली तें आह्मीं उघड दाखवितों. **शिल्पशास्त्र**[‡]. श्रीगणेशायनमः॥ ऋषिणांजाति कथनं ऋषि कूलंच कथ्यते॥ केनजन्मकेनमृत्यु र्मेविदंचात्रषण्मुख॥ १॥ शिल्पशास्त्रं आदि तश्चअन्यकर्मविनिर्मितं॥ विश्वादिक्रियाधर्मंच विश्वकर्माचकथ्यते॥ २॥ ऋषि बीजकुलंनास्ति अनेककुलजातयः॥ ऋषेश्वरं जाति नास्ति तस्यजन्मनकारयेत् ॥ ३॥ ऋषेश्वरंनीचया जातिभेदंनकारयेत् ॥ ऋषेश्वरंजाति नास्ति विजातिबहु संभवा॥ ४॥ येकवर्णा ब्राह्मणास्ते नकवर्णा महर्षयः॥ येकवर्णांचजातिश्च नानाजा तिर्ऋषिस्तथा॥ ५॥ मनुवंशाकुलेरत्नं कश्यपोकुलदीपकः॥ पंचब्रह्मस्यपंब्रह्म कश्यपो ब्राह्मब्राह्मणाः॥ ६॥ कश्यपोब्रह्मअदिश्च ब्राह्मणोजातिकश्यपः॥ ब्रह्मसृष्टिस्तथाचैव ब्रह्मकर्मसमाचरेत्॥ ७॥ द्विजंचकथययाति द्विजानांचकथंद्विज॥ ब्राह्मणाजन्म नाश्चैव वर्णानां निर्णयं तथा॥ २०॥ ब्राह्मणांचकथंनाम उत्पत्तिकेंचस्थानके॥ क्रिया कर्म कथंदेव ब्रूहिमेपरमेश्वर॥ २१॥ ईश्वरउवाच॥ शृणुषण्मुखमहाप्राज्ञमहाज्ञा नपरायण॥ कथितंऋषिकुलंच जातिवर्णाश्रमंतथा॥ २२॥ मच्छकूर्मवराहंच नारसिंहंच वामनं॥ रामंरामंच कृष्णांच बोध्यंकालंक्रियंतथा॥ २३॥ पिंगळीगर्भसंभूतो पिंगळोयमहामुनि॥ तपसाजायते० २४॥ विणाकिगर्भसंभूतो विणाकोयमहामुनिः॥ तपसाजायते०॥ २५॥ अश्विनीगर्भसंभूतो अश्वत्थोयंमहामुनिः॥ तपसाजायते०॥ ... ६॥ कुरंगीगर्भसंभूतो ऋष्यशृंगमहामुनिः॥ तपसाजायते०॥ २७॥ कलशगर्भसं...तो अगस्तीयोमहामुनिः॥ तपसाजायते०॥ २८॥ भिल्लिणीगर्भसंभूतो वाल्मिके ...महामुनिः॥ तपसाजायते०॥ २९॥ रासभीगर्भसंभूतोगर्गाचार्योमहामुनिः॥ तपसाजाय ...॥ ३०॥ क्षेत्रीयगर्भसंभूतो विश्वामित्रोमहामुनिः॥ तपसाजायते०॥ ३१॥ श्वान गर्भसंभूतो शौनाचार्योमहामुनिः॥ तपसाजायते०॥ ३२॥ दुदुरीगर्भसंभूतो दो...यंमहामुनिः॥ तपसाजायते०॥ ३३॥ श्वपचीगर्भसंभूतो सांख्यायनमहामुनिः॥ ...जायते०॥ ३४॥ त्रृणमध्येचसंभूते कृपाचार्योमहामुनिः॥ तपसाजा०॥ ३५॥ कृशम

[‡] हे श्लोक सोनाराच्या पुस्तका प्रमाणें आहेत, आमचा हस्तदोष नाहीं.

ध्येन्वसंभूतो कौशिकेयोमहामुनिः॥ तप०॥३६॥जंबुकीगर्भसंभूतो जंबुकश्चमहामुनिः ॥तपसा०॥३७॥कासीगर्भसंभूतो कासाचार्योमहामुनिः॥ तपसा०॥३८॥कणोजीगर्भसंभूतो कंदनाचार्योमहामुनिः॥ तपसा०॥३९॥ लाडिनीगर्भसंभूतो लाडकीन्वमहामुनिः॥ तपसाजायते०॥४०॥ बिज्वलीगर्भसंभूतो कुंजनाचार्यमहामुनिः॥तपसाजायते०॥४१॥ तांबोलीगर्भसंभूतो नदाचार्योमहामुनिः॥ तपसाजायते०॥४२॥ कोळणीगर्भसंभूतो वामनाचार्यमहामुनिः॥ तपसाजायते०॥४३॥ तेलणीगर्भसंभूतो नारणाचार्यमहामुनिः॥ तपसाजायते०॥ ४४॥ वैशिणीगर्भसंभूतोवैह्यायन महामुनिः॥तपसाजायते०॥ ४५॥तांबटीगर्भसंभूतो भार्गवाचार्यमहामुनिः॥तपसाजायते०॥४६॥ न्यायनीगर्भसंभूतो कौंडण्योयेमहामुनिः॥तपसाजायते० ॥४७॥ शाळिणीगर्भसंभूतो शांतनश्चमहामुनिः॥तपसाजायते०॥ ४८॥ चर्मकीगर्भसंभूतो चंपाचार्यमहामुनिः ॥ तपसाजायते०॥ ४९॥ कोष्ठिनीगर्भसंभूतो कोष्टिकायोमहामुनिः॥ तपसाजायते०॥ ५०॥ डोणकीगर्भसंभूतो बृहनाचार्यमहामुनिः॥तपसाजाय०॥५१॥ बुडणीगर्भसंभूतो दंडाचार्योमहामुनिः॥ तपसाजाय०॥५२॥सिंपिणीगर्भसंभूतो मार्गजंन्वमहामुनिः॥ तपसाजाय०॥५३॥ वाचकहो. याप्रमाणें १०६ श्लोक लिहिले आहेत परंतु ग्रंथवृद्धिभयार्थ येथें सर्व लिहिले नाहींत पुढें तर धनगरणीगर्भसंभूतोनिधनाचार्यमहामुनिः॥ खाटकीगर्भसंभूतोखट्वाचार्योमहामुनिः असे श्लोक असून पुढें फळश्रुती ही आहे. परंतु हे १०६ श्लोक शिल्पशास्त्रांत मुळींच नाहींत व या अर्थाचे श्लोक अन्यग्रंथांत ही नाहींत. असें असून वासुदेव आत्माराम शेट सोनार यानें ठोकड्या शास्त्रांतील एका भंगड शास्त्र्याकर्वी केलेले असावे कारण भिल्लिणी, लाडिणी, तांबोळी, कोळणी, तेलिणी, तांबटी, कोष्टिनी, बुर्डिणी, सिंपिणी, धनगरणी, खटकी, इत्यादिक शब्द कोशांत किंवा वेदशास्त्रपुराणादि काव्यें [illegible]ादिक संस्कृत ग्रंथांत कोठेंच आढळत नाहींत. केवल प्राकृत ग्रंथांत किंवा लावण्यांतच आहेत आणि शिल्पशास्त्र हें संस्कृत भाषेंत आहे व त्याचे अध्याय १२ आहेत व त्यांतील विषय प्रथमाध्यायांत वास्तुपुरुषाचीउत्पत्ती, त्याचें पूजन,

भूपरीक्षा २ गृहनिर्माणास चैत्रादिमासनिर्णय ३ गृहनिर्माण काल ४ शयनस्ना नादिमंडपनिर्णय ५ वास्तुदेहलक्षण गणेशपूजनादिनिर्णय ६ अनेकप्रकारची गृहनिर्माणयुक्ति ७ शयनादिभेदें करून गृहनिर्माणविचार ८ कूपजलाशयादिविचार ९ वृक्षच्छेदनविचार १० गृहप्रवेशादिविचार ११ दुर्गनिर्माणविधान १२ शल्योद्धारकथन १३ गृहवेधनिर्णयादि असून ह्याचा प्रथम श्लोक प्रवक्ष्यामि मुनिश्रेष्ठ शृणु ध्वेकाग्रमानसः ॥ यदुक्तं शंभुना पूर्वं वास्तुशास्त्रं पुरातनं ॥ पराशरःप्राह बृहद्रथाय बृहद्रथः प्राहच विश्वकर्मणे ॥ सविश्वकर्मा जगतां हिताय प्रोवाच शास्त्रं बहुभेदयुक्तं ॥ असा आरंभ असून याशिवाय शिल्पशास्त्राचें समरंगण, **प्रसादमंडन, रूपमंडन, क्षीरार्णव, विश्वकर्मप्रकाश, राजवल्लभ, अग्निपुराणोक्त शिल्पप्रकरण, मत्स्यपुराणोक्तशिल्पप्रकरण, आणि शिल्पमहोदधी,** इत्यादि ९ ग्रंथ असून त्या तितक्याही ग्रंथांत या ब्रह्मविचारांतील छिचोर कवित्वाची योजना कोठेंच केल्याची आढळत नसून समावेशही नाहीं. दुसरें शिवरहस्याचे एकंदर अध्याय २९ असून संपूर्णग्रंथसंख्या १०३२ आहे. पैकीं यांतील विषयानुक्रम १ शैवार्चन २ जपविधि ३ होमविधि ४ पुनश्चरणविधि, ५ मंत्रोद्धारविधि, ६ यंत्रोद्धारविधि, ७ स्तवराज, ८ कवच महात्म्यादिक असून शेवट काशीप्रभाववर्णन याप्रमाणें शिवरहस्याचें वर्णन असून वासुदेवशेट सोनार हे शिवरहस्यांत असेंच आहे असें लिहितात तें सर्व मिथ्या आहे सारांश कीटेन कोरितंकाष्ठंपुस्तकं पडिलंभुमिं॥ कवन करीलंगडयामाणको बाईचा जावाई. या कवितेसारखीच हिन्दी रचना आहे. आतां येथें सोनार अशी शंका घेतील कीं हे वरील श्लोक व्याकरण व कोशादिकास विरुद्ध आहेत व शिल्पशास्त्रांतील नव्हे खरे परंतु या श्लोकांतील भावार्थाप्रमाणें ऋषींचा उत्पत्ति आहे किंवा नाहीं तरि त्यांस (सोनारांस) असें सांगावें कीं त्याच ग्रंथाच्या उत्तरार्धांत ऋषींचीं जन्मकर्मा विषयीं प्रमाणें लिहीन तीं पहा म्हणजे खात्री होईल. असो आतां वासुदेवआत्मारामशेट सोनार यांनीं मत्स्यपुराणांतील एक इतिहास बायकांच्या मुखांतून ऐकून त्याचा पूर्वापरसंबंध न ऐकता व **गरुडपुराण,** हरिवंश इत्यादिकामध्यें

हाच इतिहास असून त्याचा विचार न पाहतां ऋषींची निंदा करण्यास प्रवर्तक हो- ऊन असें लिहितात कीं "ऋषीचें कूळ आणि भस्माचें मूळ काढूं नका" अ शीजी ह्मण आहे ती पुरातन पासून आबाल वृद्धास माहीत आहे. अतिशू द्र हे मेलेल्या गाई खातात परंतु ऋषी हे प्रत्यक्ष जीवंत गाय मारून खातात यावरून अतिशूद्राचें आणि ऋषी यांचे आचरणांत फरक नाहीं परंतु अति शूद्राचें आचरण पाहिलें असतां ऋषीपेक्षां कांहींबरें आहे तें असें कीं, ऋषी हे जीवंत गाय मारून खातात आणि अतिशूद्र हे मेलेली खातात यावरून अति शूद्रापेक्षां ऋषीचें कर्म किती निंद्य आहे हें उघड दिसतें. असें लिहून मत्स्यपुरा णाच्या २० अध्यायांतील ३।५।६।७ असे ४ श्लोक लिहिले हे ४ श्लोक खरे आहेत. परंतु यांचा इतिहास असा आहे कीं. कौशिकऋषीचे स्वसृप, क्रोधन, हिंस्र, पिशन, कवी, वाग्दुष्ट, पितृवर्ती असे सात पुत्र होते त्यांनीं अनावृष्टिकालीं क्षुधेनें व्याकुल होत्साते गर्गाचार्यांची सवत्स कपिला गाय अरण्यात चारीत असतां श्राद्धार्थ त्या गाईचा वध करून श्राद्ध केलें अशा इतिहासावरून वासुदेव आत्मारामशेट सोनार बडबड करितात परंतु त्या च अध्यायांतील पूर्वापर संबंध पाहतां पंचभिर्जन्मसंबंधैर्गताविष्णोः परंपदं।।च क्रे समाहितःश्राद्धं सुपयुज्यचतांपुनः।। अनावृष्टिश्च महती सर्वलोकभयंकरी।। इत्यादिकश्लोकांवर किंवा मनुस्मृति अध्याय ५। श्लोक ।। मधुपर्केच यज्ञेचपितृदै वतकर्मणि । अत्रैवपशवोहिंसानान्यत्रेत्यब्रवीन्मनुः।एष्वर्थेषुपशून्हिंसन्वे दतत्त्वार्थविद्विजः। आत्मानंचपशूंश्चैवगमयत्युत्तमांगतिं। यावेदविहिताहिंसा नियतास्मिंश्चराचरे। अहिंसामेवतांविद्याद्वेदाद्धर्मोहिनिर्बभौ। योहिंसकानिभू तानि निहंत्यात्मसुखेच्छया। सजीवंश्च मृतश्चैव न क्वचित् सुखमेधते। य- ज्ञार्थं पशवः सृष्टाः स्वयमेवस्वयंभुवा। यज्ञस्य भूत्यै सर्वस्य तस्माद्यज्ञे वधोऽ वधः। प्रोक्षितं भक्षयेन्मांसं ब्राह्मणानांच काम्यया। यथाविधिनियुक्तस्तु प्रा- णानामेवचात्यये।प्राणस्यान्नमिदंसर्वंप्रजापतिरकल्पयत्।स्थावरंजंगमंचै वसर्वंप्राणस्यभोजनमितिमनुः अ. ५। श्लो. २७ ४१।४२।४३।४४।४५ तथा। "प्राणात्ययेतथाश्राद्धेप्रोक्षितंद्विजकाम्यया।। देवान्पितृन्समभ्य

[illegible] नागात याज्ञवल्क्यस्मृति अ०१ श्लो०१२ तथा। माता रुद्राणां दुहिता वसूनां स्वसादित्यानाममृतस्य नाभिः प्रनुवोचं चिकितुषे जनाय मा गामनागामदितिं वधिष्टेत्यादि ऋग्वेदेपि। अ०८ नामांसो मधुपर्को भवति भवति आश्वलायनगृह्यसूत्र अ० १ खं० २४ इत्याद्यनेक प्रमाणें श्राद्धयज्ञादिकांत पशू मारण्याविषयीं असून तें युगही यज्ञाचें होतें; इत्यादि सबळ पुरावे शास्त्राचे असतां त्यानें (वासुदेव शेट सोनार यानें) याकडे कानाडोळा कां केला असेल तो असो. असो आतां याचविषयीं दुसरीं प्रमाणें गरुडपुराण प्रेतकल्प अ० १२ भरद्वाजात्मजाः सप्त पुत्का जन्मपरंपरां। कृत्वापि गोवधं तार्क्ष्य मुक्ता पितृप्रसादतः ॥१७॥ सप्त व्याधा दशार्णेषु मृगाः कालंजरे गिरौ। चक्रवाकाः शरद्वीपे हंसाः सरसि मानसे ॥१८॥ तेपि जाताः कुरुक्षेत्रे ब्राह्मणा वेदपारगाः ॥ पितृभक्त्या च ते सर्वे गता मुक्तिं द्विजात्मजाः ॥१९॥ हरिवंशामध्येंहि असा इतिहास आहे. असें असून मनु, याज्ञवल्क्य, पुराणें, आगम, भारतादि ग्रंथाचें अवलोकन नकरितां वासुदेव आत्माराम शेट सोनार आपल्या अज्ञानवर्धकरूप ब्रह्मविचार नामक ग्रंथाच्या सातव्या अध्यायांत भंगड लोकासारखे बडबडतात हे त्यांचें (सोनाराचें) बडबडणें "मुखमस्तीति वक्तव्यं" तोंड आहे म्हणून बोलावें या प्रमाणेंच समजलें पाहिजे आणि "विना शास्त्रेण यो ब्रूयात्तमाहुर्ब्रह्मघातकी" शास्त्रावांचून जो बोलतो त्याला ब्रह्महत्येचें पातक लागतें या वचनाला तर मुळींच मानीत नसतील किंवा माहीत नसेल. सारांश मत्स्यपुराणांतील इतिहास सत्य व श्रुति, स्मृति, पुराणें, इतिहास, आगमादिकास अवलंबून आहे असें असून सोनारांनीं अतिशूद्रापेक्षां ऋषी नीच ठरतात असें लिहिलें यांत ब्राह्मणद्रोहयुक्त पातकें करून नरक आपलासा केला. अस्तु पुढें सोनार असें लिहितात कीं, एकंदर दहा ऋषी आढळतात आणि हल्लीं दाहांहून जास्त भरतात याचें कारण कांहीं अर्वाचीन आहे. श्लोक* सारस्वताः कान्यकुब्जा गौडा उत्कल मैथिलाः। पंचगौडा इति ख्याता विंध्यस्योत्तरवासिनः ॥२॥ द्राविडाश्चैव तैलंगा कर्नाडा मध्यदेशगाः। गुर्जराः पंचधाश्चैव द्राविडाः पंच कथ्यते ॥३॥ असे दोन श्लोक लिहून पुढें स्कं० पु० स० खं० अ० ८२ शृणु पुत्र प्रवक्ष्यामि इतिहासं पुरातनं ॥ कराष्ट्र देश नामानं दश योजन विस्तरं ॥ २॥ वेदवत्या

* हे सर्व श्लोक सोनारांच्या पुस्तकाप्रमाणेंच आहेत.

चोन्नरेतुकोइनासंगदक्षिणे। कराटदेशनामंच दुष्टदेशःप्रकीर्तितः ॥ ३॥ सर्व लोकाश्च कठिणा दुर्जनाः पापकर्मिणः । तद्देशजाश्च विप्रा तु कराट इति नामतः ॥ ४॥ पापकर्मा महानष्टाः व्यभिचारेण उत्पत्तिः । असे १६ श्लोक लिहून त्याचप्रमाणें रस्त्यावर जाहिराती ही लाविल्या. परंतु त्या वासुदेव आत्मारामशेट सोनारास असें सांगावें कीं, तुह्मी जें सह्याद्रिखंड पाहिलें तें सर्व मिथ्या असून पूर्वापरसंबंधशून्य व व्याकरणादिकास विरुद्ध व्यासकृत इति ह्यासाला सोडून आहे. कारण. ह्या सह्याद्रिखंडाच्या प्रति आह्मी बहुत मिळविल्या आणि सर्व तपासून पाहतां सह्याद्रिखंडें दोन आढळतात आणि संवाद व इतिहास भिन्न आहेत तुह्मी (सोनारानीं) लिहिलेल्या सह्याद्रिखंडांत सनत्कुमार, शंकर, गणपति स्कंद इत्यादिकांचा संवाद व दुसऱ्या सह्याद्रिखंडांत धर्मराज व मार्कंडेय ऋषि यांचा संवाद आहे तो असा कीं, युधिष्ठिरउवाच । कथितानि मुनिश्रेष्ठ तीर्थानि भवतामम। क्षेत्राणिचैव सुरव्यानि वनानिवनवासिनां॥१॥ बदर्यादीनि स्थानानि नैमिषंपुष्करंतथा। सह्याद्रेर्दंडकारण्ये माहात्म्यं वदसुव्रत॥२॥ मार्कंडेयउवाच। शृणु वत्स प्रवक्ष्यामि सह्याद्रेर्दंडकेवने। देवदेवःस्वयंयत्र सदातिष्ठति दैत्यहा॥३॥ दत्तात्रेयोमुनिर्यत्र यत्रदेवीचरेणुका। रामस्तु सर्वदायत्र संस्थितोभार्गवःस्वयं॥४॥ यस्मिन्क्षेत्रे महाराजद्विसप्ततिचतुर्मुखाः। मुक्तिंप्राप्तास्तथासर्वेसिद्धाद्याःसनकादयः॥५॥ कृष्णाधात्रीफलोयत्रवृक्षस्तिष्ठति सर्वदा॥ यत्रदेवश्चदेवाश्च शिवश्च परमेश्वरः॥६॥ ब्रह्मप्रणीताचनदीयत्रतिष्ठतिसर्वदा। क्षेत्रमाकर्णयन्नृपभुक्तिमुक्तिप्रदंनृणां॥७॥ मयाश्रुतंपुराशंभोः सकाशात्स्कंदसंनिधौ॥ देवानां दुर्लभंस्थानंयत्रदत्तःस्वयंमुनिः॥८॥ असा आरंभ असून त्याप्रमाणें अनेक तीर्थादिकांचें वर्णन. व रेणुकामाहात्म्य, ब्राह्मणादिकांचें वर्णन सविस्तर आहे व ह्या पुस्तकाच्या प्रति मजपाशीं आहेत ज्यास पाहण्याची इच्छा असेल त्यास प्रीतिपूर्वक दाखवीन ह्या पुस्तकाच्या प्रती २०० वर्षांच्या पूर्वींच्या आहेत प्रत्यक्ष पाहिल्यावर खात्री होईल. सारांश सोनारांनीं लिहिलेल्या सह्याद्रिखंडांत कोइनानदीच्या उत्तरेस कराष्ट्रनामक दुष्टदेश आहे त्यास प्रस्तुत कराड असें ह्मणतात तेथील सर्व लोक कठोर,

दुर्जन पापकर्मी असें होते इत्यादि बहुत वर्णन आहे परंतु करहाटक्षेत्रमहात्म्य" अगस्त्यसंहितेंतील कृष्णामाहात्म्यांत आहे. त्याला व या इतिहासाला बहुत विरोध येतो तो असा कीं, करहाटक्षेत्रमाहात्म्यांत त्या देशाचें वर्णन काशीक्षेत्राप्रमाणें आहे व सोनारांनी लिहिलेल्या ८२ अध्यायांत निंदा आहे. आणि २५।२६ श्लोकांत करांडदेश दहा योजनें असून तो दुष्ट आहे परंतु त्यामध्यें पांचकोस कोल्हापुर क्षेत्र मात्र पुण्यकारक आहे. तेव्हां या उभय वाक्याचा विचार करणें हें विद्वान् वाचकांचें काम आहे. ग्रंथवृद्धिभयार्थ येथें विस्तार लिहीत नाहीं परंतु सोनारादिकांस सह्याद्रिखंडाविषयीं माहिती पाहिजे असेल तर त्यानीं राजनीतीप्रमाणें सर्व विद्वानांस बोलावून सभा करावी ह्मणजे मी सर्व पुस्तकें आणून सर्वविद्वानांसमक्ष त्यांची (सोनारादिकांची) चांगली समजूत करीन. आणि सभा केल्याशिवाय किंवा उभयग्रंथाचा निर्णय केल्यावांचून जर वासुदेव आत्माराम शेट सोनार आदिकरून बडबड करितील किंवा नाटकाप्रमाणें रस्त्यावर जाहिराती लावितील तर "गांडीचें सोडलें आणि डोकीस गुंडाळिलें" अशा पोरकट ह्मणीप्रमाणेंच समजून विद्वानांस उगीच बसावें लागेल. बरें इतकें असून ही वासुदेव आत्माराम शेट सोनारादिकांस जर दांडगाईनें चित्तपावनादिक जातीविषयीं खोट्या सह्याद्रिखंडावरून जाहिराती वगैरे प्रसिद्ध करणें असल्यास त्याच सह्याद्रिखंडाच्या ८४ अध्यायांतील २७।२८ श्लोकाचा व २५ अध्यायांतील ३९। ४० श्लोकाचा अर्थ लिहून नंतर इतर जातीविषयीं लिहावें. असो सारांश याप्रमाणें खोट्या वचनानीं युक्त अशा ब्रह्मविचार नामक सोनाराच्या ग्रंथांतील ७ व्या अध्यायाचें खंडन झालें. पुढें ८।९ या अध्यायांत स्कं. ना. रुद्रयामल, भाष्य अशीं हे डिंगें देऊन खोटे श्लोक लिहिले आहेत. कांहीं मनुस्मृतींतील श्लोक मात्र खरे आहेत परंतु त्या श्लोकांचा अर्थ सोनारादिकांकडे मुळींच लागू होत नाहीं. ह्मणून व ग्रंथवृद्धिभयास्तव सर्व लिहीत नाहीं. वाचकहो ह्या अनिर्वाच्य वचनयुक्त ब्रह्मविचारग्रंथाप्रमाणें श्रीधर बाबाजी मठकर या नावाच्या सोनारानें **सद्बोधचिंतामणी** या नावाचा एक ग्रंथ करविला. या ग्रंथाचा कर्ता मोठा सुज्ञ होता त्यानें वचनें खरीं लिहिलीं आहेत परंतु पूर्वापर संबंध सोडून भलत्याच विषयाकडेस लाविली आ

हेन आणि श्रीमज्जगद्गुरु शंकराचार्य व काशीक्षेत्रस्थ ब्राह्मणांची नांवें घालून खोटीं पत्रें करून छापिलीं आहेत. त्यांत प्रथमतः स्मृत्या व पुराणें, इतिहास, आगमादिकास तुच्छ मानून मूर्तिपूजेची निंदा करणारा **दयानंद सरस्वती** यानें सोनारांस संमतीपत्र दिलें आहे. त्यांत असें लिहिलें आहे कीं, ज्यास वाचा आहे त्यानें (स्त्री, शूद्र, अतिशूद्रानें) वेदाध्ययन करावें. यावरून सोनारांस मोठेंच भूषण आलें असेल असो पुढें श्रीमच्छंकराचार्यांच्या पत्रांत असें आहे कीं तुह्मास आज्ञापत्र असें दिलें कीं "अग्निपुराण" तथा "विश्वकर्मोत्पत्ति" प्रतिपादित श्रुतिकर्मांचा अधिकार आहे. तुह्मी स्वरवें वेदोक्त कर्म करावें, तथा नमस्कार करावा यांत हरकत नाहीं. आतां हें आज्ञापत्र तुह्मास योग्य आहे ह्मणून दिलें असे, तर यास कोणी एक तुमचे संगाती स्पर्धा व हरकत न करावी; जर कोणी करील त्यास आमची शफत असें शके १७०९ प्लवंगनामसंवत्सरे ज्येष्ठ ५ मी भौमवासरे. इत्यलं ॥ वाचक हो वरील श्रीमच्छंकराचार्यांच्या पत्रांत "अग्निपुराण" विश्वकर्मोत्पत्ति" प्रतिपादित श्रुतिकर्मांचा अधिकार आहे. असें लिहिलें आहे यावरून आह्मी उभय ग्रंथांचा शोध लाविला परंतु त्यांत सोनारादिकांस वेदोक्तकर्मांचा अधिकार आहे असें मुळींच नाहीं. यावरून व आमची शफत आहे अशा लेखावरून हें पत्र बनावट आहे असें सिद्ध होतें आणि अशींच बनावट पत्रें गोळक, घडशी, जिनगर इत्यादिकांपाशीं शिक्कामोर्तबासह आहेत. त्याचप्रमाणें सोनाराचें पत्र समजलें पाहिजे. असें दुसरें एक तेलंगु लिपींत शंकराचार्यांचें पत्र आहे त्यांत रथकारेत्यादिदैवज्ञ ऊर्फ स्वर्णकार याजला उपनयन, वेदाध्ययन, आलयप्रतिष्ठा, वास्तु, अध्यापनादि वृत्ती सांगितल्या आहेत यावरून वेदोक्त कर्म करावें. असें लिहिलें आहे व काशी क्षेत्रस्थ ब्राह्मणांचीं नांवें घालून एक पत्र छापिलें आहे. त्यांत वराहपुराणे " स्वर्णकारो दारुकारो शिलाकारस्तथैव च। अयस्कर स्ताम्रकारः पंचैते रथकारकाः। स्कंदपुराणे नागरखंडे वैदिक धर्माधिकारत्वंस्पष्टमेवउक्तं **अर्थ**— लोहार, कासार, सुतार, पाथरवट, सोनार यांस रथकार असें म्हणावें आणि यांना वेदोक्त कर्मांचा अधिकार आहे असें नागर खंडांत स्पष्ट आहे असे पुढें श्लोक लिहिले आहेत आणि पुढें " अग्निपुराणांतर्गत सुत्पत्ति

भृगुराह ॥ अग्निभ्य इदमुत्पन्नं मिथुन कार्यसाधकं। नाडीहस्तः पुमान् योषि त्कुंडी हस्ता प्रदृश्यते। तस्मादिदं स्वर्णरौप्य धातुकार्य प्रसाधकं वन्हिरेतः सुवर्णं चति दं वन्हि समुद्भवं। अग्निदेवात्समुत्पन्नं तस्माद्देवाग्नि संज्ञित **अर्थ.** अग्नीपासून एक मिथुन (एक स्त्री आणि एक पुरुष) उत्पन्न झालें तें असें कीं, पुरुषाच्या हातांत **फुंकणी** व स्त्रीच्या हातांत **कुंडी** असे अग्नि देवापासून जाहले म्हणून याना देवाग्नि असें ह्मणावें व सुवर्णाचे अलंकार करतील ह्मणून स्वर्णकार असे प्रसिद्ध होतील तस्मात् सोनारांस वेदोक्त कर्मांचा अधिकार आहे असें लिहून पुढें शके १७३८ युवानाम संवत्सरे आषाढ शुद्ध दशम्यां लिखितमिदं अशी मिती ही घातली आहे. वाचकहो- हें वरील पत्र पाहून आह्मी वराह पुराण, स्कंदपु. नागरखंड, अग्निपुराण इत्यादि ग्रंथ साद्यंत वाचून पाहिले परंतु यांतील एकही श्लोक सांपडत नाहीं व या अर्थाचे अन्य श्लोक ही नाहींत परंतु शके १७४२ सालांत "त्रिमिंगिलाचार्य" नामक एक रामानुजसांप्रदायी पंडित आला होता त्यानें सोनारांपासून बहुत द्रव्य खाऊन "रथकारकल्पद्रुम" यानावाचा एक ग्रंथ करून दिला आहे त्यांत "वर्षासु रथकारं। वर्षासु रथकारोग्नि मादधीत" इत्यादिक श्रुतिप्रमाणें करून रथकारास वेदाचा अधिकार आहे असें लिहून पुढें स्कंदपुराण नागरखंड, लिं. तो. रुद्रयामल, अग्निपुराण, शिल्पशास्त्र अशीं हे डिंगे देऊन खोटे श्लोक करून घातले आणि सोनाराकडून वेदकर्म चालवूं लागला. त्याकालीं पुणें मुक्कामीं सर्व विद्वज्जनांनीं सभा करून श्रीक्षेत्र पंढरी येथील राहणार वे ॥ श्री तात्यापाध्ये यानीं सर्व पुस्तकें सभेमध्यें आणून विचारिलें कीं; पंडितमहाराज, आपण जीं वचनें लिहिलीं आहेत तीं ह्या ग्रंथांत दाखवावीं इतकें बोलल्याबरोबर ते पंडित बावा सभेंतून निघून गेले नंतर पुणेकर लोकांनीं शेणमार केला. सारांश असा जो त्रिमिंगिलाचार्यानें केलेला रथकारकल्पद्रुमग्रंथ तोही हाल्लीं सोनारांपाशीं आहे. तो आह्मीं मोठ्या युक्तीनें मिळवून पाहतां श्रीमच्छंकराचार्यांचा व काशीक्षेत्रस्थ पंडितांच्या पत्रांत तीं सर्व खोटीं वचनें सांपडतात, तेव्हां हीं पत्रें खरीं किंवा खोटीं याचा विचार विद्वान् वाचकानींच करावा. तात्पर्यार्थ मुंबईंत राहणारे वासुदेव आत्माराम शेट सोनार,

श्रीधर बाबाजी मठकर सोनार व नारायण केशव सोनार यांनि वर्गानीं छापून प्रसिद्ध केलेले "ब्रह्मविचार, सद्बोधचिंतामणी, मुखमासी ब्राह्मणवर्णन नामक तीन ग्रंथ तपासून पाहतां त्यांतील वचनें त्रिमिंगिलाचार्यांच्या कृतीचीं आहेत. व श्रुति, स्मृति, पुराणें, इतिहास, आगमादिकांहून विरुद्ध आहेत तेव्हां असे खोटे ग्रंथ छापून सोनारादिक ब्राह्मण ठरतात असें नाहीं. तरि जे श्रुति, स्मृति, पुराणादिकांत दासीपुत्र सांगितले आहेत तेंच खरें आहे. आतां येथें कोणी संस्कृताऽनभिज्ञलोक शंका घेतील कीं, सोनारादिक लोम, विलोम, व दासीपुत्र, यांसि प्रमाण काय? तरी त्यांस आह्मी प्रतिज्ञापूर्वक असें सांगतों कीं, लोहार, सुतार, कांसार, पाथरवट, सोनार हे लोम विलोम दसीपुत्रच आहेत यांविषयीं प्रमाणें बहुतच आहेत परंतु येथें ग्रंथविस्तार भयास्तव सर्व न लिहितां दिग्दर्शन करितों तें येणें प्रमाणें

"लोहार, सुतार, कांसार, पाथरवट, सोनार, या पांचांची उत्पत्ती व जीवनार्थ कर्मे"

आतां लोम, विलोम, अनुलोम इत्यादि जाति संक्षेपानें सांगतों **याज्ञवल्क्य स्मृति** अ. १ श्लो. विप्रान्मूर्धावसिक्तोहि क्षत्रियायां विशः स्त्रियां। अंबष्ठः शूद्र्यांनिषादो जातः पारसवोपिवा॥९१॥ तथाच गोपिनाथकृत जातिविवेके। मूर्धावसिक्तोंबष्ठश्चनिषादोब्रह्मतः क्रमात्। माहिष्योग्रोक्षत्रियतोनुलोमाः करणोविशः॥२॥ इत्यनुलोमषट्कं॥ **अर्थ** ब्राह्मणापासून क्षत्रियेचे ठाई विचारपूर्वक जो पुत्र उत्पन्न झाला तो मूर्धाभिषिक्त होय. आणि वैश्यकन्येचे ठाई ब्राह्मणापासून झाला तो अंबष्ठ. शूद्रकन्येठायीं ब्राह्मणापासून झाला तो निषाद किंवा पारसव. वैश्येचे ठाई आणि शूद्रिणीचे ठाई क्षत्रियापासून झाले जे दोन पुत्र ते माहिष्य आणि उग्रसंज्ञक होय. शूद्रीचे ठाई वैश्यापासून झाला त्याचें नांव करण. हे सहा अनुलोमज जाणावे. तसेच ब्राह्मणीचे ठाई क्षत्रिय, वैश्य, शूद्र यांपासून झाले जे तीन पुत्र ते सूत, वैदेहिक, चांडाल असे होत त्यांत चांडाल हा सर्व धर्मबहिष्कृत होय. क्षत्रियेचे ठायीं वैश्यापासून झाला तो मागध आणि क्षत्रियेचे ठायीं शूद्रापासून झाला तो क्षत्ता वैश्येचे ठायीं शूद्रापासून झाला तो आयोगव. हे सहा प्रतिलोमज आणि ह्या अनुलोमज प्रतिलोमामध्येंव्यभिचारापासून उत्पन्न झाले ते संकरादि अनेक भेद आहेत. त्यांतील एक भेद

दारवितों. **याज्ञवल्क्यस्मृति** अ० १ श्लो० ९५ माहिष्येण करिण्यांतु रथकारःप्रजायते ॥ असत्संतस्तुविज्ञेयाः प्रतिलोमानुलोमजाः ॥ ९५॥ **तथाचशंखः** क्षत्रियवैश्यानुलोमानंतरो त्पन्नजोरथकारः ॥ **अर्थ-** वैश्यापासून शूद्रिणीस्त्रीचे ठायीं उत्पन्न झाहली जी ती करिणी तीचे ठायीं क्षत्रियापासून वैश्यस्त्रीचेठायीं उत्पन्न जो पुत्र त्याचें नाव माहिष्य त्यानें उत्पन्न केलेला जो पुत्र त्याचें नांव रथकार. प्रतिलोमापेक्षां अनुलोम नीच व त्याहीपेक्षां संकरादिक नीच जाणावे. असा प्रतिलोम, अनुलोम, संकर इत्यादि जाती विषयीं, उशना, मनु, अत्रि, याज्ञवल्क्य, देवल, शंख, इत्यादि स्मृतींत व कमलाकरकृत, दलपतकृत, गोपिनाथकृत जातिविवेकांत व पुराणांत व शूद्रकमलाकर, गागाभट्टी इत्यादि ग्रंथांत वर्णन आहे. सारांश- ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र त्या चार जाती. ब्राह्मणोस्यमुखमासीत्० इत्यादिक श्रुतिस्मृतिपुराणादिकांमध्यें प्रसिद्ध आहेत आणि त्यामध्यें वर्णाश्रमविभागेंकरून व ब्राह्मादि अष्ट विवाहेंकरून सवर्ण स्त्रीचे ठायीं जे पुत्रउत्पन्न करितात ते पुत्र सवर्ण होतात व ब्राह्मादिअष्टविवाह विरुद्ध आणि वर्णविपर्यासें करून होतात ते अनुलोम आणि व्यभिचारें करून होतात ते प्रतिलोम तसेच अनुलोमप्रतिलोमाच्या व्यभिचारें करून होतात ते रथकारादि संकर होतात तेव्हां सोनारादिक जर ब्राह्मण किंवहुना सच्छूद्र असते तरि त्यांची उत्पत्ति स्मृत्यादि ग्रंथांत व कोशांत प्रतिलोमादिकांत वर्णिली नसती ज्यापेक्षां पूर्वोक्त ग्रंथांत प्रतिलोमज असें वर्णन आहे त्यापेक्षां त्यास (सोनारादिकांस) प्रतिलोमज किंवा दासीपुत्र म्हणण्यास कांहींच संशय नाहीं. आतां प्रथमतः लोहाराची उत्पत्ती सांगतों. अमरसिंहानें अमरादिकोशांत वर्गरूप नियम केले त्यांत द्वितीयकांडामध्यें वर्गाः पृथ्वी पुरक्ष्माभृद्वनौषधिमृगादिभिः । नृब्रह्मक्षत्रविट्शूद्रैः सांगोपांगैरिहोदिताः " **अर्थ** अमरसिंह म्हणतो. या द्वितीय कांडांत भूमि, पुर, शैल, वनौषधि, सिंहादि, मनुष्य, ब्रह्म, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, असे दहा वर्ग सांगतों असें म्हणून त्याचप्रमाणें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, असे वर्ग सांगून पुढें शूद्रवर्ग सांगितला त्यांत प्रथमतः " शूद्राश्चावरवर्णाश्च वृषलाश्च जघन्यजाः । अशी ४ नावें शूद्राचीं सांगून " आचंडालात्तु संकीर्णा अंबष्ठकरणादयः " येथून अनुलो

म, प्रतिलोम, संकीर्ण, अशा जातीमध्यें लोहारादिक पांचांचीं नांवें आहेत तीं मी क्रमानें दाखवितों. " पादूकृच्चर्मकारः स्याद्व्योकारो लोहकारकः अर्थ- पादूकृत्, चर्मकार, हीं दोन नांवें चांभाराचीं सांगून पुढें व्योकार, लोहकार, हीं दोन नांवें लोहाराचीं सांगीतलीं आहेत. यावरून लोहार प्रतिलोम व चांभारापेक्षां नीच असें उघड सिद्ध होतें. आतां येथें सोनारादिक अशी शंका घेतील कीं, कोश हे जैनानें केले आहेत ते आह्मास मान्य नाहींत. तरि त्यांस असें सांगावें कीं, कोश हे जरी जैनानें केले तत्रापि श्रुति स्मृति पुराणादिकांस अनुसरून आहेत ह्मणूनच श्रीमच्छंकराचार्यांनीं जैनाचे ग्रंथ बुडवून कोश मात्र ठेविले आणि ते विद्वन्मान्य आहेत. व न्यायशास्त्रांत असें आहे कीं, " शक्तिग्रहं व्याकरणोपमानकोशाप्तवाक्याद्व्यवहारतश्च। वाक्यस्य शेषाद्विवृतेर्वदंति सांनिध्यतः सिद्धपदस्य वृद्धाः " अर्थ अमुक अर्थीं अमुक शब्दाची शक्ती आहे हें जाणण्याविषयीं, व्याकरण, उपमान, कोश, आप्तवाक्य, व्यवहार, व्याख्यान, सिद्धपदाचें सांनिध्य, इत्यादि कारणें लागतात. यावरून कोश हें प्रमाण असून सोनारादिकांची खात्री नसल्यास स्मृत्यादि प्रमाणें दाखवितों तीं पाहून खात्री करून घ्यावी. यो मागधीक्षत्रिययोर्जातउल्मूकसंज्ञकः। सलोहकर्मणा जीवेदुत्तमश्चांत्यजातितः। ब्रह्मक्षत्रियविट्शूद्रवर्णेभ्योहीनएवस। लोहकारइतिख्यातो लोहकर्मास्य जीवनं " अर्थ- मागधी ( वैश्यापासून ब्राह्मणीचे गर्भीं उत्पन्न जो पुत्र त्याचें नांव मागध ह्याची स्त्री ) तिचे गर्भीं क्षत्रियापासून झाला जो पुत्र त्यास उल्मूक, लोहार, असें ह्मणतात. हा लोहकार, अंत्यजापेक्षां उत्तम व ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र यापेक्षां नीच आहे. यानें लोखंडी काम करून उपजीविका करावी. हे वरील श्लोक शूद्रकमलाकर, गोपिनाथ, दलपत, कमलाकर, श्रीधर, दयाराम, केशवदास, माधव, कुवदाचार्य इत्यादिकांनीं केलेल्या जातिविवेक ग्रंथांत आहेत आणि तसेंच गागाभट्टीमध्यें " राजांगनास्वयोगेन कर्मकारोभिजायते। लोहादिनास्वनिर्दिष्टं कृत्वाजीवेन्नसंशयः। इत्यादि अनेक प्रमाणांवरून लोहकार ( लोहार ) प्रतिलोम ( जारकर्मेंकरून झालेले ) अंत्यजापेक्षां उत्तम व ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र यांपेक्षां नीच असें निर्बाधक सिद्ध होतें " आतां कांसारांची उत्पत्ती

सांगतो " उशनास्मृति श्लोक १२ नृपायां वैश्यसंसर्गादायोगव इतिस्मृतः। तंतुवाया भवंत्येव वस्त्रकांस्योपजीविनः। १२ **अर्थ-** क्षत्रियस्त्रीचे ठाईं वैश्यापासून जारकर्मे करून जो पुत्र झाला तो आयोगव (कांसार) यानें द्रव्य व कांस्य यावर उपजीविका करावी. हा एक कांसारांचा भेद असून दुसरा भेद असा कीं, " अंबष्ठायांद्विजाज्जातः पुत्रः कांसस्यकर्मकृत्। कांस्यपात्राणि चित्राणि रचयेज्जीवनायसः। शूद्रधर्मेण सर्वत्र स्थितिरस्यविधीयते ) **अर्थ-** ब्राह्मणापासून वैश्यस्त्रीठायीं झालेली जी कंन्या तिचे गर्यी ब्राह्मणापासून झाला जो पुत्र तो कांस्यकार (कांसार) यानें कांशाच्यीं चित्रविचित्र भांडी करून त्यावर उपजीविका करावी. असें शूद्रकमलाकरादि ग्रंथांत स्पष्ट आहे व गोपिनाथकृत जातिविवेकांत " वैश्यस्त्रीद्विजसंभूता कन्यकांबष्ठकाभिधा। सात्वंबष्ठाद्विजाश्लिष्ठा जनयेत्तनयंरहः। सकासार इतिख्यातः सततं कालिकां यजेत्। कांस्यपात्राणि रचयेद्विक्रयेज्जीवनायच। याचा अर्थ पूर्वीच्या वचना प्रमाणेंच आहे.

**सारांश** अशा अनेक वचनांवरून कांसारांत जरी दोन भेद आहेत तत्रापि दोन्हीही प्रतिलोम असून शूद्रापेक्षां नीच आहेत असें सिद्ध होतें. " आतां तांबटाची उत्पत्ति सांगतों." अ. को. कां. २ स्याच्छांकिकः शांबविकः शौल्बिकस्ताम्रकुट्टकः। ७ **अर्थ-** शांखिक, शांबविक, शौल्बिक, ताम्रकुट्टक, हीं ४ नावें तांबटाचीं असून संकरजातींत आहेत यास प्रमाण. उशनास्मृतिश्लो. १४ आयोगवेन विप्रायां जातास्ताम्रोपजीविनः॥१४॥ **अर्थ** शूद्रापासून वैश्यस्त्रीचे ठायीं झाला जो पुत्र तो आयोगव, त्यानें विप्रस्त्रीचे ठायीं उत्पादित जो पुत्र, तो तांबट त्यानें तांब्याचीं पात्रें करून उपजीविका करावी. हा एक तांबटाचा भेद असून दुसरा असा आहे कीं, " शूद्राक्षत्रिययोः पारसवीयाच्चेति जायते। सासूते क्षत्रियात्पुत्रं विख्यातं ताम्रकुट्टकं। संसर्गं सहकासारैः कुर्यात्सतु विशेषतः। घटनं ताम्रपात्राणां तत्पर्यावर्तजीवनं। शास्त्रे कनाट इत्युक्तो लोके तांबटसंज्ञकः। **अर्थ-** शूद्रस्त्री आणि क्षत्रिय, यां पासून झाली जी कन्या तिचें नांव पारसवीया, तिचे ठाईं क्षत्रियापासून झाला तो तांबट, यानें कांसाराशीं संसर्ग करावा आणि तांब्याचीं भांडीं घडून

त्यावर उपजीविका करावी. असें गोपिनाथादिकृत जातिविवेक ग्रंथांत प्रसिद्ध आहे.. **तात्पर्यार्थ** असे दोन तांबटाचे भेद आहेत परंतु दोनही प्रतिलोम व शूद्रापेक्षां नीच आहेत." आतां सुतारांची उत्पत्ति सांगतो " अमरकोश कांड २ श्लोक. तक्षातु वार्धकि स्त्वष्टा रथकारस्तुकाष्ठतट्। ग्रामाधीनो ग्रामतक्षः कौटतक्षोधनीनकः॥९॥ **अर्थ**- तक्षा, वर्धकी, त्वष्टा, रथकार, काष्ठतट्, इत्यादि नामें संकरजातींत असून यास प्रमाणे ही बहुत आहेत. असें असून आह्मीच रथकारकार, आम्हाला आधान, उपनयनादिकाचा अधिकार आहे असें ह्मणून सोनारांनीं "त्रिमिंगिलाचार्य " याला द्रव्य देऊन "रथकार कल्पद्रुम " या नांवाचा एक ग्रंथ करून घेतला आणि त्यावरून वेदोक्त करूं लागले त्याबद्दल पुणें मुक्कामीं सरकार मार्फत सभा होऊन त्या सभेंत पंच सरपंच व अनेक विद्वानानीं स्वर्णकारादिक हे" रथकार नव्हेत व यांना वेदकर्माचा अधिकार नाहीं. असें अनेक श्रुति, स्मृति पुराणें इत्यादिक प्रमाणें करून सिद्ध केलें व त्रिमिंगिलाचार्यानें केलेला ग्रंथ मिथ्या आहे असें त्यांच्या मुखांतून वदविलें **सारांश**- सोनारादिक हे रथकार नसून संकरजात्युत्पन्न आहेत." आतां पाथर्वट ( पात्रुट ) यांची उत्पत्ती सांगतो. " वैश्यास्त्री शूद्र संयोगादायोगवकसंज्ञकः। सशूद्राक्षीयते धर्मे पाषाणेष्टक कर्मकृत्। सकुर्यात्कुट्टिमांभूमिं चूर्णेनास्येहजीवनं। **अर्थ**- वैश्य स्त्रीचे ठायीं शूद्रापासून झाला जो पुत्र तो पाथर्वट (पात्रुट) यानें पाषाणादिकांचीं कामें करावीं किंवा चूर्णेंकरून भिंत्यादिकांस लेप करावा आणि उपजीविका करावी हा शूद्रधर्मापासून भ्रष्ट आहे हें वचन गोपिनाथ, श्रीधर, दयाराम, केशवदास, इत्यादिकांनीं केलेल्या जातिविवेकांत आहे." तात्पर्यार्थ" अशा अनेक प्रमाणांवरून "पाथर्वट" हे प्रतिलोम असून शूद्रापेक्षां नीच आहेत. "आतां सोनारांची उत्पत्ति सांगतों " अमरकोश कांड २ **श्लोक** ७ नाडींधमः स्वर्णकारः कलादो रुक्मकारकः। **अर्थ**- नाडींधम, स्वर्णकार, कलाद, रुक्मकारक, अशीं ४ नांवें सोनारांचीं असून संकरजातींत गणिलीं आहेत. त्यास अन्य प्रमाणें." उशनास्मृति श्लोक॥२६॥ शूद्रायां विधिना

विप्राज्जातः पारशवोमतः । भद्रकालींसमाश्रित्य जीवेयुः पूतकाः स्मृताः ॥ ३५ ॥

**अर्थ**– शूद्रस्त्रीचे ठाईं ब्राह्मणापासून विधिना (विवाहें करून) उत्पन्न झालाजो पुत्र तो पारसव (सोनार) यानें भद्रकालीचें पूजन करावें. " ब्राह्मणाच्छूद्रकन्यायां जातः पारसवः स्मृतः । भद्रकाल्यर्चनंतस्य नृत्यंनाट्यंच वृत्तये । हा श्लोक श्रीधर, दयाराम, केशवदास, गोपिनाथ, गागाभट्ट, यांनीं केलेल्या जातिविवेकांत आहेत सेंच " शूद्रांशयनमारोप्य ब्राह्मणश्चेलकर्थंचन । जनयेद्ग्राम्यधर्मेण तस्यां पारसवं सुतं । महाशूद्रः सविख्यातः शूद्रेभ्यः किंचिदुत्तमः । स्वर्णकारस्य तस्येह स्नानं धोत्रं पवित्रकं । सर्वं शूद्रस्य धर्मेण वर्तनंतस्यजीविका । (तस्यचस्मृतं इत्यपिपाठः)

**अर्थ**– ब्राह्मणानें शूद्रस्त्रीला शयनावर आरोपण करून मैथुनोपायानें तिचेठाईं पुत्र उत्पन्न केला त्याचें नांव पारसव (सोनार) त्यालाच महाशूद्र असें ह्मणतात. हा शूद्रापेक्षां किंचित् उत्तम आहे. यानें स्नान करावें, धोतर नेसावें, पवित्र घालावें. किंवा " शाणसूत्रंपवित्रकं " पवित्रक हें नांव शाणसूत्राचें (तागाच्यासुताचें) आहे ह्मणून तागाचें वस्त्र नेसावें असाही अर्थ होतो. " शूद्रेभ्यः किंचिदुत्तमः " या वरून आह्मी शूद्र नव्हे असा अर्थ सोनार करतील, तर तसा अर्थ होत नाहीं. कारण महाशूद्र या पदाला विरोध येतो. याकरितां, स्नान धोत्रादिक अधिकार आहेत ह्मणून शूद्रापेक्षां कांहीं उत्तम ह्मणून महाशूद्र, असें ह्मटलें आहे. आणि या श्लोकांतील " पारसव " या शब्दाचा अर्थ असा आहे कीं, " परात्सूते सा परसूः तस्याः अपत्यं पुमान् पारसवः । पर (अन्य) यापासून प्रसवते ती परसूः तीचा जो पुत्र तो पारसव. यावरून परपुरुषा पासून झाला तो पारसव असासामान्य अर्थ होतो. आणि हा शब्द निषाद (कोळी) वाचक आहे. परंतु त्यांचीं कर्में आणि या सोनारांचीं कर्में निराळीं आहेत. यावरून पारसव हे दोन आहेत असें सिद्ध होतें. श्रीधर, दयाराम, केशवदास, गोपिनाथादि कृत जातिविवेक ग्रंथांत असें आहे कीं, " कुर्यात्स्वर्णव्यवहारं विषमांसस्यविक्रयी ॥ **अर्थ**– सोनारानें सुवर्णाचा व्यवहार, व विष मांस यांचा विक्रय करावा. अर्थात् कोळ्याच्याबरोबर सोनार आले, असें सिद्ध होतें. आतां " श्रीधर बाबाजी मठकर " या नांवाच्या सोनारानें " सद्बोध चिंतामणि " या नांवाचा ग्रंथ छापिला त्या

ग्रंथाच्या ४७ व्या पत्रांत असें लिहिलें आहे कीं, वरील ( शूद्रांशायन ) हे श्लोक नवीन करून ग्रंथांत घुसकून दिले आहेत, आणि त्यांतील " धोत्र " हा शब्द मराठी भाषेंत आहे आणि कोणत्याही संस्कृत ग्रंथांत नसून व्याकरणविरुद्ध आहे. तरि " श्रीधरबाबाजीमठकर सोनार, व ग्रंथ लिहिणार " या उभयतांस असें सांगावें कीं, धोत्र हा शब्द बहुत संस्कृत ग्रंथांत असून व्याकरण युक्त आहे. याशि प्रमाण. " श्रीधर, केशवदास, गोपिनाथकृत जातिविवेकांत "शिखायज्ञोपवीतंच धोत्रमारक्त मंजसा॥ इत्यादि प्रमाणें पुराणांमध्यें प्रसिद्ध आहेत ग्रंथविस्तार भयास्तव लिहिली नाहींत. आतां " धोत्र " शब्द व्याकरणसिद्ध दाखवितो. " धूञ् कंपने " या धातूहून " सार्वधातुभ्यष्ट्रन् " या सूत्रें करून ष्ट्रन्प्रत्यय केला असतां " धुत्रं " असें रूप होतें. नंतर " सार्वधातुकार्धधातुकयो: " या सूत्रें करून गुण केला असतां " धोत्रं " असें रूप सिद्ध होतें. कांहीं पुस्तकावर " धौत्रं " असा पाठ आहे. तेथें " प्रज्ञादिभ्यश्च्वण् " या सूत्रें करून स्वार्थी अण् प्रत्यय केला असतां " धौत्रं " असें रूप सिद्ध होतें. " धोत्रमेव धौत्रं " असा विग्रह होतो. असें असून हे श्लोक ग्रंथांत नसून घुसकून दिले व " धोत्रशब्द " मराठी आहे असें सोनारांचें लिहिणें आपल्या ज्ञातीचें नीचत्व आच्छादनार्थच असावें. असो या प्रमाणें सोनार हे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, यांपेक्षां नीच आहेत. आतां ब्राह्मणापासून शूद्रस्त्रीचे ठाईं उत्पन्न तो सोनार अशा अर्थाचे श्लोक " उशनास्मृति, जातिविवेकादि ग्रंथांत " स्पष्ट असून सोनार हे श्लोक खोटे आहेत असे लिहितात. याकरितां आह्मी अष्टादश पुराणें, व उपपुराणें ही वाचून पाहतां, " ब्रह्मवैवर्त पुराणांतील ब्रह्मखंड अध्याय १० यांतील इतिहासावरून " सोनारादिक " दासीपुत्र असें सिद्ध होतें. आतां या अध्यायाचे श्लोक १०० आहेत परंतु ग्रंथवृद्धिभयास्तव सर्व न लिहितां सारांश लिहितों तो वाचून पाहिला ह्मणजे पूर्वीचे " शूद्रांशान " हे श्लोक खरे किंवा खोटे, सोनारादिक उच्च किंवा नीच हें सहज लक्षांत येईल " ब्रह्मवैवर्त पुराण ब्रह्मखंड अध्याय १० वा. श्लोक. अधिकं यासि सुश्लोके मम प्राणपरप्रिये। मम प्राणांश्चापहृ

त्यस्थिता चैव क्षणं शृणुभे। तवैवान्वेषणं कृत्वा भ्रमामि जगतीतलं। स्वप्राणां स्त्यक्तुमिष्टोहं त्वां न दृष्ट्वा हुताशने। कामुकस्य वचः श्रुत्वा घृतची सस्मिता मुने। ददौ प्रत्युत्तरं शीघ्रं नीतियुक्तं मनोहरं। घृताच्युवाच। त्वया यदुक्तं भद्रं तत् करकाराऽधुनेतिच। किंतु सामयिकं वाक्यं ब्रविष्यामि स्मरातुर। कामदेवालयं यामि कृत्वा वेशंच तत्कृते। यद्दिने यत्कृते यामो वयं तेषांच योषितः। अद्याहं कामपत्नीच गुरुपत्नी तवाधुना। त्वयोक्तमधुना मिथ्या पठितं कामवेदतः। विद्यादाता मंत्रदाता गुरुर्लक्षगुणं पितुः। मातुः सहस्रगुणतो नास्त्यन्यस्य समो गुरुः। गुरोः शतगुणा पूज्या गुरुपत्नी श्रुतौ यतः। पितुः शतगुणा पूज्या यथा माता विचक्षण। मात्रा सहित शृंगारे यावान् दोषः श्रुतौ श्रुतः। ततो लक्षगुणो दोषो गुरुपत्नी समागमे। तत्र घोरे वसत्येव यावच्चंद्र दिवाकरौ। प्रायश्चित्तं पापिनश्च तस्य नैव श्रुतौ श्रुतं। घृताची वचनं श्रुत्वा विश्वकर्मातिरोषतः। शशाप शूद्रयोनिंच व्रजेति जगतीतले। शशाप सुरदारूणं घृताचीति विशेषः। तेषां नामानि वक्ष्येहं शृणुध्व द्विजसत्तम। मालाकारः कर्मकारः शांकिकश्च कुविंदकान्। कुंभकारः सूत्रधार स्वर्णचित्रकरांस्तथा। तेषां बहुवरान् दत्वा संस्थाप्य पृथिवीतले। मानवीं जन्मनात्सृज्य जग्मुतुर्निजमंदिरं॥ इत्यादिकया दैवज्ञ ह्मणविणाऱ्या सोनाराच्या उत्पत्ति विषयीं प्रमाणें असून पुढें हेतुरूप प्रश्न आहे तो असा. शौनक उवाच। सूत्रधारश्चित्रकारः स्वर्णकारस्तथैवच पतितास्ते ब्रह्मशापात् बभूवुः केन हेतुना। हे पुराणविदांश्रेष्ठ तन्नः शंसितुमर्हसि। सूत उ०। स्वर्णकारः स्वर्णचौर्यात् ब्राह्मणानां द्विजोत्तम। बभूव पतितः सद्यो ब्रह्मशापेन कर्मणा। सूत्रधारो द्विजानांतु शापेन पतितोऽभवत्। शीघ्रंच यज्ञकाष्ठानि न ददौ तेन हेतुना। इत्यादि श्लोक १००

**भावार्थ**- घृताची नामक अप्सरेनें सर्व शृंगार करून शंकराकडे जात असतां वाटेस विश्वकर्मा " याची गांठ पडली. तेव्हां तो कामातुर होऊन त्या घृताचीला म्हणतो कीं, हे घृताची " तुला पाहून मी फार कामातुर जाहलों. तुझा शोध मी बहुत दिवस करीत आहें तरी माझी कामशांती कर. नाहीं पेक्षां मी आपले प्राण अग्नीमध्यें दहन करीन तेव्हां घृताची म्हणते, हे विश्वकर्म्या, ती गोष्ट आज होणार

नाहीं कारण मी शंकराकडे जात आहें आणि तो तुझा गुरु आहे याकरितां आज मी तुझी गुरुपत्नी होय याकरितां तूं आग्रह करूं नको त्या कालीं विश्वकर्म्याला क्रोध येऊन घृताचीला शाप दिला तो असा कीं, माझी आज्ञा मानीत नाहीस त्यापेक्षां तूं शूद्रयोनींत मृत्युलोकीं जन्म पावशील. तेव्हां निरपराध शाप दिला असें पाहून घृताची ह्मणते तूंही माझ्या शापें करून मृत्युलोकीं ब्राह्मणकुलांत जन्म पावशील. असा परस्पर शाप होऊन नंतर ते उभयतां मृत्युलोकीं शापानुरूप जन्म पावले. कांहीं दिवसानीं ब्रह्मकुलोत्पन्न विश्वकर्म्यानें त्या शूद्रकुलोत्पन्न स्त्रीस मलयाचलपर्वतावर नेऊन तिचे ठाईं एक वर्षांत आठ पुत्र उत्पन्न केले. ते येणें प्रमाणें. १ माळी. २ कांसार. ३ कुंभार. ४ सुतार. ५ शिंपी. ६ लोहार. ७ सोनार ८ पाथरवट. नंतर त्या ८ पुत्राला वर प्रदानें देऊन उभयता शापमुक्त होऊन स्वर्गाप्रत गेले. पुढें सोनार हा सोनें चोरूं लागला, सुतार यज्ञकाष्ठें देईना अशा अनेक कारणांवरून त्या ८ पुत्रांस ऋषींनीं शाप दिला. तेणें करून ते आठ पुत्र पतित जाहले. हा इतिहास मोठा आहे, परंतु ग्रंथविस्तार भयास्तव येथें सारांश लिहिला आहे. हा इतिहास, "मेहेरबान् उलियम चापलेन साहेब बाहादुर दक्षिणेचे कमीशनर यांजकडे झालेल्या अपिलांत ८ व्या नंबरांतही हा इतिहास संक्षिप्तरूपानें घेतला आहे. त्यांत घृताची गवळिणीचे पोटीं जन्मली असें लिहिलें आहे. सारांश– ह्या इतिहासावरून "शूद्रांशयनमारोप्य" "शूद्रायां विधिना" हे श्लोक सत्य किंवा मिथ्या याचा विचार "श्रीधर बाबाजी मठकर" इत्यादिक सोनारांनीं करावा आतां अमरकोशादिकांत वर्ग बांधून, संकरजातीमध्यें सोनारादिक गणले हें यथार्थ आहे. कारण. कोशकारांनीं जे वर्ग बांधले ते वेदाधारें बांधिले आहेत. यास प्रमाण– शुक्लयजू अध्याय ३० मंत्र ५ पासून १७ पर्यंत" ब्रह्मणे ब्राह्मणं क्षत्राय राजन्यं मरुद्भ्यो वैश्यं तपसे शूद्रं तमसे तस्करं नारकाय वीरहणं पाप्मने क्लीबं आक्रयायाग्रूकामाय पुंश्चलमतिक्रुष्टाय मागधं नृत्ताय सूतं गीताय शैलूषं हसाय कारिमानं दाय स्त्रीसरवं मेधायै रथकारं धैर्याय तक्षाणं तपसे कौलालं

मायायै कर्मारं* रूपाय मणिकारं नदीभ्यः पौंजिष्ठं मक्षिकाभ्यो नैषादं गंधर्वाप्सरोभ्यो व्रात्यं पिशाचेभ्यो विदलकारीं बलायो पदां हर्म्येभ्यो हस्तिपं जवायाश्वपं पुष्ट्यै गोपालं तेजसे जापालं कीलालायसुराकारं भद्रायगृहपं मेधाय वा पल्पूलीं प्रकामाय रजयित्री मवाराय कैवर्तंस्वनेभ्यः पर्णकं बीभत्सायै पौल्कसं वर्णाय हिरण्यकार+ मित्यादि. मंत्र १२ असून त्यांच्या भाष्यांतही पूर्वोक्त श्लोक आहेत ग्रंथवृद्धि भयार्थ लिहिले नाहीं. सोनारांनीं पाहिले असतां खात्री होईल. तात्पर्यार्थ "सोनारादिक" जर ब्राह्मण असते, तर मंत्रामध्यें "ब्रह्मणे ब्राह्मणं" असा ब्राह्मण शब्द असून पुढें "रथकारं, कर्मारं, हिरण्यकारं, असें असण्याचें कारण काय? तेव्हां या मंत्रार्थावरून ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, ह्या चार जातीहून "सोनारादिक भिन्न आहेत असें सिद्ध होतें. आतां आह्मी पांचाल ब्राह्मण होय असे सोनारादिक ह्मणतात. परंतु "पांचाल शब्द" जातिवाचक नसून देशवाचक मात्र आहे. यास प्रमाण **मत्स्यपुराण** अध्याय ५० श्लोक. ३।४। मुद्गलश्च जयश्चैव राजा बृहदिषुस्तथा। जवीनरश्च विक्रांतः कपिलश्चैव पंचमः।३। पंचानांचेव पांचाला नेतान्जनपदान्विदुः। पंचालं रक्षिणो ह्येते देशानामितिनः श्रुतं॥४॥ **अर्थ**- पृथुराजाचा पुत्र भद्राश्व त्याला मुद्गल, जय, बृहदिषु, जवीनर, कपिल, असे ५ पुत्र होते. ते ज्या देशाचें राज्य करीत होते, त्या देशाला "पांचाल" असें ह्मणतात. असेंच "श्रीमद्भागवताच्या नवमस्कंधांत वर्णन आहे. **सारांश** अशा प्रमाणावरून "पांचालशब्द" देशवाचक असें सिद्ध असून सोनारादिक आम्ही "पांचाल" असें ह्मणतात तरी पांचाल शब्दापेक्षा "**पाणचट**" असे ह्मणतील तर फार शोभणार आहे. असोः अशा अनेक श्रुति, स्मृति, पुराणें, आगमादिक आधारावरून सोनारादिक "अनुलोम, प्रतिलोम, संकरजात्युत्पन्न" असें सिद्ध होते. व या मागील सर्व ग्रंथाच्या व कोशांच्या आधारावरून दैवज्ञ ह्मणजे ज्योतिषी ब्राह्मण इतकें सिद्ध झालें. तस्मात् "नंदस्त्वात्मज उत्पन्ने" या भागवत वचनांत दैवज्ञ (ज्योतिषी) ब्राह्मणांस बोलावून त्यांकरवीं पुण्याहवाचनादिक जातकर्म संस्कार केला. आणि त्यांस सालंकृत दोन लक्ष गाई दिल्या

* लोहार. + सोनार.

असें जें व्यासांनीं लिहिलें आहे त्याचा अर्थ देवज्ञ ह्मणजे सोनार असा होत नाहीं परंतु देवज्ञ ह्मणजे सोनार असा मनःकल्पित अर्थ करून नंदानें सोनारांस च गाई दिल्या असें ह्मणतात; तर ब्राह्मण व्यतिरिक्त अन्यजातीस दान घेण्याचा अधिकार मुळींच नाहीं, हें तर सर्वांच्या मतें सिद्ध आहे. परंतु नीच जातीकडून ब्राह्मणानें दान घेतलें असतां ब्राह्मणास जीं प्रायश्चित्तें सांगितलीं आहेत तीं खालीं प्रदर्शित करितों तिकडे लक्ष्य दिलें ह्मणजे सोनार हे उच्च किंवा नीच अर्थात् समजेल. आणि नंदानें सोनारास गाई दिल्या कीं काय याचा निर्णय सहज लक्षांत येईल. **याज्ञवल्क्यस्मृति** अ० १ श्लोक १६२ अवीरास्त्री स्वर्णकारस्त्री जित ग्रामयाजिनां। शस्त्रविक्रय कर्मार तंतुवायश्ववृत्तिनाम्। एषामन्नं नभोक्तव्यं सोमविक्रयिणस्तथा **अर्थ-** अवीरा (ज्या स्त्रीस पति पुत्र नाहीं ती), सोनार, स्त्रीवर उपजीविका करणारा, ग्रामोपाध्याय, शस्त्रविक्रय करणारा, लोहार, कोष्टी, अंत्यज आणि कलाल यांच्याकडील आमान्न ब्राह्मणानें स्वीकारूं नये. तस्मात् सोनार हे जर ब्राह्मण आहेत, तर सोनाराकडील आमान्न स्वीकारूं नये, असें याज्ञवल्क्यांनीं कां लिहिलें यास दुसरें प्रमाण. **मनुस्मृति** अध्याय ४ श्लोक २१५। २१८ कर्मारस्य निषादस्य रंगावतारकस्यच ॥ सुवर्णकर्तुर्वैणस्य शस्त्रविक्रयिणस्तथा ॥ भुक्त्वातोन्यतमस्यान्नममत्याक्षपणं त्र्यहं ॥ **अर्थ-** लोहार, निषाद (कोळी), रंगारी, सोनार, बुरुड, आणि शस्त्रविक्रय करणारा या सहा ज्ञातींकडील ब्राह्मणानें न समजून आमान्न घेतलें असतां तीन दिवस उपोषण करावें ह्मणजे तद्भक्षणजन्य दोषापासून ब्राह्मण मुक्त होतो, असें आहे तेव्हां जर सोनार ब्राह्मण आहेत, तर त्यांच्याकडील आमान्न घेतलें असतां प्रायश्चित्त कां सांगितलें? तिसरें प्रमाण. **स्कं० सह्याद्रिखंड*** अ० ८४

* वाचक हो ब्रह्मविचार कर्त्यानें जातिनिर्णयार्थ सह्याद्रिखंड हा ग्रंथ मुख्य व सर्वमान्य आहे असा आपल्या मनाशीं दृढनिश्चय करून आपल्या कीर्तीचे ध्वज चहूंकडे उभारावे अशा स्तुत्य हेतूनें सह्याद्रिखंडाचे ८१।८२ ह्या अध्यायांतील भावार्थ छापून गल्लोगल्ली भिंतीस लाविला त्यावरून मीही तोच ग्रंथ अवलोकन करीत असतां सात आठ प्रतींत ८४वे अध्यायांत दोन श्लोक व २५वे अध्यायांत ३९।४० हे दोन श्लोक आढळले तर हे श्लोक वाचते वेळीं त्यास झोंपला गली होती किंवा आपल्यास लांछन येईल म्हणून ब्रह्मविचार ग्रंथांत लिहिले नाहीं हे समजत नाहीं.

श्लो० २७।२८ तथापिनैव पांचालमायामनुजलौष्ठ्रकाः।शिल्पिकाः स्वर्णकाराश्चपांचालाः पंचकथ्यते ॥ कुंभकाराश्चपांचालायदाप्रतिग्रहीद्विजः ॥दशकुलैः पतत्येव अधःपातेनसंशयः **अर्थ-** ईश्वर पार्वतीप्रत संकर जातीचें विवरण करीत असतां पूर्वी गोळक जाती सांगून आतां ह्मणतात कीं; तसेच सुतार, लोहार, कांसार, पाथरवट, सोनार व कुंभार या जातींस पांचाल अशी संज्ञा आहे; या सहा जातीं कडील जर ब्राह्मणानें दान घेतलें तर तो दान घेणारा ब्राह्मण आपल्यादाहा कुलांसहित नरकांत पडतो असें आहे. आतां यावरून ही सोनार ब्राह्मण नव्हेत असें ठरतें आणि याचविषयीं दुसरीं प्रमाणें दाखवितों. **मनुस्मृति** अध्याय ४ श्लोक २२१ राजान्नं तेज आदत्ते शूद्रान्नं ब्रह्मवर्चसं॥ आयुः सुवर्णकारान्नंयशश्चर्मावकर्तिनः **अर्थ-** राजान्न ग्रहणानें तेजाचा (कांतीचा), शूद्रान्नानें ब्रह्मचर्यव्रताचा, सोनाराकडील अन्नानें आयुष्याचा आणि चांभाराकडील अन्नानें कीर्तीचा नाश होतो. याचविषयीं दुसरें प्रमाण. **भारत** राजधर्म अध्याय ३६ आयुः सुवर्णकारान्नमवीरायाश्चयोषितः **अर्थ-** सोनारव अवीरास्त्री (पतिपुत्ररहितस्त्री) यांच्याकडील ब्राह्मणानें अन्न घेतलें असतां ब्राह्मणाच्या आयुष्याचा नाश होतो; असें आहे तस्मात् सोनार हे जर ब्राह्मण आहेत, तर त्यांच्याकडील अन्नग्रहणानें आयुष्याचा नाश होतो. असें मनु व भारतकार यांणीं कसें लिहिलें असतें. कारण कीं, ब्राह्मणांकडील अन्न ग्रहणास दोष कोठेंच लिहिला नसून अतिश्रेष्ठत्व मात्र लिहिलें आहे. यास प्रमाण. **पाराशरस्मृति** अ. ४ श्लोक ३१ अमृतं ब्राह्मणस्यान्नं क्षत्रियान्नंपयःस्मृतं॥ वैश्यस्यत्वन्नमेवान्नं शूद्रान्नं रुधिरं स्मृतम् **अर्थ-** ब्राह्मणाकडील अन्न दुग्धाप्रमाणें, वैश्याकडील अन्न अन्नच होय आणि शूद्राकडील अन्न रुधिरा (रक्ता) प्रमाणें असें सांगीतलें आहे. तस्मात् जर सोनार हे ब्राह्मण आहेत तर जसें पराशरानीं ब्राह्मणाकडील अन्नास श्रेष्ठत्व दिलें तसेंच मनुस्मृति, भारत, याज्ञवल्क्यस्मृति ह्या ग्रंथांत सोनाराकडील अन्नास श्रेष्ठत्व लिहिलें असतें तर ज्यापेक्षां तसें न करितां मन्वादिकांनीं सोनाराच्या अन्नग्रहणाविषयीं नीचत्व सांगून तद्भक्षण दोषपरिहारार्थ प्रायश्चित्तादि सांगितलीं, तस्मात

* नाटकाइत्यपि क्वचित्पाठः

त्यांचे मतें सोनार हे ब्राह्मण नव्हेत असें सिद्ध होऊन सोनार हे अत्यंत नीच आहेत असेंही उघडपणें ठरतें. यास प्रमाण. मनुस्मृति अध्याय ९ श्लो० २९२ सर्वकंटकपापिष्ठं हेमकारं नराधिप प्रवर्तमानमन्याये छेदयेल्लवशः क्षुरैः अर्थ- सर्व दुष्ट जातींमध्यें पापिष्ठ असा जो सोनार तो अन्यायानें वागावयास लागला तर वस्त्र्यानें त्याच्या शरीराचे बारीक तुकडे करावे, यास दुसरें विशेष प्रमाण. मत्स्यपुराण अ० २२७ श्लो० ८२ सर्वसंकरपापिष्ठं हेमकारं नराधिप अन्याये वर्तमानंच छेदयेल्लवशः क्षुरैः अर्थ- मत्स्यरूपी भगवान् मनुराजाप्रत राजनीती सांगत असतां कोणत्या अपराधास कोणास काय शिक्षा हें सांगतात. सोनाराविषयीं असें ह्मणतात कीं, हे राजा सर्व संकरजातीमध्यें पापिष्ठ जो हेमकार (सोनार) हा अन्यायानें (धर्म सोडून परधर्माचरण इत्यादि) कर्मे करूं लागला असतां राजानें त्याच्या अंगाचे वस्त्र्यानें बारीक तुकडे करावे. असें सांगितलें. तस्मात् या दोन वचनांवरून सोनार हे ब्राह्मण नव्हेत असें उघड ठरतें याचविषयीं दुसरें प्रमाण. भागवत प्रथमस्कंध अ० ७ श्लो० ५७ वपनं द्रविणादानं स्थानान्निर्यापणं तथा ॥ एषहि ब्रह्मबंधूनां वधो नान्योस्ति दैहिकः अर्थ- सूत शौनकांस सांगतात कीं ब्राह्मणांनीं मोठा (वधार्ह) अपराध केला तर त्याचें वपन करावें (पाट काढावे), द्रव्य घ्यावें आणि त्यास गांवातून घालवावें हाच वध होय. कारण कीं, ब्राह्मणाचा प्रत्यक्ष वध कदापीही करूं नये असें आहे. तस्मात् जर सोनार हे ब्राह्मण असते तर सोनाराचे अंगाचे वस्त्र्यानें तिळाएवढे तुकडे करावे असें मनुस्मृतींत व मत्स्यपुराणांत सांगितलें नसतें. यावरून सोनार हे ब्राह्मण नव्हत असें सिद्ध होतें. यास दुसरें प्रमाण. स्कं० स० अ० २५ श्लोक ३९ । ४० शूद्रां शायनमारोप्य ब्राह्मणश्चेत् कथंचन ॥ जनयेद्ग्राम्यधर्मेण तस्यां पारसवं सुतम् ॥ ३९ ॥ महाशूद्र इति ख्यातः शूद्रेभ्यः किंचिदुत्तमः । सर्वशूद्रस्य धर्मेण वर्तनं तस्यचस्मृतं। या श्लोकाचा अर्थ पूर्वी लिहिला आहे. सोनारास सोनें चोरिल्याबद्दल ऋषीनीं शापिलें तेव्हांपासून सोनार हे चौर्य कर्म करितात म्हणोन त्यांस राजानें गांवाच्या बाहेर ठेवावें. याशि प्रमाण. " शुक्रनीती अ०

४ श्लोक ७७ " चोराणांपितृभूतास्तेस्वर्णकारादयस्त्वनः । गंजागृहं पृथक् ग्रामात्तस्मिन्क्षेत्तु मद्यपान् ॥ ७७॥ टीका- चोरांचेबाप हेसर्व, सोनारादिम्ह णोनियां। कलाली गांवबाहेर, मद्यपारक्षिजेतथा ॥ अर्थ- कलाल, मद्यपी, स्वर्णकार, हे चोरांचे बाप आहेत म्हणून ह्या तिघांस राजानें गांवाच्या बाहेर ठेवावे. अशींवचनें बहुत आहेत परंतु ग्रंथविस्तार होईल म्हणून लिहिलीं नाहींत. असो. हे सोनार शूद्रापेक्षां नीच असून ब्राह्मण होण्या विषयीं ब हुत यत्न करितात आणि आमचें ब्राह्मणत्व पेशवे सरकारानें बुडविलें अ सें बोलतात परंतु हें बोलणें त्यांच्याच लेखावरून खोटें होतें. कारण "श्रीध र बाबाजी मठकर सोनार " यानें छापलेल्या "सद्बोधचिंतामणि" ग्रंथांत असें लिहिलें आहे कीं, जगूबाळशेट पोतदार राहणार जंजिरा व बाबाजी पांडशेट मजगांवकर राहणार मुरुड, या उभयता सोनारांनीं "हपशी सरकार" याजकडे अर्ज केला कीं, आमच्या स्वज्ञातींतील ब्राम्हण "गोपिनाथभट्ट" वृत्ति चालवीत होता त्याच्या मागें बजाबापंतोजी चालवीत आला तो हाल्लीं मयत झाला सबब आम्ही स्वज्ञातींतील ब्राह्मण आणून वृत्तिचालवूं. यास हुकूम मिळावा म्हणून खावंदांचे कदमाजवळ अर्ज केला आहे. बंगीसरो श नहोय. हाअर्ज पेशवाई होण्याच्या पूर्वींचा आहे यावरून पेशवाईच्या पूर्वी सोनारांची बडबड होती. पुढें " जगन्नाथ शंकरशेट "( नानाशंकर शेट ) सोनार हे द्रव्यवान् असल्या कारणानें ब्राह्मणास बहुत द्रव्य देऊन आपल्या घरीं चोरून वेदोक्त कर्मे करूं लागले. पुढें त्रिमिंगिलाचार्याला द्रव्य देऊन "रथकार कल्पद्रुम" ग्रंथ करून घेतला आणि त्रिमिंगिला चार्याच्या सांगण्यावरून सोनारांकडून वेदोक्त कर्मे करवूं लागले. त्यावे- ळीं अमदानगर मुक्कामीं "बाळकृष्ण मुकुंद सोनार मुंबईकर" यांचे घरीं त्रिमिंगिलाचार्यानें ७ ब्राह्मणांकडून वेदोक्त मुंज लाविली. त्यावेळीं १५७ ब्राह्मणानीं पुणें मुक्कामीं येऊन तारीख १५ मे सन १८२३ शके १७४५ चैत्र शुद्ध ९ रोजीं इंग्रज सरकाराकडे अर्ज केला कीं सोनार हे शूद्रापेक्षा नीच आहेत यांना वेदोक्त कर्मांचा अधिकार नसून " बाळकृष्ण मुकुंद सोनार"

यानें ८ ब्राह्मणांकडून वेदोक्त कर्म केलें तरि याचा बंदोबस्त व्हावा–अशाअ र्जीवरून ८ ब्राह्मण व सोनार यांस पुणें मुक्कामीं आणून विचारिलें कीं सोनारांकडे वेदोक्त कर्म करण्यास आधार काय? त्यावेळीं त्रिमिंगिलाचार्यानें रथकारकल्पद्रुम ग्रंथ पुढें केला आणि सांगितलें कीं सोनार हे रथकार यांना वेदोक्त कर्माचा अधिकार आहे. तेव्हां सरकारमार्फत सभा जाहली त्यांत पंच सरपंच होते त्यांचीं नांवें. वादीतर्फे पंच १ यशवंत शास्त्री कडवेकर २ हरभट काशीकर सरकारी पंच १ चिंतामण दीक्षित अपटे २ अनंताचार्य रामानुज. सरपंच "मल्हार श्रोते" या प्रमाणें सभा होऊन त्रिमिंगिलाचार्यानें केलेला ग्रंथ खोटा ठरला व गांवोगावींच्या "पोर्सिसा" आणून निकाल झाला तो येणेंप्रमाणें. त्रिमिंगिलाचार्याचा ग्रंथ व ब्राह्मणांनीं दिलेलीं संमति पत्रें खोटीं आहेत. सोनारांनीं आचार करावयाचे ते येणें प्रमाणें. १ श्राद्ध करणें तें कणकीच्या पिंडेकरून करावें. १ गर्भाधानादि संस्कार शूद्रवत् करावे. १ दुहेरी वस्त्र नेसावें. १ साधारण गांठीचें एक जानवें घालावें १ धातुप्रतिमा पूजन करावें १ शालिग्राम पूजन करूं नये १ गंधाचा टिकला लावावा १ भस्म लावूं नये १ ब्राह्मणभोजन अमान्नद्वारा करावें १ सोनार जातींत पूर्वीप्रमाणें पाट लावावे. १ ज्यानीं संमति पत्रें दिलीं त्यास व त्रिमिंगिलाचार्यास अधर्म केल्याबद्दल प्रायश्चित्त व राजदंड असावा या प्रमाणें निकाल होऊन ब्राह्मणास प्रायश्चित्तें दिलीं व त्रिमिंगिलाचार्य पळून गेला. हा निकाल शके १७४६ तारण नाम संवत्सरे चैत्र शुद्ध १ सोमवार हस्ताक्षर गणेशबापूजी जोग निसबत सरपंच. हा निवाडा पुणें येथें सरकारांत आहे आणि याची नक्कल आमच्यापाशीं आहे, ज्यास पाहण्याची इच्छा असेल त्यास आम्ही प्रीति पूर्वक दाखवूं.

सारांश – असें पूर्वी नानाशंकर वोद्र प्रभृती सोनारांनीं आम्हींच "रथकार म्हणून बहुत तंटे केले आणि "स्टील साहेब" या नें केलेल्या "हिंदुधर्मीला" या पुस्तकांतही रथकार म्हणून खोटा लेख दिला, तो येणें प्रमाणें.

Extract from Steel's Summary of the laws and customs of Hindoo castes publish ed in Bombay 1827 made by the order of the Hon'ble The Governor in council 27th July 1826 Page 98

The following statement asserting of the Ruthakar Sonar caste, and their right to the Vedokt-karam, was communicated by Jugunnath Sunkurset of Bombay. These Ruthkar Sonars deny that they are the Parsava &c. &c.

The Siwagam states that from the five mouths of Siva produced five oop Brahmans called Panchals viz Munoo, Maya, Twasta, Shilpee, and Dywadnya-

According to the Rudriamul and Skund pooran, Brumha was the father of Petam-aha Munoo, who was the father of Prajapatee. The latter had eight sons known by the designation of wusoo. one of these named Prabhas had a son with five mouths and ten hands called wishwakarma to whom were born five sons having the same names, occupations, and rights as

those above mentioned Viz: Munoo, Muya Twasta, shilpee and Dywadnya.

Agreeably to the order of Wishwakarma, Bramaha assumed the form of Virat and from his mouth was produced swayambhoo Manoo, from whom six Brahmans and four oop Brahmans had their origin. The eldest of the latter, silpayan, had five sons, the first Munoo, the second Muya, the third Twasta, the fourth shilpee, and fifth Dywadnya. These five learned the five veds from the five, who were produced from a Siva's mouth, and their names, profession, rights and qualities were the same as those of their teachers.

From the Deity Fire were produced a man and woman, who were termed Dywadnya goldsmiths.

The above four had a pure origin, and were authorized to perform the Vedokt-Karams and also the six rites called Shat-karam Viz: Yajan, Yajam, Adhyayan, Adhyapan, Dan, and Pratigraha,

The Mahish or sunker Ruthkars,

are of Unooloma origin, and although this origin be not equally pure with the four above stated, still they are entitled to the performance of the Vedokt karma Their title to these rights is proved in many Hindoo law-books, and the Rushi-Brahmans always required their assistance in the Solemnization of Yadnyas or Sacrifices.

## वरील मजकुराचें भाषांतर.

स्टील साहेब यांणीं गव्हरनर इन कोसलाच्या (१८२५ जुलई) हुकुमावरून "हिंदु धर्मशास्त्र व जाति" याविषयीं संक्षिप्त ग्रंथ लिहिला आहे त्यांतील सोनार ज्ञातीच्या उत्पत्ती वगैरे विषयीं खालीं लिहिलेले उतारे घेतले आहेत (पृष्ठ ९८ ज्ञाति)

मुंबईचे जगन्नाथ शंकरशेट असें कळवितात कीं "रथकार" सोनार यांस वेदोक्त कर्म करण्यास अधिकार आहे. ग्रंथांतरीं रथकार सोनार हे "पारसव" आहेत असें जें लिहिलें आहे तें खोटें आहे असें ते (रथकार) ह्मणतात.

शैवागमांत असें लिहिलें आहे कीं शिवाच्या पांच मुखां पासून पांच "पांचाळ" नामक उपब्राह्मण उत्पन्न झाले ते:— मनु, मय, त्वष्टा, शिल्पी आणि दैवज्ञ.

स्कंदपुराण व रुद्रयामल ग्रंथांत असें लिहिलें आहे कीं ब्रह्मा हा पितामह मनूचा बाप होता. या पितामह मनूस प्रजापति म्हणून एक पुत्र होता.

या प्रजापतीस " अष्टवसू " म्हणून आठ पुत्र झाले. त्यांतील " प्रभास " नांवाच्या एका पुत्रास विश्वकर्मा म्हणून एक पुत्र होता. यास पांच मुखें व दहा हात होते. या विश्वकर्म्यास पांच पुत्र होते. ज्यांची नांवें, धंदे, व हक्क हीं सर्व वर सांगितल्या " पांचाळां " प्रमाणें होती.

विश्वकर्म्याच्या आज्ञे वरून ब्रह्म्यानें " विराट् " स्वरूप धारण केलें, त्याच्या मुखा पासून " स्वयंभू मनू " उत्पन्न झाला. त्याच्या पासून सहा ब्राह्मण व चार उप ब्राह्मण उत्पन्न झाले. यांतून वडील पुत्रास मनु, मय, त्वष्टा, शिल्पी, व दैवज्ञ असे पांच पुत्र होते. या पांचांनीं शिवाच्या मुखा पासून जे पांच ब्राह्मण उत्पन्न झाले असें लिहिलें आहे त्यां पासून पांच वेदांचें अध्ययन केलें. यांचीं नांवें, धंदे, हक्क वगैरे त्यांच्या शिक्षकां प्रमाणेंच होते.

अग्नी पासून एक स्त्री व एक पुरुष अशीं दोन मनुष्यें उत्पन्न झालीं त्यांस दैवज्ञ सोनार असें नांव प्राप्त झालें. वर सांगितलेले चार (उप) ब्राह्मण यांची उत्पत्ती निर्दोष होती यांस वेदोक्त कर्मांचा तसेंच यजन, याजन वगैरे षट् कर्मांचा अधिकार होता.

माहिष किंवा संकर रथकार हे अनुलोमा पासून उत्पन्न झाले. यांची उत्पत्ती जरी वर सांगितलेल्या चार (उप) ब्राह्मणा इतकी निर्दोष नव्हती तथापी त्यांस वेदोक्त कर्मांचा अधिकार होता. व या विषयीं हिंदुधर्मशास्त्रांत अनेक ठिकाणीं प्रमाणें आहेत. " ऋषी ब्राह्मण " यज्ञयागादिक कर्मींत त्यांची हमेश मदत घेत असत.

वाचकहो- वरील मजकूर " जगन्नाथ शंकरशेट सोनार " यांनीं दिलेला सर्व मिथ्या आहे व स्कंदपुराण, शैवागम, अग्निपुराण, रुद्रयामल या ग्रंथांचीं नांवें दिलीं परंतु त्या ग्रंथांत व अन्य ग्रंथांतही कथा मुळींच नाहीं व मनु, मय, त्वष्टा, शिल्पि, दैवज्ञ अशीं नांवें ही नाहींत. प्रभासवसूचा

---

*: जगन्नाथ शंकर शेटजी यांनीं दिलेल्या प्रमाणां वरून स्टील साहेबांनीं वरील लेख लिहिला आहे.

पुन “विश्वकर्मा” तो देवांचा सुतार अशी कथा मत्स्यादि पुराणांत आहे व त्याला शंकरा पासून शिल्पविद्या प्राप्त झाली असें “काशीखंडाच्या ८६ अध्यायांत वर्णन आहें आणि तेंच ह्या ग्रंथाच्या ३६।३७ पृष्ठावर आम्हीं लिहिलें आहे. परंतु त्याला ५ मुखें व १० हात असें वर्णन कोठेंही नसून “नाना शंकरशेट सोनार” हे स्टील साहेबांजवळ लिहून देतात हें सर्व मिथ्या आहे. “जगन्नाथ शंकरशेट सोनार” यांनीं आपणास ब्राह्मण ह्मणावें म्हणून बहुत द्रव्य खर्च केलें परंतु तो हेतु सिद्धीस नजातां श्रीक्षेत्र पंढरपूर माहुली, नाशिक, वांई इत्यादि क्षेत्रांत अपमान होऊन शेवटीं ब्राह्मणांनीं मारिलें. हा मजकूर तारीख २२ सन १८३८ डिसेंबरच्या गुजराथी चाबूक पत्राचें पुस्तक ६ अंक ६१५ यांत छापून प्रसिद्ध केला आहे. तसेंच “श्रीमाहुली क्षेत्रांत” तीर्थविधीचे वेळीं ब्राह्मणांनीं वेदोक्त कर्म केलें नाहीं व त्यांचे (नानाशंकर शेट सोनार) यांचे तीर्थोपाध्याय वेदमूर्ति श्री बापूभट्ट जी निबंधे हे गेले होते सबब त्यांस ब्राह्मणांनीं प्रायश्चित्त देऊन ब्रह्मदंड घेतला. याविषयीं तारीख १५ नोव्हेंबर सन १८६२ “वर्तमानदीपिका आणि वृत्तसार” या वर्तमान पत्रांत कांहीं लिहिलें आहे. तसेंच नाशिक येथें गरुड या उपनावाचे तीर्थोपाध्याय आहेत त्यांना द्रव्य देऊन त्यांच्या वहीवर असें लिहिलें आहे कीं, “नानाशंकर शेट” हे क्षेत्रांत येऊन वेदोक्त तीर्थविधि केला व भाताचे पिंड केले. अशा आपणास ब्राह्मण म्हणून घेण्याविषयीं सोनारांच्या बहुत लबाड्या आहेत परंतु ग्रंथवृद्धिभयार्थ लिहिल्या नाहींत. तसेंच सोनारांनीं नमस्कार बंद करण्याविषयीं सरकारांतून हुकूम झाला तो येणें प्रमाणें.

*To*

*Dannubsett Trimbucksett.*
*Head of the caste of goldsmiths*

*The Hon'ble the president in council hav-*

ing thought proper to prohibit the caste of Goldsmith from making use of the form of Salutation termed Namaskar you are hereby peremptorily enjoined to make known this order and resolution to the whole caste and to take care that the same be strictly observed

Bombay Castle
9th August 1779

By order
Sig.d W. Page.
Secretary to Government

वरील मजकुराचें भाषांतर.

दामुलशेट त्रिंबकशेट सोनार ज्ञातीचे प्रमुख यांस.

ऑनराबल प्रेसिडेंट इन्कौन्सिल यांस, सोनार ज्ञातीनें नमस्कार करण्याचें बंद करावें असें योग्य वाटल्यावरून तुम्हास निक्षून असा हुकूम करण्यात येतो कीं तुम्ही आपल्या सर्व ज्ञातीस हा हुकूम विदित करावा. आणि तो यथास्थित चालत आहे किंवा नाहीं हें पहावें.

हुकुमावरून
वुयलियम पेज
सेक्रेटरी टु गव्हर्मेन्ट.

मुंबई क्यास्टल
९ आगस्ट १७९९

सोनारांच्या नीचत्वा विषयीं इंग्लिश इतिहासांत बहुत प्रमाणें आहेत परंतु तीं सर्व न लिहितां एक रिपोर्ट मात्र लिहितो तो येणें प्रमाणें.

The Sonars or gold-smiths rank is next to
the Purbhoos in respect to caste They however
assert that they are superior to them, and
some even go so far as to arrogate to themselves a
position equal to the Brahmans. It is, how-
ever, notorious that they are a crafty and an
unscrupulous race, but persevering and pa
tient The Sonar is as indispensable in a vil-
lage as the Bhut, and consequently no large
village is to be seen without its goldsmith, who
generally has about the best house in it. The
Sonars are solely employed in this district
in making the common golden and silver
ornaments used by the natives, who are ob-
liged to exercise great vigilance to prevent
fraud.

It is said that the Sonars in Bombay,
under their distinguished leader Juggonnath
Sunkersett, have upset the old order of things
by declaring that they are of a superior
caste to the Brahmans and consequent
pronounce it defilement to eat with a
man. They have also Bhuts of their

*Caste, to officiate at ceremonies—*

*Colaba Agency*
*p 69*
*Bombay Govt. Records*
*No. VII New Series*

## वरील मजकुराचें भाषांतर.

**सोनार** हा वर्ग ज्ञातीच्या संबंधानें परभूंच्या खालच्या वर्गांतीलच आहे. परंतु ते (सोनार) आपण परभांपेक्षां श्रेष्ठ आहों असें म्हणतात. व कितीएक तर आपण ब्राह्मणच आहों असें प्रतिपादन करितात. तथापी इतकें स्पष्ट आहे कीं ते (सोनार) लोक लबाड व अविचारी असून उद्योगी व सहनशील आहेत. खेड्या पाड्यांत ज्याप्रमाणें ब्राह्मणाची त्याप्रमाणेंच सोनारांची अवश्यकता आहे, सबब कोणत्याही मोठ्या गांवांत सोनार नाहींत व त्यांचीं घरें नाहींत असें नाहीं या (कुलाबा) प्रांतांत सोनार बहुतकरून सोन्यारुप्याचें दागिने करण्याचें काम करतात व त्यांत (दागिन्यांत) लबाडी होऊंनये म्हणून त्यांच्यांशी (लोक) फार सावधगिरीनें वागतात.

असें म्हणतात कीं मुंबईंत प्रसिद्ध जगन्नाथ शंकरशेट यांच्या आश्रयाखालीं सोनारलोकांनीं प्राचीन रीति इतकी मोडून टाकली आहे कीं आपण ब्राह्मणापेक्षां श्रेष्ट आहों असें मानून त्यांच्याशीं अन्नोदक व्यवहार करणें हें सदोष आहे असें ते म्हणतात. त्याणीं आपल्या ज्ञातींत आपले ब्राह्मण केले आहेत व त्यांकडून आपल्या घरचें ब्रह्मकर्म करवितात.

(कुलाबाएजन्सी रिपोर्ट पत्र ६९ बांबे गव्हर्मेन्ट रेकर्डस् नंबर ७ न्यूसिरीज)

या प्रमाणें खालीं लिहिलेल्या इंग्लिश पुस्तकांत काढून पहावें.

"एड वर्डमूर साहेब कृत सर्व देवसभा" "हामिलटन कृत हिंदु स्थानाचा इतिहास भाग१" "रॉयल एशियाटिक् रिसर्चिस भाग९" "बर्थन कृत गोवा अँड नीलगिरी" "लेफटनन् कर्नल मार्क वुइक्स" "वुइल सन् ग्लासरी" "टेलर्स ओरियंटल् हस्तलेख" "याशिवाय पोर्टुगीज सरकारचे निवाडे."

या प्रमाणें सोनारादिकांची उत्पत्ति, श्रुति, स्मृति, पुराणें व जातिविवेकादि ग्रंथांत वर्णन केली असून पुढें जाती विषयीं वर्ग बांधिले आहेत. ते असे कीं, मणिकांस्य घट स्वर्ण लोहस्यंदन कारकाः । सिंदोलः सोषिरस्तैली कर्ता किंशुक विल्विकौ, पांस्फलः कर्म चांडालो रोमिकौ बंधुलस्तथा। कुकुटश्चाथखाद्वीन्च श्वपाकोष्ठादशस्मृताः । **अर्थ**- मणिकार, कांसार, सोनार, लोहार, सुतार इत्यादि १८ जाति एक वर्गांत आहेत परंतु त्यामध्यें. आरामिकोमणिकारस्तंतुवायस्तुलेपकः । नापितोदासकश्चैव प्रकृत्यामध्यमाश्चषट् ।कारुकोदारुकारश्च वारुकः कांस्यघट्टकः लोहकृत्कुंभकारश्च प्रकृत्याउत्तमाश्च षट् । **अर्थ**- माळी, मणिकार, कांसार, गवंडी, न्हावी, कोळी हे लोमविलोमामध्यें मध्यम आहेत व कारुक (शिल्पिभेद) सुतार, वारुक, कांसार, लोहार, कुंभार हे लोमविलोमामध्यें उत्तम.

या प्रमाणावरून ही सोनारादिक हे न्हावी, कोळी, कुंभार, या वर्गांतीलच आहेत असें सिद्ध होतें. वरील २* श्लोकांत कांसारपद दोन वेळा आहे याचें कारण त्यांचे दोन भेद आहेत ते पूर्वी दाखविले आहेत.

**सारांश** अशी सोनारादिकांच्या नीचत्वा विषयीं बहुत प्रमाणें आहेत परंतु ग्रंथवृद्धिभयार्थ सर्व न लिहितां दिक् दर्शन केलें आहे. या सर्व वाक्यांची व श्रुति, स्मृति पुराणें इत्यादिकांची एक वाक्यता करून पाहिलें असतां सोनारादीक हे लोम विलोम संकर जात्युत्पन्न व दासी पुत्र असें सिद्ध होतें.

इति सच्छास्त्र मंडणे पूर्वार्ध समाप्तम्॥

---

* हे श्लोक गोपिनाथादि कृत जातिविवेकांत आहेत.

श्रीगणेशायनमः ॥ नत्वागजाननंदेवींसद्गुरुंपितरौमया॥ सच्छास्त्रमंडण स्येदमुत्तरार्धंवितन्यते॥१॥ विद्वज्जनवाचकहो! ह्या ग्रंथाच्या पूर्वार्धांत वासुदेवआत्मारामखोट " श्रीधरबाबाजीमठकर, नारायणकेशवसोनार, यांनीं मुंबईंत छापून प्रसिद्ध केलेल्या "ब्रह्मविचार, सद्बोधचिंतामणि, मुखमासी ब्राह्मणवर्णन" या नांवाच्या पुस्तकाचें खंडन श्रुति, स्मृति, पुराणे, आगमादिकां च्या प्रमाणानें झालें परंतु त्या ग्रंथांत सोनारांचा मुख्य हेतू असा कीं ऋषी हे ब्राह्मण नव्हेत व त्यांना वेदकर्माचा अधिकार नसून त्यानीं कोठें केलेंही नाहीं. अशा पोरकट लेखाचें पूर्वी खंडन केलें परंतु पुनः मुंबई मुक्कामीं "रामब्रह्म" या नांवाच्या गृहस्थानें तारीख ३१ जुलै सन १८७६ रोजीं जाहिराती छापून सर्व शहरांत वांटल्या व "स्वदेशमित्र" वर्तमानपत्रांतही छापिल्या. त्यांत असें लिहिलें आहे कीं. प्रस्तुतचे ऋषिवंशस्थ हे खरे ब्राह्मण नव्हत व त्यांचे मूळ पुरुष जे ऋषी तेही ब्राह्मण नव्हत. याविषयीं आम्ही वेदाधारें स्पष्टीकरण करूं. ऋष्यादिकांनीं केलेल्या कल्पित स्मृत्या व पुराणांतील असंबद्ध कथा मानल्या जाणार नाहींत. ज्यास खात्री करून घेणें असेल त्यानीं आमच्या बिऱ्हाडी यावें. वाचकहो अशा जाहिराती पाहून आम्ही स्वदेशमित्र वर्त्तमानपत्रांत लालजी वैजनाथ व्यास व नंदराम शास्त्री याजकडून ८ प्रश्न व सभा करावी म्हणोन पत्रव्यवहार केला. परंतु तसे न करितां मुंबईंतून गेले. परंतु कांहीं अज्ञलोकांच्या मनांत ऋषींच्या वेदाधिकाराविषयीं शंका आली असेल ती दूर होण्याकरितां ह्या उत्तरार्धांत प्रथमतः वेदाचीं प्रमाणें देऊन पुनः पुराणादिकांचीं प्रमाणें देतों तीं वाचून पाहिल्यावर ऋषीला वेदाधिकार आहे किंवा काय हें स्पष्ट दिसेल. वाचकहो- वेद ईश्वप्रणित असून अनादि आहेत व सर्वांस "वेदाः प्रमाणं" इत्यादि सूत्रावरून प्रमाणभूत आहे असा वेद प्रथमतः ईश्वरानें उत्पन्न करून नंतर आपल्या नाभिकमलापासून उत्पन्न जो ब्रह्मदेव त्यास अंतःकरण द्वारा उपदेश केला. यास प्रमाण ऋग्वेद अ॰३ व॰१० मं॰७ वयंनामप्रब्रवामाघृतस्यास्मिन्यज्ञेधारयामानमोभिः। उपब्रह्माशृणवच्छस्यमानंचतुःशृंगोवमीद्गौरएतत्॥ याऋचेचा अर्थपूर्वी लिहिला आहे

वतमेंच अन्य प्रमाण. श्वेताश्वतरोपनिषद अ. ६ मं. १८ योब्रह्माणं विदधाति पूर्वं योवैवेदांश्च प्रहिणोति तस्मै। तं ह देवमात्मबुद्धिप्रकाशं मुमुक्षुर्वै शरणमहं प्रपद्ये ॥ भा. स्कं. १ श्लो. १ तेनेब्रह्महृदाय आदिकवये मुह्यंति यत्सूरयः ॥ अशा अनेक प्रमाणांवरून ईश्वरानें प्रथमतः ब्रह्मदेवासच वेद सांगिले असें सिद्ध होऊन पुढें अग्नि, वायु, सूर्य इत्यादिकांला प्राप्त झाले नंतर विद्वांऽसोहि देवाः। शतपथब्राह्मण अ. ७ मं. २९५ ऋग्वेद अ. ८ अ. ८ मं. १९१ धाताय थापूर्वमकल्पयत् ॥ अशा प्रमाणांवरून ते वेद देवास प्राप्त झाले नंतर ब्रह्मदेवानें १० मानसिक पुत्र उत्पन्न केले आणि ते वेद प्रवर्तक झाले यास प्रमाण. मत्स्यपुराण अ. ३ श्लो. ५।६।७।८॥ " वेदाभ्यासरतस्यास्य प्रजाकामस्य मानसाः। मनसः पूर्वसृष्टावै जातायत्तेन मानसाः। मारीचिरभवत्पूर्वं ततो त्रिर्भगवानृषिः। अंगिराश्चाभवत्पश्चात् पुलस्त्यस्तदनंतरं। ततः पुलहनामावै ततः क्रतुरजायत। प्रचेताश्च ततः पुत्रो वसिष्ठश्चाभवत्पुनः। पुत्रोभृगुरभूत्तद्वन्नारदोप्यचिरादभूत् । दशेमान् मानसान्ब्रह्मा मुनीन्पुत्रानजीजनत् ॥ श्रीमद्भागवत स्कं. ३ अ. १२ पासून. " अथाभिध्यायतः सर्गं दशपुत्राः प्रजज्ञिरे। भगवच्छक्तियुक्तस्य लोकसंतानहेतवः। मरीचिरत्र्यंगिरसः पुलस्त्यः पुलहः क्रतुः। भृगुर्वसिष्ठोदक्षश्च दशमस्तत्र नारदः। उत्संगान्नारदो जज्ञे दक्षोंगुष्ठात्स्वयंभुवः। प्राणाद्वसिष्ठः संजातो भृगुस्त्वचिकरात् क्रतुः। पुलहोनाभितोजज्ञे पुलस्त्यः कर्णयोर्ऋषिः। अंगिरामुखतोऽक्ष्णो ऽत्रिर्मरीचिर्मनसोभवत्। धर्मोपितद्दक्षिणतो यत्र नारायणः स्वयं। अधर्मः पृष्ठतो यस्मान्मृत्युर्लोकभयंकरः। ऋषिहिंसागतौ धातुर्विद्यात्सत्यं तपः श्रुतं। एषसन्निचयो यस्माद्ब्रह्मणस्तु ततस्त्वृषिः। निवृत्तिसमकालाच्च बुध्याव्यक्त ऋषिस्त्वयं। ऋषते परमं यस्मात्परमर्षिस्ततः स्मृतः। गत्यर्था दृषतेर्धातोर्नामनिवृत्तिकारणं। यस्मादेषस्वयंभूतस्तस्माच्च ऋषिता मता। सेश्वराः स्वयमुद्भूता ब्रह्मणो मानसासुताः। निवर्तमानैस्तैर्बुध्या महान्परिगतः परः। यस्मात् दृशपरत्वेन सहतस्मान्महर्षयः। ईश्वराणां सुतास्तेषां मानसाश्चौरसाश्चवै। ऋषिस्तस्मात्परत्वेन भूतादिक्र

षय स्ततः । ऋषिपुत्रा ऋषीकास्तु मैथुनाद्गर्भसंभवाः । परत्वेन ऋषंते वै भूतादीनृषिकास्ततः । ऋषिकाणां सुतायेतु विज्ञेया ऋषिपुत्रकाः । श्रुत्वा ऋषं परत्वेन श्रुतास्तस्माच्छ्रुतर्षयः । अव्यक्तात्मा महात्मा वाहंकारात्मा तथैव च । भूतात्मा चेंद्रियात्मा च तेषां तज्ज्ञानमुच्यते । इत्येवमृषिजातिस्तु पंचधा नामविश्रुता ॥ अर्थ- ब्रह्मदेव प्रजोत्पादनाविषयीं विचार करीत असतां त्याच्या मनापासून मरीचि, अत्रि, अंगिरा, पुलस्त्य, पुलह, क्रतु, भृगु, वसिष्ठ, दक्ष, नारद असे १० पुत्र उत्पन्न झाले आणि ह्यापासून पुढें वंशविस्तार झाला अशी कथा पुराणांत प्रसिद्ध आहे " आतां ऋषिशब्दाचा अर्थ व भेद दाखवितों. वैवस्वत मनु मत्स्यरूपी भगवंताला प्रश्न विचारीत असतां भगवान् त्याचें उत्तर अनुक्रमानें देतात कीं, ऋषि धातु हिंसा न करणें या अर्थी आहे. अर्थात् अहिंसा धर्मानें वर्तणाराचे अंगीं ब्रह्म संबंधी विद्या, सत्य, तप व शास्त्र या गुणांचा समुदाय असतो; तेणेंकरून तो ऋषि पदवीचा अधिकारी होतो " " आणि तो ऋषि आपले उत्पत्तिकालापासून लोकांत ज्ञानानें प्रसिद्ध होतो म्हणून त्यास ऋषि म्हणतात् व तो परब्रह्मास जाणतो यास्तव त्यास परमर्षी ही नाम प्रसिद्ध आहे " " आणि ज्या धातूंचा गति 'ऋगति' अर्थ आहे त्यांस ज्ञान हाही अर्थ आहे. तेव्हां ऋषि धातु गतिरूप अर्थी आहे म्हणून त्यास ज्ञान हाही अर्थ आहे. अर्थात् जो ज्ञानानें स्वयंप्रकाश आहे; त्यास ज्ञान पूर्वक कर्म करणें या ऋषिधर्मामुळें ऋषि हें पद योग्य आहे " ब्रह्मदेवाचे मानसपुत्र स्वयंप्रकाश ज्ञानी व ईश्वरसमान समर्थ असून ज्ञानाविषयीं तत्पर असल्यानें त्यानीं ज्ञानबळेंकरून महान् परमेश्वर वश केला " " व ते ऋषि ज्ञानाच्या पूर्णतेनें लोकांत प्रकाशित असतात म्हणून त्यास परमर्षि असें म्हणतात व त्यासम अशा ऋषीस मानस व औरस पुत्रही आहेत. आणि हेच वेदाचे शाखा उपशाखादि प्रवर्तक झाले याविषयीं पूर्वी चरण व्यूहादिक प्रमाणें दाखविलीं. आणि युगमानेंकरून वेद नष्ट झाले त्यावेळीं भरद्वाजानें ब्रह्मदेवापासून वेद आणून ऋषीस दिले आणि ते ऋषीनीं लिहिले त्यावरून ते मंत्राचे ऋषि झाले अशावि

षयीं पूर्वीप्रमाणें दर्शविली आणि त्याच प्रमाणें सूक्तें, अध्याय, वर्ग, अष्टक, मंडलें असे भेदही ऋषीनींच केले याविषयीं आरण्यक, चरणव्यूह, बृहद्देवताक इत्यादिग्रंथांत बहुत प्रमाणें आहेत. तसेंच "सर्वानुक्रमणिका भाष्ये वराहपुराणे" ऋचांसमूहो ऋग्वेदस्तमभ्यस्य प्रयत्नतः । पठितः शाकलेनादौ चतुर्भिस्तदनंतरं । सांख्याश्वलायनौ चैव मांडूको बाष्कलस्तथा । बह्वृचा ऋषयः सर्वे पंचैते एकवेदिनः । **अर्थ**- प्रथमतः शाकलऋषीनें ऋग्वेदाचा अभ्यास करून नंतर सांख्यायन, आश्वलायन, मांडूक, बाष्कल असे ५ ऋषी ऋग्वेदप्रवर्तक झाले. व मुद्गल, गोभिल, वात्स्य, शैशिर, शिशिर असे ५ पांच ऋषी शाखा करणारे झाले. तसेंच सूक्तें, महासूक्तें, क्षुद्रसूक्तें, इत्यादि करणारे शतर्चिनादि ऋषी झाले. या विषयीं प्रमाणें "बृहदारण्य बृहद्देवताक" इत्यादिकांत बहुत आहेत परंतु ग्रंथविस्तार भयार्थ येथें सर्व न घेतां दिग्दर्शन करितों. उदु ब्रह्माण्यैरत श्रवस्येति ब्राह्मणाच्छंसं ब्रह्मएव समृद्धं सूक्तमहरहः शंसंतीतिश्रुतेः । "बृहद्देवताक" संपूर्णमृषिवाक्यं तु सूक्तमित्यभिधीयते । ऋषिसूक्तानि यावंति सूक्तान्येकस्यवै स्तुतिः स्तूयेत कां तु यावत्क तत्सूक्तं दैवतं विदुः । समानछंदसो मंत्रछंदः सूक्तं तदुच्यते ॥ ऐतरेयब्राह्मणपंचिका ॥ ५ । ६ ॥ वासिष्ठमेनवैवासिष्ठं इंद्रस्यप्रियंधामोपगच्छत् ॥ तस्मान्मैत्रावरुणं मैत्रावरुणकः प्रातः सवनेशंसति ॥ तदु त्रैष्टुभंतेनप्रतिष्ठितपदेन ॥ **अर्थ**-ओळीने ऋचें च्या समुदायास जेथपर्यंत एक ऋषी आहे त्यास व संपूर्ण ऋषिवाक्यास ऋषिसूक्त असें म्हणावें व एका देवतेची स्तुती जेथपर्यंत आहे ते "दैवतसूक्त" त्याच प्रमाणें एक छंदें करूनच जेथपर्यंत ऋचा आहेत त्यास "छंदः सूक्त" असें म्हणावें. "यास उदाहरण" अग्निमीळे येथून आरंभ करून गायंतित्वा गायत्रिणो वर्ग १८ येथ पर्यंत एक गायत्री छंद आहे म्हणून यास छंदःसूक्त असें म्हणावें या प्रमाणें ऋषिसूक्ताची व्यवस्था जाणावी. "आतां मंडलांविषयीं कांहीं प्रमाणें दाखवितों" **सर्वानुक्रम** यआंगिरसः शौनकोभूत्वाभार्गवः शौनकोभवत्सगृत्समदो द्वितीयं मंडलंपश्यदिति ॥ **अर्थ** द्वितीयमंडलाचा गृत्समद ऋषि आणि

त्या प्रमाणेंच " त्वमग्नेगृत्समदोस्त्रिष्टुप् " या प्रमाणें द्वितीयाष्टकाच्या मंडला पुढील मंत्रांत गृत्समद ऋषी आहे. अशीच सर्व १० मंडलास ऋषी आहेत ग्रंथवृद्धिभयार्थ लिहिले नाहीत. " आतां ऋषीच वेदवेत्ते याविषयीं प्रमाण. कृष्णयजु " अहेबुध्निय मंत्रंमे गोपाय। यमृषयस्त्रैविदाविदुः। ऋचः सामानियजूंषि। साहिश्रीरमृतासतां। " भाष्य " त्रैविदाऋषयः ऋचः सामानि यजूंषीत्येवंरूपं विदुः ज्ञानवंतस्तं मे मंत्रं वेदत्रयलक्षणं हे बुध्निय त्वं गोपाय रक्षस्व। सावेदत्रयी हि यतो हेतोः सासतामममृताअक्षया श्रीः संपत्तिरित्यर्थः ॥ **अर्थ**– ज्या वेदत्रीप्रत ऋषि जाणितात ती वेदत्रयी साधूंची अक्षयसंपत्ति आहे. या वरील ऋचेवरून वेदवेत्ते ऋषीच असें सिद्ध होतें तसेंच " तैत्तिरीय आरण्यक " अजानन् ह वै प्रश्नीं स्तपस्यमानान् ब्रह्मस्व अभ्यानर्षत ऋषयोभवंस्तदृषीणामृषित्वं " यास्कनिरुक्त तदृषीणामृषित्वमिति विज्ञायते " भाष्य अस्यार्थः। स्वयंभू ब्रह्मांभमनुपजीव्य स्वयभूतमिति यावत्। ब्रह्मवेदः तपश्चरतोऽजान् अयोनिसंभवान् प्रश्निपुरुषान्प्रति अभ्यानर्षत अभिजगाम ऋषिगतौ तुदादि परोक्षे लिट् अतस्ते ऋषयोऽभवन्नित्यादिस्तदर्थः ऋषिर्दर्शनात्स्तोमान्ददर्शेत्यौपमन्यवइतिनिरुक्ते ॥ **अर्थ**– तपश्चर्या करणारे अयोनिसंभव असे जे प्रश्निपुरुष ( ब्रह्मदेवाचे १० दहा मानसपुत्रादिक ) त्यास वेदप्राप्त झाला. आणि तेणेंकरून ते ऋषी झाले. " आतां मंत्र द्रष्टे ऋषीच याविषयीं प्रमाणें दाखवितों " ऐतरेयब्राह्मण. एतेरवल्वमीसंत्र दृशः खल्वएतेपरस्थै वशिभुरिति॥ निरुक्त उ. खंड ३ येऋषीणां मंत्रदृष्टयोभवंति ॥ तद्येनादिष्टदेवता मंत्रास्तेषुदेवतोपपरीक्षायत्काम ऋषिर्यस्यांदेवतायामार्थापत्यमिच्छंस्तुतिं प्रयुंक्ते तद्दैवतः समंत्रोभवति। तास्त्रिविधाऋचः परोक्षकृताः प्रत्यक्षकृताआध्यात्मिक्यश्चेत्यादि। " कात्यायन सर्वानुक्रम " छंदो न विद्यते द्रष्टाऋषयः स्मर्तारः परमेष्ठ्यादयोदेवता मंत्रांतर्गताइत्यादि। " तै. ऋग्. ५।३।७ " समास्याग्नय ऋतवो वर्धयंतु संवत्सराऋषयो यानिसत्याः। ऋषयोमंत्रद्रष्टारः इतितैत्तिरीयारण्यकभाष्यं॥ " आतां वसिष्ठ ऋषीला वेद मिळाले

याविषयीं वेदांतील इतिहास लिहितो" तै. ३।५।२।१ ऋषयोइंद्रंप्रत्यक्षं नापश्यन्तंवसिष्ठः प्रत्यक्षमपश्यत्सोब्रवीद्ब्राह्मणं तेप्रवक्ष्यामि यथात्वत्पुरोहिताः प्रजाः प्रजनिष्यंते ऽथमे तरेभ्यऋषिभ्योमाप्रवोचइति। तस्मादेतान्स्तोमभागानब्रवीत्। ततोवसिष्ठपुरोहिताः प्रजाः प्रजायंत। तस्माद्वासिष्ठोब्रह्मा कार्यः। अर्थ- पूर्वी कालमानेंकरून वेदनष्ट झाले असतां सर्व ऋषी मिळून इंद्राजवळ गेले त्याकालीं ऋषींचें तपोबल कमीझालें होतें ह्मणून इंद्र त्यांच्या (ऋषींच्या) दृष्टीस पडला नाहीं. परंतु वसिष्ठानें इंद्रास प्रत्यक्ष पाहिलें. त्यावेळीं इंद्र म्हणतो हे वसिष्ठऋषे मी तुला वेद सांगतों परंतु तूं सर्वांचा पुरोहित (उपाध्याय) होऊन सर्वांकडून प्रजा उत्पन्न करीव आणि ह्या ऋषींनीं तपश्चर्या केल्यावांचून वेद सांगूनको. नंतर वसिष्ठ ऋषीनें इंद्रा पासून वेद शिकून नंतर सर्व ऋषींस सांगितले. अशी कथा असून " आपस्तं० २।९।२४।१३।१४।१५ प्रजापतेर्ऋषीणामिति सर्गोयम्। नत्रये पुण्यकृतस्तेषां प्रकृतयः पराज्वलंत्य उपलभ्यंते। तस्यास्तुकर्मावयवेन तपसा वा कश्चित् सशरीरोंतवंतंलोकं जयत्ति संकल्प्यसिद्धिश्च स्यान्नतु तज्ज्येष्ठमाश्रमाणाम् भाष्य पुण्यकृतः स्वरवेनाद्यापि वर्तंत इति नत्रोदाहरणमाह। तत्रेत्यादि तत्रस्वर्गेये पुण्यकृतो वसिष्ठादयस्तेषां प्रकृतयः शरीराणि पराउत्कृष्टा ज्वलन्त्योदीप्यमाना उपलभ्यंते दिवि यथा सप्तर्षिमंडल मित्यादि वृत्तिः अर्थ- पुण्यवान् असे जे वसिष्ठादि ऋषी त्यांच्या प्रकृति (शरीरें) तेजोरूपानें आकाशामध्यें आहेत. " यास उदाहरण" जसें सप्तऋषींचीं मंडलें त्या प्रमाणें. अशा अनेक प्रमाणांवरून ऋषी हेच मंत्र द्रष्टे व वेदाचे सूक्तें, मंडलें, अष्टक, अध्याय, वर्ग, अष्टौविकृति, शाखाभेद करणारे होते, असें सिद्ध होतें. " आतां बर्हिषद्, अर्यमा, अग्निष्वात्तादिपितर हे ऋषिपुत्र आहेत यास प्रमाणें दाखवितों" तै. १।६।८ " स्वधाकारोहि पितॄणां। सोममभैयजति। सोमंप्रयाजाहिपितरः। सोमेंपितृमंतं यजति। संवत्सरोवैसोमः पितृमान्। संवत्सरमेव तद्यजति। पितॄन्बर्हिषदोयजति। येवैयज्वानः। तेपितरोबर्हिषदः। तानेव तद्यजति।

पितॄनग्निष्वात्तान्यजति। येवा अयज्वानो गृहमेधिनः। तेपितरोअग्निष्वात्ता इति। तैत्तिरीयब्राह्मणे १।६।९। पितृयज्ञेनस्वर्गंलोकंगमयति। दक्षिणतः प्राचीनावीती निर्वपति। दक्षिणावृद्धिःपितृणां। अस्ररान् पराभाव्यसोमावास्यां प्रत्यागच्छत्। तेपितरः पूर्वेद्युरागच्छत्। पितृयज्ञो गच्छत्। तंदेवाः पुनरयाचंत। तस्मात्पितृभ्यः पूर्वेद्युः क्रियते। तै० १।३।१०। ततःपितृषु जुहोति तस्मात् पितरः संति। श० ब्रा० ६।२।२८२।सोमायपितृमतेपुरोडाशं षट्कपालं निर्वपति पितृभ्योबर्हिषद्भ्यो धानाः पितृभ्योऽग्निष्वात्तेभ्योऽभिवान्यायै दुग्धे नथमेत्तन्तो ततयेचत्वामन्वेतन्तो इति कृष्णयजुर्वेद १।८।५। एतन्ते ततयेचत्वामन्विति तिसृषु स्त्रीषुनिदधाति। तस्मादातृतीयात् पुरुषान्नामनगृण्हाति एतावंतोहीज्यते। तै० १।६।९। अक्रोधनाः शौचपराः सततंब्रह्मचारिणः न्यस्तशस्त्रामहाभागाः पितरः पूर्वदेवताः। यस्मादुत्पत्तिरेतेषांसर्वेषामप्यशेषतः। येचयैरुपचर्याः स्युर्नियमैस्तान्निबोधत। मनोर्हैरण्यगर्भस्य येमरीच्यादयः सुताः। तेषामृषीणांसर्वेषां पुत्राः पितृगणाः स्मृताः। विराट्सुताःसोमसदः साध्यानांपितरः स्मृताः। अग्निष्वात्ताश्च देवानांमारीचालोकविश्रुताः। दैत्यदानवयक्षाणांगंधर्वोरगरक्षसां। सुपर्णकिन्नराणांच स्मृताबर्हिषदोत्रिजाः सोमपानामविप्राणां क्षत्रियाणांहविर्भुजः। वैश्यानामाज्यपानाम शूद्राणां तुसुकालिनः)। सोमपास्तुकवेः (भृगोः) पुत्राहविष्मंतोंगिरःसुताः। पुलस्त्यस्याज्यपाः पुत्रा वसिष्ठस्यसुकालिनः। सुमूर्तिमंतः पितरो वसिष्ठस्यसुताः स्मृताः। नाम्ना तुमानसाः सर्वे सर्वेते धर्ममूर्तयः। ज्योतिर्भासिषु लोकेषुयेवसंति दिवःपरं। विराजमानाःक्रीडंति यत्र ते श्राद्धदायिनः। गौर्नामकन्यायेषांतुमानसीदिविराजते। शुक्रस्यदयितापत्नीसाध्यानांकीर्तिवर्धनी १५ मरीचगर्भानाम्नातुलोकामार्तंडमंडले। पितरोयत्रतिष्ठंति हविष्मंतोंगिरःसुताः। १६ ऋषिभ्यःपितरोजातापितृभ्योदेवमानवाः। देवेभ्यस्तुजगत्सर्वंचरंस्थाण्वनुपूर्वशः। मनुस्मृति· अ· ३। श्लो· १९२ पा· २०१ पर्यंत २ तसेच "आश्वलायनगृह्यसूत्र" अध्याय २ खं· ४

ऋमंतु जैमिनिवैशंपायनपैलसूत्रभाष्यभारतमहाभारतेत्यादि " जानंतुबा हविगार्ग्यगोतम इत्यादि अनेक प्रमाणावरून " अर्यमादि, अग्निष्वात्तादि, बर्हिषदादि पितर " हे वसिष्ठादि ऋषींचे पुत्र आहेत. आणि त्याच प्रमाणे "ये चुत्वामु त्रानु " या मंत्राचा अर्थही अर्यमादिपितरद्वारा आपल्या पितरादिकांस पिंडतिलोदकादि कपोंचतात. असें असून "सोनारादिक" हे श्राद्ध कर्तेवेळीं ह्या ऋषिपुत्र पितरांचें नांव घेतात किंवा मनुमयादि, लोहार, सुतारादिकांचीं घेतात हें कळत नाहीं. आतां कांहीं सोनारादिक असें म्हणतात कीं, सनातन, भूवन, प्रत्न, सानग, सुपर्ण अशीं ५ गोत्रें आमचीं आहेत. त्याचा शोध करिता . तै. ४।३।३। ऋतमयानां पुरोवातोवातः सनगऋषिः। दक्षिणाद्वातोवातःसनातनऋषिः। विवत्सावयोद्वावरोयानांपश्चाद्वातोवातोह भूवन ऋषिः। आस्कंदोयानासुन्तराद्वातोवातः प्रत्नऋषिः। त्रयस्त्रिंशद्वर्तनिः षष्ठ्याद्वयोभिभूरयानांविष्वग्वातोवातः सुपर्णऋषिः। पितरः पितामहः परेवरेति. अशा प्रमाणावरून हे पांच ऋषि ठरतात. आणि सोनारादिक ऋषींची निंदा करून त्यांची (ऋषींची) गोत्रें घेतात हें त्यांचें मोठें अज्ञान आहे. आणि जर ऋषींची गोत्रें घेतील तर ऋषी त्यांचे पूर्वज होतील. याकरितां सोनारादिकानीं पूर्वी " ब्रह्मविचार ग्रंथांत " मनुः कौंडण्यगोत्रः स्यात् इत्यादि खोटे श्लोक लिहून कौंडण्य, अत्रि, काश्यपादि पांच गोत्रें व सद्योजातादि पांच प्रवर असेंही लिहिलें. परंतु त्यास कोठेंही आधार नसून गोत्रप्रवरैक्यादिदोष येतो आणि ते कौंडण्यादि ५ ऋषि आहेत याकरितां "सोनारादिकांनीं" सानग, सनातन, भूवन, प्रत्न, सुपर्ण असे ५ ऋषी व कौंडण्यादि ५ ऋषी यांचीं गोत्रें न घेतां लोमविलोमामध्यें ज्यापासून उत्पन्न झाले त्यांचीं गोत्रें घ्यावीं आणि त्यामध्यें सोनारांनीं मात्र ज्या ब्राह्मणानें आपणास शूद्रिणीचे ठायीं उत्पन्न केले त्या ब्राह्मणाचें गोत्र घ्यावें म्हणजे त्यांच्या मना प्रमाणें होईल. परंतु शास्त्रामध्यें " दासीपुत्रास " गोत्रादिक मुळींच सांगितलीं नाहींत. आतां गोत्रप्रवरादिप्रवर्तक ऋषींची उत्पत्ति संक्षेपें करून दाखवितों " माध्यंदिनी शाखेचा ब्राह्मण " अथर्व॰ शः समानमासां जीपुत्रा त्सांजीनीपुत्रो मांडूकायनेर्मांडूकाय

नेमांडूकायनिर्मंडव्यान्मांडव्यः॥ इत्यादि बहुत विस्तार असून त्याचप्र
माणें "मत्स्यपुराण" अ. १४४ श्लो. ८० पासून ११८ पर्यंत "भृगुर्म
रीचिरत्रिश्च अंगिराः पुलहः क्रतुः। मनुर्दक्षोवसिष्ठश्च पुलस्त्यश्चापि
तेदश। ब्रह्मणोमा नसाह्येते उत्पन्नाः स्वयमीश्वराः। "परत्वेनर्षयोय
स्मान्मतास्तस्मान्महर्षयः। ईश्वराणांस्कुतास्तेषामृषयस्तान्निबोधत।
काव्योबृहस्पतिश्चैव कश्यपश्च्यवनस्तथा। उतथ्योवामदेवश्चअगस्त्यः
कौशिकस्तथा। कर्दमोवालखिल्यश्चविश्रवाः शक्तिवर्धनः। इत्येतेऋ
षयः प्रोक्तास्तपसाऋषितांगताः। तेषांपुत्रानृषीकांस्तुगर्भोत्पन्नान्नि
बोधत। वत्सरोनग्नहूश्चैवभरद्वाजश्चवीर्यवान्। ऋषिर्दीर्घतमाचैवबृहद्
क्षाः शरद्वत्। वाजिश्रवाःसुचिंतश्चशावश्चसपराशरः। शृंगीचशंखपा
श्चैवराजावैश्रवणस्तथा। इत्येतेऋषिकाःसर्वे सत्येनऋषितांगताः। ईश्व
राऋषयश्चैवऋषिकायेचविश्रुताः। एवंमंत्रकृतः सर्वे कृत्स्नशश्चनिबोध
त। भृगुः काश्यपः प्राचेतदधीचोह्यात्मवानपि। ऊर्वोथजमदग्निश्चवेदः
सारस्वतस्तथा। आर्ष्टिषेणश्च्यवनश्चवीतहव्यः सवेधसः। वन्यः पृथु
र्दिवोदासोब्रह्मवान्गृत्सशौनकौ। एकोनविंशतिह्येतेभृगवोमंत्रकृत्तमाः।
अंगिराश्चैवत्रितश्चभरद्वाजोथलक्ष्मणः। कृतवाचस्तथागर्गः स्मृति,
संस्कृतिरेवच। कुरुवीरश्चमांधाता अंबरीषस्तथैवच॥ युवनाश्वः पुरुः
कुत्सः सुश्रवस्त्रसदस्यवान्। अजमीढोश्वहार्यश्च ह्युत्कलः कविरेवच। पृ
षदश्वोविरूपश्चकाव्यश्चैवाथमुद्गलः। उतथ्यश्चशरद्वांश्चतथावार्तिश्र
वाअपि। अपस्यौषः सुचित्तिश्चवामदेवस्तथैवच। ऋषिजोबृहच्छुक्र
श्चऋषिर्दीर्घतमाअपि। कक्षीवांश्चत्रयस्त्रिंशत्स्मृताह्यंगिरसांवराः। एते
मंत्रकृतः सर्वेकाश्यपांस्तुनिबोधत। कश्यपः सहवत्सारोनैध्रुवोनित्यएव
च। असितोदेवलश्चैवषडेतेब्रम्हवादिनः। अत्रिरर्धस्वनश्चैवशावास्यो
थगविष्ठिरः। कर्णकश्चऋषिः सिद्धस्तथापूर्वातिथिश्चयः। इत्येतेत्वत्रयः
प्रोक्तामंत्रकृत्सणमहर्षयः। वसिष्ठश्चैवशक्तिश्च तृतीयश्चपराशरः। त
तस्तु इंद्रप्रतिमः पंचमस्तुभरद्वसुः। षष्ठस्तुमित्रावरुणः सप्तमः कुंडिन

स्तथा। इत्येते सप्तविज्ञेयावासिष्ठा ब्रह्मवादिनः। विश्वामित्रश्वगाधेयोदेवरात स्तथावलः। तथाविद्वान्मधुछंदाऋषिश्चान्योघमर्षिणः। अष्टकोलोहितश्चैव भृत्तकीलश्चयांबुधिः। देवश्चवादेवरतः पुराणश्चधनंजयः। शिशिरश्चमहाते जाःशालकायनएवच। त्रयोदशैतेविज्ञेयाब्रह्मिष्ठाःकौशिकावराः। अगस्त्योभगवान् घुम्नो इंद्रबाहुस्तथैवच। ब्रह्मिष्ठागस्त्ययोह्येतेत्रयः परमकीर्तयः। मनुर्वैवस्वत श्चैवऐलोराजापुरूरवाः। क्षत्रियाणां वरोह्येतौविज्ञेयौमंत्रवादिनौ। भलंदकश्चवासाश्चः संकिलश्चैवतेत्रयः। एतेमंत्रकृतो ज्ञेयावेश्यानां प्रवराः सदा। इतिद्विनवतिः प्रोक्ता मंत्रायेश्च बहिष्कृताः। ब्राह्मणाःक्षत्रियावेश्या ऋषिपुत्रान्निबोधत॥ ऋषिकाणांसुताह्येते ऋषिपुत्राःस्तु तर्पणः। इति मः पु. अ. १४४ श्लो. ८१ पासून ११८ पर्यंत **अर्थ-** १ भृगु २ मरीची, ३ अत्रि ४ अंगिरा ५ पुलह ६ ऋतु ७ मनु ८ दक्ष ९ वसिष्ठ व १० पुलस्त्य, मिळून हे १० ब्रह्मदेवाचे मानसपुत्र असून स्वतः उत्पन्न ज्ञानीसमर्थ आहेत हे ऋषी ज्ञानानें पूर्ण आहेत म्हणून त्यास महर्षि म्हणतात याशिवाय ब्रह्मदेवाऱ्यामानसपुत्राचे ही पुत्र आहेत, ते असे कीं, शुक्र, बृहस्पति, कश्यप, च्यवन, उतथ्य वामदेव, अगस्त्य, कौशिक। कर्दम, सर्व वालखिल्य ( हे ६००० हजार आहेत ) शक्तिची वृद्धि करणारा विश्रवा ऋषि हे सर्वही तपश्चर्येनें ऋषिपदवी पावले अशी "वाय्वादिपुराणांत" बहुत प्रमाणें असून तसेच "ऋग्वेद" अ. ७ अ. २ वर्ग. १८ परिशिष्ट ऋषिभिः संभृतोरसः॥ ऋषयस्तुतपस्तेपुः॥ ऐतरेयब्राह्मणपंचिका २ अ. २ खं. १ ऋषयोवैसरस्वत्यांसत्रमासत। "पंचिका ७ अ. ३ खं. १९ तस्यहविश्वामित्रोहोतासीज्जमदग्निरध्वर्युर्वसिष्ठोब्रह्मेत्यादि" ऋग्वेद अ. १ अ. १ मंत्र २ अग्निःपूर्वेभिर्ऋषिभिरीड्योनूतनैरुत॥ सदेवाँएहवक्षति॥ यास्कनिरुक्तउत्तरषट्क अ. १ खं. १५ अग्निर्यः पूर्वैर्ऋषिभिरीडितव्योवंदितव्योस्माभिश्चनवतरैः। इत्यादि अनेक श्रुति प्रमाणावरून व "भा. स्कं १ अ. १ एकदानैमिषारण्ये ऋषयः शौनकादयः। सत्रंस्वर्गायलोकायसहस्रसममासत॥ इत्यादि पुराणवाक्यावरूनतपश्चर्यावयज्ञादिकर्मे करणारे ऋषिच असे सिद्ध अ

सून व वरील वाक्यावरून ऋषींची उत्पत्ती ही निर्दोष आहे. असें असतां "वासुदेव आत्माराम शेट सोनार" हे आपल्या "ब्रह्मविचार ग्रंथांत" कोळिणीगर्भसंभूतोवाल्मीकीयोमहामुनिः ॥ शिंपिणी, घनगरिणी, भिल्लिणी, लाडणी, बुर्डिणी, इत्यादि वेदशास्त्राचा पूर्वींचे जुनाट शब्द घालून ऋषींची उत्पत्ती नीच आहे असें दाखवितात परंतु हे त्यांचें (सोनाराचें) लिहिणें सर्वथा निर्मूलक आहे. यास किंचित्प्रमाण दाखवितों तें पाहिल्यावर वाचकांची खात्री होईल. वाल्मिकऋषि हा कोळिणी पासून झाला असें सोनार लिहितो परंतु "अध्यात्मरामायण" अयोध्याकांड अध्याय ६ श्लो० ६४।६५ रामत्वन्नाममहिमावर्ण्यतेकेनवाकथं। यत्प्रभावादहंराम ब्रह्मर्षित्वमवाप्तवान्॥ ६४॥ अहंपुराकिरातेषुकिरातैःसहवर्धितः। जन्ममात्रद्विजत्वंमेशूद्राचाररतःसदा ॥ ६५ ॥ टीका. त्वन्नाममहिमावर्णनस्यप्रकारःकर्तांच दुर्लभइत्याह। रामेति ६४ अत्रैवार्थेस्वविषयमितिहासमाह। अहमिति किरातेषुतद्वसतिदेशेषु जन्ममात्रद्वित्वंजन्ममात्रेणाद्विजइत्यर्थः तत्रैवोपपत्तिमाह। शूद्राचाररतइति ६५॥ ८ अर्थ- वाल्मिक ऋषि रामचंद्राप्रत म्हणतात. हेरामा तुझ्या नामाचा महिमा कोणीहीवर्णन करूं शकणार नाहीं. कारण ज्या नामेंकरून मी ब्रह्मर्षिपदाप्रत पावलों. पूर्वीं माझें जन्म मात्र द्विज कुळांत होतें परंतु किरातदेशामध्यें किराताशिसह वाढलों आणि शूद्राचा आचार करण्या विषयीं तत्पर झालों. वाचकहो. अशाप्रमाणा वरून वाल्मिकऋषीची उत्पत्ति कोळिणी पासून नसून नीचकर्मावरून त्यास "वाल्याकोळी" असें प्राकृतलोक म्हणत होते. तेवढा शब्द कानांवर पडतांच "बागेसरी" हातवडा, ऐरण, सवाणा, कुंडी इत्यादि व्याकरणादिक सामान सिद्ध करून "वासुदेव आत्माराम शेट सोनार" यांनीं कोळिणीगर्भसंभूतो असा श्लोक ताऊन फलाखून तयार करून "शिल्पशास्त्राचें नांव मात्र दिलें असावें. याप्रमाणें सर्व श्लोकांची व्यवस्था आहे ग्रंथवृद्धिभयार्थ लिहिली नाहीं. आतां ज्या प्रमाणें १०६ श्लोक "सोनारांनीं" खोटे लिहिले त्या प्रमाणेंच "नायकिणीगर्भसंभूतो भड्डाचार्योमहामुनिः। तपसाजायते० मड्डुमी

गर्भसंभूतो युरोपीनो महामुनिः। तपसाजायते॰" इत्यादिक रचनेचे श्लोक लिहिले असते म्हणजे पिंडास कावळा शिवण्याविषयीं शंका राहिली नसती असो " जेवढा कोळसा उगाळावा तेवढा काळाच" सारांश श्रुति, स्मृति, पुराणें, आगम, इतिहासादिक अनेक प्रमाणा वरून " शाखा, अष्टक, अध्याय, वर्ग, सूक्तें मंडलें, अष्टौविकृति," इत्यादिभेद दाखविणारे मंत्रद्रष्टे ऋषीच. असें सिद्ध असून " सूत्रें, निरुक्त; ऐतरेयादिब्राम्हण, शिक्षाचतुष्टय, आरण्यक, अष्टाध्यायी, कल्प इत्यादिकाचे प्रवर्तक ऋषीच झाले. तसेच स्मृतिकार "याज्ञवल्क्यादिऋषीच असून अष्टादश पुराणोपपुराणें, आगम, इतिहास, धर्मशास्त्र, इत्यादिक ग्रंथकर्ते ऋषीच आहेत. जेवढे ग्रंथकार तेवढे ऋषीच झाले. आतां "तुकाराम, नामदेव इत्यादिक जरी ऋषि नव्हते तथापि ते भगवद्भक्त व वर्णाश्रम धर्म मानणारे असून त्यांच्या कविता वेदास व ऋषिकृत शास्त्रादिकांस अवलंबून आहेत म्हणून त्या कविता विद्वन्मान्य आहेत. सांप्रत मुंबईत " मूळस्तंभ" यानावाचा ग्रंथ छापून प्रसिद्ध झाला आहे त्यांत तारज, तांडव, तांडज, अनंत, अव्यक्त, जंगम, तामध, भिन्नयुक्त, अभ्यागत, तांबुज, विश्वावसु, अलंकृत, अतीत, विस्तारण, मनरण्य, इत्यादि नामें देऊन १८ युगें व १४ वेद इत्यादिक लिहून त्यांचें वर्णनही मनास वाटेल त्या प्रमाणें केलें आहे. त्यांत अ. १२ ओव्या- मांग, तुरुट, डोंब, माहार, ॥ आणिक पंचम निशाचर ॥ ऐशाह्या जाती अतिक्रूर ॥ ब्राह्मणोद्भव असतीपैं ॥ ८ ॥ कांसार, कोष्टी, अहीर ॥ परीट, शिंपी, सोनार ॥ न्हावी सुतार. लोहार ॥ गुरव आणि तांबट ॥ ११ ॥ तैसेच मणियार, बुरुड ॥ पाथर्वटी आणि गोंड ॥ आणिक तेलांणारी, लाड ॥ याजातीक्षत्रियांच्या ॥ १३ ॥ साळी, माळी, तांबोळी, वाणी ॥ कोळी, तेली, तैसेचि जाणि ॥ ह्यासहा जाती तुजलागुनी ॥ सांगितल्या वैश्यांच्या ॥ १४ ॥ आतां कुणबी आणि धणगर ॥ सनगर, लोणार, हाटकर ॥ तैसेचि पंचम कन्हेकर ॥ इत्यादिजाती शूद्रांच्या ॥ १५ ॥ याप्रमाणें जातीची उत्पत्ति सांगून पुढें. शातम ऋषीचा वंश साळी ॥ नाम्न ऋषीचा तांबोळी ॥ वाल्मीकाचा वंश कोळी ॥ मोची

वंशाचंपकाचा॥ २३॥ कमळऋषीचावंशवंजार॥ तापऋषीचावंशधनगर॥ ग र्गाचार्याचालोहार॥ आणिचांभारदूसरा॥ २४॥ असे अनेक वंशसांगून त्या चप्रमाणें पांचासी पांचपरी॥ नामठेविलेंअवधारी॥ तेपांचाळ्यापरी॥ ना मझालें॥ १७९॥ तेपांचम्हणशीकोणकोण॥ तरिऐकवोसांगेन॥ तेपांचाळ विचक्षण॥ असतीजे॥ १८०॥ प्रथममनूचालगरवाती॥ ठाखी, सोनार, शिल्पजाती॥ तांबटजाणचतुर्थनिगुती॥ आणिपींतकपाथर्वट॥ १८१॥ हेपांचपांचालऐक॥ हेभूलोकचाळक॥ नानापापकर्मीलोक॥ चालविले॥ १८२॥ ऐसे झालेगौरी॥ माझी भक्ती अंतरलीदुरी॥ आतांकृतयुगींचीकुसरी॥ म्हणेश्रीमहादेव॥ १८५॥ अशी या (मूळस्तंभ) ग्रंथाची रचना वेदशास्त्र विरुद्ध आहे आणि याच आधारावरून वरील १०६ श्लो० झाले असावें. आतां कांहीं कारणें करून किंवा शापादिकें करून ऋषींस जन्म घ्यावे लागले म्हणून ते निंद्य झाले असें नाहीं यास उदाहरण. पूर्वी वसिष्ठ आणि विश्वामि त्र हे उभय ऋषी परस्पर शापानुरूप पक्षिजन्म पावून युद्ध करिते झाले. असा इतिहास भारतादिकांत आहे म्हणून "पक्षिणीगर्भसंभूतो" असे श्लोक होतील काय? होणार नाहींत "सारांश" सोनारादिक ब्राह्मण नसून "र थकार देखील नव्हत. यास प्रमाण. तैत्तिरीय ब्राह्मण भाष्ये आद्यकांडे १प्र पाठके ४ अनुवाकः भृगूणांत्वांगिरसांव्रतपते व्रतेनादधामि इति भृग्वंगि रसामादध्यात् हेव्रतपनेकर्मस्वामिन्नग्नेभृगूणामंगिरसांच संबंधिनाव्रते नकर्मविशेषेण निमित्तभूतेन त्वामादधामि इहायतनेत्थापयामीतिमंत्रार्थः॥ एवमुत्तरत्रापियोज्यं॥ गोत्रांतर्गतानांब्राह्मणानामादित्याएवदेवताः अभि षिक्तस्यराज्ञोवरुणोदेवता इतरस्यक्षत्रियस्य इंद्रोदेवता॥ इंद्रियेणव्रतेन इंद्रियाभिवृद्धिहेतुनाकर्मणेत्यर्थः॥ वैश्यस्यग्रामनिर्वाहकोमनुर्देवता॥ रथ कारः अनुलोमजः संकीर्णजातिः॥ तस्यऋभवोदेवता॥ एतैर्मंत्रैर्यथादैवतमा धानंसंपद्यते॥ अथमीमांसा षष्ठाध्यायस्य प्रथमपादेचिंतितं॥ विप्रादिर्नैवर थकृदन्योवायस्तुयोगतः॥ रूढेर्वर्णांतरं तस्याधाने वर्षर्तुरुच्यते॥ वर्षासुर थकार आदधीत॥ तत्ररथंकरोतीतिव्युत्पत्त्यात्रैवर्णिकोरथकार इति चेत्तुमैवं॥

संकीर्णजातिविशेषेरूढत्वात् वैश्यायांक्षत्रियादुत्पन्नोमाहिष्यः । शूद्रायां वैश्यादुत्पन्नाकरिणीतस्यांकरिण्यांमहिष्यादुत्पन्नोरथकारः तथाच याज्ञवल्क्यः ॥ माहिष्येणकरण्यांतुरथकारःप्रजायते ॥ तस्यचरथकारस्याधानकालोवर्षतुः ॥ इतिसायनाचार्यविरचितेमाधवीयेवेदार्थप्रकाशे कृष्णयजुर्ब्राम्हणे आद्यकांडे प्रथमप्रपाठकेचतुर्थेनुवाकः ॥ अशीं अनेक प्रमाणें रथकाराविषयीं असून ती पुण्यातील निवाड्यांत घेतली आहेत म्हणून येथें घेतलीं नाहींत.

**सारांश** सोनारादिक हे रथकार नसून केवल लोम, विलोम, दासीपुत्रच आहेत असें अनेक प्रमाणांवरून सिद्ध असून ते (सोनारादिक) ऋषींची निंदा करितात. कांहीं देशीं सोनारतर ब्राह्मणाचें पाणी अंगावर आले असतां आपले पूर्वज नरकांत शेंडीसकट बुडाले असें मानितात मग अन्नादिकांची गोष्ट काय ? तसेंच मुंबईकरादिक सोनार हे हीमद्य, मांसादिक भक्षण करीत असून आजपर्यंत ब्राह्मणांकडील अन्न खाऊन किटलेले दांत बाहेर काढून ब्राह्मणाची निंदा करितात. याचें कारण " कलियुगवइंग्रेजी " हेंच समजून जसें पूर्वीं जैनादिक ब्रह्मद्वेष्टे झाले त्या प्रमाणेंच सोनारादिक समजले पाहिजेत. आणि सोनार हे ब्राह्मणाचा द्वेष करितात याचें कारण त्याचें जन्म हीं महापातकें करूनच आहे. प्रमाण " देवीभागवत " स्कं. ९ अध्या. ३३ श्लो. स्वर्णस्तेयीचयोमूढो भारतेसुरविप्रयोः। सचमंथानकुंडेवैस्वलोमाब्दंवसेध्रुवं॥ ९०॥ ताडितोयमदूतेन मंथानेच्छ चलोचनः। तद्विट्भोजीच तत्रैव ततश्चांधस्त्रिजन्मनि ॥९२॥ सप्तजन्म दरिद्रश्चमहाक्रूरश्चपातकी। भारतेस्वर्णकारश्चसचस्वर्णवणिक्ततः ॥

**अर्थ**- जो देवब्राह्मणाचें सोनें चोरितो तो आपल्या अंगावर जितके केंश आहेत तितकीं वर्षें " मंथानकुंडनामक " नरकांत पडतो. नंतर यमदूतानें ताडित होत्साता आपली विष्ठा भक्षण करितो नंतर ३ जन्में अंध होतो. नंतर महापातकी क्रूरकर्मी दरिद्री असे ७ जन्म भोगून " भारतखंडामध्यें " सोनार जन्म पावतो. नंतर स्वर्णविक्रय करणारा होतो. इत्यादि प्रमाणांवरून सोनार किती नीच आहेत याचा विचार विद्वान् वाचकां-

नींच करावा. असे श्रुति, स्मृति, पुराणें, आगमादिकांवरून "सोनारादिक" नीच असून ब्राह्मणादिकाहून भिन्न आहेत यास प्रमाण. "शतपथ आरण्यक" १४ अ. ७ अनु. २।४ तद्यथापेशस्कारीपेशसो मात्रामपादायान्यन्नवतरं रूपंतनुते ॥ भाष्य सुवर्णकारः सुवर्णस्यमात्रांपूर्वरचनामपादायापच्छिद्योपमृद्य अन्यत्पूर्वस्माद्रचनाविशेषाद्भिन्नरूपंतनुते । इत्यादि प्रमाणावरून सोनारादि जातिभिन्न आहेत. असें असून आम्ही च ब्राह्मण असें म्हणून "ब्राह्मणोस्यमुखमासीत्" या ऋचेवरून विराटाच्या पांच मुखापासून पांच ब्राह्मण उत्पन्न झाले व "मनु, मय, त्वष्टा, शिल्पि, दैवज्ञ असी ५ नावें दाखवितात. परंतु यास आधार मूळींच नाहीं. ऋचेंतील "मुखमासीत्" येवढ्याच पदावर आम्हीं "मुखमासीत् ब्राह्मण" असें म्हणतात परंतु ऋग्वेद "सहस्रशीर्षापुरुषः । विश्वतश्चक्षुरुतविश्वतोमुखो । मांडूकोपनिषत् "अपादपाणिर्जवनोगृहीतः" यजुर्वेद अ. ३२ नतस्यप्रतिमाअस्ति, मत्यङ्मुखास्तिष्ठति विश्वतोमुखः गीता " सर्वतःपाणिपादंतत्सर्वतोक्षिशिरोमुखं. इत्यादिक प्रमाणाची वाट काय? किंवा गायत्र्या ब्राह्मणमसृजत् । त्रिष्टुभाराजन्यं । मरुद्भ्यो वैश्यं । नकेनचिच्छूद्रमितिश्रुतिः । इत्यादिकांची एकवाक्यता कशी व सावकाश व निरवकाश श्रुती कोणत्या व अलंकार कोणते हें सोनारांस मुळींच माहीत नसून बडबडतात. आणि त्याच प्रमाणें कोण्या अर्थलुब्ध व भ्रष्ट ब्राह्मणास द्रव्य देऊन "मुंबईत" व अन्य कांहीं गांवांत त्राका घालून वेदाध्ययन करवून त्या मुलांचीं नांवें " भट्ट, आचार्य, शास्त्री, पुराणीक अशीं ठेवून श्रीधर बाबाजी मठकर सोनार याणें "आपल्या सद्बोध चिंतामणि" ग्रंथांत छापिली आहेत.* व पूर्वी सोनारांत पाट (न्हावेर) लागत होते व ते (सोनार) आपल्या ग्रंथांत कबूल करितात असें असून प्रस्तुत सोनारांच्या विधवा स्त्रियांचीं मस्तकें पाहिलीं असतां ब्रह्मदेव केश उत्पन्न करण्यास विसरला काय? असा भास होतो. पुढें लोहार, कांसार, सुतार, पाथरवट, यांच्या स्त्रिया केश काढूं लागतील त्यावेळीं

* १२१।१३३ पर्यंत २१ नांवें आहेत.

" नापितांस " अकरावा गुरू आलाच आला असें समजलें पाहिजे. तात्पर्यार्थ श्रुति, स्मृति, पुराणें इत्यादिकावरून "सोनारादिक" नीच असें सिद्ध असून "सोनारांनीं" हातोडा, बागेसरी, फुंकणी इत्यादि आयुधें घेऊन खोटे तीन ग्रंथ केले त्याच प्रमाणें घण, ऐरण, भाता, तासणी, सामता, करवत, टांकी, इत्यादि सामान घेऊन " लोहार. सुतार, पाथर्वट, कांसार हे ही खोटे ग्रंथ करतील तरी ते ग्रंथ सोनारांच्या ग्रंथा प्रमाणेंच खोटे समजावे. कारण सर्व ग्रंथांत हे (सोनारादिक) लोम, विलोम असून पतित असें सिद्ध आहे.

सारांश वाचक हो सोनारांनीं केलेले " ब्रह्मविचार, सद्बोधचिंतामणि, सुखमासी ब्राह्मण वर्णन " ग्रंथ ३ यांचें "श्रुति, स्मृति, पुराणें, इतिहास, आगम, उपनिषदे " इत्यादिकांतील सत्य वचनें करून खंडन केलें आहे. एकविषयावर अनेक ग्रंथांचीं प्रमाणें ग्रंथवृद्धि भयार्थ न देतां एक दोन दिली आहेत. त्यावरून "कुंभीपुलाक" न्यायानें विचार करून आदिरंत ग्रंथ वाचून पाहण्याचे श्रम घेतले असतां कर्त्याचे श्रम सफल होऊन वाचकांचे आभार मानले जातील.

श्रुतिस्मृतिपुराणानामर्थः प्राकृतभाषया ॥ अज्ञानांस्सुखबोधाय कृतोप्येवं यथामति ॥ १ ॥ दृष्टिदोषेण यज्जातं न्यूनाधिक्यं तथाऽज्ञतः ॥ *पुरोभागिपदं हित्वा सारं गृण्हंतु वै बुधाः ॥ २ ॥ **अर्थ-** अज्ञ लोकांला सुलभरीतीनें कळावें म्हणून, श्रुति, स्मृति, पुराणें इत्यादिकांचा अर्थ प्राकृत भाषेंत यथामति केला आहे. यांत अज्ञानें करून किंवा नजरचुकीनें जें " न्यूनाधिक्य " असेल तिकडे विशेष लक्ष्य न देतां त्यांतील सार पंडितांनीं ग्रहण करावा. यास दृष्टांत- प्रेम्णा सद्भिर्ग्रंथः सेव्यः शब्दार्थतः सदोषोपि ॥ संशोध्य राजहंसः पिबति क्षीरं हि तोयमिश्रमिव ॥ १ ॥ **अर्थ-** राजहंस पक्षी उदकमिश्रित दुग्धातें शोधून दुग्धच प्राशितो. तसेंच हा माझा ग्रंथ सदोष आहे तथापि विद्वानांनीं प्रेमपूर्वक शब्दार्थें करून त्याचें सेवन करावें.

---

* दोषैकदृक्पुरोभागीत्यमरः

श्रीमत्ककुद्मतीकृष्णा संगमस्योपकंठतः ॥
करहाटमितिक्षेत्रं प्रख्यातं बहुपुण्यदम् ॥
एतस्मादुत्तरेभागे द्वियोजनप्रमाणतः ॥
प्रसिद्धे तारळेग्रामे श्रोत्रियेत्युपनामधृक् ॥
गार्ग्यगोत्रोद्भवोयज्वा श्रुतिस्मृतिपरायणः ॥
भट्टनारायणइति ख्यातस्तस्यात्मजः सुधीः ॥
पितृवद्गुणयुक्तस्तु ज्योतिःशास्त्रादिपारगः ॥
शिवरामइतिख्यातस्तत्सूनुश्च* मनोजवः ॥
सखारामेतिविख्यातो दैवज्ञः स्मार्ततत्परः ॥
बाल्यएवपितृघातत्वात् तत्कृपावर्धितेनवै ॥
तस्यानुजेनहिकृतो ग्रंथोविठ्ठलशास्त्रिणा ॥
नागांकशैलेंदुमितेशाकेच धात्रब्दके। मार्गसितेचतुर्थ्यां
सच्छास्त्रमंडनमितिप्रचुरैःप्रमाणै ग्रंथः कृतोविठ्ठलशास्त्रिणालघुः ॥

---

इदं पुस्तकं मुंबापुर्यां सोहनीत्युपाह्व रामचंद्रात्मज नारायणशर्मणः जगदीश्वराख्यशिलायंत्रे मुद्रितम् ।

---

* पितृतुल्यः